Your Posts 2023

धन्यवाद, मित्रवर्य चंद्रमोहन !

@ पूर्व नोंदणी करणारे मित्रहो

@ प्रकाशित झाल्यावर घेणारे मित्रहो

— दोघांनाही आश्वस्त करतो आहे की, लवकरच

।आवर्तने — चं.प्र.देशपांडे।हे पुस्तक उपलब्ध करून देत आहे.

किंमत ₹ 450/-

पूर्वनोंदणी ₹ 375/-

संपर्क : 86249770290 पुस्तकवाला ॲण्ड कंपनी पुणे

9923724550

वर्णमुद्रा पब्लिशर्स शेगाव

।। प्रकशनपूर्व नोंदणी ।।

आवर्तने: कविता, आशय, आकलन । लेखक: चं. प्र. देशपांडे

पृष्ठ संख्या: २४०+

बांधणी: हार्डबाउंड

मूळ किंमत: ₹४५०/- । विशेष सवलतीत: ₹३७५/- (टपाल खर्चासहित)

एक गोष्ट मी स्पष्ट करू इच्छितो. साठोत्तरी, नव्वदोत्तरी, आधुनिक, उत्तरआधुनिक, असे कप्पे लक्षात घेऊन मी इथे लिहिणार नाही. एक वाचक म्हणून कविता समजून घेणे, असे त्याचे स्वरूप असेल, एक विद्वान अभ्यासक म्हणून नव्हे. कवितेचा वाचकाशी होणारा संपर्क हा अभ्यासाच्या बौद्धिक स्तराचा असणे हे मला कविता आत्मसात होण्यातला अडथळा वाटते. कवितेत अमुक इझम्स असतात असेही मी गृहीत धरणार नाही. कवी हा बाहेर, व्यवहारात कोणत्याही विचारसरणीचा असो, प्रत्यक्ष कविता लिहिताना त्याने ती वैचारिक चाकोरी वा आकलन-मर्यादा सोडलेली असू शकते. कवी हिंदुत्ववादी आहे की कम्युनिस्ट आहे याचा कविता वाचनात संबंध आणू नये. असे दिसून येते की कवितेच्या आधी कवीचेच वाचन व मूल्यमापन केले जाते. हे पूर्णतः चुकीचे आहे. कवीची विचारसरणी, त्याची नैतिकता, तो कर नीट भरतो की नाही, या गोष्टींची माहिती वाचकाने मुळीच डोक्यात ठेवायची गरज नाही. हेच जरा पुढे नेऊन असेही म्हणता येते की कवितेतला मी आणि स्वत: कवी हे एकच असे समजणेही चुकीचेच आहे. ते प्रत्यक्षात एकच असले तरीही कविता लेखनाच्या सर्जक प्रक्रियेत तो कवी व्यवहारातली एक व्यक्ती म्हणून तिथे उपस्थित नसतो.

- Champra Deshpande

पुस्तकासाठी संपर्क: 8624977029 or wa.me/918624977029

#PustakwalaAndCompany

" तुम्ही एवढे नीचपणे कसे वागलात ? "

" २००३ साली तुम्ही नव्हता का वागलात नीचपणे ? "

३) आवर्तने (कविता-आशय-आकलन)

(मर्ढेकर ते मन्या जोशी)

•सामान्यत: अलीकडची बरीच मराठी कविता ही खुजी आहे असे मला जाणवत होते. नुसते ज्ञानेश्वर, तुकाराम थोडेफार अभ्यासल्यामुळेच नव्हे तर जगातलेही अनेक कवी वाचल्यामुळेही.

•आपल्याकडे वा जगभर कवितांच्या अनेक व्याख्या केल्या गेलेल्या आहेत. प्रत्येक विचारवंत वा कवी हा त्याला महत्त्वाची वाटणारी गुणवैशिष्ट्ये घेऊन या  व्याख्या सांगतो, हे तर उघडच आहे आणि समजण्यासारखेही आहे. तरीही त्यातले काळाच्या  ओघात महत्त्वाचे ठरलेले कवी काय म्हणताहेत हे दुर्लक्षिता येणार नाही. प्रामाणिकपणा सगळ्यांचाच गृहीत धरला तरी माझ्या आकलनातून मला काय वाटते ते मांडावे, असे मला वाटत होते.

•समीक्षकांनी आणि उपपत्तिकारांनी या बाबतीत मांडलेले विचार लक्षात घेऊन मराठी कवितेबद्दल काय बोलता येईल, असे विचार मनात येत होते. कलेत हे असे सामान्यीकरण फसवे असते हे तर मान्यच करावे लागते. दोनचार कवितांच्या जोरावर काही कवी अमर झालेले दिसतात, हेही लक्षात घ्यावे लागणारच. त्यामुळे, एका एका कवीचे – त्याच्या पूर्ण काव्यलेखनाचे मूल्यमापन करावे लागेल का, असा प्रश्न आला. मी स्वत: निरनिराळ्या नोंदी ठेवणारा अभ्यासक नाही, हे एक आणि दुसरे म्हणजे या कामाला मी वेळ किती देणार आहे, हेही प्रश्न समोर आले. मी स्वत:ही थोडाफार कवी, नाट्यलेखक असल्याने मला ते अधिक महत्त्वाचे वाटणार हे तर सरळच होते.

या सगळ्यातून हळूहळू मनात मार्ग असा ठरत गेला की असंख्य खुज्या कविता घेऊन त्यांचे खुजेपण दाखवत बसण्यापेक्षा प्रत्येक कवीच्या, सापडतील त्या, एकदोन चांगल्या कवितांवर लिहीत जावे.

•ही पद्धत चांगली वाटली. मी काही मराठी कवितांचा पूर्ण आढावा घेण्याची जबाबदारी घेतच नाही आहे. मला सहज उपलब्ध झालेले काही कवी मी इथे घेतले आहेत.

•इतर कवींच्या बऱ्याच कविता चांगल्या असूही शकतील. त्यांची आणि माझी दोघांचीही झाकली मूठ राहू शकणे हा एक यातला दिलासा म्हणायचा. मुख्य हेतू मी कोणत्या कवितांना चांगल्या म्हणतो ते व्यक्त व्हावे हाच तर आहे. सारांश म्हणजे या कामासाठी इथे निवडलेले कवी वा त्यांच्या कविता यात कोणतीही कंपूगिरी वा टोळीबाजी नाही. शिवाय, इथे मी एखाद्या कवीच्या एकदोन कवितांवर बोलतो आहे याचा अर्थ त्या त्या कवीच्या सगळ्याच कविता मला चांगल्या वाटतात असे नाही. मी वा मला वाटणे याच पद्धतीने मी लिहिणार आहे. हे स्वत:चे महत्त्व सांगण्यासाठी नसून आधीच नम्रपणे माझी मर्यादा स्वीकारणेही आहे. हा मुखवटा मी स्वीकारत असलो तरी जे लिहिणार ते माझ्या निर्भेळ आकलनाचेच असणार, हेही अर्थात आहेच. पण, काहीतरी सनसनाटी काम करावे असा मात्र यात विचार नाही. एखादा विद्रोह वा क्रांती मांडण्यासाठी हे नाही. एका मराठी माणसाच्या मेंदूने केलेले हे एक आत्मचिंतन आहे, असे म्हणायला हरकत नाही. तरीही, या निमित्ताने कवितेकडे पाहणे, ती वाचकाला पोचण्याची वा

समजण्याची प्रक्रिया अशा अंगाने काही बोलायचा विचार आहेच. निदान नव्या कवींना आणि वाचकांना तरी ते इंटरेस्टिंग वाटेल असे वाटते.

— चं.प्र.देशपांडे

सिमिक गेला आणि खूप म्हणजे खूपच वाईट वाटले

परवा म्हणजे ९ जानेवारीला चार्ल्स सिमिक गेला आणि खूप म्हणजे खूपच वाईट वाटले. विसाव्या शतकातील सर्वोत्तम म्हणावे अशा काही कवींपैकी तो एक होता. त्याच्या कवितेची  ओळख तशी फारशी जुनी नाही. साधारण आठ दहा वर्षांपूर्वी Poetry Foundation या Washington येथील कवितेला वाहिलेल्या साहित्यिक संस्थेद्वारे प्रकाशित होणाऱ्या Poetry या नियतकालिकातून त्याच्या कवितांची ओळख झाली होती. ती ओळख आता आयुष्यभर पुरेलच पण तो सातासमुद्रापार अमेरिकेत चालता बोलता आहे आणि अधूनमधून कविता लिहित असेल, ही जी एक कुठलाही ठोस आधार नसलेली भावना परवा पर्यंत मनात होती, ती मात्र आता नसेल. म्हणून वाईट वाटले. तो नसेल पण त्याच्या कविता असतीलच की. घरातल्या कवितांच्या कपाटातून कधीही त्याचे संग्रह काढून कुठल्याही पानावरून नजर फिरवायला सुरुवात केली की चार्ल्स सिमिक सोबतीला असेलच.

असेच काहीसे अर्नेस्तो कार्देनाल हे कवितेच्या क्षेत्रातील आजोबा अलीकडेच गेले तेव्हाही वाटले होते. कार्देनाल यांना तर व्यक्तीशः भेटायचीही खूप इच्छा होती. आपले मित्र हेमंत दिवटे हे कार्देनालच्या मृत्यू आधी त्यांना भेटले होते. त्यांची ती पांढरी शुभ्र दाढी लोण्याच्या गोळ्यासारखी भासत असेल आणि त्यांचे हात लोण्याइतकेच मऊ असावेत असं का कुणास ठाऊक पण उगीच वाटत असे. दिवटेंचा त्यांच्या शेजारी बसून काढलेला फोटो बघून उगीच हेवाही वाटला होता. पण पिकलं पानच ते शेवटी, वयाच्या भाराने पिकून गळलं शेवटी.

सिमिक या बेलग्रेडमध्ये जन्मलेल्या आणि अमेरिकेत आयुष्य घालवलेल्या कवीला तर आपल्यापैकी कुणीही भेटलं नसेलच. पण तरीही आपल्यापैकी काही कविता लिहिणाऱ्या, वाचणाऱ्या मंडळींना त्यांच्याबद्दल मला वाटते तशीच आपुलकी वाटतच असेल, असे पुन्हा उगीच मनातल्या मनात वाटत असे. चंप्र देशपांडे यांनी जगातल्या त्यांना आवडलेल्या काही निवडक कवींच्या निवडक कविता त्यांच्या पद्धतीने भाषांतरित करून 'तंबाखूची टपरी' या संग्रहात छापल्या होत्या. त्या संग्रहात सिमिकच्या कविता वाचून चंप्रना मी मनातल्या मनात 'धन्यवाद सर', असे म्हटले होते. रवी लाखे आणि मी तर सिमिकच्या कवितांबद्दल बरंच बोलत असतो. साठ सत्तर वर्षे सातत्याने कविता लिहिणाऱ्या सिमिकचे वीसेक तरी कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. पैकी 'The World Doesn't End' या कवितासंग्रहाला जगातील अत्यंत सन्मानाचा मानला जाणारा १९९० साली Pulitzer पुरस्कार देण्यात आला होता. नंतर एकदा पुन्हा त्यांचा दुसरा संग्रह Pulitzer पुरस्कारासाठीच्या अंतिम यादीत होता. त्याला इतर अनेक मानाचे पुरस्कार मिळाले, खूप मानसन्मान व प्रतिष्ठा लाभली. परंतु जेव्हा जेव्हा त्यांना मी कविता वाचताना पाहिले तेव्हा तेव्हा ते एखाद्याअत्यंत नम्र व्यक्तीने मान खाली घालून आवाजाचे उतार-चढावाचे प्रयोग न करता कविता वाचावी तसे कविता वाचत असत. खरं म्हणजे त्यांच्या कवितेतील प्रतिमा, त्यांची काव्यभाषा आणि त्यांच्या कवितेतील नाट्य या गुणांमुळे ती कविता अनेक लोक जसे अभिवाचन करताना सादरीकरणाचे प्रयोग करतात तशी ती सादर करता

येईल, असे वाटते. परंतु सिमिक मात्र जवळजवळ एकाच लयीत एकसुरी पद्धतीने स्वतःच्या कविता वाचायचे. पण मी जितक्यांदा त्या कविता वाचतो किंवा ऐकतो तेव्हा एक वेगळीच तंद्री लागते. अमेरिकेत त्यांच्या कवितांचे वाचन जिथे कुठे आयोजित केले जायचे तिथे तिथे मोठ्याप्रमाणात लोक ऐकायला येत असत. त्यांच्या कवितेचे काव्यशास्त्रीय पद्धतीने विश्लेषण आणि वर्णन भरपूर झालेले आहे. परंतु एका वाक्यात सांगायचे तर त्यांच्या कवितेतून माणसाच्या वैचित्र्यपूर्ण आणि दुःखी अस्तित्वाबद्दल त्यांना वाटणारी करुणा अक्षरशः सातत्याने एखाद्या नदीप्रमाणे प्रवाहित राहिली. सिमिक यांच्या कविता आशयाच्या दृष्टीने, रूपाच्या दृष्टीने आणि ज्यांना Poetic Devices म्हणतो त्यांच्या वापराच्या दृष्टीने या विसाव्या शतकातील सर्वोत्तम म्हणाव्या अशा कवितांपैकी एक आहेत. त्यांच्या कवितेतील त्यांची नव्यानव्या प्रतिमा घडवण्याची प्रतिभा तर अगदी थक्क करणारी आहे. दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या झळा प्रत्यक्ष भोगलेला हा कवी स्वतःची कविता भावनेच्या भरात शब्दबंबाळ, आक्रस्ताळी किंवा प्रचारकी चुकुनही होऊ देत नसे. सिमिकला कवितेचे अल्पाक्षरीत्व जास्त भावत असावे, त्यामुळेच कमीतकमी ओळींत आणि कमीत कमी शब्दांत प्रचंड मोठा आशय ठासून भरण्याची कला त्याला उपजत असावीच, पण ती त्याने कष्टपूर्वक जोपासलीही असावी, असे किमान मला तरी वाटते.

मराठी कवींना कवितांसाठी चांगली शीर्षके आणि संग्रहांसाठी चांगली नावे अभावानेच सुचतात, अशी एक लडिवाळ तक्रार आमचे गुरुजी करत असत. त्यादृष्टीने सिमिकच्या कवितासंग्रहांची नावे आणि कवितांची शीर्षके खूपच वेगळी आणि एकदम ध्यान आकर्षित करणारी अशी आहेत. उदाहरणार्थ, त्याच्या एका संग्रहाचे नाव 'Hotel Insomnia', तर दुसऱ्या संग्रहाचे नाव 'Weather Forecast for Utopia & Vicinity' आणि तिसऱ्याचे नाव 'Return to a place lit by a glass of milk' हे आहे. अशी नावे सुचणे मला तरी थोरच वाटते.

त्याच्या अल्पाक्षरी कवितेची ताकद त्याच्या एका दोन ओळींच्या कवितेतून दाखवून देता येते. त्या कवितेचे शीर्षक आहे 'Evening Chess'. ती कविता वाचाच.

Evening Chess

The Black Queen raised high
In my father's angry hand.

या दोन ओळींच्या कवितेत व्यंग्यार्थ कसा ठासून भरलेला आहे. अर्थाच्या किती शक्यता त्या दोन ओळींत दडलेल्या आहेत. सामाजिक आशयाची, विद्रोहाची, निषेधाची, प्रतीरोधाची कविता आवडणाऱ्या काव्यरसिकाला या दोन ओळींत पुरुषप्रधान संस्कृतीवर सिमिकने केलेला तीव्र आघात दिसेलच तर त्याचप्रमाणे आशयासोबत रुपाबद्दलही सजग असणाऱ्या काव्यरसिकाला The Black Queen या तीनही शब्दांचे पहिले अक्षर आवर्जून Capital केल्याचे लक्षात येईल. त्याचप्रमाणे एखादे विधानात्मक गद्य वाक्य कुठे तोडायचे हा निर्णय चांगला कवी अत्यंत विचारपूर्वक घेत असतो. तसाच निर्णय सिमिक यांनी एका विधानाच्या दोन ओळी करताना किती काळजीपूर्वक घेतला आहे बघा. पहिल्या काव्य वाक्यात फक्त Black Queen बद्दलचे काव्यविधान आहे तर दुसऱ्या वाक्यात वडिलांच्या म्हणजे पर्यायाने पुरुषप्रधान संस्कृतीच्या रागाने उंचावलेल्या हाताबद्दलचे काव्यविधान आहे.

ही आणि यासारख्या असंख्य कवितांनी इतकी वर्षे आपल्या सारख्या हजारो लाखो काव्यरसिकांना एका समृद्ध काव्यानुभावाची साथ दिली. त्यासाठी चार्ल्स सिमिक यांचे मनःपूर्वक आभार आणि त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन.

--- गणेश कनाटे.

चार्ल्स सिमिक.

अनुसर्जन : चंप्र देशपांडे

वाचन – मनोज पाठक.

या खालील गाण्याची एक गंमत आहे. याच्या चालीवर तुम्ही कोणतीही अक्षरे बसवू शकता ! तसे केले की याचे एक उत्तम बडबडगीत तयार होते ! या गीताच्या उपयोगाने मनाची पोकळी हा प्रश्नच नाही राहात ! मग एकच पायरी राहते. त्या बडबडगीताला लेट गो म्हणजे जाऊ दे करायचे की तुम्ही क्षणात एक मुक्त पक्षी होता ! करून बघा --- ( सांझ ढली --- काला बाजार. )

ही आहे चंप्र देशपांडे सरांच्या ।आवर्तने। ची नमूना प्रत.ती मंजूर झाल्यामुळे आता पुस्तक साताठ दिवसांत उपलब्ध होईल.

प्री बुकिंग केलेल्यांना ₹ 375/- मध्ये पुस्तक पाठवत आहे.

नव्याने मागविणाऱ्या मित्रांना आता ते ₹ 450/-

ला मिळेल.

प्री बुकिंग यादी पुढीलप्रमाणे आहे, परंतु आजच माझ्या फोनमधील नावे गायब झाली आहेत, मी ती रिकव्हर करीनच, परंतु ही पोस्ट वाचून खालील यादीतील मित्रांनी

मला पत्ता पिनकोड मोबाईल नंबर सह कळवला तर पुस्तक डिलिव्हरी फास्ट करू शकतो.

नम्र विनंती!☺🙏

माझा व्हाटस् अप नंबर

9923724550

ॲन इंट्रोडक्शन

— कमला दास

(तंबाखूची टपरी : चंप्र देशपांडे)

वाचन – मनोज पाठक.

बजेट म्हणजे काही रामायण वा महाभारत मालिका किंवा क्रिकेटचा अंतिम सामना नव्हे --- सगळे फिरताहेत रस्त्यांवरून !

१. सर्वांच्या आशा पल्लवित !
२. अत्यंत निराशाजनक !
३. पैसे आणणार कुठून ?
४. सामान्य माणूस -- बघू -- पाहू –

आपण विद्वान नाही.
विद्वानांत खूप मतभेद असतात.
कोणत्या विद्वानावर विश्वास ठेवायचा हे ठरवणे, हेच आपले काम !

१. महाराष्ट्रातले सरकार फेब्रुवारीत पडेल !
२. महाराष्ट्रात कोणत्याच निवडणुका होणार नसल्याने या राज्याकडे दुर्लक्ष !

There is no one in you who needs to be happy. There is no one in you who needs to be miserable. They are both impostors. So every time you try to exchange negative conditioning to positive conditioning, you're causing conflict. This is the reason psychology and psychiatry does not work. For they're trying to make you normal. Who wants to be normal? How boring.
--- Robert Adams.

पुन्हा संमेलन

खरे तर साहित्य संमेलन या महोत्सवाशी माझा काही संबंध नाही. तरीही, मीही काही लिहीत असतो त्यामुळे, एक गंभीर चाळा म्हणून यावर लिहावेसे वाटते. हे नाही लिहिले तर काय बिघडणार आहे, हे जसे खरे आहे तसेच, हे लिहिले म्हणूनही काही बिघडणार नाही, हेही खरेच आहे. तर, यंदा, न्या. नरेंद्र चपळगावकर अध्यक्ष आहेत. ते गांधीवादी विचारवंत आहेत. त्यांचे भाषण अमूकच कुणाच्या बाजूचे वा अमूकच कुणाच्या विरोधावरच केंद्रित असे नसणार याची कल्पना होती. त्याप्रमाणे साधक-बाधक विचार मांडणारे असे अनाक्रमक, समतोल भाषण त्यांनी केलेले आहे. सरकारी हुकुमशाही नसावी या मुद्याबरोबरच त्यांनी खालील मुद्देही मांडलेले आहेत ---

एक --- जो अनुभव त्याला सांगायचा आहे त्याच्याशी सूतराम संबंध नसलेले आपण लिहू नये, याची त्याने काळजी घेतली पाहिजे. कोणाची तरी बदनामी करणे अगर आपल्या मनातील कशाबद्दलची तरी नाराजी व्यक्त करणे हा लेखकाचा उद्देश असेल तर ते वाङ्मयबाह्य प्रयोजन असते. लेखकाचे स्वातंत्र्य कधीकधी त्याच्या डोळ्यावर लागलेल्या झापडामुळे आपोआप नष्ट झालेले असते. अमूक प्रकारचेच साहित्य लिहावयाचे, तेच देशहिताचे आहे, अगर आपल्या तत्त्वज्ञानाच्या समर्थनार्थच लिहिले पाहिजे, असा त्याचा चुकीचा समज झालेला असतो.

दोन --- साहित्यिकांशी हितगूज करताना विनोबांनी काही महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या. प्रथम त्यांनी सांगितले की, अनुभवाहून अलग झाल्याशिवाय साहित्य लिहिताच येत नाही. विनोबा हेही म्हणाले की, अनुभवाला आपल्या प्रतिक्रियांची आणि मतांची जोड देण्याची आपल्याला आवश्यकता भासली म्हणजे तो अनुभव साहित्यच राहत नाही.

--- हे दोन मुद्दे काहींच्या म्हणजे ‘ भूमिकावाल्यांच्या ‘ कदाचित पचनी पडणारे नाहीत, असे वाटते. पण, चपळगावकर हे गांधीवादी असल्याने ते हिंदुत्ववादी नाहीत याची सहानुभूती म्हणून एक स्ट्राटेजीचा भाग म्हणून त्यांच्या या मुद्यांना फारसा विरोध होणार नाही. ते ठीक आहे.

या निमित्ताने मला एक वेगळाच मुद्दा मांडायचा आहे. तो आहे आपण ज्याला वाचन-संस्कृती म्हणतो, त्याबाबतचा. काल मी एका पुस्तक प्रदर्शनाला गेलो होतो. तिथे लाखभर इंग्रजी पुस्तके आहेत असे कळल्याने मुद्दाम गेलो होतो. मला वाटले होते की काही ‘ आजचे ‘ ललित लेखन वा समीक्षा असलेले असे काही असेल. तर पूर्ण भ्रमनिरास झाला ! सगळी चकचकीत बांध्याची ५०० ते ६०० पानांच्या प्रामुख्याने कादंबऱ्यांची आणि उघडच निव्वळ करमणुकीची पुस्तके होती ! या जगाच्या वाचन संस्कृतीचे हे दर्शन झाल्यावर माझ्या मनात विचार आला की याला वाचन संस्कृती म्हणावे का ? हा अर्थातच विवाद्य मुद्दा आहे, पण, असली आणि इतकी प्रचंड वाचन संस्कृती इथे नाही आहे, याचे मला समाधानच वाटले. आपल्या वाचन संस्कृतीचे तितकेच घातक असे दुसरे काही दोष आहेत -- उदा ० – इतिहास-पुराणात रमणे, अस्मितांमध्ये मश्गूल राहणे, विभूतिपूजा, वगैरे. तरीही, या अध्यक्षीय भाषणाबाबत बोलताना एक विचार आला की अध्यक्षांनी यावर बोलायला हवे होते. विशेषत: ललित लेखनावर. सर्व समावेशक नाही शक्य, पण, थोडे तरी. पण लेखकांचे उल्लेख करून बोलावे तर हेच का, ते का नाहीत, असा गटनिहाय संवेदनशीलतेचा दबाव अध्यक्षांवर येत असावा. त्यामुळे, अध्यक्षांनी यावर बोलायचेच नाही अशी प्रथा पडत आहे. अभिव्यक्तिस्वातंत्र्य संकोचच म्हणावे लागेल यालाही !

– ० --

चंप्रंचे ।आवर्तने। किंचितसा

उशीर लावत का होईना, पण एकदाचे आले.

मी वर्धेहून परतलो की, तुम्हांला पण पाठवतोच.

।पाठवले की मिळतेच।☺🙏

सरत्या-येत्या वर्षातील संधिकालात अपूर्व समाधान देणारे हे चतुष्ट्य.

शब्दशः।मास्टर्स स्ट्रोक।

मला स्वतःलाच, हे ठेवू आणि ते वाचू की, हे वाचू आणि ते ठेवू होते आहे.

— एकेक मागवा किंवा चारही एकसमायावच्छेदे मागवा.

असू द्या ही पुस्तके जवळ.

ओनर्स नव्हे एडिटर्स चॉईस! ☺🙏

संपर्क :

•वर्णमुद्रा पब्लिशर्स शेगाव जिल्हा बुलढाणा

9923724550

•पुस्तकवाला ॲण्ड कंपनी पुणे

8624977029

किमती नेहमीच्याच -

400, 424, 450, 504

शक्य असेल तितक्या सवलतीत. ( Manoj Pathak )

हे फुलपाखरू फूटपाथवरून चालत होते ! त्याला उडता येत नसावे ! कदाचित ते त्याचे शेवटचे क्षण मोजत असावे --- ( with photo )

हे फुलपाखरू फूटपाथवरून चालत होते ! त्याला उडता येत नसावे ! कदाचित ते त्याचे शेवटचे क्षण मोजत असावे --- “ मै चला जिधर जमाना चल पडे “ ( मिस बॉम्बे 1957. )

युगधर्म

हिंदी सिनेमांत जसे रस्त्यातून हसत बागडत खेळत पळत गाणी म्हणत जाणारे हीरो असतात तसे पुण्यात अनेक दुचाकीस्वार -- बाईकस्वार आहेत ! ते त्यांच्या मस्तीत वाहने वेगात पण नागमोडी पद्धतीने चालवतात ! ते भयानक आणि धोक्याचे असतात ! पण कुणी कुणाला काही बोलायचे नाही, असा काळ आहे ! एवढ्याश्या कारणासाठी ' प्राण घेतलं हाती ' अशी अवस्था होऊ शकते ! तरीही, मनात एक वाक्य येतेच -- " अरे च्युत्या, तू असशील आनंदात पण इतरांचा जीव कशाला धोक्यात घालतोस ? " यावरचे त्याचे उत्तर काय असू शकेल तेही येतेच ना डोक्यात -- " अरे बांडगुळा, रस्त्यावर हे सगळे असणार -- नसेल सहन होत तर येऊ नकोस ना रस्त्यावर ! " मुंबईच्या लोकलमध्ये जसे पायावर पाय पडणे हे अटळ आणि ' नैसर्गिक ' आहे, तसेच हे म्हणायचे !

आपण आनंदात आहोत याचे प्रदर्शन का करावेसे वाटत असेल कुणालाही ? की बेफिकिरी आणि उन्माद यांचा अंगीकार हा एक आता युगधर्मच झाला असावा ? की एखाद्या पक्ष्याने गाणे म्हणणे आणि हे दोन्ही सारखेच समजावे ?

--- ००० ---

चित्र कळणे

मी काही चित्रकलेचे रीतसर प्रशिक्षण वगैरे घेतलेले नाही. थोडेफार वाचन आणि काही ' पाहणे ' हीच माझी या कलेतली संपर्क-सामुग्री. पण त्यामुळेच मी या विषयावर लिहिले पाहिजे असे वाटले. कोणतीही कला ही काही फक्त प्रशिक्षितांसाठी नसते – ती सर्वच इच्छुकांसाठी आणि उत्सुकांसाठी असते, हे जर खरे असेल तर मीही या विषयावर लिहायला हरकत नाही. काही वेळा, एखादा म्हणतो की अमुक कविता दुर्बोध आहे, तिच्यात काही ऐवजच नाही किंवा अमुक नाटक कितीही प्रामाणिकपणे पाहिले तरी ' हाताला काही लागत नाही ', म्हणजे काय असते हे हाताला लागणे ? त्यांनाही जेव्हा एखादी कलाकृती आवडते तेव्हा काय घडत असावे ? ते म्हणजे ' नको तिथंच पडला अवचित माझा हात ' असे काही असेल का ? बऱ्याच लोकांना नाटक पाहिले की ' नाट्यात्म विधान ' सापडावे लागते, म्हणजे मगच ते नाटक त्यांना समजले, असे वाटते. याचा अर्थ त्यांना त्याची एक वैचारिक कॅप्सूल करता यावी लागते, हे उघड आहे. हे असले सगळे घोळ कोणत्याही कलेच्या संपर्कात येताना असतातच. संगीत ऐकताना मनात वीरभावना निर्माण झाली, दु:ख वा विरह जाणवला म्हणजे ते कळले असे वाटत असावे.

चित्राच्या बाबतीत, फोटोग्राफिक चित्र काढता येणे हीही काही सोपी गोष्ट नसते, त्यालाही प्रचंड कौशल्य लागतेच. पण तेवढ्याच बाबीला सर्जक कला असे म्हणता येईल का, असा प्रश्न येतो. ज्याला इंप्रेशनिस्टिक किंवा ठसावादी वा प्रभाववादी कला म्हणता येईल तिच्यात आकार ओळखू येतात पण ते ' जसेच्या तसे ' नसतात. रंग, आकार, पोत, रचना हे सगळेच कॉपिबहाद्दरगिरीपासून लांब असते. हे नव्यानेच पाहणे आणि घडवणे असते. हे नवे काय आहे, वास्तवापासून यात वेगळे काय आहे, त्यामुळे काय घडते आहे – असा विचार करत आणि ' पाहात ' गेले की त्या चित्रातली सर्जकता उलगडू लागते. कोणत्याही कलेत, तीत अंतर्भूत असलेल्या सर्जकतेबरोबर जाणे म्हणजे ती कळणे, हे इथे लक्षात घ्यावे. यासाठी, अर्थातच, पूर्वग्रहविरहित दृष्टीने चित्र पाहता यायला हवे. कळणे म्हणजे ' आपल्या सवयीत बसवणे ' हा विचार सोडला पाहिजे. संगीताच्या एखाद्या उत्तुंग आविष्कारात, आपल्याला हा अमुक राग आहे असे कळले नाही तरीही, आपण त्या गायकाच्या सर्जकतेबरोबर राहू शकतो. तसेच चित्रात आहे. चित्र ' आवडणे ' पासून ते ते ' ग्रेट आहे ' इथपर्यंत जाणे म्हणजे त्यातल्या सवयबाह्यतेचा, ' माहीत नसण्याचा ' प्रत्यय येणे.

अमूर्त चित्रकला तर ओळखीचे जग घेतच नाही संदर्भाला. हे अमुक आहे असे म्हणून तिथे काही संपत नाही. सर्जकता असलेली कोणतीही कलाकृती ही ' कळून संपली ' असे होऊ शकत नाही. म्हणजे प्रत्येक अमूर्त चित्र ग्रेट असते का ? उगीचच काहीही गिचमिड केले तर त्याला अमूर्त चित्र म्हणता येईल का ? या प्रश्नावर विचार करता हे लक्षात येते की प्रथमत: माध्यमावरची हुकूमत जाणवतेच. आणि त्या चित्रात जे काही आहे ते चित्रकाराच्या सखोल चिंतनप्रक्रियेतून आलेले असते. आता हे कशावरून ? तर ते चित्र पाहात राहावे असे आपल्याला वाटते आणि खुल्या

मनाने आपण ते पाहात राहिलो तर त्या सर्जकतेच्या प्रक्रियेत आपण जाऊ शकतो. चित्र पाहावेसे वाटणे, आपले पूर्वग्रह सोडावेसे वाटणे आणि सवयबाह्य आशयाची जाणीव होणे ही चांगल्या चित्राची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. यावरून एक प्रश्न असा येतो की एखादे उत्तम चित्रप्रदर्शन मी पाहिले आणि आता मला त्यावर लिहायचे आहे तर मी काय, कसे लिहिणे अपेक्षित आहे ? तर, थोडक्यात, कोणकोणत्या प्रक्रियांनी ती चित्रे ‘ नवा ‘ म्हणजे सवयबाह्य आशय देत आहेत, हे सांगायला हवे. तेही वैचारिक सारांश न काढता.

--- ००० ---

" ते जर अपात्र व्हायला पात्र असतील तर ... "

"आवर्तने (कविता आशय आकलन)" हे मनोज पाठक यांच्या वर्णमुद्रा प्रकाशनाने प्रकाशित केलेले, चं. प्र. देशपांडे यांनी अगत्याने सस्नेह पाठवलेले नवीन पुस्तक काल घरी आले.

वर्णमुद्राच्या इतर सर्वच पुस्तकांप्रमाणे उत्तम निर्मितीमूल्य हे या पुस्तकाचेही वैशिष्ट्य आहेच. चंद्रमोहन कुलकर्णी यांनी केलेले पुस्तकाचे मुखपृष्ठ हे एक व्यापक व सखोल पेंटिंग आहेच तसेच ते आधुनिक मराठी कवितेतील विविध विषय, प्रतिमा, प्रतिके यांचे निदर्शकही आहे.

या पुस्तकात बा. सी. मर्ढेकर ते मन्या जोशी अशा आधुनिक मराठीतील एकूण ३६ कवींच्या काही निवडक चांगल्या कविता निवडून त्यांवर चंप्रंनी आपले आकलन मांडलेले आहे.

त्याचबरोबर ९० पृष्ठांच्या प्रदीर्घ प्रस्तावनेतून चंप्रंनी मांडलेले आधुनिक मराठी कवितेसंदर्भातील सखोल चिंतनात्मक आकलन अभ्यासकांसाठी निश्चितच उपयुक्त व महत्त्वपूर्ण ठरेल.

या प्रस्तावनेत सुरुवातीलाच चांगली कविता म्हणजे काय याविषयी त्यांनी मांडलेली निरीक्षणे (पृष्ठ क्र. ११ ते १३) पुढीलप्रमाणे -

चांगली कविता ही वाचकाला एखाद्या अनुभवात, सुखदुःखात, मूडमध्ये, विचारात वा मतात गुंतवून ठेवत नाही. या अर्थाने ती वाचकाच्या स्मृतीत भर घालण्याचे काम करत नाही. ती त्याचे भूतकाळाचे ओझे वाढवत नाही. इतकेच नव्हे तर जगण्यातल्या कोणत्याही भागाच्या वा भागांच्या निमित्ताने ती एक सखोल भान देत असल्याने एक प्रकारे ती त्याला स्वतःच्या भूतकाळाच्या ओझ्यातूनही बाहेर काढते. कवितेचे सखोल असणे याचा अर्थच ती व्यक्तिगत नसलेल्या भानाने युक्त असणे. ती वाचकावर ताण आणणारी नसून त्याला एक प्रकारे समजुतीचा विसावा देणारी असते. याचाच अर्थ, चांगली कविता ही माणसामाणसांत कोणतेही भेद मानणारी नसते. ती सर्व माणसांसाठी असते. ती समतेचे विचार व्यक्त करणारी नसून तिच्या असण्यातच समता असते. म्हणूनच मते व्यक्त करणारी कविता ही खुजी असते. विभाजन वा गटतट मानणारी कविता उथळ असते. त्याचबरोबर ती संघर्ष आणि हिंसा यांना प्रोत्साहन देणारी असते. माणसाच्या अंध आणि आपमतलबी जगण्याला ती सातत्य देणारी असते.

हे सर्व पाहता 'उपयुक्तता' असणे हा कवितेचा दुर्गुण ठरतो. उपयुक्तता ही नेहमीच मते व दृष्टिकोण यांवर आधारित असते. ते क्षेत्र चांगली कविता ओलांडत असल्याने ती उपयुक्त नसते. अमुक घडावे अशा इच्छेने लिहिलेली ती नसते

तसेच अमुक कृतीला प्रवृत्त करणारीही नसते. ती कोणत्याही पूर्वनिर्धारित विचारसरणीची नसते. ती कवीच्या मानसिक प्रभावयुक्ततेला महत्त्व देणारी नसल्याने आपोआपच ती भेदक्षेत्र ओलांडणारी असते. या संदर्भात एक मुद्दा विशेषत्वाने मांडावा लागेल की मराठी कविता सहसा या सखोलतेला स्पर्श करत नाही कारण ती प्रतिक्रियेच्या मर्यादेतच घुटमळणारी आहे. या प्रकारे पाहता सर्जकता म्हणजे अभिव्यक्ति-प्रक्रियेवरचा व्यक्तिगत कंट्रोल वा ताबा सोडला जाणे, असा होतो. पूर्वनियोजित नसणे, प्रचारकी नसणे, बोध, सारांश, निष्कर्ष वा निराकरण नसणे ही चांगल्या कवितेची महत्त्वाची लक्षणे असतात. चांगल्या कवितेत कवीच्या व्यक्तिमत्वाचा स्थिरपणा नसतो तर भानाचे प्रवाहित्व असते. कविता ओपन ठेवून इथे कवी बाजूला झालेला असतो. त्याची त्या कवितेवर कोणतीही मालकी राहिलेली नसते. आणि याच स्वच्छतेमुळे ती सर्वांच्याच जगण्याला प्रस्तुत होते. कवींचे मन वा अनुभव हे आता माध्यम झालेले असतात. त्या भानाचे माध्यम. हे प्रत्येक कवी जाणीवपूर्वक करतो असे नव्हे. त्याचे प्रत्यक्ष जगणे कसेही असले तरी निर्मिती प्रक्रियेत तो या मानाला पोचू शकतो - असा मोठा आवाका घेऊ शकतो. हे त्याने काही करणे नसून स्वत:ला टाकून देणे असते. म्हणूनच तुकाराम म्हणतो, 'तुका टाकावा थुंकोन !

म्हणजेच चांगली कविता ही 'वर्तमान' असते. तिच्यात उपरोध असला तरी तो एखाद्या आदर्श वैचारिकतेवर आधारित नसतो. ती ना भूतकाळात अडकते ना भविष्याचे चित्र रेखाटते. 'जे आहे ते' असे तिचे स्वरूप असते. स्वतःचे कंडिशनिंग हेच सत्य मानणारी कविता खुजी असते. मग ती मध्यमवर्गीय वा दलित वा हिंदुत्ववादी वा कम्युनिस्ट कोणतीही असो. अमुक असे असते, तसे नसते असे शिकवणे, गतकातरता वा रोमँटिक आठवणी यांत बद्ध असणे, विचारसरणी, टोळी, लांगूलचालन, आप्तस्वकीय, अस्मिता असणे, अस्तित्ववादी वा मृषावादी म्हणवून घेण्याची हौस असणे, शेवटच्या ओळींतला ड्रामा म्हणजे सारांश वा बोध असणे, रमवणारे निसर्गवर्णन वा विभूतिवर्णन असणे, कशाचाही गौरव वा उदात्तीकरण असणे हे सर्व अडथळे असतात. शौर्य वा द्वेष निर्माण करणे हे कवितेचे काम नाही. भाषा, प्रतिमा आणि बहुश्रुततायुक्त 'कौशल्य 'दाखवणे' हे कवितेला मारक ठरते. चांगली कविता एखाद्या घटनेला वा तिच्या विश्लेषणाला सत्यता देणारी नसते कारण अशी सत्यता देणारा तिथे कुणी नसतो. कवी आणि कविता तसेच परिस्थिती आणि कवी यांतले मानसिक संबंध ही कविता व्यक्त करत नाही तर 'पाहते'.

इथे कवितेचा आशय म्हणजे काय याकडेही पाहायला हवे. कवितेतला अनुभव हा जर वाचकात परावर्तित करण्याचा हेतू नसेल तर याचा अर्थ तो अनुभव हा कवितेचा आशय नसतो. त्या अनुभवाकडे 'पाहणे' हे त्या अनुभवाचा भाग नाही असू शकत. याचाच अर्थ चांगल्या कवितेचा आशय हा त्या कवितेच्या मजकुरात नसून मजकुराच्या बाहेर असतो. मजकुराच्या माध्यमातून तो व्यक्त होत असतो. त्यामुळे त्या कवितेला अनुभवाची तीव्रता, मताची कट्टरता वा बौद्धिक दिशा नसते. त्यामुळे चांगली कविता ही वाचकाला सौम्य, तरल, लवचीक करते त्याची वा रिजिडिटी घालवते. उपरोध हा फक्त बौद्धिक असतो - असे आपण समजतो अशा कवितेतल्या उपरोधात एकात्मकता असते, अगम्य विसंगतीचे दर्शन असते. स्थलकालपरिस्थितिसापेक्ष उपरोध हा तात्कालिक असतो. मृधा विनोद हा तात्कालिक नसतो. अशी कविता बौद्धिक दिशेने रचलेली नसल्याने खुद्द कवीलाही ती अनपेक्षित असते. तिथे अवतरणे हे त्यालाही नावीन्यपूर्ण असते. एकूण विषयातल्या अंतर्गत गुंतागुंतीचा पूर्ण आवाका घेतला जाणे हे

पूर्वनियोजित असूही शकत नाही. कविता ही तिच्या प्रक्रियेत वा शेवटी निष्कर्षानुगामी असणे हा कवितेचा मुख्य अडथळा म्हणता येतो.

याचा अर्थ कवी जगण्याच्या प्रक्रियेशी फटकून असतो असे नाही. आताचे जगणे लक्षात घेतले तर काही चांगल्या कवितांतून विषयाच्या सलगतेपेक्षा जगण्यातल्या विदीर्णतेची सलगता हीच अभिव्यक्तिपद्धती झाल्याचे दिसून येते. प्रतिमा म्हणजे शब्द, वस्तू वा चित्रे नुसती न राहता घटना वा निवेदनेही प्रतिमारूप घेताना दिसतात. त्यामुळे वाचकांनाही ओपन राहावे लागते. नुसत्या सवयीच्या वाचनाने इथे भागत नाही. हे ओपन राहणे याचा अर्थ वाचकानेही आपल्या प्रभावयुक्ततेतून बाहेर येणे असते. असे पडले तरच त्या कवितेची सर्जक प्रक्रिया पूर्ण झाली असे म्हणता येते. बऱ्याचदा वाचक त्यांच्या आवडत्या अपेक्षा घेऊन कवितेकडे पाहतात तेव्हा ते भान घेण्याऐवजी त्यांच्या प्रतिक्रिया देऊ लागतात. तशा प्रतिक्रिया देणे म्हणजे ती कविता न वाचणेच असते. कवितेत असणारे समग्रतेचे भान ही संस्कृती म्हटली तर वाचकांच्या या प्रतिक्रियांना तिचा अभाव म्हणावे लागते. चांगल्या कवितेत वाचकाला मान्य करावी लागणारी एक महत्त्वाची बाब ही असते को ही कविता बौद्धिकपणे 'आता समजली' असे कधी होत नाही. तिचा आशय हा बौद्धिक मर्यादेत बसणारा नसल्याने येणारी अनाकलनीयता हे तिचे अंगभूत सौंदर्य असते.

--- गिरीश पतके.

" सूर्याचा तुकडा उडाला ?बाप रे ! "

" काळजी नका करू -- अजून पाच अब्ज वर्षे ठणठणीत राहणार आहे सूर्य ! "

" मग ठीक आहे -- "

सात गोष्टींचं पुस्तक

ले 0 प्रशान्त बागड . प्र 0 – पपायरस.

हा बागडांचा दुसरा कथासंग्रह आहे. यापूर्वी, ‘ विवादे विषादे .. ‘ या त्यांच्या कथासंग्रहावरही मी लिहिले होते. हा गंभीरपणे लिहिणारा मराठीतला एक महत्त्वाचा लेखक आहे यात शंका नाही. तेज बुद्धी आणि कवीची फ्री संवेदनशीलता असलेला असा हा एक विशेष लेखक आहे. त्या आधीच्या संग्रहावर लिहिताना, बागडांचा अनपेक्षित असा वेगळा बाज आणि विषयाच्या लिंकपेक्षा अमर्याद अभिव्यक्तीला महत्त्व देणारी शैली यांबद्दल मी लिहिले होते. इथेही तोच प्रकार आहे, पण, वेगळा. आता या कथा मला नीट पोचताहेत का याबाबत मीच संभ्रमात आहे. तरीही, इथे, थोरामोठ्यांनी घालून दिलेल्या परंपरेप्रमाणे, आपल्याला जे नीट कळत नाही त्याची टिंगल करायची वा त्यावर किरकोळ शेरेबाजी करून पळून जायचे, असे मी करणार नाही. हा लेखक ज्या अर्थी काही वेगळे आणि म्हटले तर ‘ अवघड ‘ ही काही करतो आहे तर ते समजून घेण्याचा मी प्रयत्न केला पाहिजे, असे मला वाटते. या गोष्टी ‘ बाहेरून येतात आणि इथे आकाराला येतात ‘ असे बागड म्हणतात. गोष्ट म्हणजे कथानक, सलग पात्रे, असे झाले मग असे झाले, आणि या प्रकारात हे सगळे अमुक अमुक घटनांतून गेले – अशी सवयीची पठडी या कथा पाळत नाहीत.

यातली पहिलीच कथा ' सिद्धी ' घेतली तर, त्याला एक खून करायचा आहे, त्यासाठी तो तिची निवड करतो आणि ती त्याला तयार होते – अशी सुरुवात आहे. त्याला खून का करायचा आहे, ती तयार का होते, या प्रकारात कुठलाच ताण वा भयानकता कशी नाही – हे प्रश्न इथे अप्रस्तुत ठरतात. सलगता आणि कारण-परिणाम या पद्धतीने ही कथा वाचता नाही येणार. एकूणच मला असे दिसते की या कथा कविता समजूनच वाचाव्या लागतील. हे पाहिले की इथे वाद सुरू होतील – मग यांना कथा का म्हणावे ? आणि अशा कथेसारख्या पद्धतीने लिहिलेल्या मजकूराला कविता तरी कसे म्हणता येईल ? बरे, याला ललित लेखही नाही म्हणता येणार ! मग काय, फेटाळून लावायचे ? आपल्याला सुरुवातीला निदान एखाद्या लेखकाचे गांभीर्य आणि माध्यमात तो घेत असलेले स्वातंत्र्य हे काहीतरी महत्त्वाचे आहे, एवढे तरी जाणवायला हवे.

आता, ' माश्या न मारणाऱ्याचे अनुभव ' ही एक विचित्र नावाची कथा बघा. शीर्षकातच, माश्या मारणे वा न मारणे या फालतू गोष्टीला महत्त्व दिलेले दिसते ! त्यावरून एकूण कथेच्या ऐवजाची कल्पना येते. या कथेच्या पहिल्या उताऱ्यात वाक्य येते, " कालही रस्त्याने चालता चालता मी कथेच्या मागे मागे गेलो होतो. " या कथेचे शेवटचे वाक्य आहे, " मला कथा गवसण्याचा प्रश्न नाही. " मध्येच ही कथा भलतीकडेच जाते आणि मग वाक्य येते, " आता माश्या मारणाऱ्याच्या कोड्याकडे येतो. " यात एक वाक्य असे आहे की, " म्हणजे तो अहोरात्र माश्यांचा विचार करत होता आणि – की म्हणून ? – माश्या सतत त्याच्याभोवती भणभणत होत्या. " सार्त्रच्या ' फ्लाईज ' च्या सखोलतेचा आशय ही अब्सर्ड कथा सहज सांगून जाते.

मी हे पुस्तक पुन्हा एकदा वाचायला घेतलेले आहे.

--- 000 ---

15-02-23.

आज दि. 15-02-23 च्या पुणे मटाच्या अग्रलेखातले शेवटचे वाक्य -- " इतके सत्यनिष्ठ आणि सत्यशोधक सर्वपक्षीय नेते आपल्याला लाभले याबद्दल महाराष्ट्राने खरोखर स्वत:च्या भाग्याचा हेवा करायला हवा ! "

( त्या ऐवजी, समोर दिसणाऱ्या बातम्यांवर विसंबून, जीव खाऊन एकमेकांशी वाद घालणारे, शिवीगाळ करणारे आणि केस पिंजारून एकमेकांचे कपडे फाडत गल्लोगल्ली फिरणारे बुद्धिमान वेडेच इथे मुबलक दिसतात ! )

-- 0 –

आवर्तने

लेखक : चं प्र देशपांडे

प्रकाशन : वर्णमुद्रा

आयुष्य एकरेषीय नसतं. तशी चांगली कविताही एक रेषीय नसते. चांगल्या कवितेचा आशय असतो ती निर्माण करीत असलेल्या आशयाच्या आवर्तनात. ही आवर्तने असीम असतात.परत ही शून्याची आवर्तनं असतात.कविता लिहून झाली की कवी आणि कविता दोघेही शून्य होतात.आणि केवळ द्रुत लयीतली शून्याची आवर्तनं

उरतात.कविता ही सत्यधर्मी असते. पण तिचं काम सत्य शोधणं नसतं. सत्य म्हणजे व्याधीउपाधीशिवायचं आपलं नुसतं असणं ओळखणं. कवी हा असतो.आणि स्वत:ला ओळखण्याच्या खुणा किंवा मनाच्या मिती अनंत असतात.असणं हे वर्तमान काळातलं असतं,आरती प्रभूंसारख्या,गुरुनाथ धुरींसारख्या कवींच्या काही कवितांना तर काळच नसतो.स्वसंवेद्यता कालातीत असते.कवितेचं काम वाचकाला आपल्यात ओढून घेण्याचं नसतं तर वाचकाच्या मनात त्याच्या केवळ असण्याकडे त्यानं जाण्याची ओढ निर्माण करणं असतं.हे आपलं असणं कुठे असतं तर या भवतालात. कवीचं आणि वाचकाचं आपल्या असण्याकडे आतून पाहाणं हे या भवतालाच्या परिप्रेक्ष्यातूनच असतं. त्यामुळे अशी कविता ही समतेचे विचार व्यक्त करणारी नसते पण तिच्या असण्यातच समता असते.सध्याच्या कवितेने वाचकाला भानावर आणण्याचं काम करायला हवं. कुठल्याही कलाकृतीचं खरं काम हेच असतं की रसिकाला भान देणं किंवा खडबडून जागं करणं.खडबडून जागं होणं हे त्रास देणारं असतं.ते तुमचं आयुष्य सोपं करणारं नसतं,तशा अर्थानं कविता वाचकाला उपयोगी वाटत नाही.याचं कारण जगभर चेकाळलेला उपभोगवाद.

चांगली कविता ठरवून लिहिता येत नाही. ती पूर्वनियोजित अर्थाची असू शकते,पण ती आशय देऊ शकत नाही. अर्थ शब्दांना असतो पण शब्दांना आशय मिळतो तो कवीच्या अंतर्गत अशा गुंतागुंतीच्या मनातील अनेक मितींच्या ध्वनीतून.आशय म्हणजे अनुभव नव्हे, तर आशय म्हणजे अनुभुती. एक उदाहरण मला आठवलं. फ्रान्झ काफ्काचं. काफ्का हा क्षय या रोगाने ग्रासलेला होता.हा त्याचा रोग टोकाला गेला.तेंव्हा तो एका सॅनिटोरिअम मध्ये होता. त्याला हा रोग देत असलेल्या यातना सहन होईनात.डॉक्टर मला मॉर्फिनचा एक मोठा डोस द्या.डॉक्टरsssss.असं तो आक्रोशू लागला.तेंव्हा त्याचा मित्र मॅक्स ब्रॉड जवळ होता तो म्हणाला फ्रांन्झ ओरडू नकोस.तुला त्रास होईल. तर काफ्का म्हणाला की मला या त्रासाच्या पलीकडचा त्रास सहन होत नाहीय.. तो परत डॉक्टरांना हाक मारतो. डॉक्टरssss एकच निर्णायक डोस द्या मला मॉर्फिनचा. Kill me, or else you are a murderer! हे शेवटचं वाक्य पहा.Kill me,or else you are a murderer.मला तुम्ही ठार मारलं नाहीत आणि तुम्ही मला असंच खितपत ठेवून मी अखेर मेलो तर तुम्ही खूनी ठराल.या वाक्याचा आशय मला शब्दात आणता येत नाहीये, पण या वाक्याची अनुभुती मात्र मला येऊ शकते.नष्ट होतांना,नाहीसं होतांना या जगातून आपल्या जगण्याचा निष्कर्ष काढण्याची बुद्धी कुणाहीकडे उरलेली नसते.

मी नाटक उभं करतो तेंव्हा त्या नाटकातलं नाटक संहितेच्या बाहेर शोधतो. कारण ते नाटक संहितेच्या बाहेरच असतं. कवितेच्या बाबतीतही हेच. कविता ही दिसत असलेल्या कवितेत नसते. ती कवितेच्या बाहेर असते. त्यामुळे मला कित्येकदा प्रश्न पडतो की विद्यालयातून आणि महाविद्यालयातून कविता शिकवली कशी जाऊ शकते? सर्वसाधरणत; सरधोपटपणे शिकवली जात असावी.परिक्षार्थी विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल अशी.

कवी हा द्रष्टा असतो का? त्याच्या नकळतपणे असतो. हे द्रष्टेपण कसं शिकवायचं?.१९२२ साली ब्रिटीश सरकारने गांधीना तुरुंगवासाची सजा दिली.तेंव्हा काफ्का म्हणाला की आता उघड आणि स्पष्ट झालं की गांधीच्या चळवळीचा जय होणार.कारण या जगातल्या आत्मप्रतिष्ठेचं मूल्य केवळ स्वार्थत्यागानंच जिवंत राहतं. कवीलाही आपली आत्मप्रतिष्ठा टिकवायची असेल तर तिच्यासाठी स्वार्थत्याग करावा लागतो. सापडला नाविन्यपूर्ण कच्चा माल की वापर लगेच कवितेत. आणि मिळव टाळ्या हा मोह त्याला दूर सारावा लागतो.कच्चा माल म्हणजे अनुभव किंवा सुचणं

असंही म्हणत येईल या अशा अनुभवाला सत्याचे मूल्य प्राप्त होऊ शकत नाही.जाणीवपूर्वक जगणा-याचे सतत चिंतन चालू असते आणि ते प्रवाही असते.समग्र असते.समग्रतेचे तुकडे पाडत येत नाहीत. कवीचं आणि वाचकाचंही जगणं तुकडा तुकडा झालेलं असेल तर सर्व कविता लेखन आणि त्याचं वाचन हा सर्व खेळ खोटारडा होऊन जातो.

अनुभव वर्णन करता येतो अनुभूती वर्णन करता येत नाही.ती अमूर्त असते. अनुभूती देणारी कविता अमूर्त असते. अमूर्त कवितेच्या विषयी बोलतांना चंप्र म्हणतात,

"अमूर्त कविता शब्दार्थांच्या आणि प्रतिमांच्या अनिर्बंध साहचऱ्यातून आशयाची निर्मिती करते. यात अपघाताचे तत्त्व, संज्ञा प्रवाह आणि कल्पनाशक्ती यांचा वापर अधिक महत्त्वाचा ठरतो. यात वास्तवातली सवयीची शिस्त हमखास दुर्लक्षिलेली असते. कोणत्याही बौद्धिक संगतीचा मार्ग इथे त्यागलेला असतो. इथे एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा की बुद्धी ही आधी काही असण्यातून म्हणजे भूतकाळावर आधारितच काम करते- त्याचप्रमाणे, मानवी कल्पनाशक्तीही पूर्वज्ञानावरच आधारित काम करते. हे जग कधीतरी निर्माण झाले असेल तर ते 'काहीच नसण्यातून' कल्पिलेले आहे, असे म्हणावे लागते आणि मानवी बुद्धीच्या वा कल्पनेच्याही दृष्टीने तो कायमचा चमत्कार समजावा लागतो'

कलेचे महत्त्वाचे लक्षण म्हणजे ती केवळ सूचन करणारी असावी लागते. सूचकता हा केन्द्रबिंदू असेल कलाकृतीचा तर त्या कलाकृतीची आवर्तने अनेक असू शकतात जी अनुभवाच्या पलीकडे जातात.कुठल्याही मजकूराची स्पष्टता तुम्हाला बांधून ठेवते.असा मजकूर तुमचा साचा निर्माण करणारा असतो.मजकूराच्या बाहेर घेऊन जाणारी अमुर्तता जगण्याचे अमर्याद भान देते. तो मजकूर कुठल्याही साहित्यप्रकारातला असो गद्य असो वा पद्य असो-उदाहरणार्थ स्वप्निल चव्हाणची कथा किंवा श्रीधर तिळवे हेमंत दिवटेची कविता किंवा प्रिया जामकरची कविता किंवा मन्या जोशीची कविता घ्या ( कित्येक नावे आहेत.सगळीच नाही घेता येत)-सर्वांच्या मजकूराचे जरी पिंड वेगळे आहेत-तरी त्यांच्या साहित्यकृती एकमेकांशी संवादी आहेत.

चंप्रंच्या प्रस्तावनेतली काही महत्त्वाची विधाने:

१.

" अमूर्त चित्रात जसे रंग आणि आकार तसेच कवितेत शब्द आणि रचना-

अमूर्त चित्रात जर अमुक वस्तू,आकार वा दृश्य असे ओळखता येण्याची गरज नाही तर कवितेत तरी अमुक विचार वा अनुभव तरी ओळखता येण्याची गरज काय आहे? अमूर्त कविता का असू नये?"

२.

"अर्थपूर्ण कविता लिहिणारे खूप आहेत- अर्थहीनचासुद्धा आवाका घ्यायलाच हवा-"

३.

"कलात्मक अभिव्यक्तीत कोणत्याही कारणाने वयाची बंधने मानणे ही एक सामाजिक विकृती असते. ते फक्त सवयीने बिंबवलेले विचारव्यूह असतात. स्त्री वा पुरुष कलावंतांनी असल्या समजांना किंमत देण्याचे काहीच कारण नाही. सरकारी सेन्सॉर नसावा असे आपण म्हणतो, तसाच, हा असला सामाजिक सेन्सॉरही नाकारला पाहिजे."

४.

“समकालीन वास्तव असे काही नसते. लेखकाला दिसेल ते समकालीन वास्तव असे म्हणता येईल. कलेत वास्तवाचे महत्व नसते. वास्तवाचे भान येण्याच्या प्रक्रियेचे महत्त्व असते. ही प्रक्रिया वास्तवनिरपेक्ष असते.”

५.

“ बुद्धीची प्रत्येक गोष्ट द्वंद्वयुक्त असल्याने समतावादी हेच विषमतावादी असतात. शांततावादी हेच युद्धवादी असतात आणि नीतिवादी हेच अनितिवादी असतात हे समजून घ्यायला हवे”

६.

“ खानोलकरांच्या सारख्या लेखनात अनेकदा वेगळेपण जाणवते त्या वेगळेपणालाच काही जण प्रतिभा म्हणतात. प्रतिभा म्हणजे पवित्रायुक्तता ओलांडणारे भान. लेखकसापेक्ष नसणारे भान. म्हणजेच जाण.चांगल्या कलाकृती या ’स्वतंत्र” असतात हे खरे तर या अर्थाने. पवित्रायुक्ततेपासून स्वतंत्र.”

७.

“ सर्जक जगणे म्हणजे माणसाच्या मानसिक सवयींनी पूर्णत: बद्ध नसणे.”

आवर्तने या पुस्तकाला चंप्रंनी लिहिलेली प्रस्तावना शंभर पानी आहे. पण या प्रस्तावनेवर एक खूप मोठे सविस्तर पुस्तक होऊ शकते.नाईलाजाने मी त्या प्रस्तावनेवरचे माझे भाष्य किंवा माझी निरिक्षणे आवरती घेतो आहे. आजच्या घडीला चंप्रंनी लिहिलेले हे पुस्तक कविता या विषयावरचे सर्वात महत्त्वाचे पुस्तक आहे. जे कवी घेतले आहेत त्यांच्या कवितेवर लिहितांना, त्या त्या कवीच्या कवितेच्या अंगाने, त्यांची कविता उलगडण्याची दिशा  चंप्रंनी दाखवली आहे.कवींनी आणि कवितेच्या रसिकांनी हे पुस्तक जरूर वाचावे अशी शिफारस करून मी थांबतो.

रवी लाखे

१५.०२.२०२२

https://chinha.in/features/understanding-art/

चं. प्र. देशपांडे अर्थात चंद्रकांत प्रभाकर देशपांडे हे मराठीतले विचारवंत लेखक, कवी आणि नाटककार आहेत. त्यांनी फेसबुकवरच्या आपल्या वॉलवर ' चित्र कळणे म्हणजे काय ? ' या महत्वाच्या विषयावरील चर्चेस प्रारंभ केला आहे. चित्र कळणे म्हणजे काय ? वास्तववादी, इम्प्रेशनिस्ट, अमूर्त अशा वेगवेगळ्या प्रकारातील चित्र बघताना आपल्याला अनेक प्रश्न पडतात. अमूर्त कला समजण्यास अवघड असते का ? अमूर्त चित्रात सर्जनशीलता महत्वाची असते का ? वास्तववादी चित्रामध्ये तंत्रशुद्धता महत्वाची असते.? असं असेल तर ते चित्र श्रेष्ठ कसं ठरतं ? अशा बऱ्याच प्रश्नांचा उहापोह या चर्चेत झाला आहे. या चर्चेमध्ये रसिकांच्या खूप प्रतिक्रिया आल्या, पण त्यात चित्रकारांच्या प्रतिक्रिया जवळपास नाहीतच. चित्रकारांपर्यंत ही चर्चा पोहोचावी म्हणून ती इथे देत आहोत. जरूर वाचा आणि आपल्या प्रतिक्रिया कळवा.

*'चिन्ह'चे अपडेट्स मिळवण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करून व्हाट्सएप ग्रुप जॉईन करा*

https://chat.whatsapp.com/C8eaBiY2CjEIqxFvJWmnUD

*'चिन्ह'चे इन्स्टाग्राम पेज लाईक करा*

https://www.instagram.com/chinha_mag/?hl=en

Who will write the story of what could have been?

That, if someone writes it,

Will be the true history of humanity.

What exists is the real world—not us, just the world.

We are, in reality, what doesn't exist.

I am who I failed to be.

-- Fernando Pessoa

माणूस पुरोगामी असो की प्रतिगामी त्याच्यात घराणेशाही, लोकशाही आणि हुकुमशाही यांच्या मान्यता एकत्रितपणे नांदत असतात !

धर्मवाद-धर्मनिरपेक्षतावाद, जातिवाद-जातिअंतवाद, पुरोगामी-प्रतिगामी -- अशी द्वंद्वात्मकता उत्तर-आधुनिकतावादात खोटी ठरते !

माझीच बाजू बरोबर असे हिरीरीने म्हणणारा माणूस म्हणजे, उत्तर आधुनिकता वादाप्रमाणे, अक्कलेचा पूर्ण अभाव !

उत्तर आधुनिकता वादाप्रमाणे, तत्त्वशील माणूस दांभिक असतो तर तत्त्वहीन माणूस हा सुपर दांभिक !

गिरीश पतके यांची पोस्ट –

उंदराला मांजर साक्षी

अर्थात

मराठी कविता जागतिक का होत नाही?

....................................................

इथले कवी मुळातच कविता लिहितात ते कवी म्हणून ओळखले जाण्यासाठी, तशी मान्यता मिळवण्यासाठी, मोठे कवी म्हणून टिकून राहण्यासाठी आणि जनमानसाचा आदर मिळवून आत्मतुष्ट होण्यासाठी. याचाच अर्थ कविता लिहिण्याचा मूळ हेतूच कविताबाह्य असतो. यामुळे साहजिकच मग रूटीन, सामान्य अनुभव, विचार, नीतीकल्पना, न्याय, समता वगैरे अभिलाषित मूल्ये, भावभावनांचे पुनःप्रत्यय आणि थोडीफार चकित करणारी तंत्रकौशल्ये या मर्यादेत ही कविता खेळत-बागडत राहते. अगदी तथाकथित दुःखाची कविताही.. एकदा उद्दिष्ट कविताबाह्य मान्यतेचे

असले की पुनरावृत्ती हे एकच कवितेचे कार्यक्षेत्र बनते. मग भाषेवर आणि तंत्रावर हुकूमत असलेले काही कवी इथे निव्वळ विविधगुणदर्शन दाखवत अमर होतात. त्यांच्या कवितेत सलग गांभीर्य कसलेच नसते. पार अनिलबिनिलांपासून उदात्त अशा कुसुमाग्रजांपर्यंत. यांना जगण्याबाबत एकही समस्या सखोलपणे दिसत नाही कारण पाहायचीच नसते. कमी कुवतीचे रटाळ, सेफ जगणे हीच एक आस असल्यावर जनमान्य मार्गाने आयुष्य रेखाटत जाणे हे बंधनकारक ठरते. जनमान्य दुःखाचा माफक डोस आणि जनमान्य अस्मितांचे उदात्तीकरण यात हे कवी रमतात. यांना स्वत:ला एखादे दु:ख महत्त्वाचे वाटले, मूळापासून त्याकडे पाहावेसे वाटले, असे घडत नाही. कुसुमाग्रज इथले प्रातिनिधिक भाषा पुढारी होतात - त्यांच्या नावे भाषादिन साजरा होतो, हा याचा पुरावा आहे. हे असले कवी धर्म, भक्ती, प्रेम, आस्तिक, नास्तिक, वारकरी, शूर, देशभक्त, बांधिलकी, युद्धसमर्थक असे सगळे असतात. या प्रत्येक विभागातल्या कविता लिहून ते लोकप्रिय होत राहतात. थोडक्यात म्हणजे यांना कशाचेच फारसे गांभीर्य नसते आणि कोणत्याही समस्येला सामोरे जायची आचही नसते.
मान्यताप्राप्त प्रतिक्रिया देत आयुष्य कंठणारे लोक सर्जक म्हणजे काय असणार? यांचे सगळे लेखन हे 'माहीत असणे' या क्षेत्रातले असते. आपला स्वभाव, मते, आग्रह यांचा किनारा सोडून 'जे आहे ते' पाहण्याची - त्याच्या लौकिक यशापयशाबद्दल बेफिकीर राहण्याची यांची हिंमत नसते. मराठी समाजालाही असले काही नकोच असते. त्यामुळे, उंदराला मांजर साक्षी, अशा पद्धतीने दोघेही एकमेकांचा उपयोग करत राहतात. नुसतीच मतमतांतरे सोडून जे तत्त्वज्ञानातले किंवा अध्यात्मातले प्रश्न असतात त्यांना इथे हेटाळले जाते कारण ते प्रश्न असतात किनारा सोडायला लावणारे. इथे तर भित्रट सुरक्षिततेत खेळायचे आहे. आणि मग हेच लोक एकत्र जमून रडत विचारतात की मराठी कविता जागतिक का होत नाही?
- चं. प्र. देशपांडे
(आवर्तने प्रस्तावना पृ. ७४,७५)

माडीवरचे अध्यक्ष खाली आले, खालचे माडीवर गेले

www.champralekhan.com
या माझ्या वेबसाईटचे -- संकेतस्थळाचे --
दिनांक १६-०२-२३ पर्यंतचे अद्ययावतीकरण झालेले आहे.

द चिप्स आर डाऊन
( सध्याच्या राजकीय पेचप्रसंगामुळे आठवलेले -- )
या नावाची सार्त्रची एक कादंबरी आहे – कुठे त्याचा उल्लेख स्क्रीनप्ले असाही आहे. तर त्यात, क्रांतिकारक ग्रुपमधला एक तरुण, सैनिकाच्या गोळीने मरतो आणि दुसरीकडे एक स्त्री विषप्रयोगामुळे मरते. त्या स्त्रीची बहीण आणि तिचा नवरा यांचे लफडे वा प्रेम असते. तो तरुण आणि ती स्त्री यांचा जिवंत असताना काहीच संबंध नसतो. पण,

मृतात्म्यांच्या जगात आल्यावर त्यांची तिथे भेट होते. ( ही सार्त्रची  फँटसी – कल्पना आहे – त्याला कृपया अंधश्रद्धा म्हणू नये. ) तर त्या मृतात्म्यांच्या जगात असा नियम असतो की इथे आल्यावर एखादी स्त्री आणि पुरुष यांना जर असे वाटले की जिवंत असताना आपण भेटलो असतो तर आपण एकमेकांवर प्रेम केले असते. तर अशा परिस्थितीत त्यांना पुन्हा एकदा जगण्याची संधी दिली जाते ! त्या नियमात ही दोघे बसल्यामुळे त्यांना पुन्हा एकदा जगण्याची संधी मिळते ! याचा अर्थ, ते मेले त्या क्षणापर्यंत जग मागे जाते ! ती विषप्रयोगाने मरत नाही आणि याला गोळी लागत नाही ! त्यानंतर काही घडलेच नव्हते असे जग बिनचूक तिथून पुन्हा सुरू होते !
त्या फँटसीप्रमाणे प्रत्यक्षात कसे घडू शकेल ?
त्या कादंबरीचे शेवटचे वाक्य माझ्या मेंदूत कोरले गेलेले आहे – ती दोघे नाच करत असतात – trying to live once again ! – पुन्हा एकदा जगण्याच्या प्रयत्नात !
इथे खरेच असे घडले तरी कोण कसले मोठे सर्जक दिवे लावणार आहे ?
--- ००० ---

" आधी होते तसेच त्यांत पाणी भरून हे नारळ मला पहिल्यासारखे जोडून द्या -- मला आता ते वेगळ्या पद्धतीने फोडायचे आहेत -- "

संध्याकाळपासून रात्रीपर्यंत बरेच लोक या गाड्यांकडून काही ना काही खाऊन गेलेले असतात. त्यातल्या इकडे-तिकडे सांडलेल्या कणांवर या कावळे लोकांचा सकाळचा नाश्ता पार पडतो – ( फोटो ).

शेक्सपियर च्या ‘ कोरियलेनस ‘ या नाटकाचा स्वैर मराठी अनुवाद
योद्धा
अनु ० दिलीप जगताप, प्र ० कॉपर कॉईन.
दिलीप जगताप यांची तगडी मुक्त भाषा हे या अनुवादाचे एक खास वैशिष्ट्य आधीच नोंदवतो. भाषेची नाट्यमयता म्हणजे काय याचा हा एक उत्तम वस्तुपाठ ठरावा. यात अनेक मोठमोठ्या लांबीचे संवाद आहेत – ते जर अशा जोरकस शैलीत आले नसते तर हे नाटक मुळातच पंक्चर झाले असते. त्यामुळे, एकूणात, वाचनीयता हा या नाटकाचा एक महत्त्वाचा गुण म्हणावा लागेल. मराठीची ताकद आणि सौष्ठव हे या नाटकाला सहज पेलून धरणारे आहे. नाट्यमयता रक्तात मुरलेला जगतापांमधला नाटककार इथे सलाम घेऊन जाईल.
कोरियलेनस हा यातले प्रमुख पात्र असलेल्या मार्शियस या योद्ध्याला दिला गेलेला किताब आहे. पण जगताप नाटकाचे नाव ‘ योद्धा ‘ ठेवतात हेही अन्वर्थक आहे. एक अद्वितीय योद्धा असण्याचा गर्व वा घमेंड आणि त्यातून सामान्यांना तुच्छ लेखणे हे या नाटकाच्या वृक्षाचे बीज आहे. इतर अधिकारी व सामान्यजन यांच्याशी अपमानास्पद वागल्यामुळे मार्शियसला राज्याबाहेर हाकलून दिले जाते. याचा बदला घेण्यासाठी म्हणून तो शत्रूला जाऊन मिळतो. आणि आपल्याच राज्यावर चाल करून येतो. मग त्याच्या आईच्या विनवणीमुळे संहार टळतो पण शत्रूला त्याने

युद्धाचा शब्द दिलेला असतो तो मोडला गेल्यामुळे तो त्या शत्रूच्या दृष्टीने विश्वासघातकी ठरतो आणि मारला जातो ! एवढेच आहे हे नाटक, पण, या एकूण काळात यातले मानवी जगणे जे उलटे-सुलटे हेलकावे खात जाते त्यात शेक्सपियरची प्रज्ञा वा प्रतिभा दिसून येते. एका माणसाच्या वेडपट स्वभावामुळे अनेक समूह भूमिका बदलत उलट-सुलट होत जातात ! मराठीत सदोदित भूमिकांचा आग्रह धरणाऱ्यांनी हे नाटक जरूर वाचले पाहिजे. भूमिकांमधल्या अब्सर्डिटीवरचा जमालगोटा शेक्सपियरने फार पूर्वीच देऊन ठेवलेला आहे.

मानवी जगण्यातली अब्सर्डिटी कळल्याशिवाय कुणी सर्जक कलाकृती निर्माणच नाही करू शकणार, असे मला वाटते. त्या दृष्टीने हे एक जबरदस्त नाटक आहे. हा संवाद बघा – " धन्यवाद. ज्यांच्याबरोबर एका ताटात जेवलो त्या जिवलग मित्रांना सोडून मी माझ्या कट्टर दुश्मनाकडे आलोय. ज्या गावात मी जगलो, वाढलो त्या गावातून हाकलले मला आणि या परक्या शत्रूच्या भूभागात आलोय मी. ऑफिडियसने माझा शिरच्छेद केला तर तो योग्यच ठरेल पण त्याने मला जीवदान दिले तर त्याच्यासाठी मी माझे प्राण अर्पण करेन. " यातल्या शेवटच्या वाक्यातला उपरोध हा मानवी गधडेपणाचा उत्तुंग नमूना आहे ! आणखी एका ठिकाणी एका माणसाबद्दल दया वाटणे, कृतज्ञता वाटणे पण त्याच वेळी सूडभावना प्रचंड महत्त्वाची ठरणे – असे अनेक ' विनोद ' या नाटकात आहेत !

हे नाटक म्हणजे फक्त मार्शियस ची शोकांतिका नाही वाटत. ही पूर्ण मानवी जगण्याचीच शोकांतिका वाटते. वेळोवेळी बदलते सर्वांचे मानसिक पवित्रे हे संघर्ष, हिंसा आणि नाश घडवतात, हे जाणवते. जणू उपाय नसलेले गधडे जगणे ! मानवी जगण्याचा हा असा प्रचंड आवाका समर्थपणे मराठीत आणल्याबद्दल अनुवादक-प्रकाशकांचे अभिनंदन !

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

शेक्सपियरची दोन नाटके

' योद्धा ' आणि ' चेटूकवारं '

मराठीत स्वैर अनुवाद – दिलीप जगताप, प्रकाशक – कॉपरकॉईन.

-- असे हे पुस्तक आहे. काल मी यातल्या ' योद्धा ' या नाटकावर लिहिले. मनात ताजे असते तोवर ते लिहिले जावे म्हणून पूर्ण पुस्तक असा कार्यक्रम न राबवता, वाचून झाले त्यावर लिहिले. आज दुसरे नाटक

' चेटूकवारं ' ( मुळातले ' THE TEMPEST ' )

वाचले. अनुवाद चांगलाच आहे पण तुलनेने हे नाटक कमी ताकदीचे वाटले. यात खास असा काही मोठा संघर्ष नाही आणि खूप नाट्यमय अशी खूनबीन घटनांची सनसनाटीही नाही. पण शेवटी, मास्टर तो मास्टर – या न्यायाने शेक्सपियरचा मोठेपणा जाणवतोच. याने असे केले म्हणून मग त्याने तसे केले अशी रचना करता करता असंख्य पात्रे आणि मानवी स्वभाव यांचे प्रचंड भान घेत जाणे असे इथे फार घडत नाही. त्यातही, जादूटोण्याची मदत घेतलेली दाखवल्याने माणसांचे कार्यकर्तृत्व नगण्य ठरते. त्यामुळे मानवी कृतींचे अभेद्य जंजाळ म्हणावे असा काही अनुभव इथे येत नाही. तरीही हाताळणीत मास्टरी आहेच.

प्रोस्पेरो या ड्यूकला बेकायदेशीरपणे पदच्युत करून एका तराफ्यावरून समुद्रात मरायला सोडले जाते. एक नोकर, त्याच्यासोबत त्याची छोटी मुलगी, आणि इतर काही सामानाबरोबरच त्याची जादूची पुस्तके देतो. त्या जादूचा उपयोग करून तो कसे जुने हिशोब मिटवतो आणि त्याच्या मिरांडा या कन्येचे फर्डिनांड या राजपुत्राशी कसे लग्न होते, वगैरे असा कथाभाग आहे. सुरुवातीचे वादळ, विजा आणि खवळलेला समुद्र यांचे शेक्सपियरकृत वर्णन जबरदस्त आहे. तेव्हाच्या वेळचे कप्तानाचे हे बोलणे – " तूफान नसेल, संथ पाण्यात हे होडके आपोआप तरंगत असेल, त्या वेळी शांत संध्याकाळी आपण ' बुडते जहाज कसे वाचवावे ' या आपल्या ग्रंथाचे इथेच प्रकाशन करून त्याबद्दल चार चांगले शब्द बोलू, पण आता आत जा. कारण, अक्कलवंत मूर्खांनो, तुम्ही नकळत पश्चिमेकडील पिसाळलेल्या वादळाला साथ देत आहात. तुम्ही आत जा. " – एकूणात असे अक्कलवंत मूर्ख मानवजातीत सर्वच स्थळकाळात राहात आलेले दिसतात !

माणसे असतात जादूच्या प्रभावाखाली पण समजतात असे की सगळे त्यांच्याच प्रयत्नांनी घडते आहे. हे एका वेगळ्या प्रकारे आपल्या साधू वाण्यालाच ईश्वराने घडवलेले शासन ! पण नाटक एकूण सुखात, आनंदात संपते. तरीही, अनेक पात्रे आणि जिवंत माहोल हा अनुभव येतोच. शेक्सपियरचे संवाद मराठीत आणणे हे मराठीला एक प्रकारे समृद्ध करणेच आहे. जगतापांनी ते काम चोखपणे केलेले आहे.

असे संवाद पाठ करून म्हणू शकणारे कुणी आहेत का सध्याच्या पिढीत, कोण जाणे. पण, असे साहित्य वाचले जाणे हा जागतिक मानवी संस्कृतीचा एक महत्त्वाचा प्रवाह समजायला हवा. संस्कृती म्हणजे नुसते किल्ले, मंदिरे, लेण्या यांचे जतन नव्हे. मानवी जगणे आणि त्यांतल्या नात्यांतून निर्माण होणाऱ्या समस्या यांचा कुठेही घेतला गेलेला आवाका जगात इतरत्र कुठेही प्रस्तुतच असतो, हे समजून घ्यायला हवे.

अनुवादक जगताप आणि प्रकाशक कॉपरकॉईन यांनी हे एक चांगले काम केले आहे.

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

शिंद्यांच्या वकिलांना ते विरोधी पक्षाचे वकील म्हणताहेत -- त्यामुळे जनता अधिकच बुचकळ्यात पडते आहे !

१ से भले २, हे ठीक, पण ५ से भले ७ हे कोणत्या तत्त्वावर आधारलेले -- तर्काच्या की लोकशाहीच्या ?

( खंडपीठाबद्दल ).

आता निकाल लागल्यावरच सांगा ---- ( झोपलेल्या कुत्र्याचा फोटो ).

बे बे बकरी ( दोन अंकी नाटक )

ले ० दिलीप जगताप, प्र ० कॉपर कॉईन .

सर्वेश्वरदयाल सक्सेना यांच्या ‘ बकरी ‘ या हिंदी नाटकावर आधारित असे हे नाटक आहे. मराठीतली ही एक उत्तम राजकीय-सामाजिक उपरोधिका आहे. हे नाटक अनेक कारणांनी मला विशेष वाटले. जगताप हे ग्रामीण जीवनाचा माहोल, तिथली भाषा, म्हणी, वाक्प्रचार, त्यांच्या बोलण्यात येणारे रामायण-महाभारताचे संदर्भ या सगळ्यात पूर्ण मुरलेले आहेत. त्यामुळे हे सर्व त्यांच्या भाषेत हात जोडून त्यांच्या सेवेला हजर आहे. शिवाय जगतापांना राजकीय-सामाजिक जगण्यातल्या विसंगती आणि दांभिकपणा आणि शोषण यांचीही जवळून जाणीव आहे. त्यामुळे, या नाटकाच्या लेखनात एक सहजता, ‘ खरेपणा ’ आणि विश्वासार्हता आपोआप आलेली आहे. नाट्यतंत्र तर जगतापांना अवगत आहेच. या सर्व बाबींमुळे या नाटकाचे वाचन हे एक उद्बोधक कलात्मक आनंद देणारे ठरते.

कथावस्तू तशी छोटी व साधीच आहे. साधा बकरीचा काय तो प्रश्न पण तीसुद्धा एका खेडूत बाईकडून सक्तीने काढून घेतली जाते. लुटली जाते. प्लॅन असा की ही बकरी महात्मा गांधींच्या बकरीची वंशज असल्याचे भासवत तिला देवत्व द्यायचे आणि लोकांना तिच्या नादी लावून आपले अनेक कार्यभाग साधायचे. ती बाई फारच त्रास देऊ लागल्यावर तिला तुरुंगात घातले जाते. जनता कधी समजून, कधी भोळेपणाने आणि कधी नाइलाजाने या बकरीदेवीच्या चरणी लीन होत जाते. ते भांडवल वापरून कुणी पुढारी निवडून येतो. आणि शेवटी आनंद साजरा करण्याच्या पार्टीसाठी तीच बकरी वापरायचे ठरते ! या सगळ्या प्रकारात महात्मा गांधी, त्यांचे तत्वज्ञान यांचे चपखल संदर्भ येत राहतात. शासकीय कार्यालयांचे काम, कायदा-सुव्यवस्था आणि शेतीच्या समस्या यांचेही संदर्भ येत राहतात. दुष्काळी भागात अंधश्रद्धेचे पीक काढण्याचा हा धूर्त प्रयोग  यशस्वी होत जातो. शेवटी एक तरुण आणि त्याचे काही साथीदार बाजी उलटवतात.

ग्रामीण जीवनाचा माहोल हाताळणारी मराठीतली ही एक अद्वितीय उपरोधिका आहे. हे नुसते विनोदी नाटक नाही, फार्स तर नाहीच. मग याला कृष्णनाट्य म्हणता येईल का ? मला वाटते, नाही. कृष्णनाट्याच्या मुळाशी एक अभेद्य अशी निराशा असते. तसे इथे नाही. हे अब्सर्ड वा मृषा नाट्यही नाही. कारण तशा नाटकात एक मूलभूत अर्थशून्यता आणि हेतूहीनता असते. तसेही इथे नाही. म्हणून याला उपरोधिका म्हटले आहे.

या नाटकासोबत आपल्याला शफाअत खानांचे ‘ शोभायात्रा ‘ आठवू शकते. समोर असलेल्या परिस्थितीतले व्यंग्य, विसंगती, मूल्यहीनता हे सर्व चितारताना लेखकाच्या मनात इथे ‘ चांगले म्हणजे काय ‘ असे काही असते. तसे ते जनमान्यही असते पण जगण्यात त्याचा अभाव असतो. या अर्थाने अशी नाटके आशावादी असतात. एका विशेष उंचीवरून जगण्यातली ही विदारकता उघडी पाडण्याचे काम अशी नाटके करतात.

असंख्य ‘ खऱ्या ‘ तपशीलांनी युक्त असे मास्टर नाट्यलेखन मराठीत खूप कमी आहे. समीक्षकांनी आणि अभ्यासकांनी या नाटकाची विशेष दखल घ्यायला हवी, असे मला वाटते.

या उत्तम निर्मितीबद्दल लेखक-प्रकाशक यांना धन्यवाद !

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

एक महान माता आपल्या पुत्राला समुद्रात पोहण्यास प्रोत्साहित करत आहे -- ग्रेट ! – ( कौशिकी चक्रवर्ती ).

' बे बे बकरी ' या दिलीप जगताप यांच्या नाटकावरच्या माझ्या अभिप्रायाला आदरणीय कमलाकर सोनटक्के सर यांचा प्रतिसाद ---
[7:37 am, 04/03/2023] Dilip Jagtap: चं. प्र देशपांडे यांचं अतिशय मार्मिक आणि मर्म ग्राही विवेचन.
सर्वेश्वर दयाल सक्सेना यांच्या मूळ हिंदी नाटकाचा अचूक स्वर हेरणारं आणि दिलीप जगताप यांच्या स्वैर अनुवादाचं भरभरून कौतुक करणारं.
आपलं आणि चं. प्र. देशपांडे यांचं भरपूर अभिनंदन.
[7:37 am, 04/03/2023] Dilip Jagtap: From ; Kamlakar Sontakke.
डॉ. अरुण प्रभुणे, अमेरिका, म्हणतात, " विचारपूर्वक लिहिले आहे. "

माझी हॉरर फिल्म ( भयपट ) ---
काळोख आणि सावल्या यांच्या प्रभावात असणारा
एक स्वघोषित कवी – ( स्वत:चा फोटो ).

वखवख
कुणी कुणाला काही शिकवणे तर जाऊच द्या नुसते काही सांगूही नये, असा काळ  आहे. अगदी रस्त्याच्या मध्ये जरी गाड्या थांबवून कुणी गप्पा मारत असले तरीही जरा लांबून वळून मी गप गुमान पुढे जातो. कारण साध्या एखाद्या किरकोळ शब्दाशब्दीतही चाकू-सुरे-कोयते यांचा वापर होण्याचा धोका वाटतो ! तर सहसा मी चिडत नसलो तरी ही पोस्ट मात्र चिडूनच लिहीत आहे.
एका चॅनेलवर लहान मुलांची काही स्पर्धा चालू आहे. त्याची एक अत्यंत किळसवाणी जाहिरात सारखी दाखवली जात असते. ५/७ वर्षांच्या मुलीकडून या गाढवांनी शृंगारिक/ मादक हालचाली/ हावभाव करत एक लावणी म्हणून घेतलेली दिसते ! तिथे उपस्थित इतर सगळी गाढवे याला टाळ्याही वाजवत असणार ! प्रसिद्धीसाठी चाललेली ही एक विकृत वखवख आहे. अशा मुलामुलींच्या बिनडोक पालकांना चौकात उभे करून फटके द्यायला हवेत !
माझ्या ओळखीचे एक संगीत शिक्षक होते मुंबईत. एकदा त्यांच्याकडे एक आई आपल्या मुलीला घेऊन आली. त्या मुलीसाठी गाण्याचा क्लास लावायचा होता. प्राथमिक बोलणे झाल्यावर त्या माऊलीने विचारले की माझी मुलगी किती दिवसांत टीव्हीवर येईल ? ते शिक्षक म्हणाले, उठा आणि चालू पडा -- तसला धंदा इथे नाही होत.
मुलांना कळत नाही -- पालकच प्रसिद्धीसाठी विकृत भिकारी होत आहेत ! मला तरी हा एक भयानक रोग वाटतो !
--- ००० ---

मराठीतली एक महत्त्वाची
न-कादंबरी (  anti-novel ) आणि स्व-जाण कादंबरी ( meta-novel )

स्वप्नासारखा उजेड

ले ० रवी लाखे, प्र ० पेपरवॉल पब्लिशिंग.

एखादा माहीत असलेला ( खरे तर माहीत नसलेलाही ) गंभीर लेखक त्याचे काही ‘ वेगळेच ‘ लेखन समोर ठेवतो तेव्हा अनेकांना त्याच्या आकलनात अडचणी येऊ शकतात. अशा वेळी स्वत: जरा सबूरीने समजून घेण्यापेक्षा शक्य तो ते लेखनच धुडकावून लावावे, रद्दच करावे, नाकारावे – असे मार्ग वापरून आपल्या मद्दपणाचे रक्षण आणि समर्थन करावे याला मराठीत एक उदात्त परंपरा आहे. तो धोका याही कादंबरीला आहेच. न- कादंबरी म्हणजे कादंबरी या साहित्य प्रकाराची अनेक ‘ मान्य ‘ वैशिष्ट्ये भिरकावून देऊन वेगळाच मार्ग चोखाळणारी कादंबरी. कथावस्तू, स्वभावचित्रण, निवेदनातली सलगता, कारण-परिणाम साखळी, काळाचा दस्तावेज उभा करणे वगैरे जी सवयीने माहीत असलेली अशी कादंबरीची लक्षणे आहेत त्यांचा इथे अभाव आहे. पु. शि. रेग्यांच्या ‘ सावित्री ‘ या कादंबरीला ‘ छापून छापून वाढवलेली कादंबरी ‘ म्हणणारे लेखक-समीक्षक इथे लिहून लिहून वाढवलेल्या कादंबऱ्या लिहीत राहिले ! कारण एकच, कादंबरी निदान ३०० पानांची तरी असायला हवी ! ही कादंबरी तीही अपेक्षा मोडीत काढणारी आहे. ही फक्त १०० पानांची भरगच्च आशयाची अशी कृती आहे. फॉर्मचा किंवा साहित्य प्रकारात होणारा हा बदलही या कादंबरीत मधून मधून चर्चिला जातो. याप्रमाणे जेव्हा एखादी साहित्यकृती स्वत:ची जाण व्यक्त करते तेव्हा तिला स्व-जाण वा meta म्हणावे.

आपल्याला जे समजत नाही किंवा जे आपल्या सवयीतले वा चाकोरीतले नाही त्याची टिंगल करणे, टवाळी करणे ही पद्धत आता तरी आपण बंद करायला हवी. अभिव्यक्तिपद्धतीत असे बदल का, कशामुळे होत असतात हेही आपण समजून घ्यायला हवे. काळानुरूप मनांचे ढाचे बदलतात, प्रतिक्रियांच्या पद्धती बदलतात, जगण्याकडे ‘ पाहणे ‘ ही बदलते. त्यामुळे परंपरा नाकारणारे असे लेखन घडत असते, हे समजून घ्यायला हवे. स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी, ही कथाच नव्हे, ही कादंबरीच नव्हे, ही कविताच नव्हे अशा तुरंत-पळवाटा वापरणे घडू नये. नुसतेच स्वत:च्या कोसल्यात अंग मुडपून पडून राहणे हे कला क्षेत्राचा घात करणारे आहे.

या बदलत्या पद्धती, वेगळे ‘ पाहणे ‘ यांचे काय महत्त्व वा मूल्यात्मकता असते माणसाच्या जगण्यात ? – हा प्रश्न इथे प्रस्तुत ठरतो. बऱ्याचजणांना संदेश, बोध, नीतीप्रचार, वा काही आदर्श हे साहित्यकृतीतून पोचणे महत्त्वाचे वाटते. या सगळ्याचा थोडक्यात सारांश म्हणजे, ‘ व्यवस्था बदलणे ‘. काय बदलायचे व्यवस्था म्हणजे ? आयपीसी की घटना की संसदभवन ? की मोदींच्या जागी ममता दीदी वा पवारसाहेब वा आदित्यजी वा राहुलभाई यांची स्थापना करणे ? ही बाहेरची सगळी व्यवस्था म्हणजे आपल्या मन वापरण्याच्या सामूहिक पद्धतीची अभिव्यक्ती असते, हे लक्षात घ्यायला हवे. कला क्षेत्र हे या मुळाकडे लक्ष देत असते. पाचशे पुस्तके वाचली म्हणजे मन परिपक्व होते, असे नाही. मनाला स्वत:च्या वर्तणुकीचे भान येण्याने परिपक्वता येते. त्यानेच जगण्यात मूल्यात्मकता येते. हे सर्व पाहता, कुणी निरुद्योगी, चंगीभंगी माणसे फावल्या वेळात हे असले उद्योग करतात, असे समजू नये. हे कलावंत, लेखक हे माणसाच्या जगण्याबाबत अत्यंत गंभीर आणि संवेदनशील असतात म्हणूनच त्यांच्याकडून अशा कलाकृती निर्माण

होत असतात, ही प्राथमिक जाण असणे अत्यावश्यक आहे. कला मुख्यत: मानवी समस्यांचे, वर्तणुकीचे भान घेत असते -- हा कलाक्षेत्राचा पायाच असतो, असे म्हणता येईल.

आता या कादंबरीकडे जाऊ. या कादंबरीला एखादे सलग कथानक नाही. ‘ पुढे काय झाले ‘ यासाठी ही वाचायची नसून वर्तमान काय चालू आहे, हे पाहणे, हे या कादंबरीचे तंत्र आहे. काहीच पूर्वनियोजित नाही. एकाला जोडून वा एखाद्या निमित्ताने दुसरे काही असे निघत जाते. कुठलाच तुकडा हा परिपूर्ण असा नाही. वास्तव हे पूर्ण कधी समजूच नाही शकत, अशा अर्थाचे एक वाक्यच आहे या कादंबरीत. नावावरूनच कळते की ही कादंबरी ‘ वास्तववादी ‘ नाही आहे. या कादंबरीतल्या लेखकाच्या मनाला गाढवाचे मूर्त रूप दिलेले आहे. ही वाक्ये बघा – “ दोघे चालत राहिले. चालण्यात एवढे गुंगले की तहानभूक विसरले. देहात जेवढी शक्ती तेवढं चालणं झाल्यावर ते कोसळले. डोळे मिटले गेले. आत एक उजेड पसरला. त्या उजेडात निरंजनच्या कादंबरीतली पात्रं सावल्यांसारखी बसली होती. तो स्वत: आणि गाढवही त्यात होतं. तो उजेड स्वप्नासारखा होता. “ पूर्ण थकल्यावर, कोणताही कंट्रोल ठेवायचे त्राण नसताना दिसलेला हा उजेड ! याच वातावरणात ही पूर्ण कादंबरी घडते. तर हीत काय काय घडते हे इथे सांगण्यात अर्थच नाही. ते मुळातूनच वाचायला हवे. या कादंबरीची शैलीही म्हटले तर ताबाहीन आहे पण वाक्यावाक्यात लेखकाच्या चिंतनशीलतेचा प्रत्यय देणारी आहे. आता ही आणखी काही वाक्ये बघा –

“ तर आता हा मी लिहितोय तो मजकूर कुठला पेहराव करील मला माहीत नाही. मी सर्व मजकुरावरच सोपवलं आहे. भूमिका बदलली की पेहराव बदलतो तसं काहीसं होत राहील किंवा होणारही नाही. “ ( पान ११ ).

“ लेखक आणि माणूस हे द्वंद्व घमासान चालूच असतं “ ( पान २१ ).

“ स्किझोफ्रेनिक बेलगाम रहदारीतून चालताना मला भीती वाटते. मरणाची भीती वाटते. नीट पाहिलं तर साधी भीतीसुद्धा मरणाची असते. गेल्या दोन दशकांत ही रहदारी एवढी वाढलीये. “ ( पान २४ ).

“ लेखक नाराजीनं म्हणाला, असं ठरवून लिहिलं तर माझी तरी लिहिण्यातली मजा जाईल. “ ( पान ८५ ).

“ लेखक एकदम ओरडला. अरे कादंबरी मी लिहिणार आहे की तुम्ही ? मला सामाजिक जाणिवेचं लेखन वगैरे प्रकारच मुळात मान्य नाही. तुम्ही ठरवताय तसं मला नाही जमणार लिहायला. “ ( पान ८६ ).

“ अहो मला एवढंच सांगायचंय की जे दिसतं तेवढंच वास्तव नसतं. पलीकडे खरं वास्तव असतं जे आपल्याला कल्पित वाटू शकतं “ ( पान ९६ ).

“ म्हणून मला वाटतं की खोटं परंतु मौलिक असं खरं बोलणं म्हणजे फिक्शन असावं. “ ( पान १०८ ).

“ हे बघ कलावंताला सत्य वगैरे कधीही गवसणार नसतं. सत्य गवसल्याचा त्याला भास होतो. भ्रम होतो. “ ( पान १०८ ).

कादंबरी लेखनाबद्दल आणि मानवी संबंध आणि कृती यांबद्दल अशी बरीच चिंतनात्मक वाक्ये या कादंबरीत आहेत. जी घटिते आहेत ती रूटीन नाहीत. लिहिण्यात कोणतेही टॅबू ( मान्यतेची बंधने ) नाहीत. अत्यंत ओघवत्या रीतीने परंतु बारीकसारीक तपशीलांचा वेध घेत हे लेखन येत राहते. हे तपशील एखाद्या कार्यक्षेत्राचे वा एखाद्या गुंतागुंतीच्या आर्थिक व्यवहाराचे नसून मानसिक वर्तणुकीचे आहेत.

प्रकार बराच वेगळा आहे तर हे भराभर वाचून संपवता येणार नाही. आरामात घोटाघोटाने घ्यायची ही एक दर्जेदार दारू आहे. सावकाश, हळूहळू किक देईल पण ती नुसत्या एका व्यक्तीला नव्हे तर व्यक्तीच्या माध्यमातून एकूण मानवी जगण्याला असेल.

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

होळी आणि गणपतीची सेम सेम गाणी ऐकत आयुष्यातली ६०/६०, ७०/७० वर्षे व्यतीत करणाऱ्या सर्वांना त्याच त्या शुभेच्छा !

डॉक्टरची सिक्सर

कोरोनाच्या काळात धारावी विभागात उत्तम काम केल्याबद्दल आमच्या नात्यातला एक डॉक्टर उमेश देशपांडे याचा सत्कार झाल्याची पोस्ट मी दिली होती. त्याला आम्ही मधून मधून फोनवर सल्ला विचारत असतो. सध्या माझ्या उजव्या पायाच्या मधल्या बोटाचे नख अर्धवट उचकटले गेले आहे. जमेल तेवढे मी कापले पण अजून समस्या शिल्लक आहे. यावर काय करावे याबाबत त्याला सल्ला विचारला. तो म्हणाला सरळ दवाखान्यात जाऊन ते नख पूर्ण काढून टाकणे हाच मार्ग. मग मी विचारले की असे केल्यावर पुन्हा तिथे नख येईल का ? यावर त्याने दिलेले सिक्सर उत्तर असे -- " नख येईल पण नव्या नखाला जुन्या नखाची सर असणार नाही ! "

--- ००० ---

स्त्री दिनानिमित्त –

काही वर्षांपूर्वी लिहिलेली कविता --

स्त्री

खरे आहे
स्त्री असते रोमँटिक
तिची ठेवण तिचे मन
यांतून असते तिला भान
तिच्या सत्तेचे जी तिला

गाजवायची नसते कुठेच
तिला आवडतो सामोपचार
सहजीवन आणि स्नेह
पुरुषाला सगळे
नीट आणि निश्चित
हवे असते आणि तिला असते जाण
जगण्यातल्या अनिश्चिततेची
धोक्याची आणि नाशाचीही
पुरुषाच्या विचारी मेंदूत
शिरू नाही शकत तिच्या
उत्स्फूर्ततेचे तर्कशास्त्र
ज्याचे आकार तिच्यासारखेच
असतात लोभस आणि स्फोटक
तोडण्यापेक्षा जुळवावे
शिक्षेपेक्षा क्षमा करावी
स्वप्ने अबाधित ठेवावी
हे असते तिचे तत्त्वज्ञान
तिचे संमोहन पसरते
नकळत कधी जाणीवपूर्वकही
अमुक तिला हवेच असा तिचा
आग्रह नसतो पण आपसूकच
विश्व तिला अनुकूल होते
पुरुषाच्या आकलनाबाहेर
ती साधी असते
एखाद्या फुलासारखी
नुसती असू इच्छिणारी
ही नसते तिची नाजुकता वा असमर्थता
असते वज्रशक्ती
तिची ती अमोघ
ती पटवून कसे देणार
पुरुषी विचारी मेंदूला

सहजतेचे महत्त्व विचारांतून –

ती शांत राहाते

तिला कळतो यातला मूलप्रश्न

ज्याचे निराकरण असूच नाही शकत

ती स्वप्ने पाहात राहते

जी नसतात पळवाटा तर

असतात तिचे जगणेच

तिच्या शरीराचा कण न कण उद्युक्त

उत्सुक आणि सळसळता

प्रत्येक क्षणासाठी

तिचे ओठ स्तन मांड्या योनी

तिच्या पापण्या

तिचे डोळे

तिचे चालणे वळणे पाहणे

तिच्या वस्त्रांचे किंचितसे लहरणेही

अद्भूत खजिन्यासारखे संपन्न

निर्मितीची अगाध नदी असणारे

तिच्यामुळेच पूर्णत्व

अन्यथा संघर्षमय

विचारांच्या हिंसेत

काय घडेल ? काय उरेल ? ...

--- ००० ---

( नसणे -- पान १३६. )

महिला दिनासाठी ही एक जगप्रसिद्ध कविता --

Phenomenal Woman

by Maya Angelou

Pretty women wonder where my secret lies.
I'm not cute or built to suit a fashion model's size
But when I start to tell them,
They think I'm telling lies.
I say,
It's in the reach of my arms
The span of my hips,
The stride of my step,
The curl of my lips.
I'm a woman
Phenomenally.
Phenomenal woman,
That's me.
I walk into a room
Just as cool as you please,
And to a man,
The fellows stand or
Fall down on their knees.
Then they swarm around me,
A hive of honey bees.
I say,
It's the fire in my eyes,
And the flash of my teeth,
The swing in my waist,
And the joy in my feet.
I'm a woman
Phenomenally.
Phenomenal woman,
That's me.
Men themselves have wondered

What they see in me.
They try so much
But they can't touch
My inner mystery.
When I try to show them
They say they still can't see.
I say,
It's in the arch of my back,
The sun of my smile,
The ride of my breasts,
The grace of my style.
I'm a woman
Phenomenally.
Phenomenal woman,
That's me.
Now you understand
Just why my head's not bowed.
I don't shout or jump about
Or have to talk real loud.
When you see me passing
It ought to make you proud.
I say,
It's in the click of my heels,
The bend of my hair,
the palm of my hand,
The need of my care,
'Cause I'm a woman
Phenomenally.
Phenomenal woman,
That's me.
--- °°° ---

०८-०३-२३.

मी सुरवातीच्या काळात एकदाच कुठल्यातरी मासिकाला कविता पाठवली होती. ती छापून आली आणि काहीतरी मनीऑर्डर आल्याचं आठवतंय.ती कविता मी कुठल्याच संग्रहात घेतली नाही.
न मागता स्वतःहून कुठे कविता पाठवण्याचं धाडस आणि चिकाटी माझ्यात नाही, हेच कारण.
एकदा कवी सतीश काळसेकरांनी माझ्याकडे कविता मागितली, पण ती छापली नाही. जेव्हा आमची भेट झाली तेव्हा मी त्यांना विचारलं,'सर, माझी कविता मिळाली होती ना?' ते म्हणाले,' हो,अरे मिळाली, पण मला ती अपूर्ण वाटली.थोडं अजून काम कर तिच्यावर.'
मी प्रतिकार केला नाही कि डिफेन्सही केला नाही.
आणि गम्मत म्हणजे तीच कविता चंप्रसरांना आवडली. ती त्यांनी त्यांच्या 'आवर्तने: कविता, आशय, आकलन' या पुस्तकात घेतली आहे.
थँक्यू चंप्रसर! --- avinash gaikvad.
Champra Deshpande
वा ! भारी आहे ही कवितेची पूर्वकथा !

पहिल्याच कवितेला अजब पारितोषिक

लाख्यांच्या पोस्टमुळे माझ्या, सत्यकथेत प्रसिद्ध झालेल्या पहिल्या कवितेची आठवण झाली. ती कविता होती, ‘ झुंजुन गेल्या सरी ‘. माझ्या १७ व्या वर्षी ती सत्यकथेत आली होती. त्या कवितेला, माझ्या मते, एक विशेष पारितोषिक मिळाले, त्याची आठवण सांगतो. जरा अघळपघळ पद्धतीने सांगतो.
डॉ. मनोज भिसे हे माझे मित्र होते. ते वाडिया कॉलेजात इंग्रजीचे प्राध्यापक होते. शिवाय ते एक उत्तम अभिनेतेही होते. त्यांनी ‘ घाशीराम -- ‘ मधला घाशीराम केला होता. तर त्यांनी एकदा, वाडिया कॉलेजात इंग्रजी विभागातर्फे होणाऱ्या एका कार्यक्रमासाठी माझे नाव सुचवले होते. कार्यक्रम असा होता की निरनिराळ्या भाषांतले कवी, कथाकार, नाटककार यांनी आपापल्या सर्जक प्रक्रियेबद्दल बोलायचे. त्यात मराठीचा प्रतिनिधी म्हणून मी माझ्या नाट्यलेखनावर बोलायचे होते. त्यानंतर प्रत्येकाकडे काही विद्यार्थीसमूह देण्यात येणार होता आणि त्यांचा एक प्रकारचा लेखन-क्लास घ्यायचा होता. तोही मी घेतला होता. मी माझे भाषण लिहून नेले होते, ते वाचून दाखवले. अध्यक्ष होत्या शोभा डे. सर्व भाषणे झाल्यावर त्यांनी मुद्दाम मला भेटून, त्यांना माझे भाषण आवडल्याचे सांगितले होते.
या कार्यक्रमातल्या माझ्या यशस्वी सहभागानंतर डॉ. मनोज भिसे यांनी माझे नाव एका कार्यक्रमासाठी अहमदनगरच्या कॉलेजाला सुचवले. तिथे इंग्रजीतून ‘ मराठी नाटक ‘ या विषयावर बोलायचे होते. तोही कार्यभाग मी नीट पार पाडला होता, ते ठीक. पण, त्या कार्यक्रमापूर्वी आदल्या दिवशी आम्ही काहीजण एका लॉजवर राहिलो

होतो. तिथे मराठीतले एक विचक्षण समीक्षक डॉ. रवींद्र किंबहुने हेही होते. रात्री आम्ही गप्पा मारत बसलेलो असताना कुणितरी माझी ओळख करून दिली. किंबहुने म्हणाले, प्रत्यक्ष भेट आज झाली पण मी यांना ओळखतो. असे म्हणून त्यांनी सर्वांना जरा थांबण्याची खूण केली. आणि ते म्हणाले, तुमची सत्यकथेत आलेली पहिली कविता, ' झुंजुन गेल्या सरी '. ऐका. असे म्हणून त्यांनी ती पूर्ण कविता पाठ म्हणून दाखवली ! मला हा एक धक्काच होता ! माझी कोणतीच कविता मला स्वत:ला कधीच पाठ नसते. किंबहुन्यांनी ती कविता म्हणून दाखवणे हा मला नुसताच एक धक्का नव्हता तर ते एक अमूल्य पारितोषिकही होते !

तो  धक्का माझ्या मनात अर्थातच जपला गेलेला आहे !

ही ती ६० वर्षांपूर्वीची कविता ---

झुंजुन गेल्या सरी

झुंजुन गेल्या सरी

नभाभ्रे उन्हात भिजुन वरी

भांडुन गेली परी

नभाशी पर्वतशिखरावरी

चिंबुन गेल्या लता

फटकुनी रस्त्याशी वाकता

भंगुन गेली शिला

साहुनी डोंगर भांबावला

सांडुन गेली निशा

दिसाला चढली जेव्हा नशा

स्फुंदुन गेल्या दिठ्या

बिचाऱ्या मेघांच्या एकट्या...

--- ० ---

--- ००० ---

एक आठवण –

( मन ) हा एक एकपात्री दीर्घांक आहे -- जो नीट करेल तो नटसम्राटच !

( गोव्याच्या प्रयोगाची जाहिरात ).

हिंदीतला हा प्रयोगही बऱ्याच जणांनी पाहिला होता – ( Renovation ).

कमलाकर नाडकर्णी

एक उत्तम नाट्यसमीक्षक ! माझ्या अनेक नाटकांवरची त्यांची समीक्षणे माझ्या संग्रही आहेत ! एक गंमतीची आठवण आहे. महाराष्ट्र कल्चरल सेंटर च्या दीर्घांक स्पर्धेत माझा ' डावेदार ' हा दीर्घांक पहिला आला होता. मला लेखनाचेही पारितोषिक मिळाले होते. परीक्षक होते, कमलाकर नाडकर्णी आणि प्रतिमा कुलकर्णी. त्या दीर्घांकावर, त्यांनी तो कसा चांगला आहे याबाबत लिहिलेही होते. कालांतराने त्यांच्यातला पुरोगामी जागा झाला असावा. नंतर त्यांनी असे काही लिहिले की ' ढोलताशे ' लिहिणारा हा लेखक ' डावेदार ' सारखे प्रतिगामी नाटक कसे काय लिहू शकतो ? ! त्यावर मी, बाहेर क्रांती होवो न होवो, नाडकर्णींच्या समीक्षणात मात्र क्रांती झालेली आहे, असा एक उपरोधिक लेख लिहिला होता. तोही प्रसिद्ध झाला होता ! अशी काही क्रांती झाली असेल तर नाडकर्णींनी यापूर्वीचे स्वत:चे सर्व लेखन नाकारायला हवे, असे मी म्हटले होते ! हा संघर्ष होऊनही आमच्या मैत्रीपूर्ण संबंधात काहीच फरक पडला नव्हता. त्यांची कन्या, नमिता वर्तक, ' आई कुठे काय करते ' या मालिकेसाठी चांगले लेखन करत आहे, तिने तिचे स्वत:चे नाटक लिहायला हवे, असे आमचे फोनवर बोलणेही झाले होते. उत्तम छान दिलखुलास मित्र ! त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

--- ००० ---

वाचन संस्कृतीच्या विकासासाठी एका चॅनेलवर पुस्तकांबाबत एक कार्यक्रम असतो -- रविवारी दुपारी २/३० वाजता !

आजच्या दिलखुलास भेटीगाठी -- डॉ. दीपक बोरगावे, मी, मनोज पाठक आणि डॉ. शिरीष चिंधडे --- ( photo ).

भवताल आणि भयताल ( कवितासंग्रह )

कवी ० दीपक बोरगावे, प्र ० सम्यक विद्रोही प्रबोधन संस्था, कोल्हापूर.

१९७६ ते ७९ या काळात मी कोल्हापुरात होतो. तेव्हा आम्ही ‘ प्रत्यय ‘ या समूहाची स्थापना केली होती. त्यात अनेक लेखक, कवी, चित्रकार, दिग्दर्शक, अभिनेते वगैरे होते. वाचने व चर्चा खूप चालत. त्यात आताचे डॉ. दीपक बोरगावेही सामील असत. नंतर आमचे भौतिक, मानसिक मार्ग वेगळे होत गेले, तो भाग वेगळा. इथे फेसबुकवर बोरगावे सरांचे दर्शन नेहमीच होत होते, पण, अलीकडेच त्यांची प्रत्यक्ष भेट झाली. त्या वेळी त्यांच्याकडून मला हा सदर कवितासंग्रह सप्रेम भेट मिळाला. तो वाचून झाल्यावर मित्रत्वाच्या नात्याने हा अभिप्राय लिहीत आहे.
या संग्रहातल्या कविता प्रामुख्याने शोषित-वंचितांची दु:खे व्यक्त करणे आणि विशेषत: समतेच्या चळवळींतल्या महात्म्यांचे मोठेपण व्यक्त करणे, अशा आहेत. या सर्व कवितांच्या मुळाशी सामाजिक समतेची तीव्र इच्छा असल्याचे प्रभावीपणे जाणवते. कला वा कविता ही परिवर्तनाचे साधन असायला हवी ही एक प्रगाढ निष्ठा यामागे आहे. विषमतेची व्यवस्था बदलण्याची आच आहे. या कविता त्यांचे जीवितकार्य चोखपणे करत राहतील यात शंका नाही. माझे कलेबाबतचे आकलन वेगळे असते. कला हे साधन नसून साध्य आहे, असे मला वाटते. कला ही स्वत:च्या

असण्यातच परिपूर्ण म्हणजे समतायुक्तच असणे, हे मला महत्त्वाचे वाटते. विशेष म्हणजे या दृष्टीनेही ‘ पोचतील ‘ अशा काही कविता या संग्रहात आहेत. त्यांतल्या तीन कवितांबद्दल थोडक्यात बोलायचा विचार आहे.

( एक ) इथं काहीतरी

इथं काहीतरी
जळल्याचा वास येतोय
गादीवर सिगारेटचं थोटकं तर टाकलं नाहीस ना?
खिडकीही उघडीच आहे
बाहेर काही जळत असेल का ?
कुठून येतोय हा वास
काही समजत नाही
कुठेतरी नक्कीच जळत असलं पाहिजे
जरा खाली जाऊन पाहतोस का?
शेजाऱ्यांनी धूर केला की काय?
काय वैताग आहे!
ऑफिसातही हाच वास होता
काही लागण तर नसावी ?
काहीही होऊ शकते हो !
धुराचाही नवा संसर्ग असू शकतो ?
काही कळत नाही
पोरांना खालीच घेऊन गेलेलं बरं
ती बिचारी कारण नसता आजारी पडतील
नक्की समजेल का उद्या ?
काही भरोसा नाही कशाचाच!
इथं काहीतरी
जळल्याचा वास येतोय

( पान ४९ ).

ही कविता नुसतीच धुराच्या वा गटाराच्या वा उंदीर मेल्याच्या वासाबद्दल आहे, असे मला वाटत नाही. हा एका व्यापक अवकाशातला, मानवी जगणेच धोक्यात आणणारा वास आहे. बाहेर त्याचा उगम सापडत नाहीय. कारण तो वास सडत चाललेल्या मनाचा आहे. धर्म, जात, भाषा वा विचारसरणी यांच्याशी होणाऱ्या समरूपतेच्या घट्ट स्थितिशीलतेतून तयार होणाऱ्या डबक्याचा हा वास आहे. हे मानसिक जळत राहणे, नष्ट होत राहणे आहे. हे भान देणे हेच इथे कवितेचे परिपूर्ण काम आहे.

( दोन ) वर्तुळे

एक वर्तुळ अगदी वर, त्यात अनेक वर्तुळे

आजूबाजूलाही अनेक त्याच्यातूनच फुटलेली

शिवाय, प्रत्येकांत लपलेली अनेक छोटी वर्तुळे

हीही उपस्थित अनेक मोठ्या वर्तुळांत

एकमेकांना छेदून बाहेर पडू पाहणारी

केंद्रापासून

पण परिघावरच लोंबकळणारी

ह्या छोट्या वर्तुळांखाली

त्यांच्या मधोमध अजून अनेक वर्तुळे

फिरतात अगदी वरच्या वर्तुळात

म्हणजे तसा प्रयत्न असावा त्यांचा

प्रत्येकांची केंद्रे ही वेगवेगळी

तीही फिरतात एका तिसऱ्याच केंद्रातून

वरचे वर्तुळ हे वरच जाणार

आणि खाली सरकणारे केंद्र

हे वर कधी जाईल, हे सांगता येणार नाही

वर्तुळांच्या ह्या हालचाली

अगदी हैराण करणाऱ्या

केंद्रांची वर्तुळे बनत

इतिहासाची चाके वर्तमानात बदलतात

एक वर्तुळ अगदी वर त्यात बरीच वर्तुळे

आजूबाजूलाही अनेक त्याच्यातूनच फुटलेली

( पान ८० ).

ही कविता, समूह आणि व्यक्ती यांच्या व्यामिश्र रचनांची अनाकलनीय अस्तित्वे व्यक्त करते. केंद्रे हलतात, बदलतात – वर्तुळांच्या हालचाली हैराण करतात. हे वेगवेगळ्या प्रकारे पण एकमेकांवर परिणाम करत चालणारे मानवी जगणे आहे. ' इतिहासाची चाके वर्तमानात बदलतात ' ही यातली मर्म-ओळ आहे. इतिहासाच्या प्रभावाखाली वर्तमान आहे. तसेच, वर्तमानाच्या सोयीने भूतकाळही बदलतो आहे. काळालाही जणू वस्तुनिष्ठ परिमाण राहिलेले नाही. आपापल्या मन:स्थितीप्रमाणे भूतकाळ पाहिला व सादर केला जातो आहे.

( तीन ) आपण हा प्रश्न उद्या सोडवू

पाच पन्नासची लोकलाय

चल मी निघतो
जाशील रे माहिताय अजून चिकार वेळाय
मी काय म्हणतोय
प्रत्येक व्यवस्थेत कलेचे एक मूल्य असतंच
भांडवली व्यवस्थेचाही इथे अपवाद करता येणार नाही
वर्गीय संघर्षाचा प्रश्न नाही रे हा
जातीचे काय करणार?
हा तिढा कायम आहे
कलेच्या माध्यमातून हे सोडवता येईल रे थोडंस्स
ते तू कर
बघ काय होतंय ते?
जातीचं काय झालंय माहिताय
आपल्या देशात तरी किमान
ती आपल्याच शरिराला चामड्यासारखी चिकटलीय
ती इतकी घट्ट आहे की
तिला काढून टाकणं म्हणजे
कठीणच
अरे ही अडक आपणांसच काढाय पाहिजेल
ते खराय रे; पण काय झालंय माहिताय?
चल, मला निघाय हवं माझी लोकल चुकेल
आपण हा प्रश्न उद्या सोडवू
( पान ११३ ).

ही काहीशी लाईट व उपरोधिक टोनमधली कविता आहे. कलेची मूल्यात्मकता आणि प्रत्यक्ष जगणे यांतले अंतर इथे उघडे पाडले जातेय. इथे जात जणू घट्टपणे शरीराची चामडीच बनून चिकटलेली आहे ! या प्रश्नावर ना निराकरण आहे ना तसे काही सापडण्याची आशा आहे. हा मानवी मनाच्या समरूपतेचा प्रश्न आहे. जातीशी समरूप असण्यात सुरक्षित वाटण्याची ही समस्या आहे. याची का गरज पडावी ? कोणत्या असुरक्षिततेमुळे मन हे जात, धर्म, भाषा वा विचारसरणी यांना बिलगून राहू इच्छिते ? – हा प्रश्न नुसताच सामाजिक म्हणून नाही पाहता येत. मग करावे काय ? तेही नाही कळत ! त्यामुळे या प्रश्नापासून पळच काढण्याची एक उथळ युक्ती इथे कामाला येते आहे ! निर्भीडपणे हे इथे व्यक्त झालेले आहे.

एकदा तुम्ही कविता वाचकाकडे सोपवलीत की, त्या कवितेशी प्रतारणा न करता का असे ना, पण ती वाचण्याचे आणि समजून घेण्याचे स्वातंत्र्य वाचकाला असते ! कवीचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य जितके महत्त्वाचे असते तितकेच वाचकाचे वाचनस्वातंत्र्यही महत्त्वाचे असते ! – असे काही या निमित्ताने म्हणावेसे वाटते !

--- ००० ---

खरंतर, मनोजच्या (पाठक) आग्रहामुळेच मी, चंप्र देशपांडे आणि आमचे मार्गदर्शक डॉ. शिरीष चिंधडे... याशिवाय मनोजचे अजून दोन मित्र पुण्यात शारदा हॉटेल एरंडवणा या ठिकाणी दोन एक दिवसांपूर्वी भेटलो.

स्वतःच्या गाडीवरून पुण्यात कुठे बाहेर जाणे हा भयंकर प्रकार आहे. अलीकडे ही गोष्ट खूपच जाणवण्यासारखी झाली आहे. पूर्वी असे नव्हते. याची मुख्य दोनतीन कारणे आहेत/असावीत. एक तर वाढत चाललेले वय-- आणि अलिकडे पुण्यात रस्त्यावरची ट्राफिक इतकी असते की, तुम्हाला घाबरत घाबरतच हळूहळू जावे लागते. पण तरीही काय होईल हे काही सांगता येत नाही. काय म्हणतात ते "कफन बांधके" ☺☺ असा हा प्रकार असतो.

अजून एक कारण म्हणजे, पुण्यातील प्रत्येक रस्त्याचा चेहरा रोजच बदलत असतो. म्हणजे आपण नेमके कुठे आहोत हे समजत नाही. यामुळे मी कुठल्यातरी एका मित्राला बोलवूनच त्याच्याबरोबर बाहेर जातो. किंवा एखाद्या विद्यार्थ्याला हाक मारतो. येतात बिचारे बरोबर. मग नाटक बघणे असो किंवा कुठला कार्यक्रम असो... मग ते व्यवस्थित घरी सोडून वगैरे जातात. किंवा मग उत्तम मार्ग म्हणजे ओला किंवा उबर गाडी.

पण यावेळी इतक्या गडबडीत मनोजचा मेसेज आला की, ताबडतोब निघावे लागले (म्हणजे तसे माझे जाणे काही ठरतच नव्हते. काही काम देखील सुरू आहे. कामात व्यस्तही आहे त्यामुळे). आणि यावेळी मनोजचा आग्रहही खूप इंटेन्सिव्ह होता. मुख्य म्हणजे त्यालाच आम्हाला भेटायचे होते.

पोचलो व्यवस्थित. आणि बऱ्याच गप्पा झाल्या. कला, समाज, कविता, साहित्य--- इतरही अनेक खास असे विनोदी किस्से एकमेकांना आम्ही सांगितले (यामध्ये मनोजचाच मोठा सहभाग होता).

अगदी घरगुती स्वरूपाचे जेवण झाले. चंप्रंना मी माझी पुस्तके दिली. एक इंग्रजी अनुवादाचे पुस्तक पण दिले. पण ते म्हणाले नको. मी सामाजिक, राजकीय वगैरे असले काही आता वाचत नाही. कवितासंग्रह मात्र त्यांनी आवर्जून घेतला. हा तुमचा कवितासंग्रह आहे. मी नक्की वाचतो.

यावेळी शिरीष चिंधडे यांचे पुस्तक मनोजने ('पूर्वप्रभा आणि पश्चिम आभा', वर्णमुद्रा प्रकाशन) मला भेट म्हणून दिले.

माझ्या संग्रहावर चंप्र काही लिहितील वगैरे असे काही वाटले नव्हते. पण आज फेसबुकवर चक्क त्यांनी केलेली काही निरीक्षणे मला वाचायला मिळाली. मलाच माझ्या-- या काही ज्याला कविता म्हणता येतील त्यावर त्यांनी जे सांगितले आहे ते-- वाचून आनंद तर झालाच-- पण माझ्याच कवितांचा हा वेगळा अर्थही समजला.

चंप्र म्हणतात ते खरच आहे. वाचकांना अभिप्रेत असणारा, समजणारा-- वेगवेगळ्या अर्थांचे आकलन, त्याचे विश्लेषण हे अधिक महत्त्वाचे असते. त्यांनी माझ्या कवितांवर लिहिलेली काही निरीक्षणे मी इथे शेअर करतो आहे.

-दीपक बोरगावे

०-०-०

चला, संपली सुनावणी --
कामाला लागा आता –

कुणाचा विश्वास सार्थ ठरतो
ते कळेल लौकरच –

कुणाची लोकशाही जिंकते
ते कळेल लौकरच –

२१ -- १९ -- ८ --
या चिमण्यांनो, परत फिरा रे –

चार चार पैलवान एका वेळी -- याच्या हातात पाय, त्याच्या पायात तंगडे -- असा गुंताडा -- आता अंपायरची कसोटी !!!

Mukesh Machkar यांच्या पोस्टवर दिलेली माझी कॉमेंट --
आमच्या बँकेत तिवारी नामक एक नवा शिपाई आला होता. त्याला साहेबांनी बाहेर जाऊन काही काम करून यायला सांगितले होते. त्या कामाला त्याला वाजवीपेक्षा बराच जास्त वेळ लागला. साहेबांनी विचारणा केली तर काही कारण सांगून तो हसू लागला. " हसतोस काय मूर्खा, मेमो मिळेल तेव्हा कळेल -- " असे साहेब रागावून म्हणाले. तरीही तो हसत होता ! " अरे वेडा आहे का हा -- मी रागावतोय तर हा हसतोय -- " साहेब म्हणाले. " क्या करे साब, हमे हंसी आतीही रहती है -- " असे म्हणून तिवारी पुन्हा हसू लागला ! " ताबडतोब बाहेर हो इथून -- पुन्हा माझ्या केबिनमध्ये हसत आलास तर याद राख -- " साहेब चिडून म्हणाले. तरीही हा शहाणा हसतच केबिनमधून बाहेर आला !
--- ००० ---

कोणते का असे ना, प्रस्थापित साम्राज्य उद्ध्वस्त करणारी कविता ! भाषेला म्हणजे मनाला असे फ्री सोडून दिलेली कविता मराठीत कमी आहे ! सलाम !
Sharmishtha Bhosale

.

तू क्रॉफर्ड मार्केटात घेऊन दिलेले झुमके हरवले

तर तिथंही
मी मारली उगाच फालतू फिलॉसॉफी
की जो खोया है
वो फिर मिला भी है
चाहे रूप बदलकर क्यों न हो
हरवून पुन्हा भेटतात माणसं
तेव्हा फक्त चकवे भेटतात ॲक्च्युली
पुरान्यावाल्या माणसाच्या पुलाखालून
वाहून गेलेलं असतं कितीतरी गॅलन पाणी
हरामी, अपरिहार्य पाणी.
बरं ते सोड,
स्टॉकहोम सिंड्रोमचा हँगओव्हर उतरला
तेव्हा किती कुरूप दिसायला लागला ना
तुझ्यातला ॲडम,
आणि माझ्यातली इव्ह
रात्रीचे इको ओलांडत
पहाटे वळून पाहिलं
तर अर्धवट उजेडात
किती अनोळखी वाटला होता
शेजारी झोपलेला तुझा देह
तेव्हा वाटलेली भीती
अस्सल होती
तुझ्या नोमॅड नजरेइतकीच
आलास, ये!
निघालास,
हरकत नाही.
तेवढा
जाण्याआधी घास ना
माझ्या कपाळी,
तुझ्या सावळ्या कपाळावरचा भंडारा
मी जेजुरीच्या डोंगरात शोधत फिरेन नागफणी

नाही सांगणार दावा तुझ्या सख़्तकोमल बहरावर
- शर्मिष्ठा

मध्यभागी आहेत कोल्हापूरला आम्ही स्थापन केलेल्या ' प्रत्यय ' या नाट्यसंस्थेचे अनेक वर्षे अध्यक्ष, नेपाथ्यकार वगैरे असलेले अनिल सडोलीकर आणि त्यांच्या दोन बाजूंना आहेत मराठीतले दोन कवी ( आणि मी अर्थात नाटककारही ) राहुल पुंगलिया आणि चं. प्र. देशपांडे. ( फोटो ).

Rahul Pungaliya is with Anil Sadolikar and Champra Deshpande.

.

चं प्र देशपांडे आणि अनिल सडोलीकरांसोबत .
खूप दिवसांनी मला लहान मुलांसारखं आगाऊपणे बोलता आलं
खूप दिवसांनी दुरुस्त केला गेलो
या दिलखुलास उमद्या मित्रांची वारंवार भेट व्हावी.--- राहुल पुंगलिया.

पूर्वप्रभा आणि पश्चिम आभा
ले ० शिरीष चिंधडे, प्र ० वर्णमुद्रा

शिरीष चिंधडे यांचा इंग्रजी वाङमयाचा सखोल अभ्यास असून ते शिक्षणतज्ञही आहेत. त्यांच्या परिश्रमांतून हे पुस्तक लिहिले गेलेले आहे, हे महत्त्वाचे आहे. अनेक क्षेत्रांतल्या काही ना काही अद्वितीय काम करून गेलेल्या व्यक्तींविषयी आपल्याला कुतूहल असते. कसे गेले असेल त्यांचे आयुष्य, कोणत्या प्रेरणांनी त्यांनी कामे केली असतील, अडचणी, संकटे त्यांनाही आली असणारच त्या त्या वेळी ते त्यांतून कसे बाहेर पडले असतील, त्यांची स्वभाववैशिष्ट्ये कोणती असतील, अशा अनेक प्रश्नांबाबत आपण उत्सुक असतो. हेच ओळखून चिंधडे यांनी अनेक मोठ्या व्यक्तींची थोडक्यात चरित्रे आणि त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये यांवर वेळोवेळी लिहिलेले लेख या पुस्तकात संकलित केलेले आहेत. यांतला बर्ट्रांड रसेलवरचा प्रदीर्घ लेख तर खासच आहे. त्याची जडणघडण आणि त्याची एक जागतिक महत्त्वाचा तत्त्वज्ञ होण्याची वाटचाल या लेखात फार चांगल्या पद्धतीने आलेली आहे. त्याच्या काही मतांचेही उल्लेख यात आलेले आहेत. एका ठिकाणी तो म्हणतो, “ आपल्या व्यक्तिमत्वावर स्त्रियांचा प्रभाव पडेल याची पुष्कळ पुरुषांना धास्ती असते. माझ्या स्वत:च्या प्रत्ययानुसार ही मूर्खपणाची भीती आहे. पुरुषाला स्त्री व स्त्रीला पुरुष हा मानसिक आणि शारीरिक गरजेतून हवाच असतो. स्वत:पुरतंच म्हणायचं झालं तर, ज्या स्त्रियांवर मी प्रेम केलं त्यांचा मी ऋणाईत आहे. कारण त्यांच्या प्रेमाविना मी`तद्दन कोत्या मनाचा पुरुष झालो असतो. “ कॉनरॅड आणि रसेल यांच्या मैत्रीबद्दल लिहिताना चिंधडे लिहितात, “ अंतरीचे स्वर जुळल्यावर वैचारिक मतभेद क:पदार्थ असतात, हे या

मैत्रीवरून सिद्ध होते. " एकदा रसेलला राजकारणात शिरायची हुक्की येते, तेव्हा त्याला लिबरल संघटनेकडून काही प्रश्न विचारले जातात – ती प्रश्नोत्तरे अशी आहेत --

प्र. : आपण चर्च ऑव्ह इंग्लंडचे सभासद आहात काय ?

उ. : नाही. माझ्यावर नॉनकन्फर्मिस्ट म्हणून संस्कार झालेले आहेत.

प्र.: ते संस्कार अजून टिकून आहेत काय ?

उ. : नाही.

प्र. : म्हणजे आपण अज्ञेयवादी आहात, असा अर्थ आम्ही घ्यायचा काय ?

उ.: होय. तसाच अर्थ तुम्ही घ्यावयास हवा..

प्र. : प्रसंगवशात तरी चर्चमध्ये जायला तुम्हाला रुचेल ना?

उ.: छे, छे!

प्र. : प्रसंगवशात तुमच्या पत्नीला चर्चमध्ये जायला रुचेल ना?

उ. : छे! तिलाही ते रुचणार नाही.

प्र. : म्हणजे तुम्ही अज्ञेयवादी आहात असंच ना?

उ. : होय. बहुतेक असंच असावं.

अर्थात रसेलना तिकिट मिळालं नाही.

एकूण १५ अशा लोकोत्तर व्यक्तींचा परिचय या पुस्तकात आहे. जरूर वाचनीय !

--- ००० ---

संदेश

गुढी पाडव्याच्या आसपास आणि वसंत ऋतूच्या आगमनाप्रीत्यर्थ कुणी जागतिक सज्जन काही संदेश देत असेल तर त्याच्याकडे लक्ष द्यायला हवे. आपले माध्यमसम्राट रूपर्ट मरडॉक साहेब असा काही संदेश देत आहेत. त्यांचे वय सध्या ९२ वर्षे आहे पण ते यंग अँड ज्युबिलंट म्हणतात तसे आहेत ! गेल्याच वर्षी त्यांच्या चौथ्या पत्नीपासून ते विभक्त झाले. आता त्यांचे पाचवे लग्न ठरलेले असून त्यांची वाग्दत्त वधू ६६ वर्षांची आहे. " आयुष्याचा उत्तरार्ध एकत्र घालवण्याची उमेद आम्ही बाळगून आहोत " असे ते म्हणतात. पुढे ते असेही म्हणतात की " आता हे बहुतेक शेवटचेच प्रेमप्रकरण ! " विशेष म्हणजे यातल्या ' बहुतेक ' या शब्दाने ती सदर वधू मुळीच डिस्टर्ब झालेली नाही ! दोघेही प्रेमपंढरीचे प्रवासी असणार ! यातून संदेश काय काय आहेत --

उमेद सोडू नका.

प्रेमाला पर्याय नाही.

प्रेमाला वयाचे वा कसलेही बंधन नाही – ते अनंत असते.

मुलगा आरेसेसचा आहे वा मुलगी कम्युनिस्ट आहे, असले काहीही डोक्यात आणू नये.

परिस्थिती कशीही असो, तुमचे प्रेमपात्र तुम्हाला मिळू शकते.

आनंदाने जगण्याला महत्त्व द्या.

आजच्या जगात माध्यम सम्राटाइतका मोठा सम्राट कोण असू शकतो ?

त्याच्या तर्फे हा संदेश पसरवण्यात निसर्ग शक्तीचा नक्कीच काही हेतू असणार !

आशावादी राहा – हेच सांगण्याचा तर हेतू नसेल ? !

गुढीपाडव्याच्या सर्वांना खूप शुभेच्छा !

--- ००० ---

विदारक सत्य

" इतिहासकार पूर्वग्रहदूषित असावाच लागतो. किंबहुना पूर्वग्रहहीन व्यक्ती जगाच्या पाठीवर अस्तित्वातच नसते. वाचकांना जर मतं पटत नसतील तर त्यांनी एका इतिहासकारानंतर त्याच विषयावर लिहिणाऱ्या विरोधी मतधारी दुसऱ्या इतिहासकाराचे ग्रंथ खुशाल वाचावेत. " --- बर्ट्रांड रसेल -- पुस्तक, ' पूर्वप्रभा आणि पश्चिम आभा ' , ले ० शिरीष चिंधडे -- पान २९४. )

आम्ही जुने बँक सहकारी – ( फोटो )

स्नेहाने मला गुरुवर्य म्हणणारा माझा मित्र ---

राहुल बनसोडे !

स्मृतीस अभिवादन !

असे नेहमी नाही दिसत -- वाटल्यास बघा --

चंद्राजवळ शुक्र ! ( २४-०३-२३. )

एका मोठ्या असत्याला छोट्या छोट्या असत्यांनी एकत्र येऊन हरवणे अवघड म्हणजेच मुश्किल असते !

" भाऊ आमच्यांत मोठ्यात मोठा. माझी त्याच्याशी ओळख झाली तेव्हा हाफ पँटीत मी आणि सोशालिस्ट पार्टीत तो होता. " -- दि. पु. चित्रे.

" सबको संमति दे भगवान " नाही हो,

" सबको सन्मति -- " म्हणा !

सगळ्यांना संमती कशी चालेल ?

ललित साहित्याबाबतचा एक प्रश्न ---

अर्थात इंग्रजी शिक्षण, विशेषतः विद्यापीठीय शिक्षण, मराठी समाजात व्यापकपणे पसरले नाही किंवा आजही खोलवर रुजलेले नाही. त्यामुळे सुशिक्षिता'चे साहित्य हे उच्चभ्रू अभिजनवर्गाचे क्षेत्र राहिले आणि सामाजिकदृष्ट्या संकुचित राहिले. त्यातही आधुनिक, प्रायोगिक, नावीन्याचा शोध व वेध घेणारे वाङ्मय अतिशय अल्पसंख्य राहिले आणि त्याचा समर्थक वाचकवर्गही सहसा नागरी किंवा महानगरी अभिजनवर्गाचासुद्धा अतिसूक्ष्म हिस्सा होता. ही स्थिती आजही आहे आणि पुढेही चालूच राहील. सर्वसाधारण साक्षरतेच्या प्रमाणात जो व्यापक नवसाक्षर वाचकवर्ग निर्माण झालेला आहे आणि होत राहील त्याला आपली स्वाभाविक बाजारपेठ मानणारे प्रकाशक-लेखक-विक्रेते आणि 'कलात्मक वाङ्मया'ची निर्मिती व प्रकाशन करणारे यांच्यातील अंतर कायम राहील किंवा वाढत जाईल.
--- दिलीप पुरुषोत्तम चित्रे, साहित्य आणि अस्तित्वभान भाग -- २, पान ३६४.

नाटकघर, ऋजुता सोमण कल्चरल अकादमी आणि द बॉक्स निर्मित नृत्यनाट्य
मॉल प्रॅक्टीस अँड द शो
संकल्पना-दिग्दर्शन : अतुल पेठे, प्रकाशयोजना : प्रदीप वैद्य
कलाकार : ऋजुता सोमण, संगीतसाथ : उमेश वारभुवन

मालप्रॅक्टीस हा शब्द आपण अनेकदा ऐकतो. त्याचा अर्थ असतो बेकायदेशीर, वाईट, अनैतिक, शोषक वा भ्रष्टाचारी कृती. त्याची आठवण व्हावी असाच हा मॉल आहे. खरेदीचे, चंगळ करण्याचे, बेछूट ठिकाण. हे नृत्यनाट्य स्त्रीजीवनाला आलेले वस्तूचे स्वरूप विदारकपणे दाखवते.
एक नर्तिका आहे. छान, निरागस, हौसेने नृत्य करणारी. अचानक तिचे आयुष्य बदलते आणि ती निव्वळ एक उपभोग्य वस्तू बनते. नृत्य ही कला म्हणून तिच्या आयुष्यात राहात नाही. ती ज्या पद्धतीने तिचे पैंजण काढून टाकते वा त्यांचे जणू अखेरचे चुंबन घेते त्यावरून हे जाणवते. अत्यंत उच्चभ्रू वर्गापासून ते अगदी रानटीपणा वाटावा अशा वातावरणाचे दर्शन इथे घडत राहते. सुरुवातीचे तिचे छान आत्मविश्वासपूर्ण चालणे आता जणू गायब होते. ( सुरुवातीचे तिचे चालणे आणि “ पोचतेच आहे – ट्रॅफिक खूप आहे “ हे एकच वाक्य तिचे रूटीन जगणे तर सुचवतेच पण हे एक शहर आहे हेही सुचवते. ) तिच्या जगण्यात झालेला बदल एका धक्का तंत्राने आपल्यावर आदळतो. लैंगिक बाबतीतले सर्व बरेवाईट शब्द, कृती यांचे पडद्यावर कुरूप दर्शन घडते.
मध्यंतरी ती स्त्री कपडे उतरवते. सर्व आकार प्रदर्शित होतील असे. आणि तीच – वा, छान आणि कमाल – हे तीन शब्द अनेक प्रकारे म्हणते. पण हे दृश्य सादर असे होते की मुळीच उत्तेजकता दिसत नाही. नंतर एका प्रचंड काळ्या बुरख्यातून तिच्या हालचाली दिसतात. जणू तिचे व्यक्तित्व संपूनच गेलेले आहे.

या सगळ्याच्या आधी तिची एकदोन नृत्ये आहेत. पाऊस येण्याच्या नृत्यात तिची मास्टरी दिसते. सोबत पुरेसे यथायोग्य वाद्यसंगीतही आहे.
अमुक अशी एक शाब्दिक कथा सांगणे वा संवादांतून प्रेक्षकांना काही पोचवणे असे हे नाटक नाही. नृत्य, हालचाली आणि कृती यांतून आशय पोचवणारे हे नृत्यनाट्य आहे. शब्द जवळ जवळ नाहीतच. ऋजुता सोमण ही एकच कलावती हे एकपात्री ‘ जगणे ‘ पेलून नेते. अत्यंत सहज आणि गरजेप्रमाणे बिनधास्त असे सर्व प्रकार ती पार पाडते. हे उत्तेजकही वाटू नये आणि बीभत्सही वाटू नये – अशा असिधारेवरून आशय पोचवण्याचे हे अवघड काम ती सशक्तपणे पार पाडते. यात अर्थातच दिग्दर्शन आणि तांत्रिक अंगे याची मोलाची साथ आहेच. अतुलचे नाटक म्हणजे ते किमान एका दर्जाचे असणारच – हे इथे पुन्हा एकदा सिद्ध होते.
मी असे हे नृत्यनाट्य पहिल्यांदाच पाहिले आहे. मला जाणवले तसे लिहिले आहे. एक प्रकारे हे अमूर्त नाटक आहे, त्यामुळे, ते समजून घेण्याचे स्वातंत्र्य प्रेक्षकाला आहेच. तरीही, यात चूकभूल असू शकते याची मला जाणीव आहे. सर्व टीमला धन्यवाद !
--- ००० ---

दिलीप पुरुषोत्तम चित्रे आणि मी

चित्र्यांचे कार्य-कर्तृत्व पाहून ‘ बाप रे ‘ म्हणावे लागते ! कविता, कथा, नाटक, समीक्षा, चित्रपट, संपादक म्हणून अनेक ठिकाणी कामे, अनुवाद, राजकीय स्तंभ, मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजरातीही वाचन असे अनेक रकाने दर्जा राखून भरणारे जगणे ! भारतातल्या आणि जगातल्या अनेक मान्यवरांशी वैचारिक संपर्क, अनेक देशांतला प्रवास – असे खूप खूप खूप ! आणि  या सगळ्याच्या सूक्ष्म, तपशीलवार स्मृती ! हा माणूस राक्षस होता की देव होता की भूत होता असा प्रश्न पडावा अशी सगळी कारकीर्द ! चित्र्यांचे लेखन ओलांडून मराठी साहित्याचा विचारच नाही करता येणार इतके काम ! आणि प्रत्येक कामात जबरदस्त बुद्धिमत्ता ! या सगळ्याच्या दर्शनाने माझी छाती दडपते आणि चकित होत ऊर भरून येतो ! सोळाव्या वर्षी या माणसाने विंदांच्या कवितासंग्रहावर परीक्षण लिहिले आणि ते सत्यकथेत का मौजेत छापले गेले ! निव्वळ चमत्कार ! मी नोकरीनिमित्त गावोगावी फिरत असल्याने माझी कधी त्यांच्याशी ओळख झाली नाही.
याच्या उलट माझी अवस्था आहे. एक किरकोळ साम्य म्हणजे सतराव्या वर्षी माझी पहिली कविता सत्यकथेत आली होती. बाकी सर्व म्हणजे प्रचंड फरक ! शाळा-कॉलेजात असताना बऱ्यापैकी वाचन झाले पण पुढे नोकरीचे क्षेत्र वेगळे असल्याने ते कमी झाले. विद्वत्ता जमवण्याचे डोक्यातच नसल्याने ते काही घडले नाही. आणि जे काही करायला जमले त्यात नंतर एक महत्त्वाची कमतरता राहिली. स्मरणशक्तीची ! माझेच लेखन मला नीट आठवत नाही. आता अलीकडेच माझी, ‘ तंबाखूची टपरी ‘ आणि ‘ आवर्तने ‘ ही दोन पुस्तके प्रकाशित झाली. ते काम करताना मी शंभर टक्के त्यात असतो पण ते काम होऊन गेले की माझ्या डोक्यातून ते आपोआप काढून टाकले जाते. त्यामुळे, आता मला माझ्याच त्या पुस्तकांबद्दल काही विचाराल तर माझी अवस्था बिकट होण्याची शक्यता आहे ! त्यामुळे, मी

केलेले काम माझे नाहीच, असे मला वाटत असते ! पोलाद आणि अवजड उद्योग हे खाते मला अजिबात झेपणारे नाही.
पण, फिर भी, मेरे पास भी, कुछ तो होगा !
--- ००० ---

There is no freedom of thought.

Longer passage: We must understand very clearly that our thinking is the response of memory, and memory is mechanistic. Knowledge is ever incomplete, and all thinking born of knowledge is limited, partial, never free. So there is no freedom of thought. But we can begin to discover a freedom which is not a process of thought, and in which the mind is simply aware of all its conflicts and of all the influences impinging upon it. —Krishnamurti

Krishnamurti, The Book of Life

Poetic Outlaws

.

"All of us, in some part or other, are loathsome. We all harbour a crime we've committed, or a crime our soul is begging us to commit."
-- Fernando Pessoa

मॉलप्रॅक्टिस अँड द शो च्या निमित्ताने अनेकजण प्रथमच The Box : द बॉक्स ला भेट देत आहेत. मित्रवर्य अतुल पेठेच्या पुण्याईने हे क्षण बॉक्सच्या वाट्याला आले असं दिसलं तरी हे सारे आमचेही मित्रच आहेत. त्यामुळे त्यांची आणि आमची इच्छा असली तरी योग यावा लागतो तसा तो आत्ता आला आहे असं म्हणता येईल !
या अशा महत्वाच्या व्यक्तींपैकी एक म्हणजे ज्येष्ठ लेखक चं प्र देशपांडे. आपण सगळे त्यांचं चंप्र असंच नामाभिधान ठेवलं आहे, पण आपल्यापैकी सर्वांनाच त्यांच्याबद्दल अतीव आदरच आहे. ते आजकाल फार कुठे काही पाहायला जात नाहीत पण दुरून खबरबात घेत असतात, (विशेषतः इथे फेसबुकवर) कौतुकाची थाप पाठीवर मारतात, लाईक/रिॲक्ट करतात. शब्दाला आणि भाषेला नाटकाच्या वहनात, किंवा नाटकीय कलाव्यवहारात भाषिक सौंदर्याबाबतीत त्यांच्याकडून जे पूर्वी अनेकवेळा सप्रात्यक्षिक ऐकलं आहे ते मी कधीही विसरू शकत नाही. स्वतःची सर्व नाटकं सर्वांसाठी खुली करून देणारा हा असा नाटककार आपला (ज्येष्ठ) मित्र आहे याबद्दल स्वतःचाच हेवा वाटू शकतो. नाणेफेक, ढोलताशे, एक गगनभेदी किंचाळी तसंच बुद्धिबळ आणि झब्बू ही त्यांची नाटकं मला विलक्षण

आवडतात. माझ्या फेसबुकवरच्या कवितांवर ते कधीकधी दाद देतात तेव्हा हुरळून जायला होतं. आजही ते बॉक्सला प्रथमच आले, पण नुसतेच नव्हे तर एक सप्रेम भेट घेऊन आले. "तंबाखूची टपरी" हा जगभरातील 58 कवींच्या कविता त्यांनी मराठीत अनुसर्जित केलेला संग्रह त्यांनी मला दिला.
चंप्रनी दिलेल्या आनंदात भर पडली ती पार जळगांववरून आलेले सन्मित्र शंभू पाटील भेटले तेव्हा. जळगांवात नाटकाचं रसरशीत काम अत्यंत सातत्यपूर्ण पद्धतीने करत आलेले पाटील काल आमच्याकडे सपत्निक आले होते. ही त्यांची The Box Pune ला पहिलीच भेट होती. आता Parivartan Jal आमच्याकडे कधी येतंय याची उत्सुकता निर्माण झाली आहे हे नक्की ! --- प्रदीप वैद्य.

एका कवीचे कवितेकडे गांभीर्याने पाहणे --

दिलीप चित्रे : ----- मी लिहितो तेव्हा कलाकृती निर्माण करीत नसतो. कविता लिहिणं ही माझी एक 'मानुष' (humanistic) कृती असते. माझ्या मते, कविता लिहिणं, ही कुणाचीही एक व्यापक मानुषतावादी कृती असते आणि तशीच ती असायला हवी. ती कलाकृतीच्या मर्यादित पातळीवर येऊ शकत नाही. जीवनाचा अखंडित प्रवाह कवितेतून नोंदला जाणं, हे मला महत्त्वाचं वाटतं. हा प्रवाहीपणा आणि सबंध जीवनाची समावेशकता कवितेतून यायला हवी, असं मला वाटतं. कवितेची रचना लवचीक असावी. जीवन हे हळूहळू विकसित होत असतं. कविता जर जीवनानुसार झाली, तर तिच्यात विकास होईल. कलेच्या रसिकांचा विशिष्ट असा एक वर्ग असतो. अशा निवडक कला रसिकांच्या कल्पनेला मी महत्त्व देत नाही. जे मी लिहितो, तो एक मानवी अनुभव असतो आणि तो कुठल्याही माणसाला येऊ शकतो. काही विशिष्ट प्रकारचे अनुभव घेऊ शकणाऱ्या लोकांमध्ये मी माझा समावेश करीत नाही, की अनुभवाविषयी काही विशिष्ट दृष्टिकोन जोपासणाऱ्या खास लोकांसाठी मी लिहीत नाही. माझे अनुभव विशिष्ट परिघातले असले असते, तर माझा कवितेविषयीचा दृष्टिकोनही बंदिस्त झाला असता.
संतोष शेणई : म्हणजे संस्करण किंवा परिष्करण.....
दिलीप चित्रे : मला मान्य नाही. कवितेवर पश्चात संस्कार करणं, हे मला नैतिकदृष्ट्या चुकीचं वाटतं. 'यशस्वी' कविता लिहिण्यासाठी मी माझी लेखणी उचललेली नसते. एक गोष्ट लक्षात घ्या, मी माझ्या पहिल्या पुस्तकापासून कवी असण्याचं भान बाळगलेलं आहे. माझ्या कवितामधून मुळात कविता लिहिण्याविषयीचे प्रश्नच उपस्थित केले आहेत. अनेक कवितांमधून मी स्वतःलाच प्रश्न विचारतो की, 'कवी असणं म्हणजे काय? कविता लिहिणं म्हणजे नेमकं काय करणं असतं?' आपल्याच नादात रस्त्यातून भटकताना, मनातल्या मनात सॉनेट्स रचणाऱ्या 'रिल्कियन कवी' ची माझी पूर्वीची कल्पना मी पुढे बाद करून टाकली. एकूण जीवनाविषयीच्या माझ्या कल्पना जसजशा बदलत गेल्या त्याचबरोबर कवितेविषयीच्या कल्पनाही बदलत गेल्या. मी एक निबंधही लिहिलाय - 'कवी काय काम करतो?' मी कवी म्हणून कुणाला प्रदर्शित करण्यासाठी वस्तू निर्माण करीत नसतो. कवी हा काही एक वस्तू उत्पादित करणारा कामगार नाही. कविता हे काम अन्य उत्पादनांप्रमाणे एक उत्पादन आहे, की ती डॉक्टर किंवा वकिली यासारखी एक

सेवा आहे? 'कवितेने कोणत्या प्रकारचं मूल्य निर्माण केलं जातं?' हा प्रश्न मी निरनिराळ्या दृष्टिकोनांतून विचारला आहे.

तर मला वाटतं, की कवितेला 'यशाचा', 'पूर्णतेचा' निकष लावला, की त्याच क्षणी आपण कवितेवर अन्याय करतो. एखाद्या कवीच्या कवितांमध्ये जे चढ-उतार असतात, ते लक्षात घेऊनच त्या कविता समजून घेणं आपल्याला सोपं जातं. एखादी कविता सखोल, समृद्ध आशय व्यक्त करणारी असते; दुसरी त्या मानाने दुबळी असते. प्रत्येकाच्या आयुष्याच्या अनुभवांचा आलेख हा असाच चढ-उताराचा असतो. आपण सातत्याने एकाच पातळीवर जगत नसतो किंवा नेहमीच एकाच पातळीत विचारही करीत नसतो. आपल्या जाणिवेची तीव्रता तरी कुठे कायम सारख्या असतात? त्यामुळे कवितेत कमी-जास्त असणारच. अखेर ती तुमची कृती आहे. म्हणून आपल्या कवितेतला कमी प्रतीचा भाग काढून टाकणं म्हणजे आपल्याच चरित्रातला तुकडा पाडल्यासारखं होईल. आपल्या चरित्राची समग्रता, हाच मी ज्या प्रकारची कविता लिहितो, तिचा आधार आहे. माझ्या जीवनानुभवाची एकंदर स्वर-रचना लक्षात घेऊन कविता वाचायला हवी. मग त्याचा एखादा सूर कमी-जास्त प्रतीचा लागलेला असला तरी.

--- साहित्य आणि अस्तित्वभान भाग – २, पान ५४६-४७.

--- 000 ---

" आणखी एक मोठा समज असा की पाश्चात्य तत्त्वज्ञान, विज्ञान, नीतिशास्त्र व मार्क्सवाद वगैरे कळल्यानंतर आपल्या मराठी कवींना सामाजिक जाणीव झाली. त्यापूर्वी जणू आमच्या साहित्याला सामाजिक अर्थ नव्हताच. या संवेदनाभ्रमामुळे आम्हाला ग्रेस, सुरेश भट, नारायण सुर्वे किंवा दया पवार हे सर्वश्रेष्ठ कवी वाटू लागतात. "

--- ' साहित्य आणि अस्तित्वभान, भाग -- २', दिलीप पुरुषोत्तम चित्रे, पान ५५२.

" कादंबरीकार कशाला, एखादा लघुकथाकार दाखव. जगातल्या उत्कृष्ट लघुकथाकारांच्या रांगेत नेऊन बसवता येईल असा लघुकथाकार दाखव, लघुकथेच्या या व्यावहारिक निरीक्षणातून नेमाड्यांचा लघुकथा-संस्कृतीबद्दलचा आक्षेप आलेला आहे. ' अमृतानुभव ' चा समावेश जगातल्या उत्कृष्ट दीर्घकाव्यांमध्ये केला जाईल. तुकारामाच्या कवितेला जागतिक वाङ्मयात मानाचे स्थान आहे. या काव्याचं क्लासिक स्टेचर सांगता येतं "

--- ' साहित्य आणि अस्तित्वहभान ', भाग २, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, पान ५५४.

Nothing is more real than nothing --- Samuel Becket.

चार वर्षांपूर्वीची ही पोस्ट अजून कालबाह्य नाही झाली ? -- मग याला तर अक्षर वाङ्मयच म्हणायला हवे --

काल काल्पनिक स्तरावर एक मोदी समर्थक आणि एक मोदी विरोधक यांची भेट झाली. समर्थक म्हणत होता की मोदींइतका चांगला पंतप्रधान कधी झालाच नाही तर विरोधक म्हणत होता की मोदींइतका वाईट पंतप्रधान कधी

झालाच नाही. असे आपापले ते एकच वाक्य ते अनेक लयींत, आवाजांच्या चढ-उतारांनी आणि कधी एकमेकांवर ओरडत बोलत होते ! मी त्यांना विचारले की अशा बाजू घेताना त्यासाठी लागणाऱ्या सर्व विषयांचा बारकाईने अभ्यास करून सर्व तपशीलांसह का नाही बोलत तुम्ही ? तर ते म्हणाले की आधी आम्ही तसेच करायचो पण त्यात आणि यात किंवा त्याच्या आणि याच्या परिणामांत फारसा काहीच फरक पडत नाही, हे आमच्या लक्षात आले -- म्हणून मग आम्ही हा कमी कष्टांचा, सोपा मार्गच स्वीकारला ! शिवाय टाईम्समध्ये काय आलेय, न्यूयॉर्क टाईम्स काय म्हणतो, हिंदू काय म्हणतो, वगैरे सगळे पाहूनही काही तपशील आमच्या अभ्यासात राहूनच जात होते ! आणि आमच्यामुळे कुणाचे मतपरिवर्तन झालेलेही आम्हाला कधी दिसले नाही ! -- हे सगळे लक्षात घेऊन आता आम्ही भेटलो की जरा वेळ एकमेकांवर ओरडतो आणि थकायला झाले की एखाद्या टपरीवर चहा पिऊन घरी जातो ! -- खरोखर परिपक्व लोक ! ( 09-04-19. )

--- ००० ---

शब्दांचा क्रम बदलणे म्हणजे कविता नव्हे --- डॉ. सुधीर रसाळ यांची टीका

--- पुणे सकाळ, दि. ११-०४-२३, पान ३.

सामाजिक बांधिलकी म्हणून तत्कालीन प्रश्नांवर केलेल्या कवितेत काव्यमूल्य नसते. सामाजिक विषयांवर लेखन करताना भान आणि कवितेची लय हे पैलू कवी विसरले आहेत. दुर्दैवाने सामान्य दर्जाची कविता मराठी भाषेत लिहिली जात आहे. व्याकरण मोडून शब्दांचा क्रम बदलणे, कविता करणे हा काव्याचा अपमान आहे,' अशी परखड टीका ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांनी केली.

'सामाजिक विषयावर लिखाण करणे हे विचारवंतांचे काम आहे, कवींचे नाही. सामाजिक विषयांवर गद्य लिहिता येते; पण तत्कालीन प्रश्नांवर आधारित कविता टिकू शकत नाही. कविता हा जबाबदारी आणि जोखमीचा वाङ्मय प्रकार आहे; परंतु कविता सोपी असल्याचे अनेकांना वाटते. ' – असे ते म्हणाले.

--- ००० ---

हवामानवाल्यांचे अंदाज चुकत होते तेच बरे होते असे म्हणायची वेळ आली आहे ! आता पावसाचा प्रत्येक अंदाज बरोबर येतोय !

अब मेरा क्या होगा काल्या ?

उत्तरा बावकर या प्रख्यात अभिनेत्री गेल्या. त्यांचा अभिनय मी पाहिला नव्हता, पण, त्यांचे नाव ऐकून होतो. त्या ७९ व्या वर्षी गेल्याची माहिती आलेली आहे. त्यांच्या स्मृतीला अर्थातच सादर अभिवादन !

माझ्यासारख्याला ते एक सूचक घटित म्हणूनही समोर येते. पुढल्याच महिन्यात मीही ७९ व्या वर्षात पदार्पण करत आहे. तेच वर्ष असे नाही, पण, आपले स्टेशन जवळ आल्यावर आपल्या बॅगा उतरवणे, दाराच्या दिशेने जाणे हे तरी सुरू होतेच. काळाशी माझा संवाद असा होऊ शकतो --

" अब मेरा क्या होगा काल्या ? "

" तूने तो मेरा नमक खाया है – "

" नमकही नही – इतने साल खाये हैं – "

" तो फिर अब गोली खा ! " असे म्हणून काळ दट्ट्या ओढेल ! पण सिनेमाप्रमाणे त्या गोळीचा रकाना मोकळा असल्याने मी वाचूनही जाईन ! पण नंतर मात्र ठो ठो ठो !

तर ते ठीक. हे सगळे कधी होईल तेव्हा होईल. त्याबद्दल खेदखंत नाही.

मुद्दा असा आहे की मनात काही लेखन आहे, ते पूर्ण करावे. त्यासाठी जरा काळाचे नियोजन लागेल. आपण आहोत कलेच्या क्षेत्रात तर आपण ठिकठिकाणी सहभागीही व्हायला हवे, या विचाराने मी अनेक ठिकाणी परीक्षक, अध्यक्ष वा व्याख्याता म्हणून गेलो. अनेक कलाकृती, पुस्तके पाहून-वाचून त्यांवर अभिप्राय दिले. पण आता हे सगळे आवरते घेणार आहे. या महिन्यात ठरवल्याप्रमाणे चार कार्यक्रम पार पाडेन. शुभा गोखले यांचे चित्र प्रदर्शन, अभिराम भडकमकर यांचे अभिवाचन, प्रणव जोशी यांचे बालनाट्य ( हे माझ्या घराजवळच्या अण्णाभाऊ मध्ये आहे ) आणि गौरी रत्नपारखी यांचे पुस्तक प्रकाशन.

यापुढे मात्र कृपया कुणीही मला पुस्तके सप्रेम भेट पाठवणे अथवा अमुक नाटक वा कार्यक्रम यांसाठी निमंत्रणे पाठवणे असे काही करू नये, ही विनंती. कारण अशा गोष्टींना प्रतिसाद देणे मला जमणार नाही. वयानुसार आता कामाचे तास कमी झालेले असतात हेही कृपया समजून घ्यावे. अध्यक्ष तुम्हाला दुसरा मिळू शकतो पण माझे लेखन मलाच करावे लागेल. माझे नकार ऐकून कुणाचा गैरसमज होऊ नये म्हणून हा खुलासा केला आहे.

स्वत:चे लेखन तरी पूर्ण करायचे काय एवढे महत्त्व आहे – हा प्रश्नही बरोबरच आहे. आजवर जे लेखन केले तेही नसते केले तरी काय बिघडले असते – हाही प्रश्न योग्यच आहे. पण, इथे एक लक्षात घ्यायला हवे की एकूणच निर्बुद्ध निवडी करतच आयुष्य चाललेले आहे. त्या सर्व निवडी निरर्थक असण्याची शक्यता आहेच. तर उरलेले आयुष्यही आता तोच पॅटर्न राबवावा असे वाटते.

काही दिवसांनी, जमल्यास, अशीही वेळ येईल की आता बास – लेखन खूप झाले, आता ते बंद करावे, अशी निवड होईल ! मग मात्र कला क्षेत्र हे पूर्ण मागे टाकून मस्त रिकामा मोकळा वेळ साजरा करत जगत राहावे, असा विचार आहे !

आले ना लक्षात ? हा अर्थपूर्ण जगण्याचा प्रयत्न नाहीच आहे !

--- ००० ---

All genuine poetry in my view is antipoetry.

- Charles Simic

अधिक बिनचूक लोकशाही

एक तर मत या विषयावरच मी कन्फ्यूज्ड असतो, तरीही एक नागरिक म्हणून नेहमी मतदान करतोच. पण, यात जरा बिनचूकपणा आणता येईल असे वाटल्याने ही पोस्ट. कोणताही उमेदवार वा पक्ष १०० टक्के चांगला वा वाईट नसतो, असे मला वाटते. कधी असे वाटते की टक्केवारीत मतदान करता यावे. म्हणजे माझे एक मत मला उदाहरणार्थ, बावन्न टक्के कम्युनिस्ट, सदोतीस टक्के भाजपा, सहा टक्के काँग्रेस आणि पाच टक्के राष्ट्रवादी  असे विभागून देता यावे. हे नुसते एक उदाहरण म्हणून दिले आहे. हे माझ्या मताचे चित्र नव्हे, हे लक्षात घ्यावे. तर, प्रत्येकाने असे विभागून केलेले मतदान संगणकावर मोजून निकाल जाहीर करावा. यामुळे नागरिकांना, अधिक बिनचूक मतदान केल्याचे समाधान मिळेल आणि जनतेच्या मनाचे प्रतिबिंबही आधिक अचूक येईल. ते उमेदवारांच्या बाबतीतही अधिक न्यायाचे होईल. सर्वांचीच मने विदीर्ण, फाटलेली, चिंध्या झालेली आणि फुटलेली असण्याच्या या काळात ही एक आश्वासक सुधारणा ठरू शकते. शिवाय, या टक्केवारीप्रमाणे त्या टक्केवारीतही अधिक प्रामाणिक राहणे शक्य होईल. लोकशाही अधिकाधिक पारदर्शक, सुदृढ आणि न्यायाची करण्याच्या दृष्टीने हे सुचवले आहे. ( सध्या हा एक ललित लेखनाचा कलात्मक उतारा समजावा, ही विनंती. )

--- ००० ---

पुण्यात जबरदस्त गारांचा पाऊस !

डायरेक्ट वरून आलेला बर्फ खाण्याचे कामही केले !

गोंदणगाव द स्टुडिओ

चित्रप्रदर्शन – चित्रकर्ती – शुभा गोखले.

हे चित्रप्रदर्शन पाहिले. मी चित्रे पाहतो म्हणजे काय करतो ? मला त्यात वापरलेल्या तंत्रातले बारकावे कळतात का ? तर नाही. आणि मला त्याची गरज वाटत नाही. संगीत ऐकताना जसे राग वा स्वरज्ञान वा त्यांतल्या तांत्रिक

प्रभुत्वाच्या बाबी हे न कळताही मी त्या संगीतापुढे पूर्ण खुला होऊन त्याच्याशी संवाद साधू शकतो तसेच हे आहे. चित्रासाठी वापरलेले साहित्य, रंगांचे प्रकार वगैरे न समजताही माझा चित्रांशी संवाद होऊ शकतो, असे मला वाटते. नाटकाची तांत्रिक अंगे न समजताही प्रेक्षक नाटक पूर्णपणे ' पाहू ' शकतात. त्याच, तशाच पाहण्यानंतर ही पोस्ट लिहीत आहे.

काही काळापूर्वी मी शुभा गोखले यांचे ' बाजार ' हे चित्रप्रदर्शन पाहिले होते. त्याबाबत मी लिहिलेले एक वाक्य असे होते – "  एक प्रकारे हे अभावग्रस्त व्यक्तींचे चित्रण असूनही ते उदासी निर्माण करत नाही. " त्याचा इथे  संबंध आहे. या दालनात प्रवेश करताना आधी काही मजकूर दिसतो. त्यात असे म्हटले आहे की ' भरून आलेल्या जखमा सुंदर दिसतात. ' म्हणजेच ही चित्रे तडक दु:खाला अभिव्यक्ती देणारी नाहीत. दु:ख हा मानवी जगण्याचा भाग म्हणून त्याकडे पाहणारी आहेत. त्यामुळे इथे पिळवटलेले, जखमी झालेले, तुटले-फुटलेले चेहरे दाखवण्याला महत्त्व नाही. ही एक अधिक परिपक्वतेची प्रक्रिया आहे. या दृष्टीने आपण कठपुतळी मालिकेतली चित्रे पाहू शकतो. असंख्य प्रभावांनी युक्त असे आपले जगणे चालू असते, आपले निर्णय घेणेही प्रभावबाधितच असते. यालाच आपण ' मीबाह्य प्रभावांचे – म्हणजेच कठपुतळीचे जगणे ' म्हणू शकतो. याची माणसाला सतत जागती  जाणीव असते असे नाही, पण, हे जाणवलेले असते. या चित्रांमधले स्त्री-पुरुषांचे चेहरे वा देहबोली अशाच दिसतात. या व्यक्ती ' त्या ' दोऱ्यांनी बद्ध आहेत पण त्यामुळे वैतागलेल्या वा हतबल झालेल्या नाहीत. त्यांचे मानवी जगणे सरावाने चाललेले दिसते. एक तरुण आपल्या प्रेयसीला सोबत घेत असल्याचे दिसते. या पात्रांना त्यांच्या कृती या जणू त्यांच्या स्वतंत्र कृती वाटतात. चित्रकर्ती मात्र हे सगळे ' समग्रपणे ' पाहते आहे. तसेच आपणही पाहतो. असे पाहिले जाणे हे जणू त्या बद्धतेचा तुरुंग भेदणेच ठरते.

तोच प्रकार वेगळ्या पद्धतीने, चावीवाला, चांभार, शिंपी ही कामे करणाऱ्यांच्या मालिकेतही जाणवतो. ही माणसेही प्रचंड दु:खी वगैरे दिसत नाहीत. पण इथे असे दिसते की यांतल्या कुणाचेही पूर्ण लक्ष कामात नाही आहे. सरावाने ते कामे करत आहेत पण डोक्यात काही वेगळे विचार वा मूडस आहेत. मनाची ही एक दुभंग अवस्था आहे. माणूस पूर्णपणे वर्तमानात कधीच जगत नाही, या शोकात्म जगण्याची ही चित्रे आहेत. मासे विकणाऱ्या कोळणींच्या चित्रांतही रूटीनच्या त्रासापेक्षा ते सहज सरावाने हाताळणे आहे.

खाली पार्श्वभूमी वेगळी आणि वरील अक्रिलिक फ्रेमवर मुख्य चित्र अशी ही तांत्रिक कौशल्य एंजॉय करणारीही काही चित्रे आहेत. काही न्यूड चित्रेही अप्रतिम आहेत.

एका चित्रात एक स्त्री-पुरुष जोडी आहे. स्त्रीचा हात कमरेवर असून त्याने विरुद्ध बाजूच्या हाताने तिचा दंड धरलेला आहे. पुरुषाच्या डाव्या हाताला जरा उजळ अशी फिकट तपकिरी पार्श्वभूमी आहे, मध्ये फिकट केशरी आणि स्त्रीच्या उजव्या हाताला फिकट पोपटी. पार्श्वभूमी ना उत्साही ना क्षुब्ध आहे. तसेच त्या दोघांचे चेहरेही आपापले जे आहे ते व्यक्तित्व घेऊन अविचल आहेत. पुरुषाच्या पाहण्यात किंचित साहस आहे पण स्त्री सहज पाहते आहे. या चित्रातला कहर वेगळाच आहे. पुरुषाच्या उजव्या हातात दोन चेहऱ्यांवरून काढलेले मुखवटे आहेत. ते अर्थात त्या दोघांचेच आहेत. मुखवट्यांचे डोळे कोणतेही भाव दाखवत नाहीत पण चेहरे मात्र स्मित दाखवत आहेत. म्हणजे आता बाहेरचे

औपचारिक मुखवटे उतरवून ती दोघे एकत्र आहेत. या त्यांच्या एकत्र असण्यात पुरुषाला थोडे साहस लागते आहे पण ती मात्र सहज आहे. जे आहे ते त्यांनी आहे तसे स्वीकारलेले आहे. हे असेच का असावे असा प्रश्न न विचारता. असे किती लिहीत बसणार ? प्रत्येक चित्र आपण शांतपणे आणि खुलेपणाने पाहात गेलो तर ते आपल्याशी संवाद साधू लागते. निसर्गचित्रेही संवाद साधतात. अशा बऱ्याच चित्रांची इथे रेलचेल आहे. हे सगळे काम एकत्रितपणे पाहताना थक्क व्हायला होते.

शिवाय असंख्य प्रकारचे रंगीत दागिने, बरण्या, जार्स यांचे कौशल्यपूर्ण निर्माण आहे. स्वत: शुभा गोखले उपस्थित राहून प्रेक्षकांचे स्वागत करणे आणि त्यांच्याशी चित्रांबाबत चर्चा करणे हे करत आहेत.

या सर्व चित्रांबाबत मला विशेषत्वाने जाणवले ते असे की यांतून कोणताही संदेश देण्याचे काम घडत नाही आहे. जे आहे ते पाहणे आहे. काही ठिकाणी ‘ भरून आलेल्या, सुंदर दिसणाऱ्या ‘ जखमा आहेत तर इतरत्र, बऱ्याच ठिकाणी दुभंगत्व स्वीकारणे आहे. असेच जगायला हवे का हा प्रश्नही त्यांना पडत नसावा असे हे सवयीचे जगणे दिसते आहे. पण, चित्रकर्तीचा हेतू असो वा नसो प्रेक्षकाच्या मनात मात्र असे प्रश्न येऊ शकतात. कोणत्याही सनसनाटीपणाशिवाय चाललेल्या सवयीच्या जगण्यात जे दुभंगत्व आणि ‘ स्वीकारून चालणे ‘ पणा दिसतो आहे तो, म्हटले तर, आपल्याही जगण्यात आहे. जाणीवपूर्वक त्याच्याकडे आपण पाहात नाही. अशी चित्रे पाहून आपण ते पाहण्याची, सजग होण्याची शक्यता आहे.

असे घडणे हाच मला सांस्कृतिक जिवंतपणा म्हणजेच शहाणपणा वाटतो.

--- ००० ---

इन्शाअल्लाह

या कादंबरीचे अभिवाचन -- ले ० अभिराम भडकमकर -- प्र ० राजहंस प्रकाशन.

राजहंस पुस्तक पेठेच्या वर्षपूर्ती समारंभानिमित्त हा कार्यक्रम आयोजित केलेला होता. प्रेक्षकांचा प्रतिसाद उत्तम होता. उत्तम इडली-चटणी, उत्तम चहा आणि कार्यक्रमानंतर उत्तम बर्फी असा उत्तम आतिथ्याचाही यात समावेश होता. पाच अभिवाचकांपैकी अभिराम आणि सुशील हे माझे मित्र होते, स्वाती चिटणीस या उत्तम अभिनेत्री म्हणून माहीत होत्या – या तिघांना मी उत्तम म्हणायची गरजच नाही. पण, मला माहीत नसलेले सलीम मुल्ला आणि सचिन सुरेश हेही तोडीस तोड होते हे नक्की. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रेक्षकसंख्येला ते अभिवाचन नीट पोचणे हे सहज शक्य झाले. दणक्यात पाऊस असूनही इतक्या लोकांच्या तिथे उपस्थित असण्याचे सार्थक झाले ! संजय भास्कर जोशी आणि विनया खडपेकर यांचे चार चार शब्द अन्वर्थक आणि समयोचित होते. या निमित्ताने एक अभिनव स्पर्धा घेण्यात आली होती. आपापल्या आवडीची कविता वाचून ते रेकॉर्डिंग पेठेकडे पाठवायचे होते. त्यांतून विजेत्या ठरलेल्यांना पारितोषिके देण्यात आली. प्रत्येक विजेत्याने कोणती कविता वाचली होती, हे सांगायला हवे होते असे वाटले. असो. मूळ मुद्याकडे वळायचे तर हिंदू आणि मुस्लिम यांच्यांतली तेढ ही भारतातली एक प्रमुख समस्या आहे. त्यावर बोलणे नाजुक तर आहेच पण ते स्फोटक आणि ज्वालाग्राहीही ठरू शकते. या विषयावर मराठीत निर्भीडपणे आणि

निर्भयपणे एक कादंबरी लिहिली जावी ही एक स्वागतार्ह घटना आहे. लेखकाचे बालपण कोल्हापुरातील टाकाळा या मुस्लिमबहुल वस्तीत गेलेले असून अजूनही त्याचा त्या जीवनाशी, राहणीशी संपर्क असल्याने या समस्येवर प्रत्यक्षदर्शी भूमिकेतून लिहायला तो अगदी योग्य माणूस आहे. शिवाय मराठीतला तो एक ख्यातनाम लेखक असल्याने त्याची मांडणी ही समतोल आणि जबाबदारीची असणारच हे आपण समजू शकतो.

अनेक पात्रांच्या तोंडून हे सर्व येत असले तरी प्रामुख्याने या दोन समुदायांतली तेढ समजून घेऊन शक्य तर काही निराकरण सुचवणे या हेतूने लिहिलेली ही कादंबरी आहे. मुस्लिमांमध्ये शिक्षण, धर्मचिकित्सा आणि धर्मसुधारणा होणे हा एक प्रमुख उपाय इथे सुचवलेला आहे. हिंदूंमध्ये तुलनेने या प्रक्रिया यशस्वीपणे चालूच आहेत हे लेखकाने दाखवले आहे. मुस्लिमांमध्ये या प्रक्रिया तिथल्या बुद्धिवाद्यांनी पुढाकार घेऊन चालवल्या पाहिजेत आणि तसे झाले तर सहिष्णू हिंदूंची त्यांना साथ असेल असे लेखकाचे प्रतिपादन आहे. या बाबतीत सर्व बाजूंनी वादाचे मुद्दे येत राहतात हेही लेखकाने सांगितलेले आहे. तीन तलाक वाईट मग तुमच्याकडे बायका टाकल्या नाही का जात – असे वाद हे अमर्याद चालू शकतात. लेखकाला असे दिसते की वैचारिक क्लॅरिटीनेच यातून मार्ग निघू शकेल.

हिंदू, मुस्लिम आणि पुरोगामी यांच्यांतली कट्टरता लेखकाने एकाच पातळीवर घेणे ही या आकलनातली एक महत्त्वाची बाब आहे. इथे प्रश्न असा येतो की पुरोगामी म्हणजे जर शिक्षित, धर्मचिकित्सक आणि सुधारणावादी असतात असे मानले तर ते का कट्टर असतात ? मला असे दिसते की कुणी धर्माच्या साच्याशी समरूप होतो तर कुणी एखाद्या वैचारिक व्यूहाशी. माणसे अशी समरूप झाली की ती अलग पडणारच आणि त्यांच्यांत फूट पडणारच आणि संघर्ष होणारच, असे मला वाटते. माणसाला कुठे ना कुठे समरूप होण्याची मानसिक गरज का वाटते, हा मला यातला खोलातला आणि समावेशक प्रश्न दिसतो. या कादंबरीचा पुढील भाग येणार असेल तर न जाणो तो या अंगाने येईल. त्यासाठी माझा लेखक मित्र अभिराम याला माझ्या शुभेच्छा !

--- ००० ---

फोटो-सौजन्य -- गिरीश पतके ---

Girish Patke is with सुरेंद्र विठ्ठल दरेकर and Champra Deshpande.

इन्शाअल्ला कादंबरीच्या अभिवाचनाला भेटलेले

थ्री मस्केटिअर्स...

हा तर अवकाळी पावसाळा !

16-04-23.

डावीकडून -- गिरीश पतके, मी, नितीन भिंगारे आणि दिलीप जगताप ---

सांस्कृतिक देवाणघेवाणीची मीटिंग संपल्यावर –

हिंसा

पं. जवाहरलाल नेहरू जे. कृष्णमूर्तींची व्याख्याने ऐकत असत. इंदिरा गांधीही त्यांचे विचार आस्थेने समजून घेत. त्यांनी तर आणीबाणी उठवण्यापूर्वी जे. कृष्णमूर्तींशी चर्चा केली होती असा पुपुल जयकर लिखित त्यांच्या चरित्रात उल्लेख आहे. राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांनीही कृष्णमूर्तींच्या तत्त्वज्ञानावर चालणाऱ्या, कृष्णमूर्ती फौंडेशनच्या ऋषि व्हॅली इथल्या शाळेला भेट दिली होती. हे सगळे आठवायचे कारण वेगळे आहे.

फ्रेड्रिक ग्रोहे नामक एक लेखक काही काळ जेकेंबरोबर राहिले होते. त्या काळाच्या आठवणींवर आधारित त्यांनी ' द ब्यूटी ऑफ द मौंटेन्स ' हे एक पुस्तक लिहिलेले आहे. त्या पुस्तकातला हा उतारा बघा –

" Nevertheless, regarding Annie Besant - who was from England and whom he had loved like a mother - he said she had done more for India than Mahatma Gandhi. Using the example of Gandhi, he stated that any kind of forcing others to do what one wanted-even by the presumably peaceful means of fasting-was violent. Fasting for political reasons was violence. " ( page 47. ) म्हणजे ---

" ते काहीही असो, इंग्लंडच्या अनी बेझंट यांच्याबद्दल कृष्णमूर्तींना आईप्रमाणे प्रेम वाटे. ते म्हणाले की त्यांनी भारतासाठी महात्मा गांधींहून अधिक योगदान दिलेले आहे. गांधींचे उदाहरण पुढे नेत ते म्हणाले की तशा कोणत्याही पद्धतीने स्वत:ला जे वाटते तेच लोकांना करायला भाग पाडणे – मग ते अगदी मान्यताप्राप्त अशा शांततामय उपोषणाने का असे ना – ही हिंसाच होती. राजकीय हेतूंसाठी उपोषण करणे ही हिंसाच असते. "

यात गांधींचे मूल्यमापन वा त्यांच्याबद्दल काही मत बनवणे, हे इथे महत्त्वाचे नाही. सध्याच्या वातावरणात ' हिंसा ' हा विषय आपल्या सर्वांच्याच चिंतनात असायला हवा. एखादी व्यक्ती महत्त्वाची नसून मानवी जगण्यातली ' हिंसा ' या समस्येकडे नीट पाहिले जायला हवे.

--- ००० ---

बोक्या सातबंडे ( बालनाट्य )

मूळ कथा – दिलीप प्रभावळकर, नाट्यरूपांतर – डॉ. नीलेश माने, दिग्दर्शक – विक्रम पाटील आणि दीप्ती जोशी, दृश्यसंकल्पना – प्रणव जोशी, निर्मिती – अनामिका भूमिका थिएटर्स.

सुट्ट्या सुरू झाल्या आहेत आणि हा काळ नेमका पकडत अनेक बालनाट्ये येताहेत. त्यांतले हे आज पाहिले. याच्या आधी मी तशी खूप कमी बालनाट्ये पाहिली आहेत. एक म्हणजे ' आविष्कार -- चंद्रशाळा ' चे ' दुर्गा झाली गौरी ', दुसरे, प्रकाश बुद्धिसागरने बसवलेले, ' आला अडाण्याचा गाडा ' आणि काही ग्रिप्सची नाटके. माझ्या स्मरणाप्रमाणे या नाटकांना एक साधीशी गोष्ट असते -- उदा ० हट्टी राजकन्या ताळ्यावर येणे किंवा मुलांनी एखादा गुन्हेगार पकडून देणे, असे काही. पण, हे बालनाट्य वेगळे आहे. याला अमुक एक अशी सलग कथा नाही. पात्रे तीच असली तरी पहिला अंक आणि दुसरा अंक हे तसे वेगळ्या घटनांवर रचलेले आहेत. मला हा प्रकार विशेष आवडला. ' पुढे

काय ' याचा फारसा हुक न लावता मुलांना धरून ठेवणे तसे सोपे नाही. ते यशस्वीपणे इथे साध्य झालेले आहे. पहिला अंक प्राणिमैत्री च्या अंगाने जातो तर दुसरा झाडे लावा-जगवा या अंगाने. मुलांना आवडणारी भरपूर कृतिशीलता हे या नाटकाचे खास वैशिष्ट्य आहे. चापट्या मारणे, ढकलणे, पाडणे किंवा पडणे – असे काही दिसले की मुले दणकून हसतात ! शिवाय उत्तम गाणी आणि नाच आहेत – तेही उत्तम नेपथ्य आणि दिलखेचक प्रकाशयोजनेच्या पार्श्वभूमीवर. ' बोक्या सातबंडे ' हे गाणे तर मुलांमध्ये तिथल्या तिथे प्रिय झाले ! मध्यांतरात बरीच मुले ते गाणे म्हणत एंजॉय करत होती ! मुलांच्या खळखळाटात बसून हे नाटक पाहायला मलाही खूप मजा आली ! अशा नाटकाचे दिग्दर्शन सोपे नसणार. सगळ्यांकडून असे बिनचूक कामे करून घेणे – तेही ती मुले एंजॉय करतील अशा पद्धतीने ही खरोखर एक करामतच आहे ! हरणाचे पिल्लू या भूमिकेत तर एक तीनचार वर्षांची मुलगी होती ! टीम बरीच मोठी आहे – पण बोक्याच्या भूमिकेत आरुष बेडेकर मजा आणतो. नाटकाच्या शेवटच्या गाण्यात नाटकातल्या पात्रांनी प्रेक्षकांत येऊन मुलांना त्यात सामील करून घेतल्याने खूप मजा आली ! संगीत दणाणून टाकणारे – आजच्या पिढीचे आहे !

रूढ चाकोरी सोडून जरा वेगळ्या मार्गाने जाणारे, मुलांना मस्त खुश करणारे हे नाटक रंगभूमीवर आणल्याबद्दल निर्माते आणि सर्व टीमचे अभिनंदन !

--- ००० ---

Champra Deshpande interacting with Chandramohan Kulkarni @ my Show Gondangao, The Studio . Pune . 2023 . ( शुभा गोखले यांचे चित्र-प्रदर्शन ).

Champra Deshpande and his grand daughter @ my Show Gondangao , The Studio . Pune . 2023 .

अन्नाने शक्ती मिळते म्हणून दिसेल ते बकाबका खावे का ?

--- पुस्तकदिनाच्या शुभेच्छा !

आवर्तने चं. प्र. देशपांडे

चं. प्र. देशपांडे ह्यांचे आवर्तने हे एक कविंच्यासाठीही आवश्यक वाचन ह्या कॅटेगरीतील पुस्तक आहे कारण देशीवादाच्या गदारोळात आधुनिक अस्तित्वभान देण्याचा प्रयत्न ते करतं . मराठीत श्रद्धेय परंपरा , काल्पनिक पुराण व पुरोगामी इतिहास ह्यांची सद्या इतकी झुंबड उडालीय कि मराठीत व भारतातही आधुनिकता शोधणारा एक प्रवाह आहे ह्याचा सगळ्यांना विसर पडलाय मराठीत ही आधुनिकता मर्ढेकरांनी आणली हे सर्वमान्य आहे आणि चं प्र नीं निवडलेल्या कवितांची सुरवात मर्ढेकरांच्यापासून केली आहे त्यांची दिशा इथेच स्पष्ट होते मराठीत विंदा करंदीकर , गंगाधर गाडगीळ , अरविंद गोखले , सदानंद रेगे , प्रभाकर पाध्ये , विलास सारंग , वसंत डहाके ,विजय तेंडुलकर ,

महेश एलकुंचवार , गुरुनाथ धुरी , गुरुनाथ सामंत, वसंत पाटणकर ह्यासारख्या अनेकांनी आधुनिकता धगधगती ठेवली काही लोक आधुनिकता आणि पुरोगामी रोमँटिसिझम ह्यांच्यात लोम्बकळते राहिले जसे आरती प्रभू (ह्यांनी सर्वांचीच गोची करून ठेवलीये ) ग्रेस व पु शि रेगे ह्यांनी सौन्दर्यवादाचा झेंडा फडफडत ठेवला अनेक आधुनिक कवींची सुरवात रोमँटिसिझमने झाली असली तरी ते पुढे आधुनिक झाले उदा सदानंद रेगे तर दिलीप चित्रे (कविता व ऑर्फियस हा कथासंग्रह शिबा राणीच्या शोधात हे आत्मकथन वा आत्मकादंबरी )व अरुण कोलटकरांचे (अरुण कोलटकरांच्या कविता ) हे पहिले संग्रह आधुनिक व नंतरचे देशीवादी आहेत

चं. प्र. देशपांडे हे अस्तित्ववादी आधुनिक धारेत मोडतात व शेवटी ज्याला मी ऍब्सर्ड अस्तित्ववाद म्हणतो तिथे पोहचतात ज्या पॉल सार्त्र , ईजीन आयनेस्को , सॅम्युएल बेकेट , हेराल्ड पिंटर , अल्बेयर काम्यू , फ्रान्झ काफ्का ह्यासारख्या अनेकांनी ही धारा समृद्ध केली आहे चं. प्र. देशपांडे ह्यांनी ही धारा आत्मसात करत पुढे वाटचाल केली आहे आणि डायलन थॉमसच्या काव्यविचाराची त्यात भर टाकून त्याला एक दिशा दिली आहे

संपूर्ण पुस्तकात एक गोष्ट जाणवते ती म्हणजे मराठी आधुनिकता , कविता आणि तिचे खुजेपण हा त्यांच्या चिंतनाचा विषय आहे ते अतिवास्तववाद व अमूर्तता ह्यांची चर्चा करतात त्यांचा अंतिम निष्कर्ष मात्र मर्ढेकरी आधुनिकवादाला साजेसा आहे मर्ढेकर आधुनिक कलावादी होते तसेच चं. प्र. देशपांडे आहेत मात्र मर्ढेकर ऍब्सर्डिटीच्या अमूर्ततेत गटांगळ्या खात नाहीत कदाचित त्यांच्या काळात अशा गटांगळ्या अस्तित्वात नसाव्यात पण चं. प्र. देशपांडे ह्यांच्या पिढीत त्या अस्तित्वात आल्याने चं. प्र. देशपांडे ह्यांना मात्र ह्या गटांगळ्यांच्या खोलात जावेसे वाटले असावे संपूर्ण पुस्तकात एक प्रकारचा रॅन्डमनेस आहे जो अब्सर्ड अस्तित्ववादाला साजेसा आहे एका अर्थाने ही बेकेटियन शैलीची मांडणी आहे पण त्यात अचानक रोमँटिक लोकसुद्धा घुसलेले दिसतात चं. प्र. देशपांडे ह्यातून वैयक्तिक आवड म्हणून सुटका करून घेतात पण चं. प्र. देशपांडे ह्यांना आपण वाचक म्हणून सुटका करून का द्यावी कारण नाही म्हंटले तरी कलावादात हे सर्व बसत असले तरी ते खटकत राहते

त्यांनी नव्वदोत्तरी कवींचाही केलेला समावेश हा ते अपडेट असल्याचा पुरावा आहे कविता दशकाची ह्या ग्रंथालीच्या पुस्तकातले काही कवी इथे आहेत ज्यांना आजकाल ऐंशोत्तरी म्हंटले जाते संतोष पवार , नितीन वाघ ह्यांच्यासारखे कवी ह्यात नसणे हे खटकते

काही इन्साईट्स खास चं. प्र. देशपांडे स्टाईलमधल्या आहेत उदा तुकारामाच्या बीज भाजुनी केली लाही ह्या अभंगांचे त्यांनी केलेले अर्थनिर्णयन ! किंवा कवितेला प्रचार बनवू पाहणाऱ्या प्रचारवाद्यांच्यावर त्यांनी केलेले हल्ले मला त्यांच्या प्रस्तावनेतील सर्वात आवडलेला भाग कवितेची मंत्रशक्ती हा आहे मराठीत भारावून टाकणे ह्या गोष्टीचा विलक्षण गवगवा आहे तिचा भांडेफोड चं प्र नीं छान केला आहे

माझ्या कवितांचे त्यांनी केलेले अर्थनिर्णयनही मला चकित करणारे वाटले (पॉझिटिव्ह अर्थाने )मी माझ्या कविता लिहितो आणि मोकळा होतो जास्त विचार करत बसत नाही पण तरीही आपल्या कवितेकडे असेही बघता येते हे मला नवीन होते त्यासाठी मी त्यांचे आभार मानतो

एकंदरच पुस्तक नक्कीच किमान एकदा तरी वाचावे असे आहे . वर्णमुद्रां प्रकाशनाची पुस्तके दिसायला देखणी असतात हे पुस्तकही दिसायला देखणे आहे त्यामुळे एक वाचक म्हणून त्यांचेही आभार

श्रीधर तिळवे नाईक

काठपदर

मूळ लेखक – जिआ झेने, मूळ नाटक – द मेडस, मराठी नाट्यरूपांतर – दिलीप जगताप,

निर्मिती – लक्ष्मणझुला थिएटर्स, प्रभादेवी, मुंबई, सौजन्य – महाराष्ट्र कल्चरल सेंटर, पुणे.

हे नाटक काल पाहिले. राज्य नाट्यस्पर्धेत विविध पारितोषिके मिळवून गाजलेले असे हे नाटक आहे. जगभर मान्यताप्राप्त आणि अनेक भाषांत रूपांतरित झालेले आणि अजूनही प्रयोग होत असलेले असे हे नाटक आहे. दिलीप जगताप या नाटकात मुरलेल्या लेखकाने केलेले हे रूपांतर असल्याने, म्हटले तर संवादप्रधान असलेले हे नाटक नाट्यमय होते, प्रेक्षकांना पकडून ठेवते. एक लक्षात घ्यायला हवे की अशी नाटके सादर करायला स्टार कलाकार सहसा येत नसतात. बहुतेक वेळा नव्या नट-नट्या आणि तंत्रज्ञ हेच धाडसाने अशी आव्हाने पेलत असतात. रंगायन, साहित्य संघ अशा नामवंत संस्था आणि समूह अशी नाटके सादर करताहेत, असे फारसे वातावरण नाही. त्यामुळे काही क्वचित रफनेस वाटला तरी या अशा प्रयोगांचे दिलखुलास स्वागत व्हायला हवे. हे म्हणत असतानाच मी इथे आधीच सांगू इच्छितो की हा प्रयोग उत्तम होतो आहे. ज्यांना झेनेचे हे अजरामर नाटक पाहायचे आहे त्यांनी संधी सोडू नये.

झेने हा एक अब्सर्ड ( मृषा ) नाटककार होता आणि तो क्रौर्य- नाटकाचाही एक पुरस्कर्ता होता. या नाटकात एक मालकीण आणि तिच्या दोन घरसेविका ( मोलकरणी वा दासी हे शब्द मुद्दाम टाळत आहे ) या तीन पात्रांमध्ये घडणारे मानवी भावभावनांचे घमासान आहे. त्या दोन घरसेविका, त्यांची मालकीण घरात नसताना आपसात एक खेळ खेळत असतात -- एकीने मालकीण व्हायचे आणि दुसरीने घरसेविका, असा तो खेळ असतो. या निमित्ताने त्या एकमेकींबाबतचे आणि मालकिणीबाबतचे मनातले सर्व गरळ ओकत राहतात. प्रेम, राग, लोभ, मत्सर, तिरस्कार अशा सर्व आविष्कारांचे एक चोंबाळे या नाटकात दिसते. कधी ना कधी आपण मालकिणीचा खून करावा असे त्यांचे स्वप्न असते. मालकिणीला द्यायच्या चहामध्ये दहा गोळ्या टाकायची शक्कल त्या लढवतात. आणखी दोन पात्रांचे उल्लेख नाटकात येतात, ती म्हणजे, मालकिणीचा प्रियकर/नवरा आणि या दोघींवर लट्टू असलेला गवळी. सर्व तपशील सांगत बसत नाही. तसे करायचे तर पूर्ण नाटकच सांगावे लागेल.

काहीजणांना हे नाटक सामाजिक वा राजकीय शोषक-शोषित यांचे वाटते, काहींना मालक-नोकर यांच्यांतल्या अन्यायी संबंधांचे वाटते तर काहींना ते समसंभोगी व्यक्तींमधल्या नातेसंबंधांचे वाटते. घरसेविकांऐवजी दोन घरसेवक घेऊन त्यांच्यांतल्या संबंधांचे नाटक, असेही हे सादर केले गेलेले आहे. याचाच अर्थ असा की वास्तव म्हणून, अमुक म्हणजे अमूकच असा ठामपणा न ठेवता अनेक प्रकारे जाणवू शकेल, असे हे नाटक आहे. इथे मी मात्र ते मानवी संबंधांतले वर्चस्व, गुलामी, छळणूक आणि सूडभावना यांचा गुंताडा म्हणून पाहतो. कोणत्याही पद्धतीने पाहिले तरी त्याने जगण्यातली वैचारिक निरर्थकता आणि एक हेतूविहीनता या या नाटकाच्या आशयाला बाधा पोचत नाही, असे मला दिसते.

नाटक पाहून झाल्यावर आम्हा मित्रांत काही चर्चा झाली. त्या अनुषंगानेही इथे काही बोलावेसे वाटते. एक म्हणजे त्या घरसेविकांचा पोषाख. परकर-पोलक्यासारखे हे असले पोषाख कुठे कोण वापरते ? मला वाटते असले वास्तव शोधणारे प्रश्न इथे अप्रस्तुत आहेत. सवयीच्या नसलेल्या या पोषाखांमुळे प्रेक्षकांत आणि नाटकात अंतर निर्माण होत असेल तर ते योग्यच आहे. यातल्या पात्रांच्या भावभावनांशी प्रेक्षकांनी समरूप व्हावे अशी इथे अपेक्षाच नाही. दुसरे म्हणजे त्या दोघींची भाषा. एकमेकींशी बोलताना त्या मधेच ग्रामीण भाषेत बोलतात पण मुख्यत: शहरी भाषेतच बोलतात. यात काहीच चुकीचे नाही. त्यांचे मूळ रूपही दिसावे एवढाच त्यात हेतू आहे. बाकी सतत त्या शहरी भाषेचा मुखवटाच वापरतात. त्यामुळे आमच्या एका मित्राला त्या पुण्यातल्या कोथरुडमधल्या घरसेविका वाटल्या ! त्याने काहीच फरक पडत नाही. जगात कुठेही घडू शकणारे हे नाटक आहे. यातल्या वास्तवाचे निश्चितीकरण करायची मला गरज वाटत नाही. याच चर्चेत असाही एक प्रश्न आला की मुळातले झेनेचे नाटक आणि हे मराठीतले नाटक यांची तुलना करत हे नाटक बघावे का ? माझ्या मते नाही, तसे बघू नये. ज्या नाटकाचे अनेक अन्वय सादर होतात त्याच्या बाबतीत मुळातले नाटक कुठले ? मूळ आशय समजणे आणि तिथे पोचणे घडते आहे की नाही, हेच महत्त्वाचे समजायला हवे. तुलनात्मक अभ्यासू दृष्टीने पाहणे याचा अर्थ मुळातच गोंधळून पाहणे वा एक काहीतरी मुळातले म्हणून गृहीत धरून पाहणे ठरते. याचा परिणाम, अर्थातच, समोर चाललेले मराठी नाटक न पाहण्यातच होणार. तसे न करता हे एक स्वतंत्र नाटक म्हणूनच पाहिले जायला हवे, असे मला वाटते.

या नाटकाच्या सादरीकरणाबाबत माझा एक मुद्दा होता. नाटकात अनेक दृश्यांत अनेक पातळ्या आहेत, त्या अधोरेखित करत वा लक्षात घेत नाटक सादर न झाल्याने त्यातले नाट्य उणावते. याच्याच जोडीला चर्मवाद्याचे एक संगीत कमीअधिक आवाजात जवळ जवळ सतत चालू असते, त्यामुळे नाटकाला एकसुरीपणा येतो. असे झाल्यामुळे मिनिटभर का असे ना बघणाऱ्याचे अवधान हलते – नीट टिकत नाही. आणि या नाटकात तर प्रत्येक संवाद, प्रत्येक घडणे हे महत्त्वाचे आहे. या बाबतीत दिग्दर्शकाशी मी बोललो. त्याने याचा सखोल विचार केलेला दिसला. तो असे म्हणाला की हे नाटक म्हणजे, वास्तव, सत्य, असत्य, स्वप्न, भास या सर्वांचे मिश्रण आहे. यातले अमुक सत्य आणि तमुक भास, असे मला वाटत नाही – हे एकाच वेळी हे सगळेच आहे. त्यामुळे तसा वेगळेपणा घेतलेला नाही. – हे मला शंभर टक्के पटले ! नाटकातली एखादी असली समस्या सोडवताना असा निर्णय घ्यावाच लागणार. सादरीकरणात त्या मानसिक पातळ्यांचे वेगळे वेधही घेतले असते तर कदाचित अभिनयाचा पोतही अधिक नाट्यमय झाला असता. पण, दिग्दर्शकाने केलेला विचार पाहता आपणच हे नाटक अधिक सजगपणे पाहायला हवे, हे लक्षात आले.

आता नेपथ्य आणि प्रकाश योजना. नेपथ्य काही टाळी घेणारे नाही. पुरेसे आणि योग्य आहे. पहिला अंक संपताना मालकिणीचा प्रवेश समोरच्या खिडकीत दिसण्याने तो शेवट प्रभावी झाला. प्रकाशयोजना मात्र टाळी घेणारी होती. पण, ती मन:स्थितींची तीव्रता दाखवणारी असल्याने योग्य होती. शिवाय नाटकाच्या चालू प्रक्रियेला बाध आणणारी नव्हती. ( शिवाय, राज्य नाट्य स्पर्धेत काही असे ‘ दाखवणे ’ ठीकही म्हणता येते. )

तिन्ही अभिनेत्रींनी आपापल्या भूमिका छान वठवल्या. त्यासाठी त्यांनी घेतलेली मेहनत जाणवत होती. नाटकाची निवडलेली शैली पाहता इथे ' स्टार ' अभिनय अपेक्षितच नव्हता. नाटकाला महत्त्व देत ते सादर होणे हेच महत्त्वाचे होते. ' तीन सुंदर मुलींचे दणदणीत नाटक ' अशी त्यांना शाबासकी दिली !

एक लक्षातच ठेवावे लागते अशा नाटकात -- कसले निनावी पत्र, कसला अपराध, मालकिणीचा नवरा तुरुंगात कसा गेला, जामिनावर सुटून कसा आला – असे वास्तव चाचपणारे प्रश्न विचारायचेच नसतात. नाहीतर आयनेस्कोचे ' द न्यू टेनंट ' बघताना आपण विचारू की आपले सामान या खोलीत मावेल की नाही ते त्या भाडेकरूला आधी कळले नाही ? घेतलेच कसे त्याने ते घर ? अशा नाटकांत समोरच्या घटनांचे शारीरिक नव्हे तर मानसिक वास्तव अनेकदा व्यक्त होत असते, हे समजून घ्यायला हवे.

जाता जाता एक सांगतो. या नाटकाच्या लेखनाची प्रक्रिया मी घडताना पाहिलेली आहे. ' काठपदर ' हे नाव जगतापांना मीच सुचवले होते आणि तेच त्यांनी मुक्रर केले !

निर्माते, मुख्यत: दिग्दर्शक राजीव वेंगुर्लेकर आणि पूर्ण टीमचे अभिनंदन ! कुछ भी रहने दो मतभेद, डोक्याला जागे करणारे, चालना देणारे हे नाटक आहे ! जय हो !

--- चं. प्र. देशपांडे.

--- 000 ---

आनंदभेटी-चर्चा-इतर गप्पा-आणि इतर काही खानपान --

काठपदर या नाटकाच्या पुण्यातील प्रयोगाच्या निमित्ताने झालेल्या काही भेटीगाठी

मी लिहिलेल्या, ' काठपदर ' या नाटकाच्या परीक्षणाबाबत

आदरणीय नाट्यगुरू प्रा. कमलाकर सोनटक्के यांचा प्रतिसाद ---

आपण पाठवलेल्या " काठपदर " या नाटकाच्या परीक्षणासाठी धन्यवाद.

चं प्र देशपांडे यांचं " काठपदर " या दिलीप जगताप लिखित पुरस्कार विजेत्या नाटकाचं आणि नाट्यप्रयोगाचं विश्लेषण अतिशय अभ्यासू आणि व्यासंग पूर्ण वाटलं.

चं प्र यांनी जां जेने यांच्या मूळ " द मेडस " या नाटकाची गहराई, त्यामागचा साग्र विचार, नाट्याची जातकुळी याचंही विश्लेषण केलं आहे आणि त्याबरोबरच दिलीप जगताप यांनी मराठीत केलेल्या " काठपदर " या रूपांतराचं मर्म ही अधोरेखित करून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे लेखकानं आणि दिग्दर्शकांनं या नाटकासाठी वापरलेल्या अर्ध ग्रामीण, अर्ध नागर भाषेचा केलेला वापर: याचे अन्वय त्यांनी व्यवहाराच्या पातळीवर मोठ्या कुशलतापूर्वक उलगडून दाखवले आहेत.

चं. प्र देशपांडे हे एक निष्णात प्रयोगशील नाटककार आणि नाटकावरील भाष्यकार सुद्धा आहेत. त्यांनी एक प्रकारे या नाटकाच्या रचनेपासून तो सादरीकरणा पर्यंत आणि अभिनय शैलीपर्यंत मांडलेली मतं, मग ती त्यांच्या मित्रांच्या प्रश्नाद्वारे असोत किंवा त्यांच्या स्वतःच्या मतांप्रमाणे असोत, ती खूपच प्रभावी वाटतात.

आज आमच्या आधुनिक प्रायोगिक रंगभूमीवर अशा प्रकारचे रचनात्मक भाष्यकार मिळणे ही दुर्मिळ गोष्ट झालेली गोष्ट आहे. चं प्र देशपांडे यांनी ही पोकळी सार्थपणे भरून काढली आहे.
मी स्वतः या नाटकाचे इंग्रजी भाषेत तसंच हिंदी भाषेत सुद्धा प्रयोग बघितले आहेत. या चौफेर परीक्षणामुळे हे नाटक पहिल्यांदा मला अधिक तपशीलवार अर्थांसह कळलं. यासाठी या परीक्षणाचं विशेष महत्त्व मला वाटतं.
पुन्हा एक वार दिलीप जगताप, नाटकाचे दिग्दर्शक कलावंत आणि अशा प्रकारची आशय गहन समीक्षा करणारे चं प्र देशपांडे यांचं मनापासून अभिनंदन.
कमलाकर सोनटक्के, मुंबई.
--- 000 ---
अमेरिकास्थित आमचे मित्रवर्य डॉ. अरुण प्रभुणे यांचा ' काठपदर ' बाबतचा प्रतिसाद --
चं. प्र. सारख्या प्रतिभावान नाटककार असलेल्या चोखंदळ रसिकाने आस्वादात्मक प्रतिक्रिया अगदी मनापासून लिहिली आहे. ही प्रतिक्रिया सविस्तर, तपशीलपूर्वक लिहिलेली असून मूल्यमापनात्मकही आहेच, पण खरे म्हणजे एका निर्मितिक्षम व आस्वादक्षम मनाने अनुभवलेला नाट्यानुभवच इथं शब्दबद्ध केला गेला आहे असे ही प्रतिक्रिया वाचून वाटले. 'काठपदर'च्या नामजनकाचे व काठपदर'च्या निर्मितिजनकाचे मनापासून अभिनंदन !
--- डॉ. अरुण प्रभुणे, अमेरिका.

आमचे आणखी एक मित्रवर्य सर्वप्रिय अमोल पालेकर, ' काठपदर ' बाबत --
चंप्र आणि सोनटक्के सारख्या नाट्यकलेची सखोल जाण असणा-या नाट्यकर्मींच्या प्रतिक्रिया वाचून छान वाटलं. पुनश्च एकदा अभिनंदन! ▯▯▯
--- अमोल पालेकर.

The Samvaad at my Show Gondangao , The Studio . Pune . 2023 . Sarita and Chandramohan Kulkarni , Ashutosh Potdar and Champra Deshpande .

कदाचित काहींना हे पाहायला महत्त्वाचे वाटू शकेल -- कारण ही एक सर्वसामान्य समस्या आहे -- म्हणून --
K had started to deteriorate at Brockwood. The regular walks that he took became shorter. The walk through the Grove and across the pastures and fields, which entailed climbing over a fence, he did not do anymore. Apart from that, he was as active as ever. Once he told me: Je travaille comme un fou! (I am working like mad!)
Indifference and understanding
One has to be indifferent to health, to loneliness, to what people say or do not say, indifferent to whether one succeeds or does not succeed, indifferent to authority. If

you hear somebody shooting, making a lot of noise with a gun, you can very easily get used to it, and you turn a deaf ear; that is not indifference. Indifference comes into being when you listen to that noise with no resistance, go with that noise, ride on that noise infinitely. Then that noise does not affect you, does not pervert you. Then you listen to every noise in the world - the noise of your children, of your wife, of the birds, the noise of the chatter of the politicians make. You listen to it completely with indifference and therefore with understanding.
--- J. Krishnamurti.

तीन उपयुक्त धडे

1 एका नव्या गावात बदली झाली होती. थोडक्या काळात अनेक ओळखी झाल्या होत्या. एकदा बाहेरून बायकोबरोबर एक बाई आल्या होत्या. आता समोर दिसल्यावर काहीतरी बोलायचे म्हणून मी म्हणालो, " काय म्हणतात मिस्टर जाधव ? " बाप रे ! त्या बाई एकदम चपापल्या, धक्काच बसला त्यांना ! ते पाहून बायको पटकन मधेच म्हणाली, " या मिसेस जाधव नाहीत – या मिसेस शिंदे – ". " अरे, सॉरी हं, " मी, जरी बायकोने सांगितले असले तरी चाचरत विचारले, " काय म्हणतात मिस्टर शिंदे ? " त्या नुसते हसल्या. बायकोने सावरून घेतले, " हे जरा लेखक-कवी आहेत ना – तंद्रीत असतात कधी कधी ! " तेव्हापासून मी धडाच घेतला – समोर कोण आहेत या बाई हे नक्की माहीत असले तरीही मी सावधपणे विचारतो, " काय म्हणतात मिस्टर ? " हे बरे, या अमुक आहेत, असे नकोच ते !

2 दुसरा धडा माझ्या एका असिस्टंटमुळे मिळाला. एका बाईबरोबर एक पुरुष आलेला होता. त्यांच्या प्रत्येक कामात तो लक्ष घालत होता. आमच्या त्या असिस्टंटने विचारले, " हे तुमचे मालक आहेत का ? " त्या बाई चिडल्याच. " भाऊ आहे तो माझा – माहीत नसताना असे कसे विचारता तुम्ही ? " त्या असिस्टंट तर्फे मी सॉरी म्हणून ते मिटवले. यातून धडा लक्षात ठेवला – हे तुमचे अमुक का, असे कधीही विचारायचे नाही. " हे तुमचे कोण ? " असे विचारायचे.

3. तिसरा धडा मीच माझ्या सहकाऱ्यांना सांगितला. मी ज्या विभागाचा प्रमुख होतो त्याचे एक काम म्हणजे ग्राहकांच्या तक्रारींबाबत कार्यवाही करणे. कधी आमच्या एखाद्या अधिकाऱ्यावर भ्रष्टाचाराचा आरोप करणारे पत्र येई. मग एक अधिकारी आम्ही त्याची माहिती घ्यायला पाठवत असू. समजा त्यात काही तथ्य नाही, ती तक्रार खोटी आहे असे दिसले तरीही आपले मनुष्यस्वभावाचे ज्ञान वापरायचे. " तुमची तक्रार खोटी आहे " असे कधीही म्हणायचे नाही. " तुमची तक्रार सत्यावर आधारित नाही, असे दिसून आलेले आहे " – असे म्हणायचे ! येतोय ना फरक लक्षात ?

--- 000 ---

बाप रे ! मी तर विसरूनच गेलो होतो की आपण अशी काही भलीमोठी कविता लिहिली आहे ! पण वाचणार कोण हे -- हा प्रश्न आहेच ! त्या प्रश्नाला महत्त्व दिले असते तर लिहून झालीच नसती ही एक महामुक्त कविता !
अगदी छोटीशी कविता इथे दिली तरी सुमारे दहावीस वाचकच ती वाचतात. त्या मानाने ही आता एक बरीच दीर्घ म्हणावी अशी देतोय कविता. अर्थातच मनात ओशाळवाणेपणा आणि अपराधी भाव आहेत ! पण लिहिलीय ना आता तर असू द्या, असे म्हणून देतोय --

**चित्रपट**

000

वस्तुत: तिच्या डोळ्यांत दोष होता -- एक डोळा चंद्रासारखा होता तर दुसरा सूर्यासारखा ! पण प्रेमात त्याचाही आनंद होतो -- जसा देवानंदला झाला --

तेरे ये दो नैना चाँद और सूरज मेरे !
ओ मेरे जीवनसाथी !
( चित्रपट ' गाईड ' )

सकाळ, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत व इतर वृत्तपत्रात आलेले पुस्तक प्रकाशनाबद्दल वृत्तांकन व समीक्षण

आदरणीय मित्रवर्य दा. गो. काळे यांचा प्राथमिक अभिप्राय -- ( सविस्तर अभिप्रायाची वाट पाहात आहे -- )
" तंबाखूची टपरी " चंप्रंचे नव्या अनुवादकांसाठी अनुसर्जनाचे गोल्डन गेट.

चं.प्र.देशपांडे यांचा मी अत्यंत आभारी आहे.हा सगळा ऐवज www.champralekhan.com या संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध असताना मला पुस्तकाच्या रूपात उपलब्ध करून दिल्याबध्दल.त्यांच्या या प्रेमाचा,उदारपणाचा मला फायदाच झाला. कारण मी फारसा टेक्नोसेव्ही नाही.आणि माझे इंग्रजी भाषेचे वाचनही नसल्यासारखेच आहे.त्यादृष्टीने हे संकलन माझ्यासाठी तंबाखूच्या टपरीसारखे आहे.कविता वाचायची तलफ आली तेव्हा या पुस्तकातील सहजपणे उघडले जाणारे पान मी वाचण्याचा प्रयत्न करतो.त्यातील अनुसर्जनाची रित कमालीची आपल्या मातीत रूजवून पुन्हा उगवल्यासारखी वाटते.त्यातील कविंच्या अनुभवांचे स्तर जगण्यातील सूक्ष्मतीसूक्ष्म जीवन-जाणिवांनी वेढलेले असले तरी,चंप्र यांनी त्या अनुभवांना दिलेला भाषिक स्वर माझ्यासारख्या नव्या नवलाईने वाचणा-या वाचकांसारखा साधा सरळ आहे.मी त्या भाषिक अनुव्यवहाराच्या प्रेमात पडलो आहे.मला त्यात आत्मीयतेचा एक सांधणारा दूवा वाटतो.जगाच्या पार्श्वभूमीवर चाललेल्या कवितेच्या घटितांशी जोडणारा दुभाषी वाटतो.हे माझ्या बाबतीत तरी खरे आहे.

कारण मी पहिल्यांदा अनुवादीत कविता १९८५ च्या दरम्यान वसंत दावतरांच्या ' आलोचना ' या नियतकालीकात वाचल्या.तो अंक बहुतेक भारत भवन,भोपाळ यांनी आयोजित केलेल्या कविता वाचनाच्या सत्रावर केलेला होता.त्या कविता वाचनात दिलीप पुरूषोत्तम चित्रे,अरूण कोलटकर व नामदेव ढसाळ यांचा समावेश

होता.त्यांच्या इंग्रजी कविता व त्या कवितांचे अनुवाद सोबत सोबत छापलेले होते.त्या वाचनात खूप मला आली होती.नंतर मला वाटते,राजीवने संवाद मध्ये अरूण कोलटकरांच्या जेजूरी मधील कवितांचे काही अनुवाद प्रसिद्ध केले होते." जेजूरीतील एका दगडावर ढुंगण टेकविणा-या माणसाच्या आशयाची कविता आहे.बोचा (ढुंगण) दगडावर टेकवल्यानंतर अंडाला होणारा दगडी दंवट स्पर्श असे मजेशीर आपल्या बोलीभाषेला समांतर जाणारे अनुवाद वाचनात आले.भविष्यात आपल्याला असे काही वाचायला मिळावे म्हणून मी विश्व कवितांचे हिंदीतील खंड विकत आणले.परंतु त्यात माझे मन रमले नाही.मी माझ्यातच त्या कवितेला न भिडण्याचे न्यूनगंड शोधत राहिलो ते तंबाखूची टपरी हातात येईपर्यंत.या सगळ्या पार्श्वभूमीवर मला जाणवले ते असे,थेट अनुवाद असो की,अनुसर्जनाची कृती असो अनुभवाला जोडणा-या भाषा व्यवहारापर्यंत कलावंताला जाता आले पाहिजे.(तुर्त ही पुस्तक मिळाल्याची व चाळल्याची आनंदी पोंच आहे.)

दा.गो.काळे

Girish Rangnekar is with Champra Deshpande.

गिरीश रांगणेकर हा माझा एक जुना मित्र आहे. पूर्वी तो ' व्यक्त-अव्यक्त ' नावाचे एक मासिक काढत असे, त्याचा मी एक सल्लागार होतो. त्याने आपुलकीने पाठवलेला अभिप्राय ---

.

'आवर्तने : कविता, आशय, आकलन' -  चंप्र देशपांडे

 ‘आवर्तने' या आशयसमृद्ध  पुस्तकामधून चंप्र देशपांडे सरांनी मराठीतल्या निवडक कवींच्या कवितांच्या अनुषंगाने कवितेचा आशय आणि आकलन याची अतिशय असोशीने मांडणी केली आहे. 'तंबाखूची टपरी' या काही महिन्यांपूर्वी आलेल्या त्यांच्या आणखी एका महत्त्वाच्या पुस्तकाने साहित्यातले नोबेल अथवा पुलित्झर पुरस्कार प्राप्त निवडक कवी आणि त्यांच्या कवितांची मराठी वाचकांना ओळख करून देण्याचं मोलाचं काम केलेलं होतं. पिढ्यानपिढ्या आपल्या मनःपटलावर कविता या साहित्यप्रकाराविषयी सरधोपट, बंदिस्त, राजवर्खी चौकट रुतून बसलेली आहे. या चौकटीला छेद देण्याचं काम 'तंबाखूची टपरी' नं अगदी बिनधास्तपणे केलं होतं. त्यानंतर चंप्रंचा लगोलग पुढचा असाच भव्य सर्जनशील अविष्कार म्हणजे ‘आवर्तने : कविता, आशय, आकलन’ हे पुस्तक होय! मजकुराच्या मर्यादा ओलांडणारे भान कविता देते. आणि अशी कविता कोणत्याही साहित्यप्रकारात असू शकते. म्हणूनच 'वेटिंग फॉर गोदो' नाटक देखील एक कविताच असते असे चंप्र ‘आवर्तने’ पुस्तकात म्हणतात. त्या अर्थाने ‘आवर्तने’ पुस्तक देखील कवितेविषयीचे जणू एक महाकाव्य आहे!  चंप्रंनी स्वतःच पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिली आहे आणि ती आहे तब्बल १०० पानी! खरेतर नवकवींचे २-३ कविता संग्रह एवढ्या पानांत छापले जातील.  या २५० पानी पुस्तकाने आरती प्रभू, बा. सी. मर्ढेकर, पु. शि. रेगे, सदानंदन रेगे, दि. पु. चित्रे, अरुणा ढेरे, शांता शेळके, वसंत आबाजी डहाके, प्रभा गणोरकर, नामदेव ढसाळ यांच्यापासून ते प्रणव सखदेव, रवींद्र लाखे अश्या नव्या पिढीपर्यंतच्या एकूण ३६ कवींच्या कवितांची लक्षवेधी मांडणी करत धांडोळा घेतला आहे.

जगात खूप साऱ्या कविता सरळ उताऱ्यांतूनदेखील लिहिल्या गेलेल्या आहेत. पुस्तकात छापलेला कवितेचा मजकूर म्हणजे खरी कविता नव्हे. मजकुराच्या दृश्य रूपाच्या बाहेरच कविता असते. अमूर्त चित्रात जसे रंग आणि आकार असतात तसे कवितेत शब्द आणि रचना असतात. अमूर्त चित्रात जर अमुक आकार वा दृश्य ओळखता येण्याची गरज नाही तर कवितेत तसा विचार वा अनुभव ओळखण्याची गरज काय? अमूर्त कविता का असू नये असा प्रश्न चंप्र पुस्तकातून उपस्थित करतात. चंप्र म्हणतात की बातम्यांवरून वरवर दिसणारे सगळे खरे असतेच असे नाही. दिसते त्यापेक्षा वेगळेच प्लॅन शिजू शकतात आणि त्याचे विश्लेषण करणारे विद्वान निरर्थक ठरत असतात. जगण्यातली ही ऍब्सर्डिटी व्यक्त करणे हे माझ्या कवितेचे एक काम आहे असे ते ठामपणे म्हणतात आणि स्वतः कवी म्हणून असल्या लेखनाच्या उद्योगासाठी ते दिलगिरी देखील व्यक्त करतात. लेखकाची अशी पारदर्शीपणाने आपल्या मतांची स्पष्ट मांडणी हे देखील पुस्तकाचे मोठे वैशिष्ट्य ठरावे.

तुकारामाचा अभंग म्हंटले की त्यातले शब्द लक्षात न घेताही आपण डोलायला लागतो. तुकारामाच्या 'रिकामिक' किंवा 'मागेपुढे अवघा दिसे रिता ठाव' ला आपले विद्वान अध्यात्मिक म्हणून सोडून देतात आणि सार्त्रच्या नथिंगनेसपुढे गुडघे टेकतात असे परखड निरीक्षण चंप्र 'आवर्तने' मधून नोंदवतात. दिलीप पुरुषोत्तम चित्रेंवरच्या लेखात 'साहित्य आणि अस्तित्वभान-१' हे चित्र्यांचे पुस्तक विद्वत्ता आणि मर्मदृष्टी यांचा प्रचंड आविष्कार असलेले असून अशी पुस्तके मराठीत विरळाच असे चंप्र नमूद करतात. चित्रेंचा 'कवी काय काम करतो' हा लेख मराठीतला अजरामर लेख आहे असं ते म्हणतात. मात्र हे सर्व समजून घेण्यात इंटरेस्ट कोण घेणार? 'आपल्या माती'च्या दिशेने वेगाने जाणारा हा समाज लौकरात लौकर चित्रेंना नामशेष करील" असा उद्वेग देखील ते लेखात व्यक्त करतात. चंप्र चित्रेंची तुलना नेमाडेंशी करतात. टीकास्वयंवर' वाल्या नेमाड्यांऐवजी 'साहित्य आणि अस्तित्वभान-१' वाल्या चित्र्यांना खरे तर ज्ञानपीठ मिळायला हवे होते असे चंप्रंना प्रामाणिकपणे वाटते. पु. शि. रेगे यांच्या कवितेविषयी लिहिताना, रेग्यांनी साहित्याच्या सामर्थ्याचा जो गौरव केला आहे तो चंप्र उद्धृत करतात, तो महत्वाचा आहे. -

'जीवन जगले तर साहित्य जगणार नसून साहित्य जगले तरच जगण्यासारखे काहीतरी उरणार आहे!'

प्रिया जामकरांच्या 'मरणाची प्रॅक्टिस' या कवितेत येणारी गूढता ही भाषेमुळे येणारी नसून आशयाची आहे असं चंप्र सहज लिहून जातात. कवितेने टिकली लावलीच पाहिजे, बांगड्या घातल्याच पाहिजेत, साडीच नेसली पाहिजे अशा कर्मठ अपेक्षा असलेल्या वाचकांना न जुमानता खांडेकर कविता लिहितात असं मार्मिक निरीक्षण चंप्र खांडेकरांच्या कवितेविषयी नोंदवतात. श्रीधर तिळवेंच्या कवितांवर चंप्र लिहितात "अशी ओसंडती भाषा तोच निर्माण करू शकतो ज्याच्याकडे अफाट कल्पनाशक्ती आहे." रवींद्र लाखेंच्या एका कवितेबद्दल लिहिताना "ही कविता सवयीच्या जगण्यावर तिच्या अमर्याद आशयाचा बुलडोझर फिरवते" असे प्रशस्त दृश्यात्मक वर्णन करतात. चंप्रं कवितेविषयीच्या आकलनाची मांडणी करताना अशी प्रभावी शब्दयोजना आणि दृश्यात्मकतेचा वापर करून समीक्षेत नेमकेपणा आणतात. असा तजेलदार लेखन प्रतिभेचा प्रगल्भ अविष्कार अनुभवणं ही एक पर्वणी आहे.

आहे ते स्वीकारून त्यातच थोडेफार बदल करत स्वर्ग निर्माण करण्याची स्वप्ने मराठी कविता पाहत असते, तसे डहाकेंच्या कवितेत घडत नाही असे गौरवोद्गार चंप्र वसंत आबाजी डहाके ह्यांच्या कवितेविषयी काढतात. चंप्र लिहीतात, "इथे एकेका ओळीचा अर्थ सांगत जाण्याचे बीजगणित करायचे नाही आहे. कविता म्हणजे काही

शब्दकोडी नव्हेत.” मनोहर ओक ह्यांची "आरशातल्या आरशात वारले बेवारशी" अशी एक एकाच ओळीची कविता आहे. त्यावर  कणाकणाचा अर्थ सांगत बसण्याचे मी पाप करणार नाही, मेलडी खाओ और खुद जान जाओ अशी मिश्किल टिपण्णी चंप्र करतात.

मन्या जोशी ह्या कवीविषयी लिहिताना चंप्रंची भाषा काव्यात्मक होते. हा तर आजच्या पिढीचा जादूगार कवी आहे. चार चार चेंडू हवेत उडवत-झेलत राहण्याची भाषिक किमया याच्याकडे आहे. कवितेची ही अशी भाषा मराठीत तरी मी पहिल्यांदाच पाहतो आहे. राहुल पुंगलियांच्या 'सरडा' या कवितेची तुलना चंप्र स्वतःच्या 'खेकडा' या कविताशी करतात. चंप्र म्हणतात - "तिकडे मनाचा सरडा होता तर इथे मनाचा खेकडा आहे. दोन्ही ठिकाणी आपल्या अस्तित्वाच्या मुळाला भिडणे आहे. आणि हेच तर असते कलेचे उत्तुंग कार्य!"

अनेक आशयघन कविता आपल्याला पुस्तकातून भेटतात आणि अपूर्व आनंद देतात -

दिवे - अरुण कोलटकर

काहीतरी कुजल्याचा वास यायला लागला
अन मी खिशातनं रुमाल काढणार
तोच माझी करंगळी खाली पडली
ती मी दुसऱ्या हातानं उचलून घेतली
अन रुमाल नाकावर धरणार
तर नाकच निसटून रुमालात आलं
ते रुमाल गुंडाळून मी खिशात टाकलं
काहीतरी कुजल्याचा वास येतच होता
म्हणून खिशातल्या खिशात नाक मुरडलं
अन करंगळीत आळ्या पडल्यात की काय
ते बघणार : पण तेवढ्यात दिवेच गेले

‘दिवे’ कवितेविषयी  चंप्र लिहितात - कुजल्याचा वास, करंगळी, नाक, दिवे या सगळ्या प्रतिमा तर आहेतच पण ही पूर्ण कविताच एका सखोल प्रश्नाची प्रतिमा होते. कविता म्हणजे एसटीचे टाईमटेबल नसते. तिच्यातून अनेक अर्थवलये निघत असतात. कवितेचा एकच एक अर्थ अपेक्षिणे म्हणजे कविता नाकारणेच होय. चांगल्या कलाकृती एकदा 'कळून' संपत नाहीत!

क्षण - मलिक अमर शेख

जपमाळ घेऊन बसावी
तसे हे जख्ख म्हातारे पांढरे क्षण
मी सरकली जातेय मण्यांप्रमाणे
थंडगार, अलिप्त, वेळेच्या बोटातनं
केवळ सवयीनं निरर्थक

‘A good poem is a contribution to reality. The world is never the same once a good poem has been added to it. A good poem helps to change the shape of the universe, helps to extend everyone’s knowledge of himself and the world around him.’ -
'आवर्तने' पुस्तकातला हा मजकुर 'तंबाखूची टपरी' आणि ‘आवर्तने’ या दोन्ही पुस्तकांना अगदी तंतोतंत लागू आहे. अशी अभ्यासपूर्ण पुस्तके फक्त कवितेचेच नव्हे तर आपल्या समग्र जगण्याचे देखील भान वाढवतात. एखाद्या संपूर्ण साहित्य प्रकाराविषयी वाचकाचा दृष्टिकोन विस्तीर्ण करणाऱ्या अश्या पुस्तकांविषयी चर्चा व्हायला हवी, अश्या लेखनाचा यथोचित सन्मान व्हायला हवा. त्याचाच एक भाग म्हणून 'आवर्तने' आणि 'तंबाखूची टपरी' या दोन्ही पुस्तकातल्या एकूण निवडक २५ कवितांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम करण्याचा माझा मानस आहे. चंप्रंनी त्यासाठी अतिशय समर्पक नाव देखील मला सुचवलं आहे - 'कवितेचा क्रॅश कोर्स!''
‘आवर्तने’ वर्णमुद्रा पब्लिशर्सने प्रकाशित केले असून चंद्रमोहन कुलकर्णीचे आकर्षक मुखपृष्ठ त्याला लाभलेले आहे.
डॉ. गिरीश रांगणेकर

केंद्र आणि शरद पवार एपिसोड

मी राजकीय घडामोडींकडे मानसिक ड्रामा म्हणून पाहतो. फार प्राणपणाने त्यांना महत्त्व देत नाही. त्या घडामोडींचा खूप मसाला आणि इतिहासातले दाखले वगैरे डोक्यात भरत राहणे हा मला मूर्खपणा वाटतो. त्यामुळे, तेही फारसे माझ्याकडे नसते. बऱ्याच बाबतीत मी राजकीय अज्ञानी म्हणावे असा असतो. पण, त्याची मला खंत वाटत नाही कारण सगळेच, कमीजास्त प्रमाणात, तसेच असतात, हे मला समजते. प्रत्येकाकडे थोडे थोडे तपशील, सहज समोर आलेले वा निवडलेले असे असतात आणि त्यावरच त्यांचे राजकीय आकलन घडत असते. अगदी राजकीय विश्लेषक, पत्रकार, प्रवक्ते वा विद्वान हे सगळेच थोड्याफार फरकाने माझ्यासारखेच असतात. अगदी सत्य कळावे असा ध्यास बाळगणाऱ्यांचेही असेच असते. त्यासाठी प्रत्येक वेळी ‘ राशोमान ‘ या सिनेमाची साक्ष काढायची गरज नाही.
आताच, थोड्या वेळापूर्वी डॉ. रावसाहेब कसबे यांची टीव्हीवर एक मुलाखत ऐकली. त्यांचे म्हणणे आपल्या मतदाराने जातीय वर्तुळ ओलांडून राजकीय विचार केला पाहिजे. हे कुणालाही पटण्यासारखेच आहे. पण तसे घडत का नाही, हा प्रश्न फक्त इथे उपस्थित करून ठेवतो. त्यावर पुढे काही मजकूर येईल.
आज इंग्लंडमध्ये प्रिन्स चार्ल्स यांचा राज्याभिषेक आहे. त्यांच्या आजोबांनी वापरलेली खुर्ची तिथे असणार आहे. एकूणात, असा एक राजा असणे, जुनी खुर्ची असणे, यांतून मिळणारे मानसिक सातत्य माणसाला गरजेचे असते. आपण उगीचच घराणेशाहीच्या नावाने ओरडत असतो. एक केंद्र असले म्हणजे माणसाला आधार वाटतो, सुरक्षित वाटते. घराणे, धर्म, जात, विचारसरणी असे कोणते ना कोणते केंद्र लागतेच. ( वर जातवादाचा जो मुद्दा आला आहे त्याला हे प्रस्तुत आहे. ) जिथे एक समूह एकत्र राहील असे काहीतरी धरून ठेवण्याची ही एक जीवनावश्यक बाबच म्हणावी लागेल. अन्यथा माणसाला सैरभैर होण्याची वा असुरक्षित होण्याची भीती वाटते. पण, असे एक एक केंद्र निर्माण होण्याची पद्धत असल्यानेच सर्व समूह एकमेकांच्या बरोबर संघर्षात येऊन असुरक्षित होत राहतात. म्हणूनच सर्वच देशांना संरक्षणसिद्ध राहावे लागते.

तर अशा या पार्श्वभूमीवर आपण, अलीकडेच घडलेल्या शरद पवार एपिसोडकडे पाहू शकतो. मला तर यात एक माणुसकीचाही भाग पाहावा असे वाटते. पवारांनी 63 वर्षे राजकारणात काढलेली आहेत. एक राजकीय पक्ष उभा केलेला आहे. आता 82 व्या वर्षानंतर माणसाच्या डोक्यात, हा पक्ष, हे राजकारण पुढे कसे चालेल याबाबत विचार येणे साहजिक आहे. त्याहून मला अधिक महत्त्वाचे वाटते ते म्हणजे, आता बास, आता निवृत्त व्हावे, असे त्यांना वाटले तरी ते चुकीचे म्हणता येणार नाही. वय आणि तब्येत यांच्याकडे दुर्लक्ष करून ते एक महान योद्धा आहेत असे म्हणत त्यांना यातून मोकळे होऊच न देणे, हे योग्य नाही वाटत. आता यापुढे, खरे तर, त्यांच्या मर्जीने त्यांना आवडेल तसे जगू द्यायला हवे, असे वाटते. एका बाजूला त्यांच्या बाबतीतले प्रेम, आदर, निष्ठा, कृतज्ञता यांबरोबरच तेच केंद्र म्हणून उपलब्ध असण्याची मानसिक गरज असे हे एक उत्तुंग प्रकरण तयार झाल्याचे दिसते आहे. एक ज्येष्ठ पुढारी म्हणाले की पवारसाहेब निवृत्त होत असले तर आम्हीही राजकारण सोडून देऊ. दुसरे एकजण म्हणाले की आम्ही पवारसाहेबांच्या आधारानेच जगत आलेलो आहे. ते नसतील तर आम्ही उद्ध्वस्त होऊ. एकूणात, एका बाजूला हे एक भावनिक अवलंबित्व आहे तर दुसऱ्या बाजूला त्याला व्यावहारिक सुरक्षेची खात्री हवी असणे, हेही आहे. गुरू-शिष्य जसे एकमेकांवर अवलंबून असतात तसेच हे एक घट्ट अभेद्य जगणे तयार झाल्यासारखे दिसते आहे. दोघांचाही एकमेकांना फायदा झालेला असतो, दोघेही एकमेकांना वापरत आलेले असतात. बहुतेक सर्वच मानवी संबंधांत हे असेच चित्र दिसते.

या एपिसोडचे कवित्व अजून बरेच चालणार असले तरी सध्या तो संपला आहे, असे म्हणता येते. पवारांनी निवृत्तीचा विचार जाहीर केला, त्याला सर्वांचा विरोध झाला आणि एकूण जनभावनेचा – सांगात्यांच्या भावनांचा आदर राखून त्यांनी तो विचार मागे घेतला. लोक, राजीनामा दिला, मागे घेतला म्हणताहेत, ते चूक आहे. ते असो. आता काही लोक म्हणतात की साहेब डावीकडे दगड मारतात तेव्हा उजवीकडच्या झाडावरचे चार आंबे खाली पडतात. प्रत्येक गोष्टीचा असा गौरव करत बसायची मला गरज वाटत नाही कारण मी काही त्यांचा अनुयायी नाही. त्यांचे साधे, सरळ, नॉर्मल असे काही जगणे-वागणे असूच शकत नाही, असे मला वाटत नाही. त्यामुळे एक सरळ समस्यायुक्त मानवी जगणे, असे मी याकडे पाहतो आहे.

आपण वर उल्लेख केलेले केंद्रतत्त्व लक्षात घेतले तर निवृत्तीनंतरचा उत्तराधिकारी कुटुंबातला – नात्यातलाच असणे गरजेचे होते. समजा अजितदादा म्हटले तर काय ? ते अत्यंत अनुभवी, कार्यक्षम असले तरी फटकळ स्वभावाचे आणि आक्रमक अशी त्यांची प्रतिमा दिसते. राष्ट्रवादी पक्षातल्या अनुभवी, विद्वान आणि याचबरोबर रफ-टफ असणाऱ्या इतर नेत्यांना बरोबर घेऊन त्यांना कितपत जाता येईल, असा प्रश्न असू शकतो. आधीच त्यांच्याकडून दुखावलेलेही काही असू शकतात. धूर्तपणा, मुरब्बीपणा आणि पाताळयंत्रीपणा हे राजकारणात अत्यावश्यक असणारे गुण त्यांच्यात कितपत असतील ? मग येतात सुप्रियाताई सुळे. या सज्जन, समंजस, मवाळ आणि सौम्य वागणाऱ्या, बोलणाऱ्या आहेत. राष्ट्रवादी ही दांडगट संघटना कितपत त्यांच्या ताब्यात राहील, हाही प्रश्न असणारच. पण, आक्रमकतेपेक्षा पक्ष चालवायला सुप्रियाताईच बऱ्या असे पवारांच्या मनात असू शकते. त्यामुळे अर्थातच अजितदादा आणि त्यांचे मित्र नाराज होणे हे घडणारच. पण, जे काय असेल ते आपल्या डोळ्यांदेखत घडावे आणि आपणच

हाताळून गाडी मार्गावर ठेवायचे काम करावे, असे पवारांच्या मनातले विचार असू शकतात. पण, आहे त्याच केंद्राची सवय असलेल्या आणि ‘ गुरुबिन कौन दुजा आधार ‘ अशा अवस्थेतल्या लोकांनी ते घडू दिलेले नाही.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा यात असू शकतो. तो म्हणजे पक्षाची स्थावर-जंगम मालमत्ता ! ती सक्षमपणे हाताळली जाण्याची लाईन लावून देणे हेही खरे तर एक महत्त्वाचे काम आहे. या प्रकाराच्या एकूण चर्चेत हा मुद्दा कुठेही आल्याचे दिसले नाही. हे कसे काय ?

हे सगळे आता अर्धवटच राहिले. खरे तर पवारांनी निवडलेली वेळ करेक्ट होती. पुढल्या वर्षीच्या निवडणुकांपूर्वी अजून काही महीने आहेत. तोवर, थोडाफार गोंधळ वा विस्कळितपणा वा रुसवेफुगवे पवारांना निस्तरता आले असते. इतका मुरब्बी राजकारणी जेव्हा काही निर्णय घेतो तेव्हा त्यामागे भविष्याचे चिंतन असणारच. पण, तुम्ही प्रेमळ-आम्ही प्रेमळ आणि तुम्ही तर अद्वितीयच, असे याला स्वरूप येऊन ही समस्या आहे तशीच राहणार आहे. यात अजितदादांची ‘ बाहेरची पत ‘ कमी झाली आहे. ‘ आता सर्व मिळून पक्षाचे बळ वाढवायच्या कामाला लागू या ‘ असे ते म्हणताहेत. त्यांच्या मनात काहीही चालले असले तरी ते पवारांचे पुतणे आहेत – पक्षात सगळे त्यांच्याशी आपुलकीनेच वागतील.

सारांश, एक अर्धवट ज्ञानी नागरीक म्हणून मला हे असे दिसते ! धिस इज लाईफ बेटा, इसमे सत्यबित्य कुछ नही होता !

--- 000 ---

अत्यंत बुद्धिमान निर्बुद्धपणा ---

अमर अकबर अँथनी

पूर्वी हा सिनेमा पाहिला तेव्हा एक साधा चेष्टेचा विषय वाटला होता. तीन हीरो, तीन हिरॉईन्स, एक दुरावलेले आईवडील, ज्यांनी संभाळ केला ते बाप, वगैरे, म्हटले तर खूप पसारा असलेली कथा. एक एक प्रेमप्रकरण फुलवत कधी नेणार आणि बाकीचा ड्रामा कधी दाखवणार ? पण नो प्रॉब्लेम ! मनमोहन देसाई हे ग्रेट मास्टर होते, हे आज पटले ! कथेतला एकही धागा मोकळा, अनुत्तरित न सोडणारी आणि सगळे जुने हिशोब चुकते करणारी कथा ! हा इथे कुठून आला, ती इकडे कुठे आली, हे विचारायचेच नाही ! एकदा तर परवीन बाबीचा काही गुंड पाठलाग करत असताना ती झाडाझुडुपातून, शेतातून पळत असते तर तिथे बुजगावणे म्हणून अमिताभ उभा ! हा कसा काय इथे -- पूछनेका नही ! असे खूप आहे. मी तर हा सिनेमा थोडी माझी निरर्थकतेची देन मिसळत पाहिला ! खूप मजा आली ! ही एक अबसर्ड सुखात्मिकाच म्हणता येईल ! या माझ्या पद्धतीने मी हा सिनेमा मनातल्या मनात पोट धरून हसत पाहिला ! या सिनेमावर अक्षरक्ष: एक मोठा ' दर्जेदार ' लेख लिहिता येईल ! पण मीच किती काय काय करणार ? ! माझ्या लेखनाच्याच एका कामाच्या संदर्भात मला हा सिनेमा पाहणे गरजेचे होते. तो आज पाहिला आणि प्रचंड खुश झालो. घटना या एकूणात कशाही घडतात -- या अर्थाने त्या निरर्थकच असतात -- हे व्यक्त करणारा हा सिनेमा म्हणजे आपला एक मास्टरपीस आहे ! यातला कण न कण विचारपूर्वक योजलेला आहे. इथले तर्कशास्त्रच वेगळे आहे -- पण तेही एक शास्त्रच आहे ! ते एकदा स्वीकारले की मजाच मजा -- धूम धमाल !

आता अलीकडे इतका बुद्धिमान निर्बुद्धपणा चालत नसावा. त्यामुळे, लोकांची कल्पनाशक्ती आणि घटनांकडे ' जरा वेगळ्या ' दृष्टीने पाहणेच बंद झालेले आहे ! लोक नुसतेच सवयीच्या तर्कशास्त्रात जगत स्वयंचलित जगता-मरताहेत !

आता यापुढे वेळ मिळेल तसे मी मनमोहन देसाईंचे सिनेमे पुन्हा बघत जाणार आहे ! जीनियस माणूस !

--- 000 ---

मनमोहन देसाई म्हणत की माझ्या चित्रपटाची कथा खोटी असते पण त्यातली पात्रे खरी असतात !

आदरणीय अशोक राणेजी

अशोक राणे हे आंतरराष्ट्रीय चित्रपटाचे अभ्यासक, लेखक आणि शिक्षक आहेत. मी लिहिलेली ' अमर अकबर अँथनी ' या चित्रपटावरची पोस्ट त्यांना खूप आवडली. त्यांच्या मते हा चित्रपट एक महत्त्वाचा भारतीय चित्रपट आहे. या मतामुळे काही लोक त्यांना हसत. पण मी एक समानधर्मा भेटल्यामुळे त्यांना आनंद वाटला. त्या निमित्ताने फोनवर आमचे सुमारे अर्धा तास बोलणे झाले. राण्यांनी मनमोहन देसाईंची एक प्रदीर्घ मुलाखत घेतली होती, त्याचीही आठवण त्यांनी सांगितली. अँथनी च्या भूमिकेसाठी आधी धर्मेंद्रला घ्यायचे ठरले होते, पण, त्याला वेळ नव्हता म्हणून अमिताभला घेतले गेले ! अमिताभने अर्थात त्याचे सोने केले. देसाईंच्या चित्रपटात काम करताना कलाकारांना त्यांच्या अनेक कल्पना मूर्खपणाच्या वाटत, पण, देसाईंना त्यांच्या कल्पनांबाबत पूर्ण खात्री असे ! इस्पितळात तीन मुलांनी रांगेत झोपून पाईपालाईन्स जोडल्याप्रमाणे एकाच वेळी त्यांच्या आईला रक्त देण्याचा सीन करण्यापूर्वी सगळे कलाकार पोट दुखेस्तोवर हसले होते, पण, ते दृष्य प्रत्यक्षात जबरदस्त हिट ठरले ! असे रक्त नाही दिले जात, हे सगळ्यांना माहीत असते, पण, लोक त्यामागची भावना पाहतात, असे ते म्हणत !

आ. राणे यांना मागे एकदा मी ' धूसर ' या चित्रपटावर लिहिलेले, 'लोकसत्ता ' मध्ये आलेले माझे टिपणही खूप आवडले होते. तेव्हाही आमचे फोनवर बोलणे झाले होते. मी काही चित्रपटाचा अभ्यासक वगैरे नाही पण त्या बाबतीतले माझे काही लेखन राण्यांसारख्या विचक्षण अभ्यासकाला आवडते याचा मला आनंद वाटला ! प्रत्यक्ष आमची भेट झालेली नसली तरी त्यांनी माझी अनेक नाटके बघितलेली आहेत आणि त्यांना ती आवडलेली आहेत, हे त्यांनी सांगितले. छान वाटले !

--- 000 ---

फ्रेण्ड फिलॉसॉफर आणि गाईड चंप्रंना वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा --- रवी लाखे.

77 वे संपून 78 व्यात पदार्पण ---

अगणित शुभेच्छा आणि अमाप स्नेह पोचला !

धन्यवाद आणि शुभेच्छा !

नाटकाचे नाव --

' मी जिंकलो, मी हरलो ' --

परिणाम --

सर्वत्र जल्लोष !

केरळ स्टोरी आणि जे. कृष्णमूर्ती

अनी बेझंट यांच्या थिऑसऑफिकल सोसायटीने जे. कृष्णमूर्ती यांना दत्तक घेतलेले होते. त्यांच्या सोसायटीच्या भाकिताप्रमाणे जन्माला आलेले विश्वगुरू ते हेच आहेत असे जाहीर करण्यात आले होते. त्यासाठी ‘ ऑर्डर ऑफ स्टार ‘ नामक एक संस्था उभारण्यात आली होती. अमाप संपत्ती जमा झालेली होती. परंतु, कृष्णमूर्तींनी हे सगळे एक दिवशी बरखास्त करून टाकले. लोकांचे पैसे परत दिले. धर्म संघटित झाला की तो घातक होतो, हिंसक होतो हे त्यांना समजले होते. कोणत्याही धर्माशी, विचारसरणीशी वा राष्ट्राशी होणारी समरूपता ही माणसामाणसात फूट पाडते, संघर्ष निर्माण करते आणि हिंसा घडवते, असे त्यांचे आकलन होते. त्यांच्या स्वच्छ आकलनाप्रमाणे लोकांशी संवाद साधत त्यांनी जगभर भ्रमंती केली. ‘ मी तुमचा गुरू नाही, तुम्ही माझे शिष्य नाही ‘ असे ते सांगत. त्यांच्यासह कुणावरही विश्वास ठेवू नका – जे बोलले जाते आहे त्याची सत्यता वा असत्यता स्वत:च्या जगण्यात स्वत: बघा, असे ते म्हणत. कोणताही संबंध हे आकलनाचे प्रवेशद्वार असते, असे ते सांगत. अमुक प्रणाली, तमुक कलमे, कट्टर शिस्त वा प्रचंड परिश्रम यांचा आणि सत्याचा काही संबंध नसून सत्य हा एक पथहीन प्रांत आहे, असे ते स्पष्ट करत.

धर्मवाले असोत की विचारसरणीवाले असोत, आपले मत, आपला वैचारिक ढाचा म्हणजेच सत्य असे जगभर मानले जाते. नि:शंकपणे ! त्याचे परिणाम आपण वर्षानुवर्षे पाहतो-भोगतो आहोत. तशाच एका समस्येबाबतचा हा एक सिनेमा आलेला आहे – ‘ द केरला स्टोरी ’. ही कथा खरी आहे का, हीतले तपशील खरे आहेत का, दोन समाजांत फूट पाडण्यासाठी हा सिनेमा आला आहे का, राजकीय प्रचारासाठी याची निर्मिती झाली आहे का, वगैरे अनेक प्रश्न चर्चेत आहेत. भारतात दर तीन महिन्यांत कोणत्या ना कोणत्या निवडणुका असतातच, मग असा सिनेमा काढायचाच नाही का, असे विचारले जाते आहे. हा सिनेमा अतिरेकी कारवायांपासून सावध राहण्याचा संदेश देतो आणि अतिरेक्यांना तर अमुक धर्माचे म्हणूच नये, असे आपण म्हणतो – तर मग या सिनेमाने फूट कशी पडेल, वगैरे विचारही मांडले जात आहेत.

यात बाजू कोणती घ्यावी, याबाबत मत कसे मांडावे, हिताचे काय असेल, असे महत्त्वाचे प्रश्न समोर येत आहेत. या सिनेमात काही प्रश्न समोर आणले जातात – उदा – तुमच्या देवाची बायको मुळात कुणी पळवून कशी नेतो आणि तिला परत आणायला जर त्याला वानरसेनेची मदत लागते तर तसला देव कुणाचे रक्षण कसे करू शकेल, किंवा, तुमच्या देवाच्या मुलाला सुळी दिले जाते तरी तुमचा तो देव त्याला वाचवू शकत नाही, तो तुमचे रक्षण काय करणार ? आता या प्रश्नांना शाळकरी म्हणावे की सखोल म्हणावे यावरही मतभेद होतील. किंवा त्याच दर्जाचे प्रतिवादही कुणाला सुचू शकतील. मला ते महत्त्वाचे नाही वाटत. धार्मिक कट्टरता फूट पाडते हे स्पष्टच आहे, पण, त्याहून वाईट

असते शहाजोग अशी वैचारिक कट्टरता. मलाच माणसाचे हित समजते हा वैचारिक भ्रम. हाही एक वैचारिक साचाच असल्याने तो अलगतेच्या, फुटीच्याच प्रक्रियेला बळ देत असतो, तिला तीव्र करत असतो, असे मला दिसते. या सिनेमाबाबतचे वाद जिंकण्याहरण्यापेक्षा यातल्या समस्येचे आकलन होणे अधिक महत्त्वाचे आहे. आपल्या शिक्षणव्यवस्थेत कुठेही या वा अशा गंभीर समस्यांच्या आकलनाला जागा नाही. त्यामुळे कोणतीही कट्टरता कोणत्याही निर्बुद्ध मतावर ‘ सत्यतेने ‘ जगत राहू शकते !

दुर्दैवाचा भाग असा आहे की ‘ मत ‘ हेच स्वातंत्र्य आणि तेच सत्य या खात्रीत सगळ्यांनाच जगायचे आहे. त्यामुळे, आपापली विद्वत्ता पाजळत राहायला हा आणखी एक विषय, एवढेच याचे आपल्या जगण्यात स्थान राहील !

कशाचाही दोष दुसऱ्याला द्यायचा आणि खापर दुसऱ्यावर फोडायचे, यात आपण प्रचंड माहीर आहोतच !

--- 000 ---

' वेटिंग फॉर गोदो ' मध्ये गोदोची वाट पाहणे म्हणजे मानवी समस्येच्या बौद्धिक निराकरणाची वाट पाहणे !

खरंतर, मनोजच्या (पाठक) आग्रहामुळेच मी, चंप्र देशपांडे आणि आमचे मार्गदर्शक डॉ. शिरीष चिंधडे... याशिवाय मनोजचे अजून दोन मित्र पुण्यात शारदा हॉटेल एरंडवणा या ठिकाणी दोन एक दिवसांपूर्वी भेटलो.

स्वतःच्या गाडीवरून पुण्यात कुठे बाहेर जाणे हा भयंकर प्रकार आहे. अलीकडे ही गोष्ट खूपच जाणवण्यासारखी झाली आहे. पूर्वी असे नव्हते. याची मुख्य दोनतीन कारणे आहेत/असावीत. एक तर वाढत चाललेले वय-- आणि अलिकडे पुण्यात रस्त्यावरची ट्राफिक इतकी असते की, तुम्हाला घाबरत घाबरतच हळूहळू जावे लागते. पण तरीही काय होईल हे काही सांगता येत नाही. काय म्हणतात ते "कफन बांधके" ☺☺ असा हा प्रकार असतो.

अजून एक कारण म्हणजे, पुण्यातील प्रत्येक रस्त्याचा चेहरा रोजच बदलत असतो. म्हणजे आपण नेमके कुठे आहोत हे समजत नाही. यामुळे मी कुठल्यातरी एका मित्राला बोलवूनच त्याच्याबरोबर बाहेर जातो. किंवा एखाद्या विद्यार्थ्याला हाक मारतो. येतात बिचारे बरोबर. मग नाटक बघणे असो किंवा कुठला कार्यक्रम असो... मग ते व्यवस्थित घरी सोडून वगैरे जातात. किंवा मग उत्तम मार्ग म्हणजे ओला किंवा उबर गाडी.

पण यावेळी इतक्या गडबडीत मनोजचा मेसेज आला की, ताबडतोब निघावे लागले (म्हणजे तसे माझे जाणे काही ठरतच नव्हते. काही काम देखील सुरू आहे. कामात व्यस्तही आहे त्यामुळे). आणि यावेळी मनोजचा आग्रहही खूप इंटेन्सिव्ह होता. मुख्य म्हणजे त्यालाच आम्हाला भेटायचे होते.

पोचलो व्यवस्थित. आणि बऱ्याच गप्पा झाल्या. कला, समाज, कविता, साहित्य--- इतरही अनेक खास असे विनोदी किस्से एकमेकांना आम्ही सांगितले (यामध्ये मनोजचाच मोठा सहभाग होता).

अगदी घरगुती स्वरूपाचे जेवण झाले. चंप्रंना मी माझी पुस्तके दिली. एक इंग्रजी अनुवादाचे पुस्तक पण दिले. पण ते म्हणाले नको. मी सामाजिक, राजकीय वगैरे असले काही आता वाचत नाही. कवितासंग्रह मात्र त्यांनी आवर्जून घेतला. हा तुमचा कवितासंग्रह आहे. मी नक्की वाचतो.

यावेळी शिरीष चिंधडे यांचे पुस्तक मनोजने ('पूर्वप्रभा आणि पश्चिम आभा', वर्णमुद्रा प्रकाशन) मला भेट म्हणून दिले.

माझ्या संग्रहावर चंप्र काही लिहितील वगैरे असे काही वाटले नव्हते. पण आज फेसबुकवर चक्क त्यांनी केलेली काही निरीक्षणे मला वाचायला मिळाली. मलाच माझ्या-- या काही ज्याला कविता म्हणता येतील त्यावर त्यांनी जे सांगितले आहे ते-- वाचून आनंद तर झालाच-- पण माझ्याच कवितांचा हा वेगळा अर्थही समजला.

चंप्र म्हणतात ते खरच आहे. वाचकांना अभिप्रेत असणारा, समजणारा-- वेगवेगळ्या अर्थांचे आकलन, त्याचे विश्लेषण हे अधिक महत्त्वाचे असते. त्यांनी माझ्या कवितांवर लिहिलेली काही निरीक्षणे मी इथे शेअर करतो आहे.

-दीपक बोरगावे

०-०-०

भवताल आणि भयताल ( कवितासंग्रह )

कवी ० दीपक बोरगावे, प्र ० सम्यक विद्रोही प्रबोधन संस्था, कोल्हापूर.

-चंप्र देशपांडे

१९७६ ते ७९ या काळात मी कोल्हापुरात होतो. तेव्हा आम्ही ' प्रत्यय ' या समूहाची स्थापना केली होती. त्यात अनेक लेखक, कवी, चित्रकार, दिग्दर्शक, अभिनेते वगैरे होते. वाचने व चर्चा खूप चालत. त्यात आताचे डॉ. दीपक बोरगावेही सामील असत. नंतर आमचे भौतिक, मानसिक मार्ग वेगळे होत गेले, तो भाग वेगळा. इथे फेसबुकवर बोरगावे सरांचे दर्शन नेहमीच होत होते, पण, अलीकडेच त्यांची प्रत्यक्ष भेट झाली. त्या वेळी त्यांच्याकडून मला हा सदर कवितासंग्रह सप्रेम भेट मिळाला. तो वाचून झाल्यावर मित्रत्वाच्या नात्याने हा अभिप्राय लिहीत आहे.

या संग्रहातल्या कविता प्रामुख्याने शोषित-वंचितांची दु:खे व्यक्त करणे आणि विशेषत: समतेच्या चळवळींतल्या महात्म्यांचे मोठेपण व्यक्त करणे, अशा आहेत. या सर्व कवितांच्या मुळाशी सामाजिक समतेची तीव्र इच्छा असल्याचे प्रभावीपणे जाणवते. कला वा कविता ही परिवर्तनाचे साधन असायला हवी ही एक प्रगाढ निष्ठा यामागे आहे. विषमतेची व्यवस्था बदलण्याची आच आहे. या कविता त्यांचे जीवितकार्य चोखपणे करत राहतील यात शंका नाही.

माझे कलेबाबतचे आकलन वेगळे असते. कला हे साधन नसून साध्य आहे, असे मला वाटते. कला ही स्वत:च्या असण्यातच परिपूर्ण म्हणजे समतायुक्तच असणे, हे मला महत्त्वाचे वाटते. विशेष म्हणजे या दृष्टीनेही ' पोचतील ' अशा काही कविता या संग्रहात आहेत. त्यांतल्या तीन कवितांबद्दल थोडक्यात बोलायचा विचार आहे.

( एक ) इथं काहीतरी

इथं काहीतरी
जळल्याचा वास येतोय
गादीवर सिगारेटचं थोटकं तर टाकलं नाहीस ना?
खिडकीही उघडीच आहे
बाहेर काही जळत असेल का ?
कुठून येतोय हा वास

काही समजत नाही
कुठेतरी नक्कीच जळत असलं पाहिजे
जरा खाली जाऊन पाहतोस का?
शेजाऱ्यांनी धूर केला की काय?
काय वैताग आहे!
ऑफिसातही हाच वास होता
काही लागण तर नसावी ?
काहीही होऊ शकते हो !
धुराचाही नवा संसर्ग असू शकतो ?
काही कळत नाही
पोरांना खालीच घेऊन गेलेलं बरं
ती बिचारी कारण नसता आजारी पडतील
नक्की समजेल का उद्या ?
काही भरोसा नाही कशाचाच!
इथं काहीतरी
जळल्याचा वास येतोय
( पान ४९ ).

ही कविता नुसतीच धुराच्या वा गटाराच्या वा उंदीर मेल्याच्या वासाबद्दल आहे, असे मला वाटत नाही. हा एका व्यापक अवकाशातला, मानवी जगणेच धोक्यात आणणारा वास आहे. बाहेर त्याचा उगम सापडत नाहीय. कारण तो वास सडत चाललेल्या मनाचा आहे. धर्म, जात, भाषा वा विचारसरणी यांच्याशी होणाऱ्या समरूपतेच्या घट्ट स्थितिशीलतेतून तयार होणाऱ्या डबक्याचा हा वास आहे. हे मानसिक जळत राहणे, नष्ट होत राहणे आहे. हे भान देणे हेच इथे कवितेचे परिपूर्ण काम आहे.

( दोन ) वर्तुळे
एक वर्तुळ अगदी वर, त्यात अनेक वर्तुळे
आजूबाजूलाही अनेक त्याच्यातूनच फुटलेली
शिवाय, प्रत्येकांत लपलेली अनेक छोटी वर्तुळे
हीही उपस्थित अनेक मोठ्या वर्तुळांत
एकमेकांना छेदून बाहेर पडू पाहणारी
केंद्रापासून
पण परिघावरच लोंबकळणारी
ह्या छोट्या वर्तुळांखाली

त्यांच्या मधोमध अजून अनेक वर्तुळे
फिरतात अगदी वरच्या वर्तुळात
म्हणजे तसा प्रयत्न असावा त्यांचा
प्रत्येकांची केंद्रे ही वेगवेगळी
तीही फिरतात एका तिसऱ्याच केंद्रातून
वरचे वर्तुळ हे वरच जाणार
आणि खाली सरकणारे केंद्र
हे वर कधी जाईल, हे सांगता येणार नाही
वर्तुळांच्या ह्या हालचाली
अगदी हैराण करणाऱ्या
केंद्रांची वर्तुळे बनत
इतिहासाची चाके वर्तमानात बदलतात
एक वर्तुळ अगदी वर त्यात बरीच वर्तुळे
आजूबाजूलाही अनेक त्याच्यातूनच फुटलेली
( पान ८० ).

ही कविता, समूह आणि व्यक्ती यांच्या व्यामिश्र रचनांची अनाकलनीय अस्तित्वे व्यक्त करते. केंद्रे हलतात, बदलतात – वर्तुळांच्या हालचाली हैराण करतात. हे वेगवेगळ्या प्रकारे पण एकमेकांवर परिणाम करत चालणारे मानवी जगणे आहे. ' इतिहासाची चाके वर्तमानात बदलतात ' ही यातली मर्म-ओळ आहे. इतिहासाच्या प्रभावाखाली वर्तमान आहे. तसेच, वर्तमानाच्या सोयीने भूतकाळही बदलतो आहे. काळालाही जणू वस्तुनिष्ठ परिमाण राहिलेले नाही. आपापल्या मन:स्थितीप्रमाणे भूतकाळ पाहिला व सादर केला जातो आहे.

( तीन ) आपण हा प्रश्न उद्या सोडवू
पाच पन्नासची लोकलाय
चल मी निघतो
जाशील रे माहिताय अजून चिकार वेळाय
मी काय म्हणतोय
प्रत्येक व्यवस्थेत कलेचे एक मूल्य असतंच
भांडवली व्यवस्थेचाही इथे अपवाद करता येणार नाही
वर्गीय संघर्षाचा प्रश्न नाही रे हा
जातीचे काय करणार?
हा तिढा कायम आहे
कलेच्या माध्यमातून हे सोडवता येईल रे थोडंस्स

ते तू कर
बघ काय होतंय ते?
जातीचं काय झालंय माहिताय
आपल्या देशात तरी किमान
ती आपल्याच शरिराला चामड्यासारखी चिकटलीय
ती इतकी घट्ट आहे की
तिला काढून टाकणं म्हणजे
कठीणच
अरे ही अडक आपणांसच काढाय पाहिजेल
ते खराय रे; पण काय झालंय माहिताय?
चल, मला निघाय हवं माझी लोकल चुकेल
आपण हा प्रश्न उद्या सोडवू
( पान ११३ ).

ही काहीशी लाईट व उपरोधिक टोनमधली कविता आहे. कलेची मूल्यात्मकता आणि प्रत्यक्ष जगणे यांतले अंतर इथे उघडे पाडले जातेय. इथे जात जणू घट्टपणे शरीराची चामडीच बनून चिकटलेली आहे ! या प्रश्नावर ना निराकरण आहे ना तसे काही सापडण्याची आशा आहे. हा मानवी मनाच्या समरूपतेचा प्रश्न आहे. जातीशी समरूप असण्यात सुरक्षित वाटण्याची ही समस्या आहे. याची का गरज पडावी ? कोणत्या असुरक्षिततेमुळे मन हे जात, धर्म, भाषा वा विचारसरणी यांना बिलगून राहू इच्छिते ? – हा प्रश्न नुसताच सामाजिक म्हणून नाही पाहता येत. मग करावे काय ? तेही नाही कळत ! त्यामुळे या प्रश्नापासून पळच काढण्याची एक उथळ युक्ती इथे कामाला येते आहे ! निर्भीडपणे हे इथे व्यक्त झालेले आहे.

एकदा तुम्ही कविता वाचकाकडे सोपवलीत की, त्या कवितेशी प्रतारणा न करता का असे ना, पण ती वाचण्याचे आणि समजून घेण्याचे स्वातंत्र्य वाचकाला असते ! कवीचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य जितके महत्त्वाचे असते तितकेच वाचकाचे वाचनस्वातंत्र्यही महत्त्वाचे असते ! – असे काही या निमित्ताने म्हणावेसे वाटते !

--- ००० ---

ज्या पुस्तकावर पोह्यांचे वा चिवड्याचे डाग आहेत ते वाचून झाले आहे असे समजावे !

दुष्ट माणूस सारखा भुवई उडवत बोलतो असे दाखवतात, याला काही शास्त्रीय कारण असेल का ?

हा उतारा ( दोन्ही अर्थांनी ) ग्रेटच ग्रेट आहे ! प्रत्येक साहित्य संमेलनाच्या प्रवेशद्वारावर हा ढळढळीतपणे लावला जायला हवा ! मराठीत डॉक्टरेट करणाऱ्या प्रत्येकाला हा उतारा पाठ करणे बंधनकारक असावे !

Rahul Pungaliya is with Sanjeev Khandekar and 6 others

.

मराठी साहित्यिक सांस्कृतिक विश्वाची तोंड ओळख

मराठी सुसंस्कृत साहित्यिक धाटणीचे लोक सनातनी पुरोगामी म्हणवता येतील .यांच्या सनातनत्वाचा पार्श्वभूमीवर हिंदुत्ववादी देखील प्रायोगिक पुरोगामी ठरतील! धर्माची काडीची कल्पना नसल्यामुळे हे स्वतःला निधर्मी समजतात. विज्ञानाच्या मर्यादा आणि परिणाम देखील समजत नसल्यामुळे हे विज्ञानवादी ,अंधश्रद्धा विरोधी असतात. लब्धप्रतिष्ठित वरिष्ठ, कनिष्ठ, मध्यमवर्गातले असल्याने व्यवस्था अबाधित राहण्यात यांचे हित आहे. त्यामुळे त्यांचा क्रांतिकारी मार्क्सवादाला विरोध आहे. तो विरोध मार्क्सवादाला नसून हुकूमशाहीला आहे, असा पळपुटा युक्तिवाद ते नेहमीच करत आले आहेत.

साहित्य आणि कलांचे पूर्ण अज्ञान. त्यातील क्रांतिकारी शक्यता जितक्या बोथट करता येतील,वगळता येतील असा दुष्ट हेतू असल्यामुळे. हे आपल्याला परवडेल अशी मध्यमवर्गीय स्वच्छंदतावादी माफक विद्रोही मानवतावादी सर्व समावेशक दृष्टिकोन असलेल्या कलेला जोपासतात. अर्थातच ती कला नुसतीच सुमार नसते, तर ती तेलकट, गुळगुळीत आंजारणारी गोंजारणारी आणि आपल्या योग्यतेची आपल्याला खात्री देणारी असते. थोडक्यात ती नारसीस्टीक आत्मलुब्ध कला असते .

शहरी मध्यमवर्गाची ही कला आणि संस्कृती, समाजातील सर्व स्तरांना वेचक प्रतिनिधित्व देत असते. शहरी मध्यमवर्गात आता सर्वच जाती-जमाती स्त्री पुरुष यांचा भरणा असल्यामुळे सगळ्यांच्याच सोयीचे हे सांस्कृतिक अवकाश आहे. एकमेकांचे कौतुक करत, सततचा उत्सवी कोडगेपणा ही यांची भावनिक ओळख आहे. यांची 'विद्रोही' लोकशाही मूल्यांची  मागणी ही देखील गंमतीजमतीची आणि जाता जाता कॅज्युअली करायची बाब आहे. बाकी गुंतवणुकी, फार्म हाऊस जीवनशैली या गोष्टींमध्ये यांच्यात आणि यांच्या कट्टर राजकीय विरोधकांमध्ये काडीचा फरक नाही. त्यामुळे हिंदुत्ववादी जसे दलित विचारवंतांना सामावून घेतात ,सांभाळून घेतात तसेच पुरोगामींना देखील सांभाळून घेतात. त्यांच्यातील विरोध लटकाच राहतो. थोड्या थोड्या वर्षांनी काही व्यक्तींचे स्तोम माजवणे बडेजाव करणे, थोडक्यात हिंदी सिनेमामधले जसे हिरोगिरीचे कल्चर आहे, त्याच पद्धतीचे हे साहित्यिक सांस्कृतिक हिरोंच्या अवतीभोवती असलेल्यांचे कोंडाळे असते.कधी पुल कधी नेमाडे कधी अवचट तर कधी कमल देसाई आणि ढसाळ आणि असे अनेक या यादीत समावेश करता येण्याजोगे

आहेत. या विश्वाची सांस्कृतिक सहनशीलता शून्य आहे. वेगवेगळ्या प्रकारची सेंसरशिप ,यामध्ये सेल्फ सेंसरशिप देखील इथे कार्यरत असते. हिंदुत्ववाद्यांच्या हुकूमशाही बद्दल बोलण्याचा नैतिक अधिकार यांना नाही. इथे चांगली अस्सल कला फळणे फुलणे जवळजवळ अशक्य आहे. ---- राहुल पुंगलिया.

मराठीच्या प्राध्यापकाची कधी टेस्ट घ्यावीशी वाटली तर त्याला एकच प्रश्न विचारा -- केशवसुतांच्या वडिलांचे नाव काय ?

समकालीनता

मराठी साहित्यात वास्तववाद म्हणजे अजूनही सर्वेसर्वा आहे. काय म्हणावा वास्तववादाचा अर्थ ? बदलत्या भौतिक परिस्थितीवर आधारित असणे ? जुन्या काळातले अनुभव असले तरीही ते ‘ दिसणाऱ्या ‘ माहितीरूप निवेदनातून येणे, असेही एक असेल. पण, मुख्यत: वास्तव हे, जुने असो वा नवे, ते लेखकाच्या प्रतिक्रियेसहच येते. हे लक्षात घेतले तर अमुक एक वास्तव म्हणजे वास्तव, असे म्हणता येत नाही. आज लिहिणाऱ्या प्रत्येक लेखकाचे वास्तव वेगळे असते. आज लिहिणाऱ्या दोन चांगल्या लेखकांचे उदाहरण घेऊ. प्रणव सखदेव आणि रवींद्र पांढरे, हे लेखक बघा. त्यांच्या लेखनाचे अनुभवद्रव्य म्हणा की दिसणारी माहिती म्हणा, ही खूपच वेगळी आहे. याच पद्धतीने प्रत्येक लेखकाचे वास्तव वेगळे असते. हे लक्षात न घेता साहित्याची समकालीनता ही संकल्पना काहींना मूल्यात्मक वाटते, असे दिसून येते. एका ढोबळ अर्थाने प्रणव सखदेवच्या साहित्यात समजा समकालीनता आहे, असे आपण म्हटले, तर, जेव्हा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावाचा काळ येईल तेव्हा ते साहित्य कालबाह्य समजावे लागेल का ? हा एक प्रश्न तर आहेच पण काही अधिकच हेकट आणि संकुचित कल्पनाही दिसतात. समकालीन वास्तव हे लेखकाच्या मतासह, भूमिकेसह यायला हवे, ही ती कल्पना. म्हणजे आजच्या लेखनात, उदाहरणार्थ, मोदींच्या हुकूमशाहीबाबत राग वा विरोधकांच्या पोटदुखीबाबत कीव व्यक्त व्हायला हवी. इथे, एक सुचवायचे आहे की या सर्व कल्पना संकुचित, साहित्याला रटाळ करणाऱ्या आहेत.

जयंत पवार हे माझे मित्र होते, पण, त्यांचे विचार मला पटत होते, असे नव्हे. त्यांनी असा एक प्रश्न मांडला होता की वास्तव आता इतक्या वेगाने बदलते आहे की ते लेखकाला समजून त्याच्या लेखनातून व्यक्त होईपर्यंत जुने होते आहे ! मुळात, आधी वास्तव समजून घ्यायचे आणि मग ते आपल्या प्रभावासह मांडायचे – ही साहित्याची कल्पनाच खोटी आहे. प्रत्येकाचे वास्तव वेगळे असते याचा अर्थच वास्तव समजणे असे काही सत्य अस्तित्वात असू शकत नाही. आणि साहित्य म्हणजे स्वमतयुक्त वास्तवाची मांडणी किंवा त्या त्या काळाचे डॉक्युमेंटेशन वा दस्तावेजीकरण हे पटण्यासारखे नाही. दस्तावेजीकरण आता इतर अनेक मार्गांनी होत असते, ती जबाबदारी आता साहित्याने झटकायला हरकत नाही.

आपण वास्तव समजून घेण्यासाठी वा ते नोंदण्यासाठी साहित्यनिर्मिती करतो वा साहित्याच्या संपर्कात येतो ही समजूतच मुळात फार थिटी आहे. ऐतिहासिक वा पौराणिक कलाकृती, शेक्सपियरची नाटके, कोणत्याही इतर प्रांतांतली वा देशांतली नाटके आपण का वाचतो वा पाहतो ? त्यात वास्तवनिरपेक्ष आणि लेखक-निरपेक्ष अशी मानवी जगण्याच्या भानाची प्रक्रिया असते म्हणून. आणि हे जगातल्या सर्वच मौल्यवान साहित्याबाबर खरे आहे. वास्तव कोणते आहे, अनुभव कोणता आहे याला महत्त्व देण्याच्या बालिशपणामुळेच काहीजण असे समजतात की निव्वळ अनुभव धारावीतल्या जगण्याचा असल्यामुळेच काही साहित्य एखाद्या मध्यमवर्गीय अनुभवक्षेत्र असणाऱ्या साहित्याहून महत्त्वाचे असते.

माझे एक नाटक सत्तरच्या दशकातल्या हिंदी सिनेमाच्या खोट्या, रचित डोलाऱ्यातून घडत जाते. एकजण म्हणाले की आता ते आजच्या काळाशी मॅच होत नाही तर दुसरे एकजण म्हणाले की हे कधीही ‘ आजचे ‘ असणारे नाटक आहे. एक-दोन नाटकांत युनियन-मॅनेजमेंट संघर्षाचे वातावरण आहे – एकजण म्हणाले की आता कुठे उरलाय

युनियनबाजीचा काळ ? त्याच्याहून किरकोळ उदाहरण म्हणजे माझ्या एका नाटकातल्या काळात फक्त लँड लाइन फोन होते, मोबाइल नव्हते ! म्हणजे गेले ते नाटक रद्दीत ? असे होत नसते. कलेचा प्रमुख सर्जक प्रवाह म्हणजे काय, हा प्रश्न स्वत:ला विचारला पाहिजे.

--- 000 ---

प्रकाश बाळ जोशी

हे प्रख्यात चित्रकार इथे आपले एफबी मित्र आहेत. इथे ते फारसे कृतिशील नसले तरी ते अनेक पोस्ट वाचत असतात आणि त्यांच्याही विविध ठिकाणांच्या चित्र-प्रदर्शनांची माहिती देत असतात. भारतातील काही प्रमुख शहरांसह अनेक इतर देशांतही त्यांची प्रदर्शने होत असतात हे आपण जाणतोच. जोशींची माझी ओळख माझा जुना मित्र अनिल किणिकर याच्यामुळे झाली. त्यानंतर जोशींनी माझे बरेच साहित्य वाचले आणि मला सुमारे 25 चित्रे माझ्या संकेतस्थळासाठी काढून पाठवली. ती मी अर्थातच माझ्या नाटकांसाठी वापरलेली आहेत. जोशींच्या व्यक्तिमत्वाची प्रथमदर्शनी जाणवणारी महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणजे शांत, परिपक्व स्वभाव, सौम्य, शांत आणि अनाक्रमक बोलणे आणि बहुश्रुतता.

काल बऱ्याच वर्षांनी त्यांची भेट झाली. पुण्यातल्या त्यांच्या स्टुडिओत मी गेलो होतो. त्यांच्याशी सुमारे दोन तास गप्पा झाल्या. त्यांची अनेक चित्रे पाहिली. अक्षरक्ष: खजिना आहे. नुसती या स्टुडिओत असलेली चित्रे म्हटली तरी प्रचंड काम आहे. ते टाइम्स ऑफ इंडियामध्ये नोकरीला होते. त्यांनी इंग्रजीतून आणि मराठीतून बरेच लेखन केलेले आहे. टीव्हीवरच्या अनेक राजकीय चर्चांमधून त्यांचे विचार व्यक्त करताना आपण त्यांना पाहिलेले आहे. नंतर बरेचसे व्याप कमी करून त्यांनी पूर्ण आयुष्य चित्रकलेला वाहून घेतलेले आहे. त्यांची चित्रे पाहणे म्हणजे एक विशेष वेगळा अनुभव आहे.

लहानपणी, पोहायला येत नसूनही, इतरांचे बघून त्यांनी नदीत उडी मारली होती, नाकातोंडात पाणी जाणे आणि मृत्यूच्या भोज्याला स्पर्श करणे घडले होते. अर्थातच कुणितरी त्यांना वाचवले होते. तेव्हापासून नदी या प्रकाराने जणू त्यांचे मन पछाडले गेले होते. तो प्रभाव अजूनही त्यांच्या जगण्यात आहे, असे ते म्हणतात. नदीची विविध रूपे आणि रंग हे अनेकदा त्यांचे विषय असतात. हुसेनांची वादग्रस्त ‘ सरस्वती ‘ आपल्याला माहीत आहे. जोश्यांचेही त्याच नावाचे एक चित्र आहे, पण ते आहे, लुप्त झालेल्या सरस्वती नदीचे. नदीत बुडून आपण नष्ट होणे आणि स्वत: नदीचेच नष्ट होणे याचे हे एक विचित्र भावमिश्रण असावे. नदीचा दृश्य गडद निळा, त्यातल्या छटांसह असणारा शांत प्रवाहीपाणा आणि तिच्या आतला, खोलातला भाव-लाव्हा यांचे हे एक तटस्थ चित्र आहे.

माहीत असल्यामुळे हे काही तपशील दिले असले तरी ही चित्रे पाहण्यासाठी चित्रकाराची माहिती असायची गरज नाही. त्यांची अनेक चित्रे पाहिल्यावर एक बाब प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे वरून वा खालून असणारे अर्धगोल. अनेक प्रकारे, अनेक रंगांत हे येतात. क्षितिजाचा प्रचंड विस्तार आणि अंतर्मनाचे एक प्रतिविश्व यांचा समतोल दर्शवणारी ही चित्रे वाटतात. सर्वच चित्रे अमूर्त शैलीतली आहेत. अमुक म्हणजे तमुक असे ओळखण्याचा इथे प्रश्न नाही. विचारक्रिया ही मर्यादित असते, तिचा त्याग केल्यावरच जगण्यातली मूलतत्त्वे जाणवतात, असे जोशी

म्हणतात. त्यांच्या सर्वच चित्रांत रंगलेपनाची आणि रंगांच्या विविध छटांच्या लीलेची मास्टरी जाणवते. आधुनिक चित्रकला म्हणजे संघर्ष, हिंसा, गोंधळ, विदीर्णता, विनाश अशा कल्पना समोर येतात. ही चित्रे मुळीच तशी नाहीत. एका शांत तटस्थतेने स्पर्शिलेली अशी ही चित्रे आहेत. काही चित्रांची नावे अशी आहेत ( मराठी भाषांतर -- ) गोठलेल्या प्रवाहाखालचे जगणे, अनंत, वर्षावानंतरची शांतता, समुद्रगर्भ, अदृश्य होणारी नदी, आतले उद्रेक, अप्राप्य, अमाप आशा, मरण-स्वप्न, सर्वस्व गमावणे, नदीची पूजा, हिरवा मेळ, स्वप्नपक्षी उडताना, वितळणे, वगैरे. भाषेत वर्णन करत बसायची ही चित्रे नाहीत. आपले पूर्वग्रह आणि विचार-सवयी त्यागून ही चित्रे पाहिल्यास ती सखोल चिंतने ( meditations ) ठरतील.

-- 000 ---

मराठीतील प्रतिभावंत लेखक चं प्र देशपांडे यांनी माझ्या स्टुडिओला भेट देऊन पेंटिंगचा अस्वाद घेतला . दोन तास मनमोकळ्या गप्पा झाल्या. त्यांच्या सोबत श्रेया देशपांडे होती. त्यांनी फेसबुक वरील त्यांच्या वॉलवर खालील टिपण दिले आहे . अमुर्त चित्रकले विषयी त्यांची निरीक्षणे आणि विचार ऐकण्याचा लाभ मिळाला . धन्यवाद फोटो : Kishor Salvi

" Hell is other people. " म्हणजे, " नरक म्हणजे इतर माणसे " -- हे सार्त्रच्या ' नो एक्जिट ' या नाटकातल्या एका पात्राचे वाक्य आहे. याबद्दल विचारले असता सार्त्र म्हणतो, " But that's only that side of the coin. The other side, which no one seems to mention, is also "Heaven is each other." … Hell is separateness, uncommunicability, self-centeredness, lust for power, for riches, for fame. Heaven, on the other hand, is very simple—and very hard: caring about your fellow beings. " थोडक्यात, अलगता हाच आहे प्रश्न.

या संदर्भात, जे. कृष्णमूर्तींचे हे वाक्य बघा -- " The other is you. " म्हणजे, दुसरा वा इतर माणूस तुम्हीच आहात. ( ' A World In Crisis ' पान 2. )

दोघेही कदाचित एकच सत्य सांगत असावेत.

--- 000 ---

तिला वड पावू नये म्हणून, मनातल्या मनात, तो पिंपळावरच्या मुंजाची करुणा भाकतो !

आपण आनंदात आहोत असे सगळ्याचजणी दाखवताहेत या विचाराने सगळ्याच जातात पूजेला !

राम पटवर्धन

साक्षेपी, विचक्षण, विदग्ध, बहुश्रुत असे सर्व एखाद्या अत्युत्तम संपादकाला शोभतील असे शब्द लावावेत असे संपादक होते राम पटवर्धन. ‘ सत्यकथा ‘ या मराठीत इतिहास घडवणाऱ्या मासिकाचे संपादक. सत्यकथेकडे  येणारे साहित्य वाचून त्यातले नेमके निवडून या मासिकातून सादर करणे हे साधे काम नव्हते. सत्यकथेबाबत काहीही असू देत वाद-प्रवाद, नारायण सुर्वे यांची, ‘ माझे विद्यापीठ ‘, आरती प्रभू आणि दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या अनेक कविता, गुरुनाथ धुरी यांची ‘ वाघ ‘ ही कविता, आणि मराठीतल्या महत्त्वाच्या ठरणाऱ्या अनेक कथा, एकांकिका, ललित लेख आणि समीक्षा लेख, आणि सौन्दर्यशास्त्रावरचेही काही मौल्यवान लेख, हे सर्व सत्यकथेतून आलेले होते, हे विसरता येणार नाही. न स्वीकारार्ह वाटल्यास, करंदीकर, कुसुमाग्रज यांचे लेखनही ‘ साभार परत ‘ देणारे मासिक असा त्या मासिकाचा दबदबा होता. त्या काळात, आपल्या चार ओळी तरी सत्यकथेत याव्यात अशी अनेक लेखक-कवींची महत्त्वाकांक्षाच असे.

मी एक नवखा कॉलेज विद्यार्थी असताना माझी पटवर्धनांशी ओळख झाली होती. आमचे सर प्रा. शंकर वैद्य यांच्या घरी, तेंडुलकरांच्या ‘ एक हट्टी मुलगी ‘ या नाटकाचे वाचन होते, त्या प्रसंगी सरांनी मलाही यायला सांगितले होते. तिथेच राम पटवर्धन, शांता शेळके आणि चिं. त्र्यं. खानोलकर यांच्याशी माझ्या ओळखी झाल्या. माझ्या कविता पटवर्धनांकडे आणि एकांकिका तेंडुलकरांकडे वैद्य सरांनीच वाचायला दिल्या होत्या. त्यातूनच पुढे, ‘ झुंजुन गेल्या सरी ‘ ही माझी कविता सत्यकथेत आली. नंतर काही एकांकिकाही आल्या. त्या काळात अनेकदा खानोलकरांसह माझे सत्यकथेच्या ऑफिसात जाणे-येणे होई. खानोलकर आणि मी दोघेही मालाडकरच असल्याने ते जमून जाई. मराठीतल्या या एवढ्या प्रतिष्ठित मासिकाचे कार्यालय साधे आणि लहान म्हणावे असेच होते. तरीही तिथे कधी कधी करंदीकर, पाडगावकर, खानोलकर अशी मंडळी जमत. अशा एकदोन मैफलींचे भाग्य मलाही लाभले होते. राम पटवर्धनांबरोबर होणारे या लोकांचे संवाद खास म्हणावेत असे असत. हा सगळा संपर्क आणि अनेक लेखक-कवींशी होणारा साधक-बाधक विचारांचा पत्रव्यवहार  संभाळून पटवर्धन सत्यकथेचे दर्जेदार अंक घडवत असत. परिपूर्ण मुद्रितशोधन, उत्तम मांडणी आणि नावीन्यपूर्ण मुखपृष्ठे ही सत्यकथेची वैशिष्ट्ये होती. सत्यकथेचे दिवाळी अंक तर खास असत. त्यांनी काढलेला खानोलकरांच्या ‘ एक शून्य बाजीराव ‘ या नाटकावरचा विशेषांक तर सलाम ठोकावा असा होता.

पुढे मी नोकरीनिमित्त मुंबई सोडल्यानंतर माझे पटवर्धनांना भेटणे फारसे घडले नाही. पण एकदा, सांगली आकाशवाणी केंद्रात माझ्या एका मुलाखतीसाठी मी  गेलेलो असताना मला पटवर्धनांचा ठाण्यातला पत्ता तिथे एकाकडून मिळाला. त्या पत्त्यावर जाऊन मी त्यांची भेट घेतली होती. अत्यंत साधी राहणी आणि तीच जुनी आपुलकी !

माझ्या काही कविता, एकांकिका वाचून आलेली पटवर्धनांची पत्रे मी जपून ठेवली होती. अत्यंत अपवादात्मक अशी ही व्यक्ती होती.

काल त्यांचा स्मृतिदिन होता. 2014 साली त्यांचे निधन झाले होते. शेवटी त्यांचे आयुष्य ते जगाच्या एका कोपऱ्यात व्यतीत करत होते. त्यांच्याबद्दल अनेकांना अतीव आदर होता आणि राहील.

त्यांच्या स्मृतीस मन:पूर्वक सादर अभिवादन !

--- 000 ---

रोमन लिपीत मराठी लिहिणाऱ्यांपेक्षा देवनागरीत इंग्लिश लिहिणारे परवडले !

आम्हा निवृत्त बँक कर्मचाऱ्यांचे त्रैवार्षिक अधिवेशन --

या निमित्ताने जुने सहकारी भेटतात हा एक आनंद आणि अमुक अमुक अजून आहेत हा दुसरा अधिकच मोठा आनंद !

Girish Rangnekar added 8 new photos to the album: Wyakt-Awyakt by Dipak Rangnekar and 14 others

.

.

व्यक्त- अव्यक्त

सध्याचा हा फेसबुक आणि व्हाट्सअपचा जमाना आहे. आपल्या मोबाईलमध्ये विविध विषयाच्या पोस्ट्स सतत येऊन पडत असतात. स्वतःचेही अनुभव कधी आपण पोस्ट करत असतो. व्यक्त होणं आता वारेमाप वाढलेलं आहे. सोशल मीडियामुळे एकंदर भानही वाढलेलं आहे. पण पोस्ट्स हे प्रकरण वेगळं आणि पुस्तकं-मासिकं वेगळं! जसं एखादी पोस्ट लिहिणं  वेगळं, सदर लिहिणं त्याहून वेगळं आणि  स्वतःचे मासिक सुरु करून ते वर्षभर चालवणे हे तर त्याहूनही वेगळेच ! त्याचा हा अनुभव.

सतरा वर्षांपूर्वी, सन २००० साली आम्ही 'व्यक्त-अव्यक्त' मासिक सुरु केले. आम्ही म्हणजे मी, मकरंद गोवर्धन आणि प्रकाश कुलकर्णी ह्या तिघांनी. मासिक सुरु करण्याचा उद्देश आम्ही पहिल्या अंकात स्पष्ट केला. त्याचा सारांश असा - 'आपापल्या नोकरी-व्यवसायाचं रुटीन, थोडासा विश्राम काळ म्हणजे टीव्ही पाहणे  ह्या कारणाने वाचनाचा वेळ जवळ जवळ खलास होत चालला आहे. ह्यामुळे बरंचसं व्यक्त होणारं समोर येणं राहून जातंय. मग व्यक्त झालेच नाहीत असे विचार, प्रश्न नुसतेच साचून मग विसरले जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे महत्वाचं असं काही 'व्यक्त' होणारं समोर आणावं आणि 'अव्यक्त' असलेलंही 'व्यक्तात' आणावं,  कमीत कमी वेळात वास्तवाचं भान द्यावं, रोजचं जगणं आहे त्या परिस्थितीतही अधिकाधिक चांगलं आणि सर्जनशील व्हावं हा मासिकाचा उद्देश आहे'. तर झालं असं कि मी 'सकाळ'ला असताना आपलं स्वतःचं काहीतरी प्रकाशन असावं, एक्सप्रेशन असावं असं मला फार वाटू लागलं. मग मीच एकट्याने माझ्या खेरीज बाहेर कोणालाही माहित नसताना नवे मासिक सुरु करण्यासाठी लागणारे दिल्लीचे RNI रजिस्ट्रेशन पूर्ण केले. त्यांना १० नावे सुचवायची असत. ते सर्व सोपस्कार पार पडून दिल्लीहून दहा नावांपैकीचे ' व्यक्त-अव्यक्त' हे निवड झालेले नाव आणि RNI नंबर मला मिळाला आणि मग मी मित्रांना गाठलं. त्यांना 'हकीकत' सांगिल्यावर तेही चाट पडले, एक्साईट झाले. अजून काय हवे होते ? मग काम सुरु!

मकरंदच्याच ऑफिसमध्ये बसून मिटिंगा सुरु झाल्या. मासिकात लिहिणार कोण आणि काय, त्याची पाने किती असावीत, कुठे छापायचे, किंमत किती ठेवायची, विकणार कोण आणि कोणाला वगरे पासून सुरुवात होती. हळू हळू उत्तरांपाशी पोहोचत गेलो. ऑन पेपर मालक माझा सख्खा भाऊ डॉ हृषीकेश तर मुद्रक-प्रकाशक माझी पत्नी सपना असणार होते. संपादक म्हणून मकरंद आणि प्रकाश तर सल्लागार म्हणून मी आणि चंप्र सर. मी त्यावेळी 'सकाळ' पेपर मध्ये नोकरीला होतो आणि त्यामुळे मला माझे नाव थेट संपादक म्हणून अंकात नको होते. .. वेगळा विचार म्हणून, आमच्या तिघांच्या नावा आणि आडनावाच्या पहिल्या अक्षरांशी खेळात खेळता मला 'गिप्रम गोरांकु' हे नाव संपादक म्हणून सुचले आणि मी ते जेव्हा दोघा मित्रांना सांगितले तेंव्हा मोठाच हशा पिकला. तो किस्सा आम्ही अजूनही अधून मधून चवीने उगाळतो. आमच्या तिघांच्या व्हाट्सअप ग्रुपला आता तेच नाव आहे, म्हणजे पहा !

व्यक्त-अव्यक्तसाठी ऑफिस मकरंदचेच ठरले. मग एक अपील लेटर तयार करून खूप साऱ्या मान्यवरांना आम्ही ते पाठवले. त्यात लेखक होते, कलावंत होते, संपादक होते.. त्यांना मासिक सुरु करण्याच्या आमच्या भूमिकेविषयी लिहिले आणि त्यांचा सल्ला, शुभेच्छा घेण्यासाठी त्यांचा वेळ मागितला. सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यावर आम्ही मग शरद तळवलकर, सतीश आळेकर, ना.सं.इनामदार, प्रतापराव गोडसे, डॉ. आनंद यादव, प्रशांत दामले, भानू काळे, डॉ. रामचंद्र देखणे इत्यादींना समक्ष भेटलो.  त्यांच्या शुभेच्छांना अर्थातच पहिल्या अंकात स्थान दिले.

दरम्यान चंप्र देशपांडे सरांनीही सल्लागार म्हणून सहभागी होण्याचे मान्य केले होते. भेटलेल्या सर्व मान्यवरांचे मिळालेले छोटे मोठे सल्ले हाताशी ठेऊन मग आम्ही ढाचा ठरवायला घेतला. संपादकीय, चालू घडामोडी, एक मोठी मुलाखत, अन्यत्र गाजलेल्या जुन्या सदारांना उजळणी, कलावंतांविषयी, कवितांविषयी, आरोग्याविषयी, मनःस्वास्थ्याविषयी,  शिक्षणाविषयी, खेळाविषयी सदरे, ललित, कथा, विनोदी सदर, उपहासात्मक संवाद असे ठरत गेले.

मग त्यात वेगळेपण कसे आणता येईल ह्यावर खूप दिवस ब्रेंस्टोर्मिंग केले. ते ठरल्यावर मग त्यानुरूप त्या त्या सदारांना न्याय देऊ शकतील अशी लेखक मंडळींची यादी केली. त्यानुसार त्या त्या लोकांना भेटण्याचा वेळ मागू लागलो. गाठी-भेटी होऊ लागल्या. झाले, चंप्र सरांसह डॉ. अरुण ढेरें, मंगला गोडबोले, बाळ ज. पंडित, डॉ. न. म. जोशी, वा.ना. अभ्यंकर ह्या सर्वांनी सदर लेखनासाठी होकार दिला. माझे जवळचे मित्र हेंमत एदलाबादकर, मिलिंद शिंत्रे, प्रवीण भोळे, डॉ. पद्मनाभ केसकर हेही आवडीने लेखन संग्रामात सामील झाले. ह्यातले काहीजण अतिशय अल्प मानधनात तर डॉ. अरुणा ढेरेंसारखे मान्यवर मानधनाशिवायच लेखन करणार होते हेही विशेषपणे नमूद करायला हवं! ह्या सर्व लेखक मंडळींच्या समन्वयाची जबाबदारी माझी असणार होती आणि ती मी माझे पुण्यातले 'सकाळ'चे ऑफिसकाम आटोपल्यावर ७ नंतरच्या संध्याकाळच्या वेळात करणार होतो. लेखन जमा झाल्यापासूनचे पुढचे सर्व सोपस्कार मकरंद आणि प्रकाश पिंपरी-चिंचवडमधून पाहणार होते कारण त्यावेळी त्यांची कर्मभूमी तिच होती. त्यामुळे कामाची ही वाटणी सर्वांच्या सोयीची अशी होती.

डॉ. ढेरेंनी त्यांना भावलेला कवी, त्या कवीची एक कविता आणि त्याचा त्यांना भावलेला अन्वयार्थ असं सदराचं स्वरूप ठरलं. चंप्र सर चालू घडामोडींविषयी 'चालू घडी' त  लिहिणार होते. मंगला गोडबोले 'माणूस' पाक्षिकात स्त्रीमुक्तीविषयी 'कुंपण आणि आकाश' हे सदर लिहीत असत. त्यातले जे लेखन आजही रेलेवंट होते त्याला त्यांनी

उजळणी द्यायचे ठरले. बाळ ज. पंडित पूर्वीचे गाजलेले क्रिकेट सामने/ खेळाडू आणि त्याची वर्तमानातल्या क्रिकेटशी सांगड घालणार होते. डॉ. न. म. जोशी संस्कार विषयक रेघोट्या' हे सदर, कमलाकर पाठकजी 'युवक विचार' आणि वा. ना. अभ्यंकर सर शिक्षणाविषयी 'खरे शिक्षण' हे सदर लिहिणार असे ठरले.
हेमंत एदलाबादकर 'गप्पा-चौक' मधून संवादात्मक राजकीय उपहास करणार होता तर आजपासून ५०० वर्षांनंतर मिळालेल्या आत्ताच्या पत्रांची मिलिंद शिंत्रे 'ई-मौज' मधून खिल्ली उडवणार होता. माझा भाऊ डॉ हृषीकेश आणि प्रकाशचे वडील उदयकुमार कुलकर्णी हे अनुक्रमे आरोग्य आणि मन:स्वास्थ्य ह्या विषयावर लिहिणार होते. ललित व कथांसाठी प्रवीण भोळे, पद्मनाभ केसकर व इतरही काही मान्यवर तयार झाले. 'मत कलावंताचे' मध्ये एखाद्या कलाकारावर इतर कलावंत मंडळींचा / त्यांच्या कलाकृतींचा पडलेल्या प्रभावाबद्दल दृष्टिक्षेप असणार होता. तर अंकात जी दीर्घ मुलाखत असणार होती ती आम्ही तिघांनी घ्यायची ठरली.
दरम्यान आम्हा तिघांबरोबर स्वप्ना पाटसकर, अजय लोखंडे, अरुण पुरोहित, विजय आढाव ही मित्र मंडळीही उसाहाने सामील झाली. स्वप्न पाटसकर फोटोग्राफी आणि जाहिरात विभागासाठी, अरुण पुरोहित आणि अजय लोखंडे वर्गणीदार व वितरण व्यवस्थेसाठी पुढे सरसावले. मग वर्गणीदारांसाठी पावती पुस्तके छापली, जाहिरातदारांसाठी बिल बुक छापले आणि धौडदौड सुरु झाली. कधी हितसंबंधांमुळे तर कधी प्रयत्नामुळे वर्गणीदार जमा होऊ लागले, जाहिराती गोळा होऊ लागल्या. प्रिंटिंग प्रेस ठरली, डीटीपी ऑपरेटर ठरला. सजावटकार आणि कार्टूनिस्ट ठरला.
पहिल्या अंकात प्रसिद्ध संगीतकार आनंद मोडकांची मुलाखत होती. तेंव्हाच्या त्यांच्या सिंहगड रोडच्या घरी आम्ही ती घेतली. मध्यरात्री पर्यंत आमच्या गप्पा रंगल्या. किशोर कुमार, 'सु'मार सानू पासून त्यांनी केलेले सांगीतिक प्रयोग ते त्यांच्या बँकेतल्या नोकरीपर्यंत..बरंच काही नवं गवसलेलं त्या मुलाखतीत. ते सर्व आम्ही अंकात आमच्यापरीनी मांडलं. अनेकांनी त्यांना ते भावल्याचं कळवलं. 'मत कलावंताचे' मध्ये विश्वास मेहेंदळेंनी 'ढोलताशे' नाटकावर दिलखुलासपणे लिहिले. कविता सदरात डॉ अरुणा ढेरेंनी 'पु. शी. रेगे' ह्या कवींविषयी उत्कटतेनं मांडलं. इतरांची सदरेही मनाजोगती लिहून आमच्याकडे आली.
प्रकाशचे बाबा आणि आई ह्यांनी प्रूफ रिडींगची जबाबदारी फार छान सांभाळली. त्या फ्रंटवर आम्ही अगदी निर्धास्त होतो. पहिला अंक प्रिंट होऊन आला आणि उदघाटनाची दिवस उजाडला. मासिकाचे उदघाटन माननीय डॉ. विश्वास मेहेंदळे ह्यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानप्रबोधिनीचे वा. ना. अभ्यंकर सर होते. नाटककार चंप्र देशपांडे सुद्धा अर्थातच व्यासपीठावर उपस्थित होते. सर्वजण छान बोलले. ज्ञानप्रबोधिनीच्याच मातृमंदिरात हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाशने तर सुत्रसंचालन मी केलं. सर्वांचे नातेवाईक, मित्रमंडळींसह छानसा आटोपशीर समारंभ झाला!
मग रुटीन सुरु झाले. लेखनाबद्दल लेखकांशी बोलणे, लेख गोळा करणे, ते टाईप करणे, मग तो मजकूर पानांत बसवणे, त्यासाठी ले-आउट, पान सजवणे, त्यासाठी पूरक चित्रं काढून घेणे, सर्वांचं प्रूफ रिडींग, प्रिंटिंग आणि डिस्पॅच.. हळू हळू वर्गणीदारांना अंक आवडू लागल्याचं कळू लागलं. काही अंक आम्ही मान्यवरांना कॉम्प्लिमेंटरी पाठवत असू. त्यांची पोस्ट काड्‌र्स येऊ लागली. होय पोस्टकार्डस! पोस्टकार्डसचा जमाना होता तो. त्यात डॉ. जयंत

नारळीकरांपासून डॉ. वीणा देव यांचा समावेश होता. नारळीकरसरांनी तर पत्रात 'अंकातील लेख विचार करायला लावणारे आहेत, सवडीनं केंव्हातरी लेखन अवश्य पाठवीन' असा अभिप्राय दिला. ते पत्र आम्ही अजूनही जपून ठेवलंय!

पुढे पुढे गीतकार सुधीर मोघे, चित्रकार रवी परांजपे, गायक संजीव अभ्यंकर, शिल्पकार खटावकर, अभिनेते निळू फुले आणि दिलीप प्रभावळकर ह्यांसारख्या प्रतिभावंतांच्या दीर्घ मुलाखती अंकात येत गेल्या. स्वप्ना पाटसकर खूप हौसेने तिचा स्वतःचा कॅमेरा घेऊन आमच्या बरोबर येत असे आणि अगदी भरपूर फोटो त्यावेळी ती काढत असे. रोलवाला कॅमेरा असताना, हे विशेष! ते फोटो आता कुठे आहेत हे तिलादेखील माहित नाही. असो, 'मत कलावंताचे' मध्येदेखील राजीव नाईक, सुधीर गाडगीळ, लालन सारंग ह्यांनी त्यांचं परखड मत नोंदवलं. प्रसिद्ध प्रकाशयोजनाकार बाळ मोघेंनी प्रकाशयोजना ह्या विषयावर काही लेख लिहिले!

काही अंकांनंतर मात्र मासिकाचे आर्थिक गणित जमेनासे झाले. वर्गणीदारांची संख्या बऱ्यापैकी म्हणजे दोनेकशे असूनही! इथे वर्गणीदार मिळवण्यासाठीचे सर्व श्रेय अरुण पुरोहित ह्या आमच्या उमद्या मित्राला! आणि ते द्यावे तेवढे कमीच आहे! पण वर्गणीदारांच्या पैशातून मासिकाचा सर्व खर्च भागणे अजिबात शक्य नव्हते. त्यासाठी अंकात ठराविक रकमेपर्यंतच्या जाहिराती असणे अवश्यक होते. पण म्हणाव्या तेवढ्या जाहिराती/ रक्कम मिळत नव्हती. सुरुवातीला ओळखीमुळे श्यामराव विठ्ठल को-ऑप बँक, अप्पूघर वॉटर पार्क, पुण्याचे वर्मा बुक सेंटर, पूर्णब्रह्म डायनींग हॉल, प्रथमेश एन्टरप्रायझेस ह्यांनी जाहिरातदार म्हणून चांगले सहकार्य केले. त्यामुळेच वर्षभर नेटाने आम्ही हा उपक्रम चालवला आणि शेवटी वर्गणीदारांच्या बांधिलकीतून मुक्त झालो...होय! आम्ही व्यक्त-अव्यक्त बंद केले! आमच्यासह लेखक आणि वर्गणीदारांनादेखील हा धक्काच होता. वर्गणीदारांनाही पुढील वर्षासाठीही व्यक्त-अव्यक्त हवे होते पण...

हा सर्वांसाठी खूप समृद्ध करणारा अनुभव होता. मागे वळून पहाता, आमच्या सर्वांची 'पायाभरणी करणारा उपक्रम' असेही त्याला म्हणता येईल. त्यादृष्टीनेतर त्याला अनन्यसाधारण महत्व आहे! ह्यात माझी पत्नी सपना आणि मकरंदची पत्नी अनुराधा ह्यांचेही सहकार्य लाभले. खूप आठवणी आहेत. लेखक, मुलाखतकारांबरोबरच्या, चंप्र सरांबरोबरच्या. चं प्र सरांनी तर आम्हाला पाहिजे तितका वेळ दिला. त्यांच्याशी असंख्यवेळा विविध विषयावर त्यांच्या घरी, बालगंधर्व कॅफेटेरियात चर्चा झाल्या. त्यातनं मिळालेलं समाधान आहे. कायम स्वरूपी लक्षात राहतील असे प्रसंग आहेत - मिलिंद शिंत्रे- वि.भा. देशपांडे आणि माधव वझे यांची लेखातील मजकुरावरून झालेली टोकाची मतांतरे आणि पराकोटीचे वाद आहेत! ते मिटवण्यासाठी मी आणि मिलिंद शिंत्रे, माधव वझे सरांच्या घरीदेखील गेलो आहे. आमचे नॉन-महाराष्ट्रीयन वर्गणीदार आणि त्यांचे किस्से देखील मजेशीर आहेत!

अंक बंद करण्यापूर्वी आम्ही मिटींग्स घेतल्या. सर्व शक्यता तपासल्या. आम्ही तिघेही नोकरी-व्यवसाय करणारे होतो. मी 'सकाळ' मध्ये, प्रकाश 'डेटाप्रो' मध्ये आणि मकरंदचा स्क्रीन प्रिंटिंगचा व्यवसाय होता. कुणा एकाचेही पोट त्या मासिकावर नव्हते आणि तोच इथे महत्वाचा मुद्दा ठरला. एकाचे जरी पोट त्या मासिकावर अवलंबून असते तर पोट-पाण्याच्या लढाईतून ते मासिक तगलेही असते कदाचित. असो.

प्रकाश कुलकर्णी  सध्या सोशल मीडियामध्येच काम करतो आहे. त्यामुळे त्याचा सदारांऐवजी आता 'पोस्ट्स' शी संबंध येतो. त्याची स्वतःची सोशल मीडियाची मोठी कंपनी आहे आणि आम्ही काही वेळा एखाद्या प्रोजेक्टसाठी बरोबर कामही करतो. मकरंदने अभिनयाबरोबरच गाण्यामध्येही इंटरेस्ट वाढवलाय. आम्हीही एकत्र ऍक्टिव्हिटीज करत असतो. स्वप्ना पाटसकर देखील प्रोफेशनल कॅमेरामन आहे.  माझा सख्खा भाऊ हृषिकेशनेही एफबीवर त्याच्या स्वतःच्या एक्सप्रेशनच्या बळावर त्याची ओळख तयार केली आहे. समविचारी आणि प्रतिथयश लोकांबरोबर त्याचा ऍक्टिव्ह ग्रुपही तिथे तयार झालाय. प्रकाशच्या बाबांनीदेखील मासिकातल्या 'मनस्वास्थ्य' ह्या सदरच्या पुढे जात 'तुमचे यश तुमच्या हातात आहे'  नावे स्वतःचे पुस्तक प्रकाशित केलं. त्याच्या दोन आवृत्या निघाल्या आणि सध्या ते मानसोपचार ह्या विषयावर व्याख्याने, सल्ले देण्यात व्यस्त असतात.

'व्यक्त-अव्यक्त' नसले तरी मला कॉर्पोरेट मॅगझिन्सचा एडिटर म्हणून काम करण्याची अधून मधून संधी मिळते. अजूनही मी मुलाखती घेतो, स्क्रिप्ट्स लिहीतो कारण मी मीडिया फिल्डमध्येच आहे. 'प्रिंट मीडिया' ऐवजी 'फिल्म मीडिया' आणि 'व्यक्त-अव्यक्त' नावाऐवजी 'पॉईंट ऑफ व्ह्यू' हे नाव हाच काय तो फरक! २००३ मध्ये,  मी लोकमतमध्ये असताना 'मत कलावंताचे' ह्या आमच्या मासिकाच्या सदरावर आधारित सदर तिथे लोकमतमध्येही लिहिलं. तेही  ६ महिने, ऑल एडिशनसाठी!  त्यात लक्ष्मीकांत बेर्डे, डॉ श्रीराम लागू, वर्षा  उसगावकर, मोहन जोशी, विक्रम गोखले, अमृता सुभाष, मच्छिन्द्र कांबळी, निर्मिती सावंत, अविनाश नारकर अश्या अनेकांची  मते, रंजक खजिना समोर आला. अलीकडेच अमित कुमार, मुक्ता बर्वे, उमेश कामतपासून डॉ. जयंत नारळीकर, डॉ. अरुण फिरोदिया, डॉ. रघुनाथ माशेलकर ह्यांच्यादेखील मुलाखती घेण्याचा योग आला.  मी लिहिलेल्या कथा, कविता, ललित आणि एकांकिकांना पूर्वी थिएटर, रेडिओच्या कार्यक्रमामधे आणि आता माझ्या स्वतःच्या प्रॉडक्षनमध्ये स्थान मिळत असते.

'व्यक्त-अव्यक्त' मासिकाचे मोठाले एक्सटेन्शन म्हणता येईल अशीच एकूण प्रत्येकाची वाटचाल आहे!  मासिकातला माझा मित्र हेमंत एदलाबादकरचे लेखक म्हणून आज मराठी सिनेमा इंडस्ट्रीत मोठे नाव आहे. त्याचे अंदाजे २० पेक्षा जास्त मराठी सिनेमे लेखक म्हणून स्वतःच्या नावावर आहेत. मिलिंद शिंत्रेनेदेखील साहित्यामधली विविध वर्ल्ड रेकॉर्डस् करण्यापासून 'फू-बाई-फू' मालिकेतील अभिनय ते स्वतःचा सिनेमा दिग्दर्शित करण्यापर्यंत पल्ला गाठलाय. प्रवीण भोळे तर आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्राचा संचालक आहे!

व्यक्त-अव्यक्त कुटुंबाचे हे एकेकाळी सर्वजण जिवलग होते आणि आम्हा सर्व 'व्यक्त-अव्यक्त' परिवाराला त्याचा अभिमान आहे!

--- गिरीश रांगणेकर.

38, कृष्ण व्हिला ( दोन अंकी नाटक )

आधीच सांगतो, हे नाटक मला आवडले. हे प्रेक्षकांनाही आवडते आहे हे पाहून आनंद वाटला. दोनच पात्रे असलेले आणि काहीसे गंभीर संवादप्रधान असलेले असे नाटक येणे ही मराठी रंगभूमीवरची एक अपवादात्मक घटना आहे. अशा नाटकाला ‘ चर्चानाट्य ‘ म्हणायची पद्धत कुणी पाडली मला माहीत नाही. मला तो शब्द अयोग्य आणि

गैरसमज निर्माण करणारा वाटतो. ‘ 21 व्या शतकात राजकारणाचे साहित्यावर होत असलेले परिणाम ‘ असा एखादा विषय घेऊन आयोजित केलेला एखादा सेमिनार वा परिसंवाद ही पात्रे सादर करत नसतात. ती एखाद्या मानवी समस्येवर केंद्रित होत असतात. नुसतीच सुखदु:खे व्यक्त करणारी नसतात. मीही काहीसा एक नाटककार असून माझ्या नाटकांनाही चर्चानाट्य म्हटले जाते. हा एक समान धागा असल्याने, या नाटकाच्या लेखिका श्वेता पेंडसे यांचे मी अभिनंदन करतो. उत्तम रचना, अत्यंत कुशल कलाटण्या आणि छान, वैचारिक संवाद ( त्यात काही अशी टाळ्यांची वाक्ये – “ आपल्या हातात पत्ते कुठले यावेत हे आपल्या हातात नसले तरी हाती आलेल्या पत्त्यांनी चांगला खेळ खेळणे हे आपल्या हातात असते ! “ – वा असेच काहीसे. ) ही या संहितेतली विशेष वैशिष्ट्ये आहेत. विजय केंकरे यांच्यासारखे, ही विचार-प्रक्रिया समजून घेऊन, तिच्यातले नाट्य पकडून ते उभे करणारे दिग्दर्शक लाभणे ही या नाटकाची एक मोठी जमेची बाजू आहे. केंकऱ्यांच्या नेतृत्वाखाली बाकी सगळे तंत्रज्ञही उत्तम आहेत. दोनच पात्रांचे हे फारसे घटनाप्रधान नसलेले नाटक एका तोलामोलाने अभिनीत होणे आवश्यक होते. गिरीश ओक आणि त्यांच्यासमोर कुठेही कमी न पडता श्वेता पेंडसे यांनी ते काम खूपच सशक्तपणे पार पाडलेले आहे. काही ठिकाणी लोक अभिनय शिकायला जात असतात – मी असे म्हणेन की भाषेचे समर्थ, सुयोग्य उच्चारण, वाक्यांतल्या मधल्या जागांतला अर्थ व्यक्त करणे, अशा अनेक बाबींसाठी अभिनयाच्या विद्यार्थ्यांनी हे नाटक पाहायला हवे.
प्रश्न असा आहे की या नाटकातली पार्श्वकथा न सांगता मला इथे लिहायचे आहे. कारण पहिल्यांदा तरी प्रेक्षकांनी यातल्या कलाटण्या प्रत्यक्ष रंगमंचावर पाहणेच योग्य होईल. दुसरा एक मला जाणवलेला भाग म्हणजे नुसतेच नाटक आवडले वा नाही आवडले, एवढ्यापुरते हे मर्यादित राहू नये असे वाटते. या नाटकाच्या निमित्तानेही काही बोलले जाणे महत्त्वाचे वाटते.
योग, प्राणायाम वगैरे शिकण्यासाठी, उपचार म्हणून ते जगण्यात स्वीकारण्यासाठी मी एका योगाश्रमात एक महिनाभर राहिलो होतो. त्या काळात तिथल्या एका स्वामींचे भाषण ऐकले होते. श्रोते म्हणजे, तिथला स्टाफ आणि आम्ही 20-25 पेशंट एवढेच होतो. त्या स्वामींनी त्यांचा एक अनुभव सांगितला की एकदा त्यांच्या उपासनेत असे घडले होते की बाळकृष्ण त्यांच्या मांडीवर आला होता आणि त्यांनी त्याला चमच्याने दूध पाजले होते. ते त्यांना अत्यानंद देणारे घडले होते. पण त्यानंतर मात्र ते पुन्हा घडत नव्हते. कितीही तीव्र इच्छेने आणि प्राणपणाने प्रयत्न केला तरी ते घडत नव्हते. हे सांगत असताना त्या स्वामींचे डोळे भरून आले आणि आमच्यासमोर ते अक्षरक्ष: रडले ! यावर मला काहीही भाष्य करायचे नाही. कारण तो स्वामींचा भ्रम असेल असे आपण म्हणू जावे तर असे अनेक भ्रम बाळगत आपणही जगत असतो. कदाचित, ते तसेच पुन्हा घडावे ही तीव्र इच्छा आणि कदाचित ते पुन्हा घडणारही नाही याची भीती – हाच एक मानसिक अडथळा घडत असणे शक्य आहे. इथे जे. कृष्णमूर्तींचे एक वाक्य आठवते – creativity is effortless – सर्जकता ही प्रयासहीन असते !
यातला नायक लेखक, त्याला साहित्य अकॅडेमी पुरस्कार मिळाल्यावर, पुन्हा त्याच दर्जाचे होईल का लिहून या विचाराने घाबरलेला आहे. त्या भीतीने त्याचे लेखनच थांबलेले आहे. यशाची प्रचंड हाव हीच त्याची सर्जकता व्यक्त होण्यातला अडथळा ठरते आहे. एकाला यशाची हाव आहे तर दुसरा एक लेखक लोक-संपर्काला घाबरतो आहे. आपली प्रतिमा नीट सादर होईल की नाही याची भीती, हीच समस्या याच्या मुळाशी आहे. या अशा दोन गोष्टींच्या

एकत्र येण्यातून ही एक रंजक कथा सादर होत राहते. विषय मानसिक असला तरी त्या मानसिक समस्येकडे पाहणे, हा नाटकाचा हेतू नाही. ती समस्या गृहीत धरून एक ‘ समृद्ध ‘ नाटक सादर करणे हाच हेतू आहे. जगण्यात ज्याप्रमाणे आपण समस्यांपासून दूर जाण्यासाठी काही पळवाटा वापरतो तसेच हे आहे. पण, असे न करता, त्या समस्या हाच नाटकाचा विषय केला तर प्रेक्षकांच्या सवयीच्या मन:स्थितींना ते आव्हान ठरणार. ते कसे चालेल प्रेक्षकांना ?

‘ व्यवस्था बदलायला हवी ‘ हे वाक्य वारंवार आपल्या कानावर पडत असते. आपण जी व्यवस्था म्हणतो ती असते आपल्या सर्वांच्या मानसिक हालचालींची एकत्रित परिणती. मग बदलणार काय ? थोडे हे बदल, थोडे ते बदल, असे घडते, पण, एकूणात सामाजिक रोगटपणा आणि विकृती वाढतच जाते. आपल्या जगण्यातल्या  मानसिक समस्यांकडे हे नाटक निर्देश करते हे महत्त्वाचेच समजावे लागेल.

वर्चस्व हवे आहे, सुरक्षितता हवी आहे आणि अहंकाराचे पोषण हवे आहे. आणि या तिन्हींची खात्री नाही. आपापला देश सुरक्षित राहावा म्हणून सर्वांनी अण्वस्त्रधारी व्हावे आणि सगळी सुरक्षितता घालवून बसावे, तसेच हे आहे. जे हवे आहे ते न घडण्याच्या भीतीमुळे सतत समस्याग्रस्त जगणे ! हे अर्थातच प्रेक्षकांना मान्य असते आणि सहानुभूतियोग्य वाटते.

विचारच करायचा असेल तर कलेचा आणि यशाचा संबंध काय – हा प्रश्न विचारायला हवा. साहित्य म्हणजे काय अनुभवांचे रसायन घेऊन नशा निर्माण करण्याचा कुटिरोद्योग असतो का ? – हा प्रश्न समोर आला पाहिजे. पण तसे होत नाही. महत्त्वाकांक्षा असणारच ना, युद्ध तर होणारच ना – अशी मानसिकता सर्वांनी स्वीकारलेली असते. त्यामुळे, झालेले रोग आणि ओढवून घेतलेले रोग यांत फारसा फरक राहात नाही. दोन्ही अटळच मानून त्याच्या सुसह्य माफक डोसात रमून जावे, त्या पात्रांबद्दल सहानुभूती बाळगावी, अत्यंत संवेदनशीलपणे डोळे जरा पाणावूही द्यावेत आणि वा, छान म्हणावे, हेच बरे पडते. एक कला समस्यांकडे पाहण्याचे धाडस करते तर एक कला समस्यांचा वापर त्या पाहणे टाळण्यासाठी करते.

या नाटकाच्या निमित्ताने हे सगळे लिहावेसे वाटणे हाच माझा खुला अभिप्राय समजावा. नुसते काही साधक-बाधक लिहून संपवावे, असे हे नाटक नाही. सर्व टीमचे अभिनंदन आणि धन्यवाद !

--- चं. प्र. देशपांडे.

--- 000 ---

याचे आणि माझे आवडते गाणे एकच आहे -- ' अकेला हूं मै ' --

https://www.google.com/search?client=firefox-b-d...

( एका एकट्या कावळ्याचा फोटो. )

अनिल भागवत

अनिल भागवत आणि मी एकाच बँकेत म्हणजे सेंट्रल बँक ऑफ इंडिया मध्ये नोकरीला होतो. नाटक हा आम्हाला जोडणारा सेतू होता. त्यामुळे, आमची मैत्री जमली. पुढे त्याने माझ्या ‘ धागेदोरे ‘ या विद्यासागर अध्यापक दिग्दर्शित नाटकात प्रमुख भूमिका केली. हे नाटक आम्ही नव्यानेच स्थापन केलेल्या ‘ अवकाश कलामंच ‘ या संस्थेतर्फे आले होते. त्या वेळी मा. कृ. पारधी हे नाट्यसमीक्षक ‘ पुणे हेरॉल्ड ‘ मधून इंग्रजीत नाट्यसमीक्षा लिहीत असत. आमच्या या नाटकाला त्यांनी मराठीतले एक अपवादात्मक न-नाटक म्हटले होते. अनिलने सादर केलेले ‘ मोहिले साहेब ‘ हे पात्र म्हणजे मराठीतला पहिला अँटी हीरो – न-नायक आहे, असे त्यांनी म्हटले होते. अनिल खरोखरच उत्तम करायचा अभिनय. तसा तो थिएटर अकॅडेमीचा नट. अनिलने निळू फुले, नाना पाटेकर यांच्याबरोबरही अभिनय केला होता. या कसदार नटाला त्याच्या पायाच्या दुखण्यामुळे ब्रेक लागला. परवाच आमच्या अधिवेशनात त्याची भेट झाली होती. आता तो फारसा घराबाहेर पडत नाही, फोनवर अधून मधून आमच्या गप्पा होतात. आज माझ्या या दिलखुलास मित्राचा वाढदिवस आहे ! त्याला मन:पूर्वक भरपूर शुभेच्छा !

--- 000 ---

भटकी कुत्री

सकाळी एकजण भटक्या कुत्र्यांना बिस्किटे खाऊ घालताना दिसला. भटक्या कुत्र्यांनी लहान मुले फाडून मारल्याच्या बातम्या तर मधून मधून येत असतातच पण शिवाय त्यांचे चावणेही खूप काळजी निर्माण करणारे असते. रेबीज या रोगाचे स्वरूप ऐकून माहीत असल्याने त्याची भीती असते. शिवाय, त्या कुत्र्यांनी दुचाक्यांचा पाठलाग करून अपघात घडवणे हेही चालूच असते. त्यामुळे, सामान्यत: लोकांना भटकी कुत्री ही एक समस्या वाटते. रस्त्यावर भटकी कुत्री असूच नयेत, असल्यास त्यांना खाऊ घालून जोपासू नये, अशी ही भूमिका असते. पण, माणसांमध्ये प्राणिमित्र नामक एक गट असतो. त्यांची भूमिका वेगळी असते. त्या कुत्र्यांनाही जगण्याचा अधिकार आहे, हा त्या भूमिकेचा पाया असतो. एक मध्यम मार्ग म्हणून त्यांचे निर्बीजीकरण करावे असाही एक विचार असतो. त्यालाही विरोध करणारी एक भूमिका असते. अपघात काय, माणसांमुळेही होतात, रोग काय माणसांमुळेही पसरतात, मग या कुत्र्यांचा विशेष गुन्हा तरी काय – असा हा प्रश्न असतो. त्यांना खाऊ घालताना कुणी एखाद्या प्राणिमित्राच्या भूमिकेत असू शकतो वा धार्मिक पुण्य मिळवण्याच्या. लोकांची श्रद्धा आहे तर त्यांना पुण्य मिळवण्याचाही अधिकार आहे, अशी ही भूमिका असते. याच्याच जोडीला कामातला हलगर्जीपणा, दुर्लक्ष, असेही मुद्दे असतात. कामातून काही फायदाच नसेल तर होणारी टाळाटाळ हे काही फक्त इथेच होते असे नाही. इतर शेकडो ठिकाणीही हे घडतच असते. ते काहीच न थांबवता हेच फक्त लावून का धरावे, हाही प्रश्न पुढे येऊ शकतो.

या सर्व गोंधळात, जाऊ दे, आहे ते चालू दे – असा एक उदार दृष्टिकोण अस्तित्वात येतो. जग हे फक्त माणूसकेंद्रित न समजता सर्वच प्राण्यांना जगण्याचे खुले स्वातंत्र्य असायला हवे, असे काहींना वाटते. माणसाचे जगणे-मरणे तर अनेक तऱ्हांनी चालूच असते, त्यात याच एका समस्येचा बाऊ करू नये – अशी ही भूमिका असते.

या सर्वच भूमिका बरोबर, समर्थनीय, न्यायाच्या आणि समतेच्या असतात. त्यामुळे, यांतली नेमकी अधिक बरोबर वा योग्य भूमिका कोणती हे कळेनासे होते. लोकांनी आपली आपण काळजी घेणे हाच यावर मार्ग – या निर्णयाला एकूण विचार येतो. ही समस्या कोर्टातही गेली होती आणि एकदा कोर्टाने माणसाच्या बाजूने निर्णय दिला होता म्हणे. पण, नंतर तो निर्णय फिरवला गेलेला असून पुन्हा समता प्रस्थापित झालेली आहे, असे कळते.

तरीही बहुसंख्य माणसे याकडे एक समस्या, त्रास आणि धोका म्हणूनच पाहतात, हेही खरे आहे. बहुसंख्यांचे विचार ही समता नाकारणारे आहेत म्हणून प्राण्यांवर अन्याय होऊ द्यावा का ? – हा प्रश्न आहे. दुसऱ्या बाजूने हेही येते समोर – माणूस स्वत:च्या फायद्यासाठी निसर्गाचा किती नाश करतो, प्रदूषण करतो, इतर प्राणिजगत धोक्यात आणतो, त्याचप्रमाणे या कुत्र्यांच्या समस्येचा विचारही माणूसकेंद्रितच का करू नये ? – असेही पटण्यासारखे विचार समोर येतात.

सारांश असा निघतो की वादळ, वारा, पाऊस, रोगराई, अपघात, युद्धे हे आणि असे सगळे आपण स्वीकारून चालतोच ना, त्यांतून येणाऱ्या प्रश्नांवर मार्ग काढत चालतोच ना, तसेच हे समजावे. बिचारी कुत्री ती, कुणी पाळत नाहीत म्हणून हे असे भटके जीवन जगत आहेत. त्यांना हौस थोडीच आहे असा कुणाला त्रास देण्याची ? हो जाता है, बस ! – हाच विचार शेवटी दिलासा म्हणायचा झाले !

--- 000 ---

20-06-23.

|||||

वाचन आणि अभ्यास संस्कृती

वाचन आणि अभ्यास संस्कृतीबद्दल एक मुद्दा मांडावासा वाटतो. हल्ली कोणत्याही पुस्तकाच्या साधारण शे-सव्वाशे प्रती निघतात. त्यांतल्या खपणाऱ्या प्रती या सामान्यत: व्यक्तीच विकत घेतात – कॉलेजेस, विद्यापीठे वा गावोगावची वाचनालये असे फारसे कुणी काही घेताना दिसत नाही. याचा अर्थ काही वर्षांनी कुणाला अमुक एका लेखकाचे अमुक एक पुस्तक वाचायचे असले तर त्याला ते मिळवणे खूपच अवघड जाईल. त्याच्याही पुढचा प्रश्न म्हणजे एखाद्या लेखकावर कुणाला डॉक्टरेट करायची असेल तर त्याचे सगळे लेखन एका ठिकाणी मिळणे अशक्यच होईल. मग लोक डॉक्टर होणार कसे ? म्हणजे यापुढच्या सगळ्या डॉक्टरेट या पुल आणि वपु यांच्यावरच कराव्या लागतील. मराठीच्या नावाने गळे काढता येतील असा हा एक मोठा प्रश्न दिसतो. काय मार्ग असू शकेल यावर ? की हळूहळू पुस्तकांचे महत्त्वच खलास होत जाण्याची ही चिन्हे आहेत ? सध्या निदान, ' पुस्तके आणि संस्कृती यांचा संबंधच काय ? ' या विषयावर एखादा परिसंवाद घ्यावा ! मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे आणि एकूण पुस्तकांची उपलब्धता नष्ट होणे हे एकाच वेळी घडेल असे दिसते. की, ' गरज ही शोधाची जननी असते ' – या सुभाषितातून निघेल काही मार्ग ?

--- 000 ---

सटकलेले

सकाळची चक्कर मारत होतो तर ‘ बोला ‘ असा मोठा आवाज आला म्हणून पाहिले तर माझ्याच वयाचे एक सज्जन रस्त्याच्या पलीकडच्या भागातून विरुद्ध दिशेला चाललेले दिसले. सुहास्य वदनाने ते मलाच हात करत होते हे लक्षात आल्याने मीही घाईघाईने हात हलवून ‘ नमस्कार, नमस्कार ‘ असे म्हणालो. आमची ओळखबिळख नव्हती. आपुलकी वाटली, बोलावे काही, एवढेच होते ते. छान वाटले. खरे तर अनोळखी माणसाला नमस्कार करायची फारशी पद्धत नाही, हे पाहता ते सज्जन जरा ‘ सटकलेले ‘ च असणार असे म्हणावे लागते ! भेटतातही क्वचित कुणी असे सटकलेले ! छान वाटते ! अशीच रस्त्यावरची एक झाडूवाली आहे. इतरांनी रस्ता साफ करत केलेले कचऱ्याचे ढीग एका हातगाडीत भरून नेणे हे तिचे काम आहे. तिच्याकडे पाहूनच कळते की ही नुसती सटकलेली नसून जरा वेडसरच आहे ! अशा लोकांना माझ्याबद्दल आपोआपच आपुलकी वाटते असा अनुभव मला अनेकदा येत असतो. तसा काही अंश माझ्यातही असणार ! तर ती झाडूवाली, इतर अनेक माणसे रस्त्यावरून जात असली तरी, मलाच सस्मित विचारते, ‘ दादा, किती वाजले हो ? ‘ मी ईमानदारीत उत्तर देऊन पुढे जातो. मी पुरेसा सटकलेला नसल्याने जरा भीतीही वाटते. पण, जगात अशा सटकलेल्या लोकांतच आणि तशा सटकलेपणाचा थोडाफार अंश असलेल्या माझ्यासारख्या  लोकांतच थोडेफार प्रेम, आपुलकी, सदिच्छा असले निरुपयोगी प्रकार शिल्लक आहेत, असे वाटते. शहाणीसुरती म्हटली जाणारी माणसे अधिकाधिक आत्मकेंद्री आणि क्रूर होत चाललेली आहेत. अशा एकूण सटकलेपणाच्या दिशेनेच, इतरांची होईल न होईल, माझी तरी प्रगती होत जावो, हीच माझी त्या सटकलेल्या परमेश्वरचरणी प्रार्थना ! ही पोस्ट वाचणाऱ्या वाचकांसाठीही हीच प्रार्थना !

--- 000 ---

जितके अधिक तुम्ही स्वत:च्या भूतकाळात व्यग्र राहता तितके अधिक तुम्ही दुसऱ्याला त्रासदायक वाटता !

जगण्यावरचे सर्वोत्तम औषध -- पक्ष्यांचे आवाज, वाऱ्याचे आवाज, झाडांचे रंग -- हा निसर्ग सहज, विना-अडथळा आपल्यात येऊ देणे.

एका तज्ञाचे सखोल विश्लेषण -- त्यांनी क्रिकेट ऐवजी आट्यापाट्या खेळायला हवे होते ! स्वत:च्या गुगलीबाबतचा गर्व त्यांना नडला !

द्वेषाचे रूपांतर क्षणात प्रेमात होऊ शकते ! -- जग ही एक माया आहे !

हा गट खरा की तो गट खरा असे खूप पक्षांचे व्हावे आणि लोकशाहीचा राडा अनेक कोर्टांतून चालू राहावा !

खरा गट राज्य करतोय की खोटा याचा निकाल त्या सरकारचा कार्यकाल संपल्यावर लागावा ! यातून जनता विवेक शिकेल !

कविता म्हणजे ' जे आहे ते ' -- काल्पनिकाचे गोडवे गाण्याने ती आदर्श, बोधप्रद आणि खोटी होते.

आता त्या दोन बंधूंनी एकत्र येण्याचा विषय चालू आहे. तेही काही एकमेकांत विलीन होणार नाहीत. मग तीही एक युती होईल. म्हणजे एकूण झाल्या तीन. ही मग, एक प्रकारे, ' युत्यांची ' लोकशाही म्हणता येईल !

वाईट काळ

इथे काही पोस्ट मी अशा देतो की ज्यांतले मला काहीच कळत नाही ( कळते असा मी आव आणतो, तो भाग वेगळा ) आणि काही पोस्ट अशा देतो की ज्यांबद्दल मला स्पष्ट आकलन आहे, असे मला वाटते. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष काय म्हणताहेत ते समजणे आणि न समजणे हेही मी इथे मांडत असतो. सध्याचे नियोजित संमेलनाध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांचे एक भाषण अनेक मराठी वर्तमानपत्रांत आले आहे. त्यावर काही लिहून पाहण्याचा हा एक प्रयत्न.

पहिला ठळक मुद्दा म्हणजे, त्यांच्या मते, मराठी लेखक सत्याला सामोरे जात नाहीत. आता मुळात सत्य म्हणजे काय इथेच माझी गाडी अडत असल्याने माझा विषय सोडा. पण सत्याला सामोरेच जाता येत नसेल वा तसे करायला घाबरत असतील तर लिहिणार काय बोंबलायला ? बरे, मराठी लेखक म्हणजे कोणते ? – पुल, वपु, काकोडकर, कदम, कानेटकर की जीए, चिंत्र्यं, मर्ढेकर, कोलटकर, चित्रे ? शेजारी तिथे भारत सासणे बसलेले होते. ते सामोरे जाणारे की न जाणारे ? तर हा विषय मी बॅट न लावता सोडून द्यावा असाच आहे.

पुढे ते म्हणतात की वाईट काळातच चांगली कलानिर्मिती होते. अशांततेच्या काळातच चांगले लेखन होऊ शकते. त्यांचे स्वत:चे सत्य आणि स्वत्व यांना लेखनातून महत्त्व देण्याचे प्रयत्न  आणीबाणीच्या काळात सुरू झाले, असे ते म्हणतात. त्या वेळी माझे आकलन असे होते की त्या वेळच्या विरोधी पक्षांनी इंदिरा गांधींना कामच करू द्यायचे नाही यासाठी हवा तसा दंगा केला, त्यांना चहू बाजूंनी घेरायचे प्रयत्न केले आणि त्यामुळेच त्यांना आणीबाणी लावणे भाग पडले. विनोबा भावे, बाळासाहेब ठाकरे यांचा आणीबाणीला पाठिंबा होता. विनोबा तर त्याला ‘ अनुशासन पर्व ‘ म्हणत होते ! आम्हालाही दिसत होते की ऑफीसची वेळ साडेदहा असेल तर सव्वादहाला सगळे कर्मचारी आपापल्या खुर्चीत आलेले असत ! सारांश, तो काळ चांगला की वाईट आणि हुकुमशाही वृत्तीमुळे आणीबाणी आली होती का याबाबत मतभेद होते. तर मराठी लेखकाने यात सत्याला निधडेपणाने सामोरे जाणे म्हणजे काय घडायला हवे होते ? की  अमुकच एक मत ग्राह्य धरून कृती करणे म्हणजेच सत्याला सामोरे जाणे ?

त्यांना वाटते की वाईट काळातच चांगली कलानिर्मिती होते. माझ्या तर वाचनात असेही आले होते की चांगल्या म्हणजे शांतता-समृद्धीच्या काळातच कला, संस्कृती यांना बहर येतो. कदाचित, अध्यक्षांना असे म्हणायचे असावे की आधी वाईट, हालअपेष्टांचा, हिंसेचा, अन्यायाचा अनुभव येऊन गेल्यामुळेच कला-साहित्य बहरते. काहीजण असेही म्हणताना मी ऐकले आहे की इथे महायुद्धांचे वगैरे दाहक अनुभव आलेले नसल्यानेच इथली सर्जकता कसदार होऊ शकलेली नाही. यावर एखादा म्हणू शकतो की मरू दे ना तुझी कला ! तुला चांगली कविता लिहिता यावी म्हणून

हजारोंनी तडफडत मरावे की काय ? हे पुन्हा तसेच एक बावळट विधान होते जसे – वंचित-पीडित जी साहित्य निर्मिती करेल त्या दर्जाची निर्मिती एखादा मध्यमवर्गीय करू शकणार नाही !
हे सगळे भ्रम आहेत. वाईट काळ सततच चालू असतो. माणसाचे मन हे दुफळी आणि हिंसा निर्माण करणारेच असते. स्वत:चे मनही. ‘ रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग ‘ याचाही इथे संदर्भ लागू शकतो. प्रत्येक नात्यात, प्रत्येक क्षणात संघर्ष आहे. साहित्य कसदार न होण्याची कारणे बाहेरच्या परिस्थितीत शोधणे कितपत अर्थपूर्ण आहे ? लेखकांनी सत्याला निधडेपणाने सामोरे जाणे म्हणजे काय ?
--- ००० ---

' ग्रेट ' कविता लिहिणे हे जर उद्दिष्ट असेल तर तशी कविता कदापि लिहिली जाणार नाही.

परिणामकेंद्री कविता सखोल कशी असेल ?

गाढवाच्या हल्ल्यात तीन जखमी
-- टीव्हीवरची सत्य बातमी --
राजकीय संदर्भ नाही !

तिकडचे इकडे आल्याने इकडच्यांच्या संधी घटल्या त्यामुळे आता इकडचे मूळचे फुटून तिकडे जाणार !

" या हिंसाचाराचे मूळ कशात आहे ते हुडकून त्यावर घाव घालायला हवा. "
-- आज, दि . १०-०७-२३ च्या ' पुणे सकाळ ' चा अग्रलेख.

डॉ. मोहन देस
हे आपले मित्र ' आरोग्यभान ' ही एक अत्यंत महत्त्वाची चळवळ चालवत आहेत. आज दि. १०-०७-२३ ची मटा पुरवणी बघा. आदर !

या पुरोगामी महाराष्ट्राच्या मंत्रालयातली केबिन नंबर ६०२ अपशकुनी आहे !

नाटक सांगोपांग ( समीक्षा )
ले ० नीलकंठ कदम, प्र ० शब्दालय प्रकाशन.
नीलकंठ कदम हे माझे एक जुने मित्र आहेत. ते गेली अनेक वर्षे अनेक नियतकालिकांतून व वर्तमानपत्रांतून नाट्य-परीक्षणे लिहीत आलेले आहेत. समक्ष बोलण्यातून वा गप्पांतून सामाजिक-राजकीय भूमिकेबाबतचे त्यांचे आग्रह

जाणवत असले तरी ती चौकट त्यांच्या कामाला बाधित करताना दिसत नाही. प्रत्येक नाटकाला त्या त्या नाटकाच्या ' असण्या ' प्रमाणे प्रतिसाद देण्याची कुवत असलेले हे समीक्षक आहेत. त्यांच्या या पुस्तकात वेळोवेळी त्यांनी लिहिलेली नाट्य-परीक्षणे समाविष्ट आहेत. ती अर्थातच दर्जेदार म्हणावीत अशी आहेत. ' शोभायात्रा ', ' यळकोट ', ' अधांतर', ' रणांगण ', ( माझे ) ' ढोलताशे ' अशा अनेक नाटकांची परीक्षणे इथे आहेत. शिवाय, प्रेमानंद गज्वी, दत्ता पाटील, श्याम मनोहर अशा काही लेखकांवरचे लेखही आहेत. त्यामुळे अभ्यासकांना आणि नाट्यकर्मींना इथे रंगभूमीवर काय काय कसे कसे घडत आलेले आहे याचे सहजच भान मिळते. कदमांची परीक्षणे ही नुसती गोषवारा देणारी नसून त्यांना जाणवलेल्या त्या त्या नाटकांच्या वैशिष्ट्यांनी आणि बारकाव्यांनी युक्त अशी आहेत. सारांश म्हणजे हे एक चिंतनशील समीक्षक आहेत. नाटकातल्या जीवनप्रवाहाला ते सहज सामोरे जाताना दिसतात. या पुस्तकामुळे कदमांची ही मूल्यात्मकता विशेषत्वाने जाणवली. आणि हेही आले लक्षात की कदमांच्या योग्यते एवढे लक्ष काही नाट्यक्षेत्रात त्यांच्याकडे दिले गेलेले नाही. खरे तर हे समीक्षक आणि प्रशिक्षक दोन्ही आहेत.

नाट्य-परीक्षणांबाबत एकत्रितपणे वाचल्याने हे काही, आजवर नीट लक्षात न आलेले तर समजलेच पण त्याहून महत्त्वाची म्हणावी अशी एक गोष्ट लक्षात आली. कदमांनी लिहिलेल्या काही नाटकांच्या संहितांच्या आस्वादक समीक्षा या पुस्तकात आहेत. ते लेखन मराठी नाट्य क्षेत्रासाठी खूप महत्त्वाचे आहे असे मला वाटते. कोणत्याही नाटकाची व्यामिश्रता आणि समग्रता समजण्यासाठी खुले आणि पूर्वग्रहविरहित मन असणे आवश्यक आहे. तसे मन असलेला हा समीक्षक आहे, हे मला माहीतच नव्हते. कदाचित बऱ्याचजणांना ते माहीत नसेल. या पुस्तकामुळे कदमांची नाट्यसंहितेची आस्वादक समीक्षा या प्रकारातली महारत विशेष लक्षात आली. हे नव्याने घडले. कविता, कथा, कादंबरी यांच्या आस्वादक समीक्षा आहेत पण नाटकाच्या संहितांबाबत या प्रकाराचा अभावच दिसतो. कदमांची या प्रकारच्या लेखनातली क्षमता पाहता त्यांनी किमान दहा तरी त्यांना चांगल्या वाटणाऱ्या नाटकांच्या आस्वादक समीक्षा लिहाव्यात असे इथे सुचवावेसे वाटते. नाटक पाहण्याचे / समजून घेण्याचे ते उत्तम वस्तुपाठ ठरतील यात शंका नाही.

या पुस्तकात, विशेषत: ' डॉ. हुद्दार ' या नाटकावरचा सविस्तर लेख पाहावा. सार्त्रच्या ' क्राईम पॅशनेल ' या नाटकाचे श्री. ना. पेंडसे यांनी केलेले हे नाट्यरूपांतर आहे. ( याच नाटकाचे रूपांतर दिलीप जगताप यांनीही ' रंगे हाथ ' या नावाने केलेले आहे. ) या नाटकात विचारांचे गुंते आणि मनातली आंतरद्वंद्वे यांची एक खूप व्यामिश्र अशी प्रक्रिया घडत जाते. ती खुल्या मनाने पाहात जाण्याला कदमांनी त्यांच्या या लेखात दिलेली अभिव्यक्ती खास दाद द्यावी अशी आहे. उदाहरणादाखल हा उतारा बघा --

" नाट्यवस्तूच्या संदर्भात बॉंबस्फोटाचा विचार करू जाता प्रत्ययाला येते ते असे की, चंदन आणि हुद्दार यांच्यामधल्या विरोधाचे सूचन होणे, चंदाने हुद्दारांच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होणे, खुनाची कृती करावी किंवा नाही, ह्या मानसिक आंदोलनात सापडलेल्या चंदनच्या हातून प्रत्यक्ष कृती न घडणे, त्यामुळे त्याला स्वत:च्या भेकडपणाचा प्रत्यय येऊन व्यक्तिमत्व-लोपाच्या दु:खद अनुभवाला सामोरे जावे लागणे, अशा विविध अनुभवघटकांना साक्षात करून आणि ' पुढे काय ' अशी विलक्षण उत्सुकता निर्माण करून हे दृश्य समाप्त होते. नाट्यवस्तूच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरावे असे हे दृश्य आहे. "

एवढे सगळे जाणवणे हे मन लवचिक, तरल, खुले असल्याशिवाय शक्य नाही. हा पूर्ण लेखच या विशेष कुवतीसाठी वाचण्यासारखा आहे. नाटकात जे जे घडत जाते ते ते आणि जे जे बोलले जाते ते ते असे सर्व एकत्रितपणे पाहण्याचा जिवंतपणा असल्याशिवाय हे घडू शकणार नाही. एखाद्या चांगल्या कलाकृतीची समृद्धी अशी जाणवत जाणे आणि ती मांडलीही जाणे हे कला क्षेत्रातले एक महत्त्वाचे घटित समजायला हवे. याच प्रकारची संवेदनशीलता आणि नाटकाच्या प्रक्रियेतले अनेक बारकावे जाणवत जाणे आणि ते नीट मांडले जात राहणे हे कदमांच्या ' आत्मकथा ' या एलकुंचवारलिखित नाटकावरच्या लेखातही प्रत्ययाला येते. हीच किमया अगदी नव्या पिढीचा लेखक असलेल्या धर्मकीर्ती सुमंत याच्या ' गेली एकवीस वर्षे ' या नाटकावरील लेखातही जाणवते.
कदमांची नाट्यसमीक्षा ही नुसती माहितीपूर्ण गोषवारा अशा प्रकारातली नाही. लेखकाला जे काही म्हणायचे आहे ते सर्व समजून घेत त्याहूनही अधिक अशा प्रत्यक्ष जगण्याच्या परिप्रेक्षात ही समीक्षा नाटकाकडे पाहते. त्यामुळे, हे पुस्तक म्हणजे नुसताच एक माहितीपूर्ण संदर्भग्रंथ झालेला नसून हा एक नाटक ' जाणवून ' घेण्याच्या प्रक्रियेचा वस्तुपाठही झालेला आहे. प्राध्यापक, विद्यार्थी, अभ्यासक, नाट्यकर्मी इतकेच काय इतर नाट्यलेखकांनाही काही ' देणारा ' असा हा ग्रंथ आहे. यासाठी कदम आणि शब्दालय प्रकाशन यांना मन:पूर्वक धन्यवाद !
--- चं. प्र. देशपांडे.
--- 000 ---

' विशाल सह्याद्री ' या दैनिकात माझे ' उडत्या तबकड्या ' हे सदर दर रविवारी प्रसिद्ध होत असे. त्यात मी लिहिलेला हा लेख बघा. मी त्या वेळी २२ वर्षांचा होतो. हा लेख पाहूनच नंतर ना. वि. काकतकर यांनी ' सुसा ' दिवाळी अंकासाठी निळूभाऊंची मुलाखत घेण्याची कामगिरी माझ्यावर सोपवली होती.
निळू फुले
'कथा अकलेच्या कांद्याची' मध्ये मी या माणसाला पहिल्यांदा पाहिलं. पाहिलं आणि ठरवलं हा माणूस ज्यात आहे असं काहीही चुकवायचं नाही. म्हणून मग परवा 'लवंगी मिरची कोल्हापूरची' पाहिलं. ' एक गाव...' वगैरे पाहणं अजून काही जमलेलं नाही. पण म्हणजे एकंदरीत सांगायचा उद्देश असा की मराठी रंगभूमीवर एवढ्या प्रचंड ताकदीनं उभी राहणारी वल्ली दुसरी नाही. हे इतकं भयंकर अफलातून असं हे एवढं एकच पात्र.
लोकनाट्यातला सोंगाड्या किंवा विदूषक हा बहुधा अतिशय गतिमान असतो. एरवीच्या विनोदात शरीर - उच्चार यांचे आणखी दोन कडक वळसे तो मिसळणारच. सारांश, अभिनय म्हणजे इरसाल, उडता, फार्सिकल प्रकार. पण निळू फुले ही असली ' गडबड गोंधळ जरा पहा ' ची धमाल धुमाकूळ अजिबात करत नाही. या माणसाचा शारीरिक अभिनय म्हणजे हिंदीतल्या राजकुमारसारखा अत्यंत माफक, कमीतकमी हालचालींनी प्रचंडात प्रचंड परिणाम साधून जाणारा.
हे या माणसाला का साधत असावं याचा मी बराच विचार केला. पण ते रहस्य पूर्णपणे कळलंय असं बोलायचं धाडस होणार नाही. म्हणजे मोनालिसाच्या स्मितासारखं काहीतरी होतं. अनेक गोष्टी जाणवतात, सुचतात आणि या सगळ्यांची बेरीज म्हणजेसुध्दा पूर्ण फुले नव्हे असं वाटत राहतं. आणि हे वाटणं म्हणजेच या माणसाच्या शक्तीची

ओळख पटणं. या माणसाच्या व्यक्तिमत्वातलं हे गूढतेचं अस्तित्व हेच त्याच्या साध्या-सरळ पण गहन अभिनयाचं मूळ.

इतर नट आपले एक पांघरलेलं व्यक्तिमत्व घेऊन एका दिशेनं रोख लावून उभे असतात. सरळसोट स्पष्ट माणसं. पण याचं तस नाही. हा दारुड्या असेल, शिक्षक असेल, बीटनिक असेल, मंत्री असेल किंवा हल्या असेल - तो जे काय असेल ते वठवत असतो सुसंगतपणे -- पण सारखं असं वाटतं की या सगळयांपासून हा कुठंतरी दूर आहे. असं वाटतं की निळू फुले नामक एक माणूस मंत्र्याची भूमिका वठवत असून खच्चून भरलेला क्षणाक्षणाला हास्यानं फुलणारा प्रेक्षक समुदाय हे पाहतो आहे -- या सगळयाचं एक संपूर्ण अवधान या माणसाला असावं. त्यामुळे हा माणूस उघड उघड आपल्यासमोर अभिनय करतोय हेही जाणवत राहतं.( काहीजणांना त्याचा हा मिस्किलपणा आहे असं वाटून रागही येण्याची शक्यता आहे !) आणि तरीहि आपण स्वत:च स्वीकारलेला समोर चाललेल्या गोष्टीच्या खरेपणाचा भ्रम अबाधित राहतो, त्याचा भंग होण्याऐवजी उलट निळूनं निर्माण केलेल्या या अंतरामुळे त्या खरेपणाला जणू एक तिसरं परिमाणच लाभतं.

राम नगरकर हा माणूस एक भाबडा टारगटपणा किंवा टारगट भाबडेपणा करण्यात अस्सल पटाईत. पण त्याच्यात प्रेक्षकांवर एक सरळ सरळ आक्रमण असतं. निळूच्या अभिनयात हा आक्रमणाचा भाग नाही. तो अलिप्त असतो. हा माणूस नेहमी एक खोल गांभीर्य घेऊन उभा आहे हे आपल्याला जाणवत असतं. या माणसाचा आवाज, डोळे, बारीकसारीक हालचाली या सगळयांतून ते गांभीर्यवलय जाणवत राहतं. आणि म्हणूनच त्याच्या विनोदावर उथळपणे भडभडून हसणं शक्य होत नाही. आणि हेच या वल्लीतलं खास. आपण हसत असतो आणि आतून कुठंतरी सुटत असतो, साधे होत असतो,गंभीर होत असतो. एक निळं आभाळ फुलत असतं.

( २० ऑक्टोबर १९६८ )

Sameer S. Dalvi is with Vinayak Marathe and

.

माझा मित्र Vinit Marathe आकाशवाणीच्या एफ एम गोल्ड आणि रेनबो या वाहिन्यांवर रेडिओ जॉकी म्हणून काम करतो. आजच्या त्याच्या शो चा विषय होता 'रंग'. त्यानिमीत्ताने त्याने माझ्याकडे विचारणा केली असता मी त्याला ज्येष्ठ साहित्यिक चं. प्र. देशपांड्यांनी चित्रकार व्ही. एस. गायतोंडेंच्या चित्रांवर लिहीलेली कवितांची मालिका सुचवली होती. आजच्या प्रसारणात त्याने या मालिकेतल्या दोनेक कविता उपलब्ध आणि मर्यादित वेळेत का होईना पण लाईव्ह वाचल्या.

श्रोत्यांचा त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. हे प्रसारण ऐकणारे श्रोतेगण जगभर पसरलेले आहेत, असे मला विनितकडून कळले.

खूप आनंद झाला ! --- समीर दळवी.

नायिकेचा आदिबंध आणि मलिका अमरशेख यांची कविता

ले ० डॉ. सुप्रिया आवारे, प्र ० वर्णमुद्रा पब्लिशर्स.

१. आता माझ्यासमोर जगण्या मरण्याचे प्रश्नयत. ते आता जास्त महत्त्वाचेयत. की जसं एखाद्या हमालाला, फुटपाथवर राहणाऱ्याला बाकीचे प्रश्न नसतात. त्याला दोन वेळची भाकरी मिळवणं हे महत्त्वाचं असतं. तो हिंदी पिक्चरमधलं घर बघतो आणि समाधान पावतो. ( पान २५२ ).

२. तेव्हा निर्णय घेणं ही सुद्धा एक जबाबदारीय. जगण्याची जबाबदारी घेणं ही सुद्धा एक जबाबदारी होते आणि त्याचं ओझं होतं. आता जगायचं कसं ? जगण्याचं ध्येय कायय, त्याचं श्रेयस कायय ? आहे की नाही ? हे जे सगळे प्रश्नयत जे पोटाची खळगी भरण्याव्यतिरिक्त पडलेले प्रश्नयत , ते सनातन आहेत. जे संतांनी पण विचारले आणि बाकीच्या लोकांनी पण विचारले. त्याकडे हा अस्तित्ववाद घेऊन जातो आणि मुळात आपण आपल्या अस्तित्वाला प्रश्न विचारणं इथूनच खऱ्या ज्ञानाची सुरुवात होते. तुम्हाला सत्य कायय माहीत नसतं. त्याही पलीकडे सत्य असेलच असं नाही. मे बी नसेलही. ( पान २५९-६० ).

--- ही दोन उद्धृते आहेत मलिका यांच्या मुलाखतीतली, काही प्रश्नांबाबत बोलताना त्यांनी दिलेल्या उत्तरांतली. याचप्रमाणे, त्यांचा ' भीषण गर्म हवा ' हा संग्रह २०२१ साली प्रसिद्ध झाल्यावर लिहिलेल्या ' परिशिष्ट १ ' मध्ये डॉ. आवारे लिहितात, "शेकडो वर्षे एका त्रासातून दुसऱ्या त्रासामध्ये अस्तित्वालाच कंटाळा आला आहे असं ती म्हणते. हा प्रवास मनुष्यजातीचा आहे तसाच तो स्त्रीजातीचाही आहे. परंतु अशा संघर्षाकडे पाहण्याची मलिकाची दृष्टी स्त्री-पुरुष भेद टाळून अधिक विस्तारत जाताना दिसते. या ताणातून सुटका करून घेताना ती एक पर्याय म्हणून पाहते की,

या नको असलेल्या अस्तित्वाचं पुन्हा कशात तरी रूपांतर करावं

की या अस्तित्वाला कुलूप लावून बिनबोभाट गुपचूप पळून जावं

परंतु अस्तित्वाचं दार बंद करणं हे मरणसदृश आहे. आत्यंतिक दबावामुळे रूपांतरणाऐवजी संपून जाणं स्वीकारावं हे सकारात्मक असत नाही. जाणं-येणं हा खरं तर अध्यात्माचा विषय येथे वैश्विक बनून येतो. प्रत्येक मनुष्याला व प्रत्येक काळाला कंटाळा आणणारं हे जाणं-येणं आहे, " ( पान २७२ ).

यावरून एक लक्षात येते की मलिका अमरशेख यांच्या कवितेतला विद्रोह वा स्त्रीवाद हा तुकड्यांचा नसून समावेशक आहे. पुरुषसत्ताक व्यवस्था, स्त्रीचे शोषण हे विषय तर आहेतच पण त्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोण हा एखाद्या बाजूचा वा एखाद्या शत्रुत्वाचा नाही आहे. त्यामुळे या कवितेला नुसत्याच एखाद्या चळवळीचे रूप न राहता तिला अधिक मूलभूत असे ' आदिबंधात्मक ' रूप येते. एका ठिकाणचे हे एक महत्त्वाचे विवेचन पहा –

" शरीरसंबंधाविषयी मलिकाने -- स्त्रीने घेतलेली भूमिका मराठी काव्यप्रांतात महत्त्वपूर्ण व प्रथमच आहे. कवयित्रीला दोघांनाही मिळालेला सेक्सचा अधिकार सर्वात मोठ्या पारितोषिकासारखा वाटतो. ती नव्या जगात प्रवेश करताना मानवाला शरीर संबंधानं येणारा अधिकार प्रथम मिळवू इच्छिते. तिच्या नवीन जगाच्या बांधणीतली ही मानवतावादी भूमिका आहे. त्या आधारित नवं जग तिला अपेक्षित आहे. हा आनंद अस्सलपणे उपभोगणाऱ्या काल्पनिक नेणीवेचं चित्र ती रेखाटते. ते दोघांनाही आदिम

स्त्री-पुरुषापर्यंत घेऊन जाणारं आहे. " ( पान ११७ ).

मलिका अमरशेख यांच्या कवितेचा अत्यंत आत्मीयतेने धांडोळा घेणारे हे पुस्तक आहे.

--- ००० ---

तुमच्याशी फुटून सत्तेवर इकडे
ठोकली आम्ही मांड
तरीही तुम्हीच आमचे हायकमांड !

सोडुन जावे असा दुरावाही नाही
जवळ यायला छान बहाणाही नाही
--- चंद्रशेखर सानेकर.

एकटे दुकटे शेर

कवी – चंद्रशेखर सानेकर, प्र ० ग्रंथाली

यातले सगळेच शेर सगळ्यांना आवडतील असे नाही. वेगवेगळे शेर वेगवेगळ्यांना आवडू शकतील. मला चांगले वाटलेले खाली देतोय –

आपापली सगळ्यांनी तलवार उपसली आहे
पण कोणाशी लढायचे हे कोणी जाणत नाही ०८
आपण अपुले एकाकीपण कोणावरही लादत नसतो
म्हणजे दारू पीतानाही दोस्त आपला सोबत नसतो १६
तुझ्या नि माझ्या प्रेमाचा ज्या वेळी करार ठरला
देवाने माझ्यात भास अन तुझ्यात पारा भरला १७
अश्रू पुसणे देवालाही आता झेपत नाही
काळाचाही रुमाल आता विटका झाला आहे ३२
त्या रणरणत्या उन्हास आपण शिव्या देत होतो तेव्हा
एक झुळुक आली होती पण आपण ती जगलो नाही ३८
पडताना असतो थकवा, उठतानाही असतो थकवा
रात्र एक अफवा आहे की झोप हीच आहे अफवा ४७
मला फक्त आवडला होता एक प्रश्न अनवटसा
कैक उत्तरांनी माझ्यावर चिडून हल्ला केला ४८
तिचीच तुजला लागत आहे ठेच सतत
तुझ्या मनावर पडली आहे जी आठी ५३

उदास होण्याचीही इच्छा उरली नाही
काळ मनाला भीषण रोगी करतो आहे ५८
कुणास ठाउक कुठे भटकते, कुठून येते
माझ्यापेक्षा झोपच माझी थकून येते ५९
कापरा आवाज, मुद्दे शुन्य, धूसर शब्दही
बघ, किती अंदाजवाणे बोलतो आहेस तू ८१
सोडून जावे असा दुरावाही नाही
जवळ यायला छान बहाणाही नाही ८२
गाभ्याविषयी तुला तेवढी आस्था नाही
कलेवराची तुला जेवढी चिंता आहे १०२
एका महान सत्याचा सत्कार सोहळा आहे
आणिक तोही असंख्य बेवारस अफवांच्या हस्ते १११
युद्धाने थकलेल्या दुनियेची ही मजबूरी आहे
युद्धाशिवाय परवडणारा दुसरा विरंगुळा नाही ११२
गरुडाचे कौतुक करताना हजारदा तू विचार कर
फक्त कावळ्यांची वस्ती जर तुझ्या भोवताली आहे ११३
तो माझा आरसा फोडतो हे नाही भय माझे
मीच सतत माझ्या चेहऱ्यावर शंका घेतो आहे ११५
हवा बिघडली आहे की आकाशच थकले आहे ?
अनेक पक्ष्यांना पंखांचे ओझे होते आहे ११६
आजवरी जे काही केले तंद्रीतच केले सगळे
गुजराणच केलेली नाही कुठल्याही भानावर मी १४०
एथवर आलास तर जाणीव ही टाकून दे !
गाठले आहेस आता टोक तर, झोकून दे ! १४१
एकमेकांची भोके झाकली एवढी त्यांनी की –
एक ठिगळ दुसऱ्या ठिगळाला मानपत्र देते आहे १४४

--- नुसतीच शाब्दिक चमत्कृती नव्हे तर जगता जगता बसलेले हे ‘ अर्थधक्के ’ आहेत. प्रत्यक्ष जगताना जर जागे असणे घडत असेल तरच अशा ओळी येणे शक्य आहे.

यावर वेगळा अभिप्राय काय देणार ?

हाच अभिप्राय समजावा.

--- ००० ---

एकजुटीसाठी आलेल्यांना नितीशजींनी फक्त दोन ग्लुकोज बिस्किटे आणि चहा दिला म्हणे ! अशाने एकजूट बलवान कशी होईल ?

राजकीय --
" भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे ! "

" ऐन वेळी तो पंतप्रधानपदासाठी
अडून बसेल -- बघ तू -- "

" त्यांचा अर्धा इंडियन तर आधीच आपण काबीज केलाय ! "

अर्थभ्रष्ट आणि तत्त्वभ्रष्ट यांचा जंगी मी-मी तू-तू सामना -- स्थळ -- लोककल्याण मैदान, लोकशाही मॉल जवळ, संविधान नगर -- १.

ते काय ते बुद्धिप्रामाण्यवाद आणि काय ते विवेक -- त्याचा होईल काय हो काही उपयोग ?

फुटीचे राजकारण नको म्हणणारे स्वत:च फुटावेत ना ! कसला हा दैवाचा खेळ !

१ --- आम्ही कदापि त्यांना सोबत घेणार नाही. २ --- आम्ही कदापि त्यांच्या सोबत जाणार नाही. (१ आणि २) चला, आजपासून आपण एकत्र !

ओळख

अब्सर्ड थिएटर हे मानवी जगण्यातली अनिश्चितता, अतार्किकता, अर्थहीनता आणि हेतुशून्यता यांचे दर्शन घडवते. आपल्याकडे काही शहाणे म्हणतात की आता संपला अब्सर्डचा काळ. अशा प्रकारे, माणसाच्या मूलभूत समस्यांकडे गांभीर्याने पाहणाऱ्या कलाकृतींचा काळ संपत नसतो. मूलभूत समस्या या काही, चळवळी वा सामाजिक-राजकीय दुरुस्त्या यांनी संपणाऱ्या नसतात. त्या सततच माणसाच्या जगण्याचा भाग असतात. माणसाची ओळख ही अशी एक समस्या आहे. ‘ हेल इज अदर पीपल ‘ असे सार्त्रच्या नाटकातले वाक्य हे काही त्याचे तत्त्वज्ञान नाही. आपली ओळख पक्की करत गेलेल्या माणसाचा तो अनुभव आहे. आपण आपल्या धार्मिक, विचारसरणीच्या, जातीय वा भाषिक ओळखी पक्क्या करत नेतो आणि मग ‘ हेल इज अदर पीपल ‘ हे आपलेही जगणे होते. स्वत:ची ओळख हा आपला आत्मगौरव असतो. ते जणू आपण निवडलेले आदर्श असतात. अशा ओळखी घडवण्यात आपण सतत मग्न

असतो आणि त्यात निर्लज्जही असतो. आपण स्वत:च्या अशाही ओळखी घडवतो – जातवादी-पुरोगामी, धर्मवादी-सेक्युलर आणि बंधुत्ववादी-द्वेष्टा. आपल्या ओळखींत असे आंतर्विरोधही असतात आणि त्यांतले काय, कुठे वर्तनात आणायचे ते आपोआप घडत असते. मुख्य म्हणजे आपल्या ओळखीमुळे इतर व्यक्ती वा वेगळ्या ओळखींचे समूह आपल्याला शत्रू वाटू लागतात. प्रत्येक ओळखवाला समूह आपापल्या वर्चस्वाची स्वप्ने पाहू लागतो. वेगवेगळ्या समूहांचे स्वार्थ आणि स्वप्ने यांचे क्लॅशेस उडणे वा टक्करी होणे अपरिहार्य बनते. माझ्या जातीचे प्राबल्य असेल तिथे माझ्या जातीच्या लोकांना अधिक संधी मिळायला हव्यात, त्याचप्रमाणे माझ्या धर्माच्या संख्येच्या प्राबल्याच्या प्रांतात दुसऱ्या धर्माचे प्राबल्य वाढता कामा नये – असे अटळ संघर्ष चालू होतात. यात धर्माच्या अर्थाचा कवडीचा संबंध नसतो, तो एक शिक्का असतो फक्त. मग आपण वेडपटासारखी ‘ मजहब नही सिखाता आपसमे बैर रखना ‘ अशी गाणी म्हणत आत्मगौरव साजरा करत राहतो. सगळ्यांचे रक्त लालच असते, अशी निर्बुद्ध वाक्ये बडबडत राहतो. ‘ माणसा माणसा माणूस हो ‘ असे उदात्त काही बोलत आपण किती समंजस आहोत असे भ्रम तयार करत राहतो. बोंबलायला माणूस व्हायचे म्हणजे करायचे काय, असा प्रश्नही आपल्याला पडत नाही. या प्रक्रियेतून अर्थातच संघर्ष, युद्धे आणि हिंसा घडत जाणे अपरिहार्य असते. अमुक हिंसा ‘ त्यांनी ‘ घडवली, मी नाही, असे म्हणणे हे पूर्ण खोटे आणि तथ्यहीन असते. कारण या ‘ व्यवस्थे ‘ ला बढावा देण्याचे काम आपण सगळेच करत असतो. हे पाहिले तर युक्रेन युद्ध आणि तिथली हानी यांना आपणही जबाबदार असतो. त्याचप्रमाणे माणिपूरच्या हिंसेतही आपला असा अप्रत्यक्ष सहभाग असतो. पण, आपल्या ओळखीला धोका आणणारे प्रश्न आपण पाहूही इच्छित नाही. ओळख नसेल तर मृत्यूच की तो – ही भीती असते. मग आपण तिकडे जी हिंसा झाली त्याला ‘ अरेरे ‘ म्हणतो वा दोन अश्रूही ढाळतो. मग आपली धावपळ सुरू होते ती याची जबाबदारी आपल्या बाहेर कुठेतरी डकवण्याची. कोणतीही हिंसा घडते तेव्हा योग्यायोग्य, नैतिकता या गोष्टी अदृश्य झालेल्या असतात आणि अविचार आणि क्रूरपणा यांनी ताबा घेतलेला असतो. ‘ किती घृणास्पद, किती किळसवाणे ‘ असे म्हणत आपण किती ‘ माणूस ‘ आहोत याचे समाधान आपण निर्माण करत राहतो. या अशा हिंसेची मूळ जागतिक प्रक्रिया ही आपण सतत देत असलेल्या बळानेच कार्यरत असते, हे आपल्याला पाहायचे नसते. मग त्याची सामाजिक-राजकीय विद्वत्ता आपण करत बसतो. दु:ख दाखवण्यात वा निषेध व्यक्त करण्यात तुम्ही सिलेक्टिव्ह आहात असे एकमेकांवर आरोप करत राहतो. महत्त्वाकांक्षा, द्वेष, वर्चस्वाची इच्छा असणारच हो, पण, इतकी हिंसा ? शी शी ! असे आपण म्हणत राहतो. या सगळ्याच्या मुळाशी असतो आपल्यातला हिंसकपणा ! तो सामूहिकपणे कधीच जाऊ नाही शकत, समूहाला तो प्रश्नही नाही पडू शकत. व्यक्तीला पडू शकतो हा प्रश्न – या हिंसेच्या प्रक्रियेला असणारी माझी काँट्रिब्यूशन – देन मला थांबवता येईल का ? पण हा तर झाला आध्यात्मिक प्रश्न ! याचा काहीच उपयोग नाही ! चालू द्या आहे ते, झाले ! – हा होतो शेवट !

०००

कविता समजली नाही की काही लोक चिडून कवीचे मूल्यमापन करू लागतात !

सतत कुठे ना कुठे मात करण्याच्या विचारात व्यग्र असणाऱ्या माणसाचा कोणत्याही कलेशी संबंध कसा असेल ?

मोहन आगाशे यांच्या निमित्ताने

मोहन आगाशे हे भारतातले एक मोठे आणि गाजलेले अभिनेते आहेत, हे आपण जाणतोच. शिवाय त्यांची सामाजिक प्रश्नांबाबतची सजगताही प्रसिद्ध आहे. त्यांना आज पुण्यात ‘ पुण्यभूषण ‘ हा पुरस्कार दिला जाणार आहे. हे अर्थातच आनंदाचे आणि अभिनंदनीय आहे. या निमित्ताने आजच्या ( २३-०७-२३ ) पुणे मटा मध्ये डॉ. जब्बार पटेलांचा एक लेख आलेला आहे. त्यातला हा ‘ जैत रे जैत ‘ मधल्या एका दृश्याबाबतचा भाग पहा – “ माशांचे मोहोळ उठते, असा एक प्रसंग चित्रपटात आहे. हा प्रसंग जिवंत वाटावा यासाठी मोहनने महाबळेश्वरहून माशा आणायला लावल्या. चित्रीकरणादरम्यान हजार ते दोन हजार माशा आम्ही त्याच्या अंगावर सोडल्या. मोहनचे अंग लालबुंद झाले. चारपाच तास तो लहान मुलाप्रमाणे रडत होता. वेदनेने विव्हळत होता. त्या त्रासातही त्याचा प्रश्न होता, “ शॉट चांगला झाला ना ? “ कामाचा ध्यास आणखी वेगळा काय असतो ? “

अशाच कामाच्या ध्यासाबद्दलचा अशोक कुमार यांचा एक किस्सा ऐकल्याचे आठवते. त्यांना खूप आजारी असल्याचा एक सीन करायचा होता, तर त्यांनी काय केले असेल ? एकदा बर्फ खायचा मग त्यावर लगेच गरम कॉफी प्यायची मग पुन्हा बर्फ आणि पुन्हा गरम कॉफी असे करून त्यांनी स्वत:च्या घशाची वाट लावून घेतली आणि मग तो सीन खरेच आजारी पडून हुबेहूब खराच वाटावा असा रंगवला ! तसाच एक प्रकार ‘ गुमराह ‘ या चित्रपटाबाबत ऐकला होता. बायकोशी भांडणाचा सीन घ्यायचा होता तर त्यातले बारकावे यावेत म्हणून तो दिग्दर्शक की नट खरोखरच घरी बायकोशी भांडून आला होता ! एका चित्रपटात, बहुतेक ‘ खूनपसीना ‘ असावा, त्यात अमिताभची एका वाघाबरोबरची मारामारी दाखवलेली आहे ! त्या वेळी खरोखरचा वाघ अमिताभच्या अंगावर सोडला होता का, ते मला माहीत नाही. पण नसावा, कारण पुढे आणि अजूनही तो अनेक चित्रपटांतून कामे करतो आहे !

मला प्रश्न असा पडतो की अभिनय प्रभावी व्हावा म्हणून खरेच असे नटाचे वा नटीचे हाल करायची गरज असते का ? तसे असेल तर हे अमानुष नाही वाटत ? ‘ या चित्रपटात पशुपक्ष्यांचे कोणतेही, कसलेही हाल करण्यात आलेले नाहीत ‘ असे एक निवेदन चित्रपटापूर्वी दिले पाहिजे, असा एक कायदा आहे. त्याचप्रमाणे ‘ या चित्रपटातील कोणत्याही कलाकार व्यक्तीचे कसलेही हाल करण्यात आलेले नाहीत ‘ असे एक निवेदनही बंधनकारक करावे का ? एखाद्या मित्राला गंमतीने म्हटले जाते, “ ती वेड्याची भूमिका तू उत्तमच वठवशील – तुला अभिनय करायची गरजच नाही ! “ तर ते असो. खऱ्या गोष्टींची अभिनय म्हणून दाद मिळवणे हे कितपत योग्य वाटते ? मग तर एखाद्या चलती असलेल्या हीरोची चंगळच होईल ! त्याच्या चित्रपटातल्या त्याच्या प्रत्येक प्रेयसीला त्याच्यावर खरोखरचे प्रेम करायला लावावे लागेल !

पण मग एखादा चित्रपट स्टुडिओ जळल्यावर त्या स्टुडिओच्या मालकाला खूप दु:ख होते, असे दृश्य घ्यायचे असेल तर खरोखर पेटवून द्यायचा एखादा स्टुडिओ ? आणि मग भ्रष्टाचारात पकडला गेल्याने खजील झालेल्या किंवा बलात्काराच्या गुन्ह्यात एकजण फाशी जाणार आहे, असे दृश्य घ्यायचे असेल तर ?

काहीतरी चुकते आहे, असे नाही वाटत ?

--- ००० ---

गझलच्या उजेडात गझल

ले ० चंद्रशेखर सानेकर, प्र ० ग्रंथाली.

सुरुवातीच्या मनोगतात सानेकर म्हणतात, “काटेकोर चिकीत्सकाच्या नजरेला हे चिंतन ढोबळ व भरड वाटू शकतं याचंही मला भान आहे. ” हे तितकेसे खरे नाही. मुळात गझल या विषयावर असे विश्लेषक लेखन आहे किती मराठीत, हा एक प्रश्नच आहे. सानेकरांनी ती पोकळी नक्कीच बरीच भरून काढलेली आहे. सानेकर स्वत: एक चांगले गझलकार असून त्यांना या काव्यप्रकाराबाबत प्रचंड आत्मीयता आणि आच आहे. त्याच प्रेमाने त्यांनी या विषयाचा सखोल अभ्यासही केलेला आहे, हे या पुस्तकात जाणवते. गझलेची बाह्य वैशिष्ट्ये आणि तीतले सखोल मर्म-प्रदेश यांचे निर्देश सानेकरांनी यथायोग्य भाषेत व्यक्त केलेले आहेत. स्त्रियांनी लिहिलेल्या गझला कमी का आहेत, मराठी कवींना ( सुरेश भट सोडून ) गझल फारशी का जमली नसावी, अशा विषयांबाबतची त्यांची विवेचने चिंतनीय आहेत. मराठी, हिंदी आणि उर्दू भाषांतल्या काही गझलांचे वेळोवेळी त्यांनी दिलेले दाखले नक्कीच विषयाची जाण वाढवणारे आहेत. कविता आणि गझल यांची त्यांनी केलेली तुलना आणि तीतले काही मुद्दे पटण्यासारखे नसले तरी विचाराला चालना देणारे आहेत. या पुस्तकात अनेक वाक्ये अशी आहेत की जी सानेकरांच्या अनेक वर्षांच्या चिंतनातून आलेली आहेत, हे जाणवते. नमून्यादाखल खाली काही उद्धृते देत आहे –

“ कुठल्याही विचारसरणीची, इझमची, विषयाची पोझ घेऊन, अभिनिवेश घेऊन गझल लिहिता येत नाही. ”

“ विलक्षण शैलीत, विलक्षण शब्दांत सांगितलेली विलक्षण गोष्ट म्हणजे गझल. ”

“ कला म्हणजे रासिकाला ‘ धडा शिकवणं ‘ नव्हे, तर त्याच्या नकळत कणभर का होई ना त्याला ‘ समृद्ध ‘ करणं म्हणजे कला. ”

याहून अधिक सूक्ष्म आणि सखोल अशी बरीच आहेत वाक्ये.

या पुस्तकात काही वेळा पुनरुक्तीचा दोष जाणवतो. पण हे काही एखाद्या हुशार अशा शिस्तबद्ध प्राध्यापकाने लिहिलेले पुस्तक नाही. हे एका कवीने लिहिलेले आहे, हे समजून घ्यावे लागेल. यापुढे, कदाचित, अशी पुस्तके वा समीक्षात्मक टिपणे ही स्वत: लेखक-कवी असलेल्यांनाच लिहावी लागतील, अशी शक्यता आहे. अशी कामे करतील असे फारसे कुणी दृष्टीपथात नाहीत. सर्व सांस्कृतिक विकासाला आता इथले राजकारणाचे क्षेत्र पुरेसे आहे !

सानेकरांचा एक शेर –

“ तू गझलेच्या वाट्याला जाऊस नको<br>
तुला एकले असणे जर झेपत नाही ”

तसे तर हे सर्वच कलेला लागू होईल. कला हे टोळीचे क्षेत्र असूच नाही शकत. अनेक मोठमोठ्या कलावंतांनी हे वेगवेगळ्या प्रकारांनी सांगितलेले आहे.

--- ००० ---

सर्व मित्र-मैत्रिणींना

एक अत्यंत कडक पण विनम्र विनंती

माझ्याकडे आलेल्या बहुतेक सर्व पुस्तकांवर अभिप्राय लिहून ते इथे सर्वांसमोर ठेवण्याचे काम झालेले आहे. मी यापूर्वीही एकदा विनंती केली होती की आता यापुढे कुणीही काहीही माझ्या वाचनासाठी पाठवू नये. तरीही प्रेमापोटी काही पुस्तके येत राहिली. मग प्रश्न येतो माझ्या भिडस्तपणाचा. शक्य तो करावेच हे काम असे घडत राहते. पण आता, ही मात्र कृपया कडक विनंती समजावी. माझ्याकडे वाचनार्थ, अभिप्रायार्थ काहीही पाठवू नये. आता माझा भिडस्तपणाही मला सोडावा लागणार आहे. यापुढे असे काहीही आले तरी मी ते वाचण्याची शक्यता नाही, हे ठाम समजावे. आता येणारी पुस्तके, माझ्यानंतर, माझ्या इतर पुस्तकांबरोबर, एखाद्या अभ्यासकाकडे वा एखाद्या वाचनालयाकडे जातील. हल्ली प्रकाशनात प्रती काढतोच आपण कमी, त्यात माझ्याकडे पाठवून एक प्रत वाया घालवू नये.

आता माझे ७८ चालू आहे. आजवर झालेल्या माझ्या लेखनाची व्यवस्था लावणे, जमल्यास काही पुस्तके प्रकाशित करणे, असे मोठे काम आहे. शिवाय नवीन काही लिहायचे आहेच. कामाचे तास तसे कमी झालेले आहेत. हे सर्व कृपया लक्षात घ्यावे. मला वाचायचीच आहेत अशी काही घेऊन ठेवलेली पुस्तके काही वर्षे पडून आहेत. त्यामुळे, सारांश म्हणजे, मी वाचन बंदच केलेले आहे, असे समजावे आणि राग मानू नये, ही विनंती. आता, मी माझ्याच लेखनाला महत्त्व देत असा निर्णय का घ्यावा, हा प्रश्न आहेच. तो माझा एक निरर्थक स्वार्थ समजावा ! आणि दुसरे म्हणजे माझे हे काम फक्त मीच करावे लागेल, हाही एक पेच आहेच !

तर ही कडक विनंती समजून घ्यावी -- समजून नाही घेतली तरी माझ्या या निर्णयात बदल होणार नाही. जय हिंद, जय महाराष्ट्र !

--- ००० ---

“ साहेब ( माणजे मी ), तुम्हीसुद्धा ? “

एका खेड्यात ब्रँच मॅनेजर होतो. तिथे एक टूरिंग टॉकीज होते. त्यांच्याकडे येणाऱ्या सिनेमांच्या पेट्यांची बिले आमच्या मार्फत सोडवावी लागत. एकदा एका दाक्षिणात्य सिनेमाचे बिल आले होते. तो सिनेमा प्रचंड अश्लील असल्याची चर्चा मला माहीत होती. त्या बिलाचा व्यवहार करताना त्या थिएटर मालकाला मी म्हणालो की ‘ मी येणार आहे बरं का आज – ‘ त्याला आश्चर्य वाटले. ‘ साहेब, तुम्ही ? ‘ तो म्हणाला. मग शिताफीने, मीही एक साधा माणूसच असल्याचे त्याला समजावले. पण त्या दिवशी इतर काही कारणांनी मी गेलो नाही. तर हे सज्जन घरी आले मला बोलवायला ! ‘ तुम्ही येणार म्हणून चालू नाही केला अजून –‘ म्हणाले ! ‘ अरे, ‘ म्हटले, ‘ नाही, मी उद्या येईन – आणि वेळेत येईन – आजचे चालू द्या तुमचे – ‘ मी म्हणालो.

त्याच खेड्यात असताना तिथे एकदा एक तमाशा आला होता. ऑफिसात सरपंच वगैरे आलेले असताना मी म्हणालो की मी येणार आहे तमाशाला. ‘ साहेब, तुम्ही ? ‘ त्यांनाही समजावून दिले की बाबा, तुमच्यासारखाच मी एक साधा

माणूस आहे. तमाशात खूपच कमरेखालचे विनोद होते. असा तमाशा शहरात असूच नाही  शकणार. साहेब कसा बघतात तमाशा, हेही काही लोक मधून मधून बघत होते !

कोल्हापुरात असताना एकदा एका ठिकाणी एक छोटा तंबू दिसला. ‘ दोन मिनिटांत मोठे नाटक ‘ असे काही तिथला तिकीट विक्रेता ओरडत होता. आम्ही दोनतीन मित्र होतो. म्हटले, पाहू तरी. दोन की पाच रुपये तिकीट होते. इकडून जायचे आणि तिकडून बाहेर पडायचे. मध्ये एका छोट्या मंचावर दोनतीन स्त्रिया त्यांच्या अवयवांचे दर्शन घडवत नाचत असायच्या. यात अर्थात कलेबिलेचा काही प्रश्नच नव्हता !

‘ आई कुठे काय करते ‘

तर, मी ही मालिका बघतो याचे काहींना आश्चर्य वाटते. ‘ एवढा दर्जेदार लेखक, हे बघतो ? ‘ असे त्यांना वाटत असावे. दर्जेदारपणाच्या आणि तशा समजल्या जाणाऱ्या लेखकाबाबतच्या लोकांच्या कल्पना फारच सोज्वळ आणि आदरभारित असतात. त्यामुळे, दर्जेदार समजले जाणे हा कधी कधी गुन्हाच ठरतो !  तर, या मालिकेत सध्या जो भाग सुरू आहे तो मला अक्षरश: तात्त्विक खोली असलेला वाटतो. म्हणजे ईशा आणि अनिरुद्ध यांचे चित्रण – त्यांचे वागणे ! थोडाफार भडकपणा आणि चोरून ऐकण्याची सवय असलेली जवळ जवळ सर्वच पात्रे, या मराठी मालिकांमधल्या अविभाज्य दुर्गुणांची इथेही रेलचेल असूनही मी हे म्हणतो आहे. ही दोन्ही पात्रे दुष्ट आहेत का, तर नाही. ती पात्रे त्यांचा स्वभाव आणि त्यांनी करून घेतलेले इतरांबाबतचे समज हे शंभर टक्के सत्य समजून वागत-जगत आहेत. प्रेक्षकांना हे त्रासदायक वाटत असले तरी पटण्यासारखे आहे. नाइलाज या विभागात लोक स्वत:च्या जगण्यातही अनेक गोष्टी स्वीकारत असतात, तसेच हे ! आपल्या आजूबाजूला असणारा आणि पसरत चाललेला हा माथेफिरूपणा जाणवत असल्याशिवाय ही अशी दृश्ये लिहिता येणार नाहीत. ही दृश्ये सादर करण्यात या एकूण टीमचेच उत्तम योगदान आहे यात शंकाच नाही.

इथे काही बोध देण्याचा हेतू नाही दिसत. पण, आपण, आपापल्या संकुचित डोक्याप्रमाणे वागत-जगत असण्याची शक्यता इथे अधोरेखित होते. हे भान प्रेक्षकांना येणे हे मला एकूण मानवी जगण्याच्याच दृष्टीने महत्त्वाचे वाटते. ही मालिका जरी अपेक्षित करमणुकीसाठीच असली तरी तिच्याकडून नकळत हे एखाद्या दर्जेदार, मोठ्या कलाकृतीचे काम होते आहे, असे मला वाटते ! म्हणून ‘ मीसुद्धा ‘ बघतो ही मालिका !

०००

Shared with Public ३१-०७-१९ ची पोस्ट.

रवीन्द्र दामोदर लाखे यांची कविता

लाख्यांच्या कवितेची अनेक वैशिष्ट्ये आणि मूल्यात्मकता यांवर मी यापूर्वी लिहिलेले आहे. आता सहज वाचता वाचता चांगल्या वाटलेल्या, म्हणजे मुद्दाम निवडून न काढलेल्या, अशा त्यांच्या दोनतीन कवितांबद्दल लिहिणार आहे. या तिन्ही कविता ‘ संपर्कक्षेत्राच्या बाहेर ‘ या संग्रहातून घेतलेल्या आहेत.

लाख्यांच्या कवितेचा एक प्रमुख म्हणावा असा विषय असतो तो म्हणजे ‘ मी ‘आणि ‘ वास्तव ‘ यांच्यांतला संघर्ष. हे वास्तव विश्वासार्ह नसते आणि प्रत्येकाचे वेगवेगळे असते. ‘ सत्य वास्तव ‘ असे काही नसते. या द्वंद्वाच्या अनेक परी

लाख्यांच्या कवितेत दिसत राहतात. वास्तव नाही तरी आभासीच आहे तर मग या आभासावर आधारितच एक बनावट वास्तव तयार करून ते न्याहाळले तर ते अधिक त्रयस्थपणे आणि पूर्णतेने समजू शकेल, या विचाराने ही कविता अशा बनावट वास्तवाचे ढीगच रचत जाते. या प्रकारे ही कविता जगण्यातल्या असंगततेला, विसंगतीला आणि अनिश्चिततेला चितारत राहते. बऱ्याचदा या कवितांतले वास्तव आपल्याला ॲब्सर्ड नाटके वा काफ्काचे जग यांची आठवण करून देते. एकाच वास्तवाचे बदलते स्वरूप आपल्याला ‘ वडील ‘ या कवितेत दिसते. घड्याळ रंगवण्याच्या घटनेतले वास्तव ( ‘ काय माहीत ' पान ७८ ), आपल्या काळाच्या कल्पनेलाही उलटेपालटे करते. या कवितांतले वास्तव हे कवीचे व्यक्तिगत वास्तव नसते. ते कोणत्याही माणसाचे वास्तव असते. व्यक्त होताना ते कवीच्या मानसिक साठ्यातून येते, इतकेच. या वास्तवाची गंमत म्हणजे इथे भावभावना, विचार, मूडस, सुखदुःखे यांच्याबरोबरच शरीराचे अवयव, वस्तू, झाडे, रस्ते, ढग अशा गोष्टीही ‘ जिवंत ‘ समजल्या जातात. यातच अबोध मनातली स्वप्ने, विचार, आठवणीही मिसळत राहतात. आपल्या परिचयाचे नसलेले विचित्र वास्तव सतत समोर येत राहते. या वास्तवाच्या जाचातून वा काचातून सुटका शक्य आहे का, हा प्रश्न या कवितांच्या मुळाशी अस्तित्वात असतो. मानवी जगण्यातला काळ आणि मृत्यू यांचाही सखोल तपास या प्रक्रियेत घेतला जात राहतो. कवितेची ही शैली आपल्या सवयीची नाही. मराठीत, वास्तव असे चुरगळून पाहणारी कविता फारशी लिहिली गेलेली नाही. त्यामुळे, ही कविता अद्वितीय ठरते. मराठी कवितेतल्या या कवितेच्या स्थानाच्या चर्चेपेक्षा या कवितेतली चिंतनशीलता वाचकाला माणूस म्हणून महत्त्वाची ठरावी, अशी ही गंभीर कविता आहे. आता उदाहरणादाखल खालील तीन कविता पाहू.

१. शांततेचा बिंदू ( पान १५८ )

शहरभर भटकल्यावर
एकभानतेनं
घराकडे परततांना
मीच निर्मनुष्य होऊ पाहतोय
पावलांचं ओझं ओढतोय.
एकेका पावलावर
आणखी कुठलंतरी ओझं वाढतंय.
कुठलं ते कळत नाहीय
तरी मी ते वाहतोय.
रिकामं पोट जड झालंय.
जडशीळ.
ते स्वतंत्र होऊ पाहतंय
माझ्या जिवंतपणाच्या जोखडातून.
मी काही त्याला अडकवून ठेवलं नाहीय.

भटकलो ज्यावरून ते रस्ते

पोटात वळवळताहेत.

ते थकले नाहीयत;

उलट वेगवान झाले आहेत;

आणि त्या रस्त्यांवर

माणसांच्या सावल्या एकवटल्या आहेत

रक्त साकळल्यासारख्या.

मी कोलाहलासारखा मल्टिपल झालोय

आणि माझ्यातून कुणी एकजण

कानावर घट्ट हात रोवून

सैरावैरा पळतोय

शोधत शांततेचा बिंदू

स्थिर होण्यासाठी.

--- ० ---

अपूर्ण ( पान १७१ )

अपुरं आणि उथळ आहे

वास्तव बाहेर

नाही मावत संपूर्ण मी

माझी खोली.

भवतालाच्या गतीत

वाहणाऱ्या जगरहाटीत

नाही राहू शकत मी

अस्खलित.

मी खिळतो

जागच्या जागी.

मी केलेल्या

आत्मझटपटीतून

येते हातात केवळ

फरफट.

ही फरफट

चौफेर होण्याची

वास्तवात उपरी होण्याची
भीती वाटतेय मला.
मी चिणून घेतोय
स्वतःला,
अभावाच्या आकाशभिंतीत
जमीनदोस्त.
मी गुदमरतोय,
माझी ही गुदमर
ऐकायला
लाभोत कान या भिंतींना
आणि लाभो वाचा
माझ्या मृत्यूला
ही गुदमर
व्यक्त करण्यासाठी.
--- ० ---
माणसं ( पान १८९ )
ही माणसं,
गर्दीत घेत असतात श्वास
मेंटली.
ही माणसं,
उचलू देतात आपलं जगणं प्रत्यक्ष गर्दीला
वागवू देतात जिवंतपणाला खांद्यावरून प्रेतवत.
ही माणसं,
उत्कट प्रेम करतात
एकटेपणाच्या त्वचारोगावर.
ही माणसं,
जपतात हा रोग
रक्ताच्या नात्यासारखा
त्यांचा जिवंतपणा
सिद्ध होण्यासाठी.
ही माणसं,

नाकारतात कुठलंही मलम

त्या खाजेवर लावण्यासाठी.

ही माणसं

घाबरतात

मलमाने पोटच्या एकटेपणाचा

खून होण्याला.

ही माणसं,

खाज बंद झाली तर

मेल्यातच होतील जमा.

ही माणसं,

दुकटी असताना

बाळाला वा नात्याला जन्म देतात

ही माणसं,

फिजिकली एकटी, मेंटली गर्दीची झाल्यावर

काळाचा सतत होत राहणारा जन्म

पाहत असतात

ही माणसं.

--- ० ---

‘ शांततेचा बिंदू ‘ या कवितेतले जगण्याचे जोखड म्हणजे वास्तवाबरोबरचा संघर्ष आणि ‘ भटकलो ज्यावरून ते रस्ते ‘ म्हणजे जमा झालेले सर्व अनुभव, हे लक्षात घेऊन कविता वाचून पाहा. ‘ अपूर्ण ‘ ही कविताही हाच संघर्ष वेगळ्या प्रकारे व्यक्त करते. जगण्यातली ‘ गुदमर ‘ जिवंत असेस्तोवर मला तरी व्यक्त करता येणे शक्य नाही आहे – माझ्या मृत्यूला ती शक्ती लाभो, असे ही कविता म्हणते ! तिसरी ‘ माणसं ‘ ही कविताही ‘ मेंटली ‘ श्वास घेणाऱ्या माणसांचीच आहे. मनाच्या उलट्यापालट्या कृती हेच जगणे ! प्रत्येकाचे वास्तव आणि वास्तवसंघर्ष वेगवेगळा असल्याने ही सर्व माणसे एकटी पडलेली आहेत. त्यांना ‘ एकटेपणाचा त्वचारोग ‘ झालेला आहे.

काहींना ही कविता दुर्बोध वाटते. त्यांच्याबरोबर ही कविता समजून घेण्याचा हा एक प्राथमिक प्रयत्न.

--- ००० –

३१-०७-२३.

आपले विचार फायनल समजणारा माणूस त्याचे पूर्ण आयुष्य क्रोधात व्यतीत करतो !

मित्रवर्य कै. ना. धों. महानोर

महानोर गेल्याचे कळले. वाईट वाटले. आम्ही दोघेही साधारण एकाच सुमारास ‘ सत्यकथे ‘ त लिहू लागलो होतो. त्यांना आणि मलाही सत्यकथेत बऱ्यापैकी फूटेज मिळत असे. गीत आणि कविता यांत एक अंतर मानले जाते. ते अंतर खूप कमी करणारे कवी म्हणजे आरती प्रभू आणि ना. धों. महानोर. शिवाय राजकीय क्षेत्रातही त्यांचा वावर होता. मुख्य म्हणजे ते एक अभ्यासू शेतकरी होते. शेती या विषयावरचे त्यांचे लेखनही वाखाणले जात असे. तशा आमच्या भेटी दोनचारच झाल्या असतील, पण, एकमेकांचे लेखन वाचून निर्माण झालेला स्नेह होता.

त्यांची एक आठवण सांगतो. २०-०२-८० ला जळगाव जिल्ह्यात एका दिवशी, सेंट्रल बँक ऑफ इंडिया या आमच्या बँकेच्या अकरा शाखा सुरू होणार होत्या. उद्घाटनाचे आयोजन वगैरे ज्या त्या शाखेच्या मॅनेजरवर सोपवण्यात आले होते. माझी प्रथमच मॅनेजर म्हणून लोहारा या शाखेसाठी नेमणूक झालेली होती. माझ्या शाखेपासून जवळच शेंदुर्णी आणि तिथून जवळच पळसखेड, हे महानोरांचे गाव हे मला माहीत झालेले होते. मला आमच्या शाखेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते व्हावे असे वाटत होते. त्यांना तशी विनंती करण्यासाठी त्यांच्या गावी जाणे आवश्यक होते. त्यासाठी बँकेचे काही उच्च अधिकारी जीप घेऊन आले. “ ते येतील या कार्यक्रमाला ? “ त्यांनी मला विचारले. म्हटले, बघू तर विचारून, चला. आणि आम्ही तिकडे गेलो. महानोरांनी आनंदाने आमचे स्वागत केले. मी बोलायला सुरुवात केली – “ मी श्याम मनोहरचा मित्र ( त्या वेळी आम्ही जिगरी दोस्त होतो ! ) या बँकेत इथे मी मॅनेजर म्हणून येतो आहे. मीही सत्यकथेत लिहीत असतो, कदाचित तुम्ही काही वाचलेही असेल. मी चंद्रकांत देशपांडे. “ इथे मला त्यांनी थांबवले. “ म्हणजे, चंद्रकांत प्रभाकर देशपांडे – “ ते म्हणाले. “ होय “, मी म्हणालो. यावर ते म्हणाले की, " श्यामच्या ओळखीची गरज नाही, तुलाच मी ओळखतो. बोल – “ मग मी त्यांना काम सांगितले. त्या दिवशी दुसरे काही नाही ना हे पाहून घेऊन ते म्हणाले, “ तुला मी नकार देऊच नाही शकणार. येईन ! “ आमचे उच्च अधिकारी चकित झाले ! या आपल्या एका साध्या मॅनेजरच्या शब्दाचे इतके वजन ? त्यानंतर महानोरांनी स्वत: आमच्याबरोबर येऊन त्यांची शेती आम्हाला दाखवली. मग परतीच्या मार्गावर असताना आमच्या अधिकाऱ्यांना, मीही कविता लिहितो, वगैरे माहिती दिली. आमच्या त्या समारंभाला अध्यक्ष म्हणून आम्ही, बहुतेक माजी सभापती, गजाननराव गरुड यांना बोलावले होते. कार्यक्रम दणक्यात झाला ! सारांश, एका राष्ट्रीयीकृत अशा मोठ्या बँकेची एक शाखा एका कवीच्या हस्ते सुरू करण्याचे पुण्य आणि आनंद मला मिळाला ! कवी असल्यामुळे ‘ वट ‘ दाखवता येण्याचा आयुष्यात घडलेला तो एकमेव महान प्रसंग !

तर असे प्रिय स्नेही असलेल्या महानोरांच्या स्मृतीस हार्दिक अभिवादन !

--- ००० ---

" मूलभूत विचारवाले ना ते ! आम्ही उथळ ! पण उथळ माणसंच जिवंत राहतात -- तळाशी जाणाऱ्यांची प्रेतं वर येतात -- "

--- नाटक -- ' दिनकर पुरोहितचा खून ' -- ( लेखक, मीच. )

काय असेल ते थोडक्यात बोल ! चटकन निर्णय सांग ! झटकन काम पूर्ण कर ! याचा अर्थ असा नाही की तुझ्या अंतःस्फूर्तीला वाव दिलाय ! नो ! सगळं पायरीपायरीनंच हवंय, पण वेगात !
( स्थळ – दिवाणखाना -- लेखक, मीच. )

कुठल्याही स्टोरीत अचानक, अनपेक्षित काही घडू शकतं. पण एखाद्या व्यक्तीनं स्वभाव बदलून घेणं धोकादायक आहे. हे असं चालत नाही. ठराविक स्वभावाच्या व्यक्ती असल्या म्हणजे स्टोरी पूर्ण होते.
( गोळ्या काढलेलं पिस्तूल -- लेखक, मीच )

काही वर्षांनंतरचा संवाद --
" तुमचे आजोबा कोणत्या पक्षात होते ? "
" ते जाऊ द्या हो -- आमच्या घराण्यात पक्ष आनुवंशिक नाही -- पक्षबदल  आनुवंशिक आहे ! "

वाचकाचे स्वातंत्र्य

लेखकाचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य या विषयावर आपण नेहमीच बोलत असतो. त्यांतलेच काही लोक लेखकाची वा कवीची मन:स्थिती कशी असायला हवी, त्याने कशी भूमिका घ्यायला हवी याबाबत आग्रही सल्लेही देताना दिसतात. पण, सामान्यत: जगभर लेखकाची चिंतनशीलता आणि त्याची आकलनप्रक्रिया यांचे महत्त्व मान्य असल्याचे दिसते. या विषयाकडे एका वेगळ्या दृष्टीनेही पाहायची गरज वाटते. कवितेचे विविध अर्थ शक्य असतात, अमुकच अर्थ योग्य असे काही नसते – या म्हणण्यात कितपत तथ्य असते, हा प्रश्न विचारात घ्यायला हवा.
कविता कशी वाचावी तर आपले कपडे काढून, किंवा वाचकाने स्वत:चे पूर्वग्रह बाजूला ठेवून कविता वाचायला हवी, किंवा वाचक हा सहृदय असायला हवा – असे म्हटले जाते तेव्हा वाचकाचे स्वातंत्र्य मर्यादित होते का, हा प्रश्न आहे. नोबेल विजेता गाओ म्हणतो की पेसोआ  हा विसाव्या शतकातला सर्वश्रेष्ठ कवी होता, आपल्याकडेही अनेकांना हे मान्य असते की ज्ञानेश्वर आणि तुकाराम हे मराठीतले सर्वश्रेष्ठ कवी आहेत. असतो का काही अर्थ अशा वाक्यांना ? कवीला समजा अभिव्यक्तीचे शंभर टक्के स्वातंत्र्य असते तसेच शंभर टक्के स्वातंत्र्य वाचकाला ती कविता समजून घेण्याच्या बाबतीत असते का ? समजा असेल तर त्याने अरुण कोलटकरच कशाला वाचायला हवेत ? – कोणत्याही एखाद्या संस्थेचा वार्षिक अहवाल घेऊन त्याचा त्याला हवी ती कविता समजून त्याला हवा तो अर्थ का लावू नये ?
--- हे प्रश्न काही नवे आहेत, असे नाही, पण, कलाक्षेत्रात हे प्रश्न नेहमीच चिंतनात असायला हवेत, असे वाटते. कवीचे स्वातंत्र्य महत्त्वाचेच असते आणि वाचकाला ‘ वाट्टेल तसे ‘ समजून घेण्याचे स्वातंत्र्य नसते, असेच मला वाटते. यावर जरूर चर्चा व्हावी असा हा विषय वाटल्याने ही पोस्ट दिलेली आहे.
--- ००० ---

४ --- झांबियाबद्दल कुणाला माहिती आहे ?

१ --- मला नाही माहीत काही --

२ -- नो -- शून्य माहिती आहे मला --

३ --- सॉरी -- नाही माहीत ---

४ --- नक्की ?

१,२,३ --- होय, नक्की --

४ --- मग, मला आहे सगळे माहीत -- ऐका ---

हरी नरके सर

' स्नेहशील विचारवंत ' या अपवादात्मक विभागात शिरोभागी घ्यावेत असे होते हरी नरके सर ! सुरुवातीला फेसबुकवर आमच्या मैत्रीपूर्ण लढती झाल्या होत्या , पण, स्नेह हाच पाया होता ! पुस्तक पेठेत आमची भेट झाली तेव्हाचा हा फोटो आहे. ही अर्थातच एक महत्त्वाची आठवण म्हणून माझ्या संग्रही असेल ! पठारे सरांबरोबर नरके सरांनी आपल्या मराठी भाषेसाठी खास कष्ट घेतलेले आहेत ! ते त्यांचे प्रयत्न फलद्रूप होवोत हीच या प्रसंगी शुभेच्छा ! सरांच्या स्मृतीस आदरपूर्वक अभिवादन !

अध्यात्म आणि पुस्तक प्रकाशन

माझे काका कै. एस. आर. देशपांडे हे पुण्यातल्या एस. पी. कॉलेजात इंग्रजीचे प्राध्यापक होते. नंतर ते कोपरगावच्या कॉलेजात प्राचार्य म्हणून गेले होते. त्यांच्याकडून मला साहित्य, कला यांतल्या अनेक गोष्टी ऐकायला मिळत. संस्कृतवर प्रभुत्व आणि शास्त्रीय संगीताची जाण हीही त्यांची वैशिष्ट्ये होती. गांभीर्याबरोबरच मिश्किलपणाही पुरेपूर असणे हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे खास वैभव होते. त्यांनी एकदा अध्यात्म आणि खेळ यांची सांगड घालत एक ज्ञानमय ओवी सांगितली होती, ती अशी –

खेळ खेळावा क्रिकेटू

मीच बॉल मीच फळकुटू

मीच माझियावेरी आपटू

मीच धावे भिरिभिरी ।।

तर त्याला धरून एक माझे पुस्तक प्रकाशित होत आहे. मीच लेखक, मीच प्रकाशक , मीच मुद्रितशोधक आणि मीच मांडणीकार, वगैरे. लेखक कितपत आत्मनिर्भर होऊ शकतो, हे पाहण्याचा हा एक प्रयोग आहे. ( मीच एकमेव वाचक, असे होऊ नये म्हणजे झाले ! ) हे जमल्यास पुढे अनेक पुस्तकांची झडच लावणार ( याच अर्थाने ‘ छडी लावणे ‘ असाही वाक्प्रचार आहे का ? ) आहे. नाटक, कविता, ललित लेख, वैचारिक-समीक्षात्मक लेखन, नाट्य-चित्रपट परीक्षणे वगैरे अनेक दालनांतली ही पुस्तके असतील.

तर यांतले पहिले पुस्तक आहे --

‘ चार पुरुषार्थांची चार नाटके ‘. ती अशी आहेत – ढोलताशे ( धर्म ), इराक ( अर्थ ), बुद्धिबळ आणि झब्बू ( काम ) आणि जणू काही वास्तव ( मोक्ष ). अशा प्रकारचे एक पुस्तक अस्तित्वात येणे ही मराठीतली एक विशेष घटना ठरावी. या पुस्तकाच्या प्रक्रियेत एक महत्त्वाची बाब लक्षात आली ती अशी की या निमित्ताने संहिता पुन्हा एकदा माझ्या नजरेखालून जातात आणि काही काटछाट, दुरुस्त्या वा पुनर्लेखन घडून त्या फायनल होतात. त्यामुळे या नाटकांच्या या पुस्तकातल्या संहिता या फायनल आहेत, असे मी म्हणू शकतो.

‘ ढोलताशे ‘ बाबत निळू फुले असे म्हणाले होते की हे नाटक जो पाहणार नाही त्याला मोक्ष मिळणार नाही. ‘ इराक ‘ हे नाटक, माझ्या माहितीप्रमाणे, मराठी लेखकाने लिहिलेले आंतरराष्ट्रीय राजकारणावरचे पहिले ओरिजिनल नाटक आहे. याच वैशिष्ट्यासाठी, हे नाटक पाहायला विजय तेंडुलकर आले होते. त्या वेळी ते नाटक  बरेच विस्कळित होते. आता ते आटोपशीर आणि नेमके केलेले आहे. ‘ बुद्धिबळ आणि झब्बू ‘ हे नाटक प्रायोगिक आणि व्यावसायिक दोन्हीकडे बरेच पाहिले गेले. तेंडुलकर,या नाटकाला, मराठीतले एक जागतिक दर्जाचे नाटक असे म्हणाले होते. रत्नाकर मतकरी यांनी या नाटकाची मराठीतल्या दहा निवडक नाटकांत गणना केली होती. ‘ जणू काही वास्तव ‘ चे प्रयोग कमी झाले पण  हे नाटक प्रख्यात समीक्षक गंगाधर पाटील यांना आवडले होते, अशी आठवण आहे. सारांश म्हणजे, मराठी नाट्य वाङमयात हे पुस्तक संग्राह्य ठरेल असा विश्वास वाटतो.

या आणि यापुढील माझ्या पुस्तकांच्या जाहिरातीही मीच करणार असलो तरी मलाच न पटणारे खोटे असे मी काही सांगणार नाही. तरीही, आपली आपण भलावण करण्याचा दोष मला पत्करावाच लागेल. त्यासाठी आधीच इथे दिलगिरी व्यक्त करून ठेवतो.

यापुढील पुस्तकांची योजना अशी आहे --

१. सहा दीर्घांक

२. चार ॲब्सर्ड नाटके.

हे एवढे झाल्यावर पुढे आणखी बरेच आहे.

सध्या इथे थांबतो.

या सदर पुस्तकाची पाने ३०० प्लस असून किंमत रु.६००/-- आहे. सवलतीची योजना व हे मिळण्याची ठिकाणे यांबाबत लौकरच माहिती देईन.

--- ००० ---

चंप्रंची ही महत्त्वाची नाटके एकत्रित उपलब्ध होणे आवश्यकच होते.

मनःपूर्वक अभिनंदन !!! ---- गिरीश पतके.

विशेष म्हणजे हे मुखपृष्ठ, नुकतीच बारावी झालेली माझी नात ( मुलाची मुलगी ) चि. श्रेया देशपांडे हिने केले आहे. तिला चित्रकलेची आवड आहेच पण या चित्रासाठी तिने बरेच कष्ट घेतलेले आहेत ! तिचे असे हे पहिलेच काम असल्याने आम्हा सर्वांनाच एक वेगळा आनंद मिळालेला आहे !

जगण्यात थोडी मोकळी स्पेस हवी -- बघा -- यू ट्यूबवर आयनेस्कोची फक्त ३० मिनिटांची एकांकिका – ' द न्यू टेनंट '.

गद्य कविता

हित

बरेच लोक काय घडले होते वा नेमके काय घडले होते हे न बोलताच मरून जातात. एक तर नको ती कटकट आणि वाद असे तरी असते किंवा बोलल्याने होणार असतो त्यांचाच मानभंग. ज्यांच्याबद्दल वाईट बोलावे लागले असते ते तरी पूर्ण वाईट कुठे होते – त्यांचे अनेक उपकार मिळालेले होतेच ना – हाही असतो कृतज्ञतेचा विचार त्यांना उघडे पाडावे की पाडू नये या द्वंद्वात्मक प्रामाणिकपणाच्या मागे. कधी असेही वाटते की कदाचित आपणच आपले दु:ख निर्माण करत होतो – आपणच भ्रमात होतो आणि खापर त्यांच्यावर फोडत होतो, असेही असू शकते. म्हणजे आपल्या नुसत्या प्रामाणिक बोलण्यामुळे त्या बिचाऱ्या निष्पापांचा होऊ शकतो प्रतिमाभंग. त्यांना आणि आपल्याला मानणाऱ्या सर्वांनाच ते दु:खाचे होऊ शकते. काय गरज होती जे होते ते बिघडवायची, असेही त्यामुळे अनेकांना वाटू शकते. आपण तर मरून जाऊ पण आपण आपल्या खरे  बोलल्याचे परिणाम पुढे काय काय होत राहतील यावर कुठे असणार आहे आपला कंट्रोल ? बरेच लोक याचा गैरफायदा घेऊ शकतील आणि आपली वा स्टोरीतल्या अन्य पात्रांची नालस्ती करू शकतील. म्हणजे जिवंत असताना त्यांनी संभाळलेली त्यांची स्वत:ची प्रतिमा डागाळली जाईल. आणि आता तर ते मृत असल्याने त्यांना ते कळणारही नाही. म्हणजेच आपण नीट प्रतिमेत मेलो या समाधानात ते मेलेले असणार आणि इकडे नंतर त्यांच्या प्रतिमेची वाट लागलेली असणार.

तरीही काहीजण भडास काढणाऱ्या वा न्यूनगंडावर उपाय म्हणून काही कादंबऱ्या लिहितात किंवा मरण्यापूर्वी सरळ आत्मचरित्रच लिहितात. ते पुस्तकात लिखित स्वरूपात आल्याने अनेकजण ते ग्राह्य मानतात. ते ग्राह्य मानून त्याचे अर्थ मात्र वेगवेगळे लावत लेख लिहिले जातात. त्याच जुन्या घटनांबाबत आणखी काही संदर्भ सापडले तर संबंधित भूतकाळाबाबत वादावादीचे फड रंगतात. कुठे कुठे विश्वास ठेवायचा हे बहुतेकांचे सामान्यत: ठरलेलेच असते. आपल्या प्रतिमांचे आणि आपल्या प्रतिमांच्या पुढील पिढ्यांचे भवितव्य सुरक्षित करण्यासाठी एकमेकांना शिव्या देत सगळेच सत्याची कास धरत राहतात.

काही सत्यशोधक पण परखड पण भंडाफोडवाले इतिहासकार असतात. ते आता नव्याने इतिहास लिहावा लागेल असे म्हणतात. आजवर पसरवलेल्या खोट्या, आभासी इतिहासातून जनतेला वाचवले पाहिजे, असे म्हणतात. इतिहास ही फक्त काही शिक्षित लोकांची मक्तेदारी राहिल्यामुळे ते म्हणतील तो इतिहास असे होऊन बसल्याचे ते अधोरेखित करत राहतात. अशा चुकीच्या इतिहासामुळे समाजाचे खूप नुकसान झाल्याचे ते प्रतिपादन करतात.

अन्याय करणाऱ्याला अन्यायी न म्हणता उलट समंजस आणि कर्तबगार म्हटल्याने आज जगणाऱ्यांच्या प्रतिमा कशा कमकुवत होतात ते ते सांगत राहतात. खरा इतिहास समोर आल्याने समाजाला शक्ती मिळेल, ऊर्जा मिळेल, प्रेरणा आणि स्फूर्ती मिळेल याची त्यांना खात्री असते. इतिहासाचे अर्थ लावताना दंगली वा हिंसा  घडू नयेत असे काही सत्ताधाऱ्यांना वाटत असते. पण इतका असेल फरक आणि इतके असत्य  जर आपल्या माथी मारण्यात आले असेल तर होऊ देत तिच्या मायला दंगली, मरू देत भोसडीचे, असेही काहींना वाटते.

एखाद्या महान चित्रकाराच्या वासनांध लफड्यांना महत्त्व देत त्याची चित्रे मूल्यहीन समजावीत का, असा येतो प्रश्न. काही स्त्रियांचे आक्रोश त्यांच्या वा त्या चित्रकाराच्या मरणोत्तर प्रकाशात येतात. समाजाच्या नीतिनियमांना न जुमानणाऱ्या माणसाला का द्यावा मानाचा फेटा असे म्हणून काहीजण त्याच्या पुतळ्याचे डोके उडवतात. आपल्याला न पटणारा माणूस आपल्या हिताचा कसा असू शकेल, हा साधा सरळ प्रश्न असतो. निदान आज, आता तरी सावध राहावे आणि सर्वार्थाने हितकारक माणूस शोधत राहावे, असे वाटते. आपण ज्यांना वाईट, दुष्ट म्हणत आलो तेच बहुमताने हितकारक ठरू शकतात, या शक्यतेची प्रचंड भीती वाटते, क्रोध येतो पण तरीही आपण निस्पृह आणि समाजहितैषीच राहायला हवे, असे काहींना वाटते. ते सतत सत्याची बाजू घेत राहतात. तोवर जे मरतात वा जिवंत असतात त्यांच्या पोटांत काय काय असेल ते माहीत नसते. त्यातले काही बाहेरही येऊ शकते कालौघात. ते खरे की खोटे हे ठरवत, जगणे सुधारत राहणे हे पुढच्या पिढ्यांचे काम असते. यातूनच सर्वांचे भले होत राहण्याची शक्यता असते.

हे असे सगळे, कुंपणावर बसलेला एकजण पाहतो आणि चेवाचेवाने इकडे वा तिकडे उडी मारण्याचे रद्द करून तो कुंपणावरच बसून राहतो. त्याला मनातून भीती असते की आपण संकटात सापडलो तर कुणीच आपल्या मदतीला येणार नाही. पण निष्ठेशिवाय एखादी बाजू घेत तसल्या खोटेपणात व्यतीत करावे का आयुष्य ही त्याची त्याला सतत भेडसावणारी समस्या आयुष्यभर त्याची पाठ सोडत नाही. जिवंत असतानाच लोक त्याला भित्रा, आपमतलबी, संवेदनशून्य आणि निष्ठुर म्हणू लागतात. तो ते ऐकून घेत राहतो.

बहुसंख्याकांची सुरक्षितता आणि हितकारकता लक्षात घेऊन दोन कट्टर विभाग तयार होतात. ते अधिकाधिक शौर्य दाखवत, निस्वार्थीपणे, मानवी मूल्यांची जोपासना करण्यासाठी एकमेकांच्या उरांवर बसत राहतात, एकमेकांना आयाबहिणींवरून शिव्या देत राहतात. सर्वांचे बरोबर-चूक वेगळे असते, सत्ये वेगळी असतात, समर्थने वेगळी असतात, न्यायाचे मुद्दे वेगळे असतात, आणि मुख्य म्हणजे नेमके काय घडते आहे याची वर्णनेही वेगळी असतात. जनता सत्याचीच बाजू घेईल याची दोघांनाही खात्री असते.

--- ००० ---

फूट न पाडता आमच्यातला एक गट शत्रूच्या गोटात सामील झाला तर यात गैर काय ?

शरम

तिकडे त्यांच्यावर एवढे अन्याय होताहेत, अत्याचार होताहेत, प्रचंड हिंसेने जगण्याच्या चिंध्या होताहेत आणि तू इथे वाढदिवस साजरा करतोस ? ट्रिपला जातोस ? बारमध्ये जाऊन मित्रांबरोबर दारू पीत हास्यविनोद आणि गप्पा करतोस ? स्वत:च्या मुलांच्या कॉलेज प्रवेशांची चिंता करतोस ? खरे तर तुझे मिनिट न मिनिट आणि तुझा प्रत्येक श्वास त्या भयानकतेने डागाळलेला, पीडित आणि रक्ताळलेला असायला हवा. तू फेसबुकवर फिरत शहाणपण दाखवत राहतोस ? शरम नाही वाटत ?

अच्छा, म्हणजे तोच काय, जगातला कुठलाही भयानकपणा मिटेपर्यंत बाकी सगळे बंदच असायला हवे. हास्यविनोद, गप्पा, शांतता, समाधान, हे तर कुठे असताच कामा नये. म्हणजेच, शांतता, समाधान हे एकूणच सर्वच माणसात एकाच क्षणी सुरू व्हायला हवे. पण मन गोंधळते, च्यायला ! बुद्धाला जेव्हा शांतता सापडली, त्याच्या जगण्यात जेव्हा तो प्रकाश आला तेव्हा झाली होती का आख्खी मानवजात शांत ? अगदी समजून चालू की हो, झाली होती. मग पुन्हा काय झाले ? पुन्हा बॉंब का सुरू झाली ? जगातली आणि माणसातली हिंसा मोजायचे काही माप आहे का ? सध्या ती कुठे किती आहे, असे ? वाढतेय की कमी होतेय, असे ?

की आख्खी मानवजात एकत्रच होणार हिंसेतून मुक्त ? म्हणजे इतरांना शरम वाटणे नको आणि हिंसेची कारणे आपल्याला दिसत असल्याचा प्रामाणिकपणाही नको ? मग अशी शांतता येण्याची प्रक्रिया कुठे सुरू आहे ? चीन की अमेरिका की युक्रेन ?  ती प्रक्रिया सगळ्यांची एकत्र कशी, कुठे चालेल ? आणि ती पूर्णतेला गेल्याचा सूर्योदय कधी होईल ? यापूर्वी असे कधी झाले होते का ?

त्यापेक्षा, हे सगळे अमुक धर्मामुळे होते आहे, अमुक देशामुळे होते आहे, तमुक नेत्यामुळे होते आहे, अशी आपली प्रामाणिक मते सत्य का धरू नयेत ? म्हणजे त्या त्या कारणीभूत बाबी नष्ट झाल्या की शांतता येईल ? मग तर आधी त्या गोष्टींच्या हिंसेनेच सुरुवात करावी लागेल. जाऊ दे, मरू दे. बाहेर आहे तेवढा खूप आहे गोंधळ, आपल्या डोक्यात नको आणखीन ! वाटल्यास सगळ्यांनी सतत दु:खी राहू सहानुभूतिपूर्ण !

– ० –

' चार पुरुषार्थांची चार नाटके ' या माझ्या पुस्तकात ' ढोलताशे ', ' इराक ', ' बुद्धिबळ आणि झब्बू ' आणि ' जणू काही वास्तव ' ही चार नाटके अनुक्रमे धर्म, अर्थ, काम व मोक्ष या पुरुषार्थांशी संबंधित आहेत. या पुस्तकाची पाने ३०० प्लस असून त्याची किंमत रु.६००/-- ( रुपये सहाशे फक्त ) आहे. सदर पुस्तकाची विक्री आता सुरू होत असून दिनांक ३१-०८-२०२३ पर्यंतची याची सवलतीची किंमत रु ४५०/-- ( रुपये चारशे पन्नास फक्त ) -- टपाल खर्चासह आहे. रक्कम पाठवण्यासाठी नंबर्स --

Chandrakant  Prabhakar Deshpande

HDFC BANK  Saving Account  No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh  Deshpande  mbl 9970065875  OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

पुस्तक पाठवण्यासाठी पत्ता

' चार पुरुषार्थांची चार नाटके ' या माझ्या पुस्तकासाठी लोक पैसे पाठवत आहेत पण त्यांतले काहीजण लगेच, यू टी आर कोडसह आपला पत्ता कळवायचे विसरत आहेत. त्यामुळे, हे पैसे आले कुणाचे, पुस्तक कुठे पाठवायचे, असे प्रश्न येत आहेत. तरी, कृपया, पुस्तकासाठी पैसे पाठवताच लगेच यू टी आर कोडसह पत्ता कळवावा, ही विनंती. पैसे आले की किमान दुसऱ्या दिवशी पुस्तक रवाना व्हावे, असा प्रयत्न आहे.

--- ० ---

गद्य कविता

मांजर

तुमच्या एका मित्राला मांजर खूप आवडते, हे तुम्हाला माहीत असते. त्याचा तुम्हाला काहीच त्रास नसतो. आवडे ना का, असे सहज साधे राहता तुम्ही. पण पुढील एकेका भेटीतून ते मांजर मोठे होत असून सांभाषणातली बरीच जागा व्यापू लागले आहे, हे तुमच्या लक्षात येत जाते. तरीही, हसून तुम्ही त्या मांजराची स्तुती करत, खरेच ते त्याला हवे तसे, तसेच प्रभावी आहे, असे बोलत राहता. तुमच्या मनात विचार येतो की बाबा ती मांजरी असून तिला कुठे ‘ दाखवून ’ आणायला तर हा विसरला नसेल ? किंवा त्याच्याकडून इतके काम हवे आहे तर त्याला ‘ ठेचायची ’ तर गरज नसेल ? पण हे आपले अज्ञानातून आलेले अंदाजही असतील असे वाटून तुम्ही ते सोडून देता. नंतर हळूहळू तुमच्या लक्षात येत जाते की ते मांजर म्हणजे नुसतीच त्याची अद्वितीयता नसून त्यात आणखी बरेच काही आहे. त्याची राजकीय मते, त्याच्या नाटक वा चित्रपटातल्या आवडीनिवडी आणि मुळात तुम्ही त्याचे मित्र असणे हेच त्याचे आत्मस्तुतीचे साधन असणे. याचाही तसा तुम्हाला काही त्रास नसतो. पण हळूहळू संभाषणच थांबणार असेल तर कसली ही मैत्री, असे व्हायला लागते. त्याच्या मतांशी, आवडीनिवडींशी तुम्ही बांधील नसणे हा जणू काही त्याला घोर अपेक्षाभंग वाटतो आहे आणि एवढेच नव्हे तर त्याला तुमचा रागही येऊ लागला आहे आणि तो दुरावत चालला आहे, हे तुमच्या लक्षात येत जाते. त्याला त्याचे सगळेच बरोबर, न्याय्य आणि माणुसकीचे वाटत असेल म्हणजे जगात दुसरे काही अस्तित्वात असणे, हेच पाप ? मधून मधून त्याचे चिडणे, कुत्सित होणे हे तुम्हाला आता खटकू लागते. याला दिसते तसेच जग सर्वांना दिसायला हवे – ही नि:शंक मनोवस्था त्याला जरी साहजिक वाटत असली तरी तुम्हाला ती रोगासारखी दिसू लागते. हे सगळे नुसतेच एखाद्या मांजरामुळे घडत असेल ?

जरा खोलात जाता असेही दिसते की आपणही थोडेफार असेच फिक्स होत गेलेलो आहोत. इतके तीव्र नाही आणि ‘ जाने दो ’ म्हणून थोडेफार दुर्लक्ष करायची तयारी असते, हाच काय तो फरक. यालाच कदाचित सहिष्णुता म्हणत असावेत. पण त्याच्या मानाने आपण बरेच लवचिक आणि मजेत जगू शकतो असे तुमच्या लक्षात येते. ते ठीक, पण, मुळात हे असे सगळे घडायचे कारणच काय, असा तुम्हाला प्रश्न पडतो.

तुम्हाला वाटते आता त्याचे तुमच्याबद्दलचे मत खराब होणार. त्याची मते या जगात फायनल असल्याने तो ते व्यक्तही करत राहणार. काहीजणांच्या नजरेतून तुम्ही आपोआप उतरत जाणार. हेही विचारच. खरेच तसे घातक ' उतरणे ' घडले तर तेही विचारच तर असणार. म्हणजे, प्रत्येक वेळी विचार टाकूनच देता आले तर काही प्रश्नच नाही राहणार. मग तर अमुकच मित्र आणि तमुकच मांजर यांचीही गरज नाही राहणार.
मैत्रीच्या नावाखाली एखाद्या मांजरात किती वेळ घालवावा, हा प्रश्न येणारच ना, आज ना उद्या.
--- ००० ---

ज्यांनी माझे खालील अर्कचित्र निव्वळ प्रेमाने काढून पाठवले होते ते आपले मित्र, प्रख्यात व्यंग/अर्क चित्रकार प्रभाकर भाटलेकर यांची आज आमच्या घरी भेट झाली ! पार्ले, विनायक पडवळ, आविष्कार संस्था अशा बऱ्याच आठवणींवर आमच्या गप्पा झाल्या ! गेलेल्या काळाला उजाळा मिळाला !

आज २३-०८-२३ खास चंद्रदिन !
संध्याकाळपर्यंत शक्य तेवढ्या गाण्यांचा गुच्छ तयार ठेवू –
१ -- हम हैं तो चांद और तारे ----- मुकेश – मैं नशेमें हूं
२ – चांद फिर निकला ------------ लता --- पेइंग गेस्ट
३ – चौदहवीका चांद हो ---------- मोहम्मद रफी --- चौदहवीका चांद
४ – चांद मेरा दिल ---------------- मोहम्मद रफी --- हम किसीसे कम नही
५ – धीरे धीरे चल चांद गगनमें --- रफी-लता --- लव्ह मॅरेज
शिवाय तुम्हाला आठवतील ती सांगत जा.

हम फेसबुक फ्रेंडस की तरफसे चांद को यह तोहफा ---
हम हैं तो चांद और तारे ----- मुकेश – मैं नशेमें हूं
चांद फिर निकला ------------ लता --- पेइंग गेस्ट
चौदहवीका चांद हो ---------- मोहम्मद रफी --- चौदहवीका चांद
चंदा मेरे राखी के ------------- लता --- छोटी बहन
चांद मेरा दिल ---------------- मोहम्मद रफी --- हम किसीसे कम नही
धीरे धीरे चल चांद गगनमें --- रफी-लता --- लव्ह मॅरेज
ओढ के अंधेरा मै जो पियासे मिलन गायी
चांदनी सिमटके बदन मेरा बन गई
--- अलका याज्ञिक -- चित्रपट -- सर --
निंबोणीच्या झाडामागे..

दमभर जो उधर मुॅंह फेरे ओ चंदा...

चांदण्यात फिरताना माझा धरलास हात - आशा भोसले..

चांद खिला ओ तारे हसे

चांद को क्या मालूम चाहता हैं उसे कोई चकोर

वो चांद खिला, तारे हसीन ये रात अजब मतवाली है

दम भर जो उधर मुह फेरे ओ चंदा…

वो चांद जैसा लडकी…

चांद फिर निकला मगर तुम न आए..

मैने पुछा चांद से..

तु चंदा मै चांदनी…

1)चंदा ओ चंदाss किसने चुराई तेरी मेरी निंदीया

2)चंदामामा से प्यारा मेरा मामा

3)चाँद को क्या मालूम चाहता है उसे कोई चकोर

4)चाँद के पास जो सितारा है

5) लिंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला ग बाई

6)चाँद चुराके लाया हूँ

7)चंद्र आहे साक्षीला

8)दमभर तो इधर मूँह फेरे

9)सुहानी चाँदनी राते हमे सोने नही देती

10)बदरी से निकला है चाँद परदेसी सैंया

11)चांदणे शिंपीत जाशी

मेरा चांद मुझे आया है नजर - मि. आशिक

चांद छुपा बादल मे - हम दिल दे चुके सनम

चांद के साथ..

कई दर्द पुराने निकले... जगजीत

चाँद किरन सी गुड़िया नाजों की है पली - २

आज अगर चाँदनिया आना मेरी गली

गुन गुन गुन गीत कोई हौले हौले गाना

नींद भरे पंख लिये झूला झूला जाना ...

ओ चांद जहाँ वो जाए, तू भी साथ चले जाना

चलो दिलदार चलो,

चांद के पार चलो.

चांद मातला मातला□

तू मेरा चांद मै तेरी चांदनी

चांद के पास जो सितारा हैं वो सितारा हसीन लगता हैं

निकला नीम के तलेसे निकला....गोलमोल चांद फिसला

चांद चुराके लाया हुं.

चल बैठे चर्चके पिछे.

संजीवकुमार व शबाना आझमी

चांद जाने कहा खो गया...

चंदा कोच ढुंडने सभी तारे निकल पडे /चंदा ओ चंदा

चंदामामा दूर गे ' रोटी पकाने भूर गे २ चांद फिर निकला ' फिरभी तुम न आये ।

चांद कटोरा लिये भिखारन रात , रोज अकेली आये ( गुलझार )

ये चांद सा रोशन चेहरा, ज़ुल्फ़ों का रंग सुनहरा

ये झील सी नीली आँखें, कोई राज़ है इनमें गहरा

तारीफ़ करूँ क्या उसकी, जिसने तुम्हें बनाया … See more

चांदण्या रात्रीतले ते स्वप्न तू विसरून जा..

चांदण्याचा गंध आला पोर्णिमेच्या रातीला चंद्र आहे साक्षीला,

चांद मातला मातला, अंगी वणवा पेटला..

हसले मनी चांदणे..

चंदा रे चंदा रे कभी तो जमी पे आ..

चंदासे होगा वो प्यारा ... मैं भी लडकी हू

१) चांद आहें भरेगा, फूल दिल थाम लेंगे

२) चलो दिलदार चलो, चांद के पार चलो

3) चांदनी रात में एक बार तुम्हे देखा है

४) चांदनी रात में यूं दिल को जलाते तो न जा

५) तू मेरा चांद मैं तेरी चांदनी

६) तू चंदा मैं चांदनी, तू तरुवर मैं शाख रे

७) चंदा रे जा रे जा रे

८) वो चांद खिला, वो तारे हंसे

९) चंदामामा दूर के

१०) आ जा सनम, मधुर चांदनी में हम

११) चांद सिफारिश जो करता हमारी

१२) खोया खोया चांद

१३) चांद चुरा के लाया हूं

१४) चांद जाने कहां खो गया

१५) चांद तारों में नजर आए चेहरा तेरा

१६) चांद सी महबूबा हो मेरी

१७) आओ तुम्हे चांद पे ले जाये

१८) आधा है चंद्रमा रात आधी

१९) मेरे सामने वाली खिडकी में एक चांद का टुकडा रहता है

२०) चांद जैसे मुखडे पे बिंदिया सितारा

२१) चांद सा मुखडा क्यूं शरमाया

२२) चांद सा चेहरा झील सी आंखे

२३) ये चांद सा रोशन चेहरा

२४) चांद को देखो जी

२५) चांद से परदा कीजिये, कहीं चुरा न ले

२६) चांद तारों में नजर आये चेहरा तेरा

२७) याद रखना चांद तारों, इस सुहानी रात को

२८) चंदा की छांव में, ठंडी ठंडी हवाओं में

२९) चंदा की डोली में, परियों की झोली में

३०) चंदा रे मेरे भैया से कहना

*****

१) रवी मी हा चंद्र कसा मग मिरवितसे

२) तू चांद जिवाचा हासरा

३) उगवला चंद्र पुनवेचा

४) चंद्रिका ही जणू

५) कोणता मानू चंद्रमा

६) हे सुरांनो चंद्र व्हा

७) चांदण्या पुनवेच्या रातीला

८) चांदण्यात फिरताना माझा धरलास हात

९) चांदण्यात न्या गं, हिला नटवा सजवा

१०) चांद केवड्याची रात आलीया बहरा

११) शारद सुंदर चंदेरी राती

१२) दे मला गे चंद्रिके प्रीती तुझी

१३) पुनवेचा चंद्र आला घरी, चांदाची किरणं दर्यावरी

१४) नवीन आज चंद्रमा, नवीन आज यामिनी

१४) मधू तिथे अन चंद्र इथे झुरतो अंधारात

चंद्रमा मदभरा क्यूँ झुमे बादलमे...(पटरानी - लता मंगेशकर , शंकर जयकिशन, शैलेंद्र)

चंदा रे चंदा रे

कभी तो ज़मीं पर आ

बैठेंगे, बातें करेंगे

तुझको आते इधर

लाज आये अगर

ओढ़ के आजा, तू बादल घने...

चंद्र आहे साक्षीला...

चंदाराणी चंदाराणी का ग दिसतेस थकल्यावाणी...

चांदणे शिंपीत जाशी चालता तू चंचले...

चांदणे झाले ग केशरी...

चल चल चंद्रा पसर चांदणे...

चांद को क्या मालूम चाहता हैं उसको ही चकोर...

चांद अकेला गाये सखी री ...

चंदा है तू मेरा सुरज है तू...

कैसे ख़ुशी लेके आया चांद ईद का, मुझे मिल गया बहाना 'तेरी दिद का...

सुहानी चांदनी राते हमें सोने नहीं देती...

तोच चंद्रमा नभात ती तूच कामिनी

शांता शेळके

आओ तुम्हे चाँद पे ले जायें...

प्यार भरे सपने जगाये...

डोंगराचे आरून इक बाई चांद उगवला...

देखो वो चांद छुपके करता है क्या इशारे..

चांद मातला मातला त्याला कशी आवरू… See more

चंदा रे, चंदा रे, कभी तो जमी पर आ..... इस्त्रो मे बैठेंगे, बाते करेंगे □

चांद मोहरे चांदणे झरे

झोपेतच गाली असा हसशी का बरे...

एक रात में दो दो चाँद खिले...

एक बदली मे एक घुंगट मे...

मामाच्या गावाला जाऊया

चांद को क्या मालुम

चाहता है उसे कोयी चकोर

चांदोबा चांदोबा भागलास का

मुझको चांद लाके दो

चंदा रे चंदा रे कभी तो जमीपे आ आओ मिलके बैठके बाते करेंगे

चांदनी रात है तू मेरे साथ है

चांदनी मै तेरी चांदनी

आचंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

चंदा ओ चंदा तुझे कैसे समझाऊ

जाने कितने दिनोंके बाद

गलीमे आज चाँद निकला

चाँद आहें भरेगा फूल दिल थाम लेंगे चंद्रयान उतरेगा तब सब नमो नाम लेंगे

चंद्र आहे साक्षीला..❤

तोच चंद्रमा नभात

देखो वो चांद छुप के करता है क्या इशारे - शर्त

देखो वो चांद छुपके करता है क्या इशारे।

लता व हेमंत कुमार यांनी गायलेले शर्त या 1954 च्या सिनेमातील

हेही एक खूप गाजलेले गाणे आहे.

चंदा के देसमे रहती इक रानी - मुकेश

मेरा घर मेरे बच्चे १९६०

चंदामामा मेरे पास आना - आशा मन्नाडे

लाजवंती १९५८

मैने पूछा चाॅंदसे के देखा है कही -रफी

अब्दुल्ला १९८०

चंदामामासे प्यारा मेरा मामा - उषा मंगेशकर रफी

कर्तव्य १९७९

चाॅंद छुपा और तारे टूटे रात गजबकी महेंद्रकपूर

सोहनी महिवाल १९५८

चंदा को ढूंढने सभी - आशा उषा हेमलता

जीने की राह १९६९

आ आ भी जा चाॅंद छुपने - लता

तीसरी कसम १९६६

चाॅंद चुपचाप है - किशोरकुमार

दाल मे काला १९६४

चाॅंद चल तू जरा धीमे - किशोरकुमार

वो जो हसीना १९८३

तुम मेरी जिंदगीमे इक चाॅंद - आशा

डंका १९५४

निकला है गोरा गोरा चाॅंद - सुमन उषा

गेस्ट हाऊस १९५९

ए सनम जिसने तुझे चाॅंदसी - मुकेश

दिवाना १९६८

सपनोंका चंदा आया - सुधा मल्होत्रा

मि. X १९५७

चंदा देखे चंदा - लता किशोर

झूठी १९८५

--- ००० ---

आता अमेझॉन वरही उपलब्ध --

Char Purusharthanchi Char Natake । चार पुरुषार्थांची चार नाटके

एक नाटककार आणि काही नाटके

ले 0 सुधीर रसाळ, प्र 0 विजय प्रकाशन

10-11-22 ला प्रकाशित झालेले समीक्षेचे हे पुस्तक मराठी समीक्षेतले एक उत्तुंग शिखर ठरावे, असे आहे. यात खानोलकरांचे, ' एक शून्य बाजीराव ', तेंडुलकरांचे, ' सखाराम बाइंडर ', खाडिलकरांचे, ' सवाई माधावरावांचा मृत्यू ', तारा वनारसे यांचे, ' कक्षा ' हे नाटक यांबरोबरच एलकुंचवारांच्या नाटकांवर एक सविस्तर लेख असा महत्त्वाचा ऐवज आहे. त्याचबरोबर, मला आस्वादक समीक्षेचा, एखाद्या नाटकाची उत्तुंगता, सूक्ष्मता आणि खोली यांचे दर्शन घडवणारा असा आणि आपल्या जगण्यात एक दार्शनिक भान देणारा लेख वाटला तो म्हणजे, या

पुस्तकात तीन भागांत असलेला, शेक्सपियरच्या ‘ किंग लिअर ‘ या नाटकावरचा ‘ राजा लिअर : सत्तासंघर्षाचे नाट्य ‘ हा लेख ! आपल्या नाट्यसमीक्षेत निव्वळ अपवादात्मक म्हणावा, असा हा लेख आहे. याच्या प्रारंभीच रसाळ सांगतात की त्यांनी शेक्सपियरचे हे मूळ नाटक वा त्यावरची इंग्रजी समीक्षा वाचलेली नाही. त्यांचे हे संपूर्ण लेखन, गो. वि. करंदीकरांनी केलेल्या मूळ नाटकाच्या ‘ राजा लिअर ‘ या अनुवादित नाटकाच्या वाचनावर आधारलेले आहे. समीक्षेचा हा एक विशेष प्रकार म्हणावा लागेल. इथे एक लक्षात घ्यायला हवे. त्या काळात मुंबई विद्यापीठात इंग्रजी विषयातले तीन प्राध्यापक विशेष ख्यातनाम होते – प्रा. बॅनर्जी, प्रा. होमाई जे. श्रॉफ ( ज्यांचा मी विद्यार्थी होतो ) आणि तिसरे आपले विंदा करंदीकर. त्यामुळे, त्यांनी केलेला अनुवाद हा मूळ संहितेशी नक्कीच एकनिष्ठ असणार असे आपण मानू शकतो. शिवाय, याला आणखी एक आधार म्हणजे, या अनुवादित नाटकाचे, कोल्हापूरच्या ‘ प्रत्यय ‘ या संस्थेने भारतभर प्रयोग केले होते आणि ते वाखाणलेही गेले होते. हे पाहता, रसाळ, प्रास्ताविकात जे म्हणतात की, “ कुठल्याही दोन भाषांत साहित्यकृतींची भाषांतरे जशी होत राहिली पाहिजेत तसेच भाषांतरित साहित्यकृतींच्या आकलनांचीही भाषांतरे होत राहिली पाहिजेत. ही प्रक्रिया दोन भाषांतील अभिजात साहित्यकृतींबाबत घडणे अधिक उपयुक्त असते. “ – याचे उत्तम उदाहरण म्हणून या समीक्षेकडे पाहता येईल. ही समीक्षा इंग्रजीत अनुवादित झाली तर नक्कीच योग्य त्या सन्मानानेच वाचली जाईल, यात शंका नाही. या तीन प्रदीर्घ लेखांच्या शेवटी, रसाळ म्हणतात, “ केवळ सत्ताप्रेरणेचीच नव्हे तर एकूण मानवजीवनाची अर्थपूर्णता हे नाटक अभिव्यक्त करते. एकूण सृष्टी, तिचे आणि मानवाचे नाते, मानवनिर्मित समाज आणि माणसामाणसातील नाती, मानवाच्या ‘ मानव ‘ म्हणून मर्यादा आणि त्याची दु:खे अशा अनेक गोष्टींची अर्थपूर्णता प्रकट करणारे हे एक महान नाटक आहे. “ या निष्कर्षापर्यंत रसाळ कसे येतात हे वाचत जाणे, ही एक अमर्याद कलानंदाची गंभीर प्रक्रिया आहे, हे नक्की. अशी समीक्षा लिहिता येण्यासाठी समीक्षक स्वत:ही कसा एक सर्जक आणि खुल्या दिलाचा माणूस असावा लागतो, हे इथे कळते. ही समीक्षा कुणाला कशी रुचेल अशा विचाराचा मानसिक अडथळा असता तर ही अशी निर्भय, मुक्त समीक्षा शक्यच झाली नसती. निर्भयतेबरोबरच ही समीक्षा निर्भीडही आहे. एका ठिकाणी रसाळ, शेक्सपियरच्या नाट्यांतर्गत काळात कशी एक चूक झालेली आहे, तेही दाखवून देतात.

खानोलकरांच्या, मराठीत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या पण नऊदहा प्रयोगांतच आटोपलेल्या, ‘ एक शून्य बाजीराव ‘ या नाटकावरचा रसाळांचा लेखही असाच मनस्वी आणि संग्राह्य झालेला आहे. त्यातही त्यांचे एक मत ते स्पष्टपणे मांडतात की यातल्या गर्भनाट्याचा आणि या मूळ नाटकाचा नीट मेळ बसत नाही. तेंडुलकरांच्या ‘ सखाराम बाइंडर ‘ वरचा रसाळांचा लेखही असाच ताकदवर झालेला आहे. ते म्हणतात, “ वास्तवाचा स्वीकार करता करताच या वास्तवाला पाठमोरे होण्याची तेंडुलकरांची वृत्ती या नाट्यलेखनात प्रथमच संपुष्टात आलेली आहे. उघड्या डोळ्यांनी, एक प्रकारच्या गृहीतनिरपेक्ष वृत्तीने तेंडुलकर इथे वास्तवाला सामोरे जाताना दिसतात. अशा प्रकारे वास्तवाला सामोरे जाणे ही खरे म्हणजे कलानिर्मितीची प्राथमिक आणि अपरिहार्य अवस्था आहे. हे नाटक वास्तवाला धीटपणे सामोरे जाते आहे म्हणून ते लक्षणीय आहे, असे नव्हे. अशा वास्तवाची एक अर्थपूर्ण संघटना बांधण्यात ते यशस्वी झाले आहेत म्हणूनच त्यांचे हे नाटक लक्षणीय मानायला हवे. “ या वाक्यापर्यंत रसाळ कसे येऊन पोचतात ते वाचणे हे कलेच्या प्रांतात अतीव उद्बोधक ठरेल यात मला शंका वाटत नाही. एलकुंचवारांवरच्या प्रदीर्घ, सखोल लेखात ते

म्हणतात, “ महेश एलकुंचवारांसंबंधी ‘ मराठीतील नाटकाच्या कक्षा विस्तारणारे नाटककार ‘ असे सार्थ विधान करावेसे वाटते. “ एखाद्या नाटककारावरचा एक सखोल, अभ्यासपूर्ण लेख म्हणून हा लेख मराठीत कायमच वाचला जात राहील. तसेच ‘ कक्षा ‘ आणि ‘ सवाई माधवरावांचा मृत्यू ‘ या नाटकांवरचे लेखही वाचनीय आहेत.
प्रत्येक नाट्यकर्मीने, कलाभ्यासकाने आणि वाचकाने/प्रेक्षकाने वाचलेच पाहिजे, असे हे पुस्तक आहे. यात कुणाचे मतभेद होणार नाहीत वा हे सर्वच लेखन सगळेच वाचक आहे असे स्वीकारतील असे नसले तरीही या पुस्तकाचे मराठीतले मोल असाधारण आहे, असे म्हणावेसे वाटते.
--- चं. प्र. देशपांडे.
--- 000 ---

एका चर्चेत, डॉ. सुधीर रसाळ यांच्या कॉमेंटवर मी दिलेला प्रतिसाद ---
" सर, मला जे दिसते ते असे -- मराठी भाषा, ती बोलणाऱ्यांच्या संख्येमुळे जगात 5 वी की 12 वी राहील, पण, साहित्यकला म्हणून ती नष्ट होत चाललेली आहे. लौकरच दार्शनिक तत्त्व असणारे साहित्य इथे कालबाह्य ठरणार आहे. याची खेदखंत कुठे फारशी दिसत नसल्याने ही प्रक्रिया वेगाने होईल असे वाटते. त्यामुळे, ज्याला जे समजते, महत्त्वाचे वाटते, ते त्याने करावे आणि आपण वाळवंटात मुतलो, असे समजून विसरून जावे, असा ' विकासकाल ' चालू आहे ! या परिस्थितीला प्रतिकार न करता आपले काम करत राहणे -- असे माझे चालूआहे. ( म्हणजे, तुम्ही काय स्वत:ला तारणहार समजता की काय, असे म्हणत काहीजण यावर उसळून येतील, हे मला माहीत आहे. ) सगळेच नष्ट होणार आहे, हेच खरे समाधान ! "
३१-०८-२३.

" ये लोगोंकी ( चिन्हांची ) लडाई नही है -- ये लोगोंकी ( लोकांची ) लडाई है ! "

" मला दोन शब्द बोलायची संधी दिली याबद्दल आभार मानतो आणि माझे चार शब्द संपवतो ! "

फूल ना फुलाची पाकळी म्हणून आमच्यातर्फे साहेबांना हा शंभर किलोंचा हार !

हे तुम्ही वाचले आहे का? हे |आवर्तने| ह्या पुस्तकात आहे. तुम्ही (लोक) ते वाचत नाही म्हणजे काय? ते वाचाच. आणि त्यासह आधीची चंप्रं ची ९० पानी प्रस्तावना सुद्धा.
पूर्वी आमच्याकडे (तुमच्याकडेही असेलच) चहा किंवा कोल्ड्रिंक्स ची जाहिरात ' कडक/ थंड्यात थंड. कडक/ थंड नसल्यास गिलास फोडून पैसे वापिस ' अशी जाहिरात असे, त्या धर्तीवर ' मेंदूला झिणझिण्या न आल्यास पुस्तक फाडून पैसे वापिस! ' असे ह्या पुस्तकाविषयी म्हणता येईल. तेव्हा मागवा आणि वाचा. ' तूही छान मीही छान, आपण दोघे छानच छान! ' पुरे झाले नाही का आता? --- मनोज पाठक.

ऑ आणि यॉ ( गद्यकविता )

तुम्ही एककल्ली असाल तर हाफमॅड आहात. तुम्ही म्हणजे तुम्हीच नव्हे, कुणीही, म्हणजे मीही. तुम्ही एककेंद्री असाल तर हुशार आहात. आणि अष्टावधानी असाल तर तुम्ही मम म्हणजे महामहोपाध्याय आहात. पण एक प्रेयसी, खरी वा खोटी मनात घेऊन वा तिच्या आठवणीकडे एकटक पाहात बसणे हे तुमचे कॉमन असते. स्त्री ही मुक्तीच्या मार्गातली धोंड असते हेही तुम्हाला आठवत असले तरीही. तर सारांश म्हणजे सगळेच असे मानसिक असल्यामुळे बहुतेकांनी ती मुक्तीची भानगड सोडूनच दिलेली आहे. काही मनाने प्रांजळ असतात तर काही अजूनही मुक्ती हा विषय रद्द केल्याचे कबूल करत नाहीत. उगीच लांबड न लावता म्हणजे आपण सगळे मिडीऑकरच असतो. सुखदु:खे भोगणे, यशस्वी माणसाचे गोडवे गाणे वगैरे. शेवटी नुसती मनाची कपॅसिटी, इतकेच असते ते. आता एक बोलता बोलता सुचलेय ते सांगू का ? अगदीच बुद्धिभक्त असाल तर तुम्हाला राग येऊ शकतो म्हणून विचारतोय. मुक्ती असे काही असेलच तर आधी ते मनाच्या कचाट्यातून सुटणे असते, असे तर नसेल ? कारण बाकी कुठलेही सुटणे हे तीच री ओढत राहणारे असणार ! मी फारसा यशस्वी नसल्यामुळे मला या नुसत्या विचारानेही रिलीफ वाटतो, हे मी नाकबूल करत नाही. या एकाच कारणासाठी तुम्ही मला एककल्ली म्हणालात तरी चालेल. मी रागावणार नाही, प्रॉमीस ! पण अयशस्वी माणसाच्या प्रॉमीसची काय असणार आहे किंमत ? त्याला काही किंमत नाही, हे मला माहीत आहे म्हणून तर प्रांजळपणाने आणि दिलखुलासपणाने देतोय मी ते ! सगळ्यांच्या मनांचे कारभार असे एकाच तराजूत तोलता आले की मस्त वाटते. असालही तुम्ही जीनियस पण मिडीयॉकरच ! ही आहे माझ्या इंग्रजीची गंमत ! आले ना लक्षात ? एकदा मी ऑ म्हणतो आणि एकदा यॉ !

--- ००० ---

" वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिस रस्त्यावर उतरले ! " --- एक चॅनेल.

अंतिम क्रियाकर्माच्या ठिकाणी एकजण म्हणत होते -- " खूप वेळ लागेल -- मरणाची गर्दी आहे ! "

Satish Tambe यांची एक पोस्ट सकाळी पाहिली होती. त्यावर जरा सविस्तर लिहावेसे वाटत होते. सगळ्यांनाच आपापले आकलन आहे तर मला का नसावे या विचारातून येणाऱ्या निर्भयपणाने ही पोस्ट देत आहे ---

मठ्ठ

मठ्ठ कुणाला म्हणायचे यावर एकमत असलेला समूह असला की त्यांच्यांतली चर्चा छान एकमेकांना सपोर्ट देत हसत-खेळत, खुदूखुदू आपापला अभिमान आणि अस्मिता गोंजारत चालते. मग तो आस्तिकांचा समूह असो की नास्तिकांचा. त्यांच्यांत आणखीही साम्ये असतात. ते सगळेच विचाराच्या क्षेत्रातच जगत असतात – अपमान झाल्यावर कुढणे, सूड घ्यावासा वाटणे, अमुक लोकांबद्दल द्वेष वा तिरस्कार वाटणे, ‘ ती ’ माणसे मानवी जगण्याची हानी करत आहेत असे वाटणे, पूर्वग्रह बाळगणे, युद्धात शौर्य गाजवावेसे वाटणे वगैरे गोष्टींबरोबरच दु:ख भोगणे,

एकाकी वाटणे, वैफल्यग्रस्त वाटणे, आत्महत्येचे विचार येणे आणि मध्येच कधीतरी ‘ मस्त ‘ वाटणे – हेही सगळे कॉमन असते. त्यांच्यांतला मुख्य मानीव भेद असतो तो म्हणजे आस्तिक लोक ‘ नसलेल्या ‘ गोष्टीवर विश्वास ठेवतात आणि नास्तिक तसे नाही करत. पण हेही सगळे जनुकरचनेपासून इतर अनेक परिणामांमुळे घडत असते. वैज्ञानिक दृष्टिकोण बाळगणाऱ्यांचा अहंकार तर त्या दृष्टिकोणामुळेच खरे तर खलास व्हायला हवा. सगळेच जर कारण-परिणामांच्या साखळीत घडत असेल तर ‘ नास्तिक ‘ असणेही कुणाचे वैयक्तिक कर्तृत्व नाही ठरू शकत. प्रत्येक गोष्ट हजारो कारणांनी घडते असे म्हटले आणि कोणत्याच गोष्टीचे परिपूर्ण विश्लेषण शक्य नाही असे म्हटले तरीही कारण-परिणाम साखळी मानली की ‘ मी शहाणा ‘ ही मस्ती तर्कानेच सोडून देणे भाग आहे. ढोबळपणे, अमुक धर्मामुळे जगाचे भले होणार आहे असे वाटणे आणि अमुक विचारसरणीमुळे जगाचे भले होणार आहे असे वाटणे, एवढाच त्यांच्यांत फरक असतो. आणि आता तर तर्काच्याच मार्गाने सर्व विचारसरण्या आणि प्रणाल्या यांचा मृत्यू झाला आहे असे म्हणणारे लोक आहेत. नास्तिक लोकांनासुद्धा तर्क हा हवा तितकाच आणि आवडीआवडीनेच वापरावा लागतो, हे लक्षात घ्यायला हवे. कोणताही धर्म वा विचारसरणी माणसाचे कल्याण करू शकलेली नाही, त्याला छान, गुण्यागोविंदाने जगायला शिकवू शकलेली नाही, हे सत्य डोळे उघडून पाहावेच लागते. हे असे का आहे तर ही सर्वच माणसे अनुभवाच्या आणि विचाराच्या आधारेच जगणारी असून प्रत्येकाचे ढाचे वेगळे आहेत. आणि व्यक्तिगत स्तरावर परिस्थिती, संबंध वा जग ‘ मनाप्रमाणे ‘ असू शकत नसल्याने दु:खी राहावे लागणे हा जणू सर्वांना एक अटळ असा शापच ठरतो आहे.

हे सगळे लक्षात घेतले तर सर्वांना कॉमन असा एकच प्रश्न उरतो – ज्याचा शेकडो, हजारो वर्षे माणूस शोध घेतो आहे – तो म्हणजे या विनाशचक्राच्या त्रासातून बाहेर पडून जगणे शक्य आहे का, हा. त्या शोधातूनच धर्म निर्माण झाले पण त्यांचाही वापर नंतर स्वार्थ आणि अस्मिता यांच्यासाठीच होत गेल्याने वाट लागली, हे पाहिले पाहिजे. पण याचा अर्थ धर्म नष्ट करावे असा प्रचार करून काहीच साधणार नाही. कारण धर्माची मूलप्रेरणा ही अत्यंत महत्त्वाची आहे. विचार, बुद्धी, अनुभव यांवर आधारित जगणे असह्य होते तेव्हा माणसे अनेक प्रकारच्या पळवाटा शोधतात. समाजकार्य, कलानिर्मिती, व्यसने, धर्मांचे वा विचारसरण्यांचे अभ्यास, वगैरे. आहे हे सवयीचे भान असह्य झाल्याने कुणी मादक द्रव्ये घेईल, कुणी पूजा करत बसेल. सर्वच माणसे भानबदल शोधत राहतात.

शास्त्रीय संशोधनाप्रमाणे मादक द्रव्ये वा ध्यान यांनी भानबदल होतो. ध्यानाने होणारा भानबदल हा सर्जक आणि हितकारक असतो. मनाची विदीर्णता जाणे आणि एकात्मतेची शांतता येणे हे याचे रहस्य असते. यावर जगभरचे धर्म, संत वा कलावंत यांचे उद्गार एकसारखे आहेत. हे सगळे काहीच पाहायचे नसणे आणि एकमेकांना मठ्ठ म्हणण्यात रममाण राहणे आणि आत्मतुष्ट भांडणे करणे हेच जगायला पुरेसे वाटणे असेही घडू शकणारच आहे. त्याला इलाज नाही.

--- ००० ---

दादासाहेब फाळके पुरस्काराबद्दल वहीदा रहमान यांचे अभिनंदन ! या निमित्ताने त्यांचे हे एक सुंदर गाणे ---

लाली लाली डोलिया मे --

डॉक्टर

काही विद्यापीठांत, कॉलेजांत वा समारंभांत मला फारच प्रोत्साहक अनुभव आलेले आहेत. खरे तर मी कुठेही प्राध्यापक नव्हतो, विद्वान म्हणावा असा माझा फारसा अभ्यासही नाही, मी टीकाकार म्हणून प्रसिद्ध असावे असे माझे एकही पुस्तक नाही, कुठल्याही संस्थेचा मी तेजस्वी अध्यक्ष नाही, मी शिट्टी मारल्यावर एक पाचपन्नास साहित्यिक-कलावंत एखाद्या निषेधासाठी जमतील अशी कुवत माझ्याकडे नाही, ज्याचे नाव घ्यावे आणि त्याची पुस्तके धडाधड खपावीत असा शब्दप्रभूही मी नाही – हे असे खूप वाढवता येईल पण आता ' तरीही ' म्हणून पुढचा भाग घेतो – तरीही तिकडे माझ्या नावापुढे ' डॉ. ' म्हणजे डॉक्टर लिहिले जाते. मी काहीसा ओशाळतो आणि बोलताना आधी ते क्लियर करतो. मी डॉक्टर आहे म्हणून तुम्ही ऐकाल आणि माझे बोलणे तुम्हाला अगदीच बाळबोध वा निरर्थक वाटले, असे होऊ शकेल, हे सांगतो. आपली खोटी प्रतिमा निर्माण होणेही नको आणि पुढे ती संभाळत बसणेही नको ! कविता, एकांकिका, नाटके लिहितानाही माझी एखादी प्रतिमा निर्माण करावी, ती संभाळावी, वाढवावी आणि पुढे वाचक-प्रेक्षक मान्यता मिळवत-टिकवत ' मोठे ' व्हावे, असे काहीच माझ्या डोक्यात नसते. या असल्या बाबतीत खास विचार न करता धोका पत्करत राहणे हे मला कोणतेही शौर्य न वाटता सहज, साधे जगणे वाटते. इथे फेसबुकावर लिहितानाही माझे तेच ' विना-डॉक्टरी ' काम चालू असते. सगळेच अत्युत्तम असेल याची मला गरज वाटत नाही. एखाद्या वेळी आज्ञानातून काही पोरकटही लिहिले जाऊ शकते – त्याची मी चिंता करत नाही. त्यामुळे, मला प्रश्न पडतो की काहींच्या बाबतींत, त्यांनी स्वत: निर्माण केलेली स्वत:ची प्रतिमाच तर त्यांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या आड येत नसेल ? लेखक-कलावंतांनी कसे जगले पाहिजे, कसा विचार केला पाहिजे, वगैरे सांगणारे बरेच असतात. इथे फेसबुकावरही ते असतीलच. पण त्या मानाने आरोग्यपूर्ण पद्धतीने चर्चांत भाग घेणे, आपल्यापेक्षा वेगळे विचार असणाऱ्यांवर न रागावणे हे का घडत नसावे, असा प्रश्न येतो. बरे, दुसऱ्या कोणाशी मतभेद व्यक्त करून नको ते वेळ घालवणे म्हणावे तर ते स्वत:ही फारशा आरोग्यवर्धक चर्चा सुरू करताना दिसत नाहीत. प्रत्येक विषयावर प्रत्येकाने बोलले पाहिजे किंवा तसे प्रत्येकाला बोलता येईल, असे नव्हे पण साधक-बाधक विचारविनिमयाचे खुले वातावरण फारसे तयार होताना दिसत नाही. खरोखर डॉक्टर असणारे वा त्या तोडीचे असणारे यांचे तसे फारसे प्रयत्न दिसत नाहीत. काय असावीत कारणे ? काही संभाव्य कारणे खाली देत आहे –

१ स्वत:चे प्रतिमाभंजन होण्याचा धोका वाटणे.

२ झाकली मूठ सव्वा लाखाची.

३ आपले काम सोडून कुठे वेळ घालवत बसा.

४ या टोळीबहाद्दरांच्या जगात न बोलणे हेच शहाणपणाचे आहे.

५ राजकारणाचे विषय सोडून हवेय कुठे काही कुणाला.

६ जे कमावलेय ते घालवून बसायला नको.

७ समविचारी लोकांशी वेगळ्या मार्गांनी बोलता येते – इथे नको.

--- आणखीही काही कारणे असतील, कुणाला सुचल्यास द्यावीत. आता एक म्हणजे या पोस्टचा विषयच बेसलेस आहे, असे कुणी म्हणू शकते. जे लिहिले ते तथ्यहीन आहे, असेही कुणाला वाटू शकते. मी फार बुद्धिमान आणि सर्वज्ञानी आहे, असे मला कधीच वाटत नाही. ये भी चलेगा !

--- ००० ---

गणपतीच्या दिवसांत एकदा तरी हे नाटक वाचतोच. खूप आधार मिळतो.

"काकू, तू मला सांग की काय काय म्हणून साजरं करावं... सगळे इतके सण - घरातल्यांचे, नातेवाइकांचे, मित्रमैत्रिणींचे वाढदिवस, उदघाटनं, निरनिराळे वर्षारंभ, ऑफिसचे, दुकानांचे वाढदिवस, नोकरी लागणं, प्रमोशन, मुलांच्या परीक्षांचे रिझल्ट, शिवाय खेळात पहिला, वक्तृत्वात पहिली, शिवाय सत्यनारायण, निरनिराळ्या शांती, रुद्र, मुंजी, साखरपुडे, लग्न, एकसष्ठ्या - असं किती सांगू तुला - हे सगळं रोगट नाही वाटत तुला ? आनंद हा सारखा असा बाहेरून ओरबाडून हावरटासारखा खात राहावा असं वाटणं हा वेडेपणा नाही वाटत ?"

"...आणि धर्मात गर्दीचं काय काम ? स्वतःला एकटं पाडण्याचं काम प्रत्येकाने स्वतः केलेलं आहे, तसंच तो एकटेपणा टाकणंही प्रत्येकाला स्वतःला करावं लागेल. गर्दी, प्रदर्शन, उन्मत्तपणा यांचा धर्माशी काहीही संबंध नाही हे मला स्वच्छपणे पटतं."

('ढोल ताशे' या नाटकातील अक्षय या पात्राच्या संवादांतून) -- विकास पालवे यांची पोस्ट.

बिनराजकीय पोस्ट -- " सर्व याचिकांची सुनावणी एकत्रितपणे घ्यावी की नाही यावर आधी सुनावणी होईल ! "

विचार

एका चॅनेलवर एक फारच उद्बोधक तुकडा पाहायला मिळाला. ते दृश्य आपल्या शेजारच्या देशातले होते. तिथल्या टीव्हीवर एक राजकीय चर्चा चालली होती. दोन कसलेले विचारवंत चर्चा करत होते. त्यांतल्या एकाला लौकरच हे लक्षात आले की आता वैचारिक चर्चेची मर्यादा संपलेली आहे. त्यामुळे त्याने त्यांच्या माजी पंतप्रधानाबद्दल एक शिवी वापरली ! झाले ! वैचारिक क्षेत्र ओलांडून ती चर्चा शारीरिक क्षेत्रात गेली ! गुद्दागुद्दीच सुरू झाली ! सत्य गाठायचेच हा दोघांचाही निर्धार असल्याने आता इलाज राहिला नाही ! मग इतरांना मध्ये पडून त्यांना सत्यापासून लांब करावे लागले !

असे वैचारिक प्रयत्न आपल्याकडेही टीव्हीवर वा प्रतिनिधीगृहांत झाल्याचे समजते. खूपच पुढारलेल्या देशांतही शेवटी हेच मार्ग चोखाळावे लागतात असे अनेकदा दिसून आलेले आहे, म्हणतात. तेवढे आपापल्या विचारांशी एकनिष्ठ आणि नि:शंक असे तगडे विचारवंत असले तरच हे क्वचित जमून जाते, असे म्हणतात. त्या मानाने महाराष्ट्रातले विचारवंत हे लेचेपेचेच असतात, असे म्हणावे लागते. विचारासाठी मरा वा मारा याला ते सहसा तयार होत नाहीत ! खरे तर सर्वच राजकीय विचारवंतांनी व्यायामशाळा आणि उत्तम आहार या बाबतीत आग्रहीच राहायला हवे. सहिष्णुतेच्या गप्पा मारत मेंगळट जगण्याचे समर्थन करणे हे सत्यापासून पळ काढणेच आहे !

मला लोक म्हणतात की तुम्ही राजकीय बाजू घेत नाही, सत्याच्या शोधात भाग घेत नाही, हा तुमचा पळपुटेपणाच नुसता नाही तर तुम्हाला एकूण समाजाबद्दलच बेफिकिरी असण्याचे हे लक्षण आहे ! पण, मी खरे ते सांगतो – आयुष्यात कधीच मी व्यायामशाळेचे तोंडही पाहिलेले नाही ! एका गुद्यात गारद होणारा असा मी माणूस आहे ! करणार काय ? निवडणुकीच्या वेळी लपत-छपत केंद्रावर जाऊन गुप्तपणे मतदान करून येणे एवढीच माझी कुवत आहे !

विचाराने सत्य गाठायचे तर तुमच्या मागे एखादी मोठी संघटना हवी, पक्ष हवा, सैन्य वा टोळी हवी, हे बेसिक सत्य समजण्याइतकी वैचारिकता नक्कीच माझ्याकडे आहे ! ( आणि अशा सामूहिक सत्याची आवड ही माझ्या वैचारिक स्वभावातच नाहीय हो ! )

--- ००० ---

" जगाची व्यवस्था बदलायला हवी म्हणजे युद्धे थांबतील आणि सर्वांना न्याय मिळेल ! "

आता मी तो ' कासव ' नामक सिनेमा पूर्ण विसरून गेलो आहे -- पण, या पोस्टमध्ये काही तथ्य असावे असे वाटल्याने पुन्हा देत आहे – ( १०-१०-१७ ).

१० ऑक्टोबर – मानसिक आरोग्य दिन आणि ‘ कासव ‘

आज मानसिक आरोग्य दिन आहे आणि याच्याशी संबंधित असा ‘ कासव ‘ हा सिनेमा मी कालच पाहिला आहे. तो सिनेमा कसा बंडल आहे त्याची पोस्ट मी दिलेलीच आहे. आता जरा वेगळ्या प्रश्नावर बोलायचे आहे. ‘ कासव ‘ चा एक प्रमुख पात्र असलेला ( हीरो नाही म्हणत ) जो शिक्षण अर्धवट सोडलेला कॉलेज तरुण आहे, तो मनोरुग्ण आहे. तो दारू पीत होता, ड्रग्स घेत होता आणि मुख्य म्हणजे मनगटाची नस कापून आत्महत्येचा प्रयत्नही त्याने केलेला आहे. या चित्रपटातली जी एक प्रमुख स्त्री व्यक्ती आहे तीही थोडीफार मनोरुग्ण असून त्यातून बाहेर पडलेली आहे. ( तिला मात्र नायिकाच म्हटले पाहिजे कारण ती म्हणजे चांगले वागण्याचे एक उत्तुंग टोक आहे ! ) तरी, मधेच तिला एखादा झटका आलेला दिसतोच. आता हा तरुण तिला कुठल्यातरी गावातल्या हॉटेलात दिसतो. त्याची तिला काहीच माहिती नाही. तरीही ती त्याला स्वतःबरोबर गोव्यात न्यायचे ठरवते. प्रेक्षक घाबरलेले असतात. त्या मुलाचे काहीतरी आजारपण दाखवून डॉक्टर, औषधे – ही जी प्रेक्षकांची अपेक्षा असते ती पूर्ण करायचे ठरते. त्यासाठी त्या मुलाला फणफणून ताप आणला जातो ! म्हणजे त्याचा मानसिक उद्रेक दाखवायची गरज पुसली जाते ! आणि बऱ्याच प्रेक्षकांना हे माहीतच असते की डॉ. मोहन आगाशे हे एक मानसोपचार तज्ज्ञ आहेत – त्यामुळे, अगदीच गरज पडल्यास ते सिनेमाबाहेर उभे राहून सिनेमातल्या त्या तरुणाला उपचार देतील ! हे विचारात घेता पात्रयोजना अत्यंत चपखल झालेली आहे, असे म्हणता येते !

एक स्वतः मानसिक रोगातून बाहेर पडलेली स्त्री दुसऱ्या एका तशाच रोग्याशी चांगले वागून त्याला कसे सुधारते, असा काही आशय हा चित्रपट काढणाऱ्यांच्या मनात असावा. पण, इथे काही प्रश्न पडतात --

१. नायिकेच्या  चेहऱ्यावर, चांगले वागण्याचे समाधान मिळवण्याचा हावरटपणा स्पष्ट दिसतो. हा उत्तम अभिनय म्हणावा की तो आदर्श मान्य असणे म्हणावे ?

२. माहीत होऊनही एखाद्या अतज्ञ व्यक्तीने अशा धोक्याच्या रुग्णाची जबाबदारी घेणे, हे बेजबाबदरपणाचे नाही का ?

३. एखाद्या व्यक्तीला चांगले वागायचे आहे म्हणून तिने एखाद्या मनोरुग्णाला धोक्यात घालावे का ?

४. काही विपरित घडले तर, अशा रुग्णाला, पोलिसांना न कळवता, स्वतःबरोबर नेणे हा गुन्हा नाही ठरणार ?

५. इतके चांगले वागणाऱ्या नायिकेला, तिच्या घटस्फोटाच्या केससाठी अचानक कधीही अमेरिकेला जावे लागू शकते, हे समजत नव्हते ? आपण, असे अचानक चिठ्ठी ठेवून गेल्यावर त्याच्यावर काय परिणाम होऊ शकतो, ताबडतोब उपचारांची गरज पडली तर काय – याची काहीच तजवीज ती करत नाही ! म्हणजे, तो आता बरा झाला आहे असे तिचे ‘ तज्ञ मत ‘ झाले आहे का ?

६. असे रुग्ण अशा ढिसाळपणे हाताळायचा अधिकार कुणी स्वतःकडे घ्यावा का ?

--  याबाबत काही तकलुपी समर्थने आहेत – तो प्रश्न नाही – पण, या सिनेमाच्या निमित्ताने आणि आजच्या मानसिक आरोग्य दिनाच्या निमित्तानेही, अशा रुग्णांच्या बाबतीतली इतरांची जबाबदारी म्हणजे काय – याची चर्चा व्हायला हवी.

--- ००० ---

ट्रोलिंग आणि द्वेष हे देशहितासाठी आवश्यकच आहेत -- त्यामुळे देशाचे मानसिक आरोग्य मार खाणार असले तरी !

लौकरच वाचकांना उपलब्ध होईल ' वस्तू ---- '

आणि त्यानंतर येईल ' पाच ॲब्सर्ड नाटके '

( आता लागलीय लिंक तर हे पुस्तकांचे काम उरकूनच घ्यावे, असा विचार आहे. )

आदरणीय चं.प्र. सर,

अनेक वर्षांनी माझे अक्षरलेखन पुन्हा सुरू केलं. त्यासंबंधी छोटीशीच पोस्ट केली आणि ती पाहून तुमच्या पुस्तकांसाठी अक्षरलेखन मी करावं_  असा तुमचा प्रस्ताव आल्यावर आनंद अर्थातच झाला होता. पण मी व्यावसायिक अक्षरलेखन करणारा कलाकार नाही. मी कलानिर्मिती_ पूर्णवेळ व्यवसाय म्हणून करत नाही असा एक inferiority complex सुद्धा जोडीला होताच.

मी काही किरकोळ सराव करून हे काम केलं.

हे अक्षर लेखन अर्थात मी स्वतः केलं. माझे अनेक मित्र अशी कामं व्यावसायिक म्हणून करतात. मुद्दाम त्यांच्याशी ह्याबद्दल बोलले सुद्धा नाही. तुमच्याकडे जो दोन तीन दिवसांचा वेळ मागितला त्यात मुद्दाम काहीही केलं नाही. अगदी माझा रोजचा अक्षर रियाज देखील केला नाही. इतर कोणतंही काम / इतरांचं अक्षरलेखन जाणीवपूर्वक पाहिलंही नाही.

तुमचं काम हे माझ्यासाठी निव्वळ एक काम नव्हतं.....

भलेही कमी प्रशिक्षित...काहीसे कच्चं...

पण मला संपूर्ण माझं काम करायचं होतं.

एकेक रेष मला माझी असायला हवी होती. त्यावर कोणाचंही अस्तित्व, सल्ला, प्रभाव, सूचना, मार्गदर्शन_ काहीही नको होतं..जे घेणं सहजशक्य होतं, अनेकांनी ते आनंदाने केलंही असतं.माझं अनघड..अनाघ्रात असणं,संपूर्ण प्रभावहीन असणं मला हवं होतं.

तो किरकोळ अक्षर प्रवास नव्हता. स्वतःचा साचा वितळणे होतं. मुद्दाम जाणिवपूर्वक...पूर्वग्रह, प्रभावहीन , संपूर्ण स्वायत्त होता येतं का हे पाहायला हा प्रवास होता....मनोमन.

त्या रेषांमध्ये कोवळीक यावी अशी इच्छा होती .

ह्या निमित्ताने आपले काही संवाद झाले होतेच. ह्या सगळ्याचा विचार करून मला हे काम ह्या प्रकारे करावं वाटलं.

रादर...

निर्मिती प्रक्रियेत कुठलंही काम असंच केलं पाहिजे असं मला वाटतं. आणि मला खात्री आहे तुम्हीही ह्याच्याशी सहमत असाल.

काल पुस्तक तयार झालं.

माझी अक्षरं....,माझ्या हातांचा स्पर्श त्या पुस्तकाच्या कव्हरवर पाहणे हा आनंद खूप खास होता.

ह्या संधीसाठी तुमचे खूप आभार.

तुमचे आशीर्वाद असेच राहो.

प्रिया देशपांडे

....

*वस्तू आणि इतर सहा दीर्घांक*

# माझा अक्षरप्रवास

@ प्रिया देशपांडे

कोणत्याही प्रकारचा द्वेष मनात बाळगणारी व्यक्ती युद्धविरोधी असू शकते ?

नेतेच हलकट असतात -- तेच बिचाऱ्या, निष्पाप सामान्यांना युद्धात ढकलतात -- हे खरे आहे ?

जिथे मैत्री वा संबंध टिकवायचा असतो तिथे मतभेदांचे महत्त्व कमी होते !

विचारांना चालना काय, कधीही मिळाली तरी चांगलेच ना --

6 Years Ago

स्वच्छंदी, विद्रोही, असंगत, अस्तित्ववादी -- अशा वेगवेगळ्या साहित्याचे वेगवेगळे समीक्षक असावे लागतात का ? एकूण निर्मितीचा आवाका खुलेपणाने घेणारे समीक्षक असू शकतात की नाही ? मराठीत असे कोण होऊन गेले वा असे कोण हयात आणि कार्यरत आहेत ?

" ' वाचनप्रेरणादिन ' या सणानिमित्त आज आमच्याकडे सदायम्मी गुलाबजाम आहेत ! "

धर्म

धर्माच्या ओळखीवर आधारित जगात कुठेही संघर्ष झाला तर जगात इतरत्र धर्मवादाला बढावा मिळण्यात त्याचा परिणाम होणारच. मुले, स्त्रिया, वृद्ध आणि साध्या नागरिकांच्या हत्या होताना पाहून कुणालाही कळवळा वाटणे साहजिकच आहे. सगळेच म्हणतात की मी युद्धाच्या विरोधात आहे पण सगळेच युद्धाला पोषक भूमीच तयार करत असतात. जसे, भ्रष्टाचार वाईट असे सगळेच म्हणतात आणि तरीही तो थांबत नाही. यात, काही बावळट लोक धर्म आणि धर्म या संकल्पनेशी असणारी समरूपता यांतला फरकच पाहात नाहीत. आणि जणू निष्पापपणे आणि उदात्तपणे गाणी म्हणतात की ‘ मजहब नही सिखाता आपसमे बैर रखना ‘, वगैरे ! हिंदुत्व या संकल्पनेखाली एकत्र येणारे लोक म्हणणारच की बघा ना, जगात काय चाललेय ते – आम्हाला आमची भूमी नको ? ती आम्ही शाबूत ठेवायला नको ? देश ही जशी एक भ्रामक संकल्पना माणसाने तयार केली तशीच धर्म हीही एक भ्रामक संकल्पनाच आहे. सगळ्यांचीच ! हिंदू धर्मात अमुक असे कुठेही सांगितलेले नाही किंवा कुठल्याच धर्मात हिंसा योग्य म्हटलेले नाही – असे मौल्यवान विचार इथे अप्रस्तुत असतात. जसे देश या नावाच्या समूहात असणे माणसाला सुरक्षित आणि आवश्यक वाटते तसेच धर्माचे आहे. धर्माशी बौद्धिक समरूप होणे आणि आचरणात धर्म असणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत, हे नीट पाहायला हवे. लोक विचारतात की बुद्ध होऊन गेला पण त्याचा मानवजातीला काय उपयोग झाला ? हाच प्रश्न प्रत्येक धर्माला लागू होणारा आहे. कारण ‘ अत्त दीप भव ‘ किंवा ‘ निर्वाण ‘ हे जगण्यात नसले की मग त्या तत्त्वांशी फक्त बौद्धिक समरूपता शक्य असते. अमूकच धर्माच्या लोकांना अक्कल शिकवण्याचा हा प्रश्न नसतो. पूर्ण मानवजातीचाच हा प्रश्न असतो. या सगळ्या प्रकारात समरूपतेत सुरक्षितता वाटणे, जगणे सशक्त वाटणे हे सर्वांचेच चालू असते. याच मार्गाने मग समरूपतेच्या जात, भाषा, प्रांत, पंथ, विचारसरण्या अशाही जरा लहान लहान आवृत्या माणूस निर्माण करत राहतो आणि सर्वांचेच जगणे संघर्षमय करत राहतो, हे डोळे उघडू पाहायला हवे. कुठेच समरूप न होता माणूस जगू शकतो का, हा खरे तर यातला मूळ प्रश्न आहे, पण, तो महत्त्वाचा कुणालाच वाटत नाही. प्रत्येकाला वा प्रत्येक समूहाला हेच दाखवायचे आहे की मी किती सज्जन, बरोबर, नैतिक, उदार आणि उदात्त आणि बाकीचेच कसे जगणे घाण करत आहेत ! असे निवडक बुद्धीचे न्यायाधीश होणे सर्वांनाच कौतुकास्पद वाटते यात शंकाच नाही. कुठे ना कुठे समरूप होणारा माणूस निष्पाप आणि अहिंसक कसा असू शकेल ? आणि मग अमूकच समरूपतेला घातक, हिंसक म्हणण्याच्या पुरोगामीपणाचा उपयोग काय ? याला एकच प्रश्नात्मक उत्तर असते की मीच कसा काय धर्माचरण करू शकेन ? सगळे जग होऊ द्या आधी निष्पाप, अहिंसक, शांत – मग मीही तसे जगायला तयार आहे. आणि असे कदापि घडण्याची शक्यता दिसत नाही, हे सर्वांनाच समजते.

मग ‘ मी आणि माझा समूह हितकारक आणि बाकीचे अहितकारक ‘ असा भ्रम स्वीकारून जगणे हेच अटळ बनते. त्यासाठी आपापल्या डोक्यांत निवडक तपशील जमवत राहणे आणि आपापली समरूपता पक्की करत राहणे, हे सगळेच करत राहतात. युद्धाने लोकांच्या जगण्याचा विध्वंस होतोच ना – नॉर्मल काय राहते ? तसेच खरे प्रश्न आर्थिक आहेत, महागाईचे, बेरोजगरीचे आहेत वगैरे उदात्ततेला शून्य किंमत राहील असे हे समरूपतेचे प्रश्न असतात.

या ना त्या प्रकारे स्वत:ला आयसोलेट करणे – अलग पाडणे, त्यातून येणारी वर्चस्वाची इच्छा, एकाकीपणा, वैफल्य, भीती – असे सगळे मनाचे प्रश्न वगळून आपल्याला सामाजिक, आर्थिक, राजकीय निराकरणे हवी आहेत. हे घडणे अशक्य आहे याकडे दुर्लक्ष करणे हा जर पुरोगामीपणा असेल तर आपण सगळेच आणि आख्खी मानवजातच पुरोगामी आहे, असे म्हणता येईल. धर्माच्या समरूपतेच्या प्रश्नांवर चर्चा करणे, एकमेकांना मूर्ख म्हणणे – हीच पद्धत लोकप्रिय आहे आणि राहील ! इलाज नाही !

--- ००० ---

' दिक्कालाच्या वाटेवरले अंधारदिवे '

या युद्धविध्वंसाच्या काळात कुणाही सजग माणसाची मनस्थिती दिङमूढ म्हणावी अशी होते. आजच्या ( १८-१०-२३ ) पुणे सकाळ मधली ब्रिटिश नंदी यांची, त्यांच्या ' ढिंग टांग ' या सदरातली ही गद्य कविता जरूर वाचावी. युद्धातून येणाऱ्या विदारक मानवी अवस्थेचे हे एक परिपूर्ण दर्शन आहे !

--- ००० ---

या, खालील पोस्टलाही ' समकालीन ' म्हणता येईल काय ? --

7 Years Ago

एकूण कलेबद्दल बोलण्या ऐवजी उदाहरणादाखल कवितेबद्दल बोलू.

अनेकदा कवी ( यात कवयित्रीही आल्या ) असे म्हणत असतात की हे पाहून ते अस्वस्थ होतात, ते पाहून तर ते अधिकच अस्वस्थ होतात आणि अशी अस्वस्थता साठत जाऊन ती अभिव्यक्त होण्यासाठी टाहो फोडू लागते, आणि त्यामुळे कविता जन्माला येते, म्हणजे लिहिली जाते.

आता एक प्रामाणिक वाचक घेऊ उदाहरणादाखल.

तो स्वतःच आधी त्याच्या त्याच्या अस्वस्थतांनी खूप अस्वस्थ असतो. त्यात परत कवी कवींत भेदभाव न करता तो असंख्य कवींनी व्यक्त केलेली पाचेकशे प्रकारची तीव्र अस्वस्थता स्वीकारत जातो !

काय होत असेल याचा परिणाम त्या वाचकाच्या आरोग्यावर ? एकूण दीर्घकालीन सामाजिक आरोग्यावर ?

अस्वस्थता हा कलेचा महत्त्वाचा निकष झाल्यामुळे हृदयरोगाचे प्रमाण वाढू शकते का ?

बरीच माणसे वेडेपणाच्या कगारवर जाऊ शकतात का ?

की यातून व्यक्तिगत आणि सामाजिक आरोग्य सुधारते ? कशा प्रकारे ?

‘चार पुरूषार्थांची चार नाटके’ या संग्रहाच्या निमित्ताने चंप्रंच्या - ढोल ताशे, इराक, बुद्धिबळ आणि झब्बू आणि जणू काही वास्तव - या चार नाटकांचे पुनर्वाचन घडले.

या आधी ही चारही नाटके मी स्वतंत्रपणे वाचली होती. शिवाय, त्यांचे रंगमंचावर सादर झालेले नाट्यप्रयोगही मी पाहिले होते.

आता, चंप्रंनी ‘चार पुरूषार्थांची चार नाटके’ या शीर्षकचौकटीत या चारही नाटकांचा समावेश करून एक अनोखा नाट्यसंग्रह उपलब्ध करून दिला आहे. अनोखा अशासाठी की, स्वतंत्रपणे वाचली होती तेव्हा अनुक्रमे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या पुरूषार्थांचा पदर या नाटकांशी पुढे मागे कधीकाळी जोडला जाऊ शकेल, असे मला वाटले नव्हते. पण आज जेव्हा मी ही चारही नाटके एका ब्रॅकेटमध्ये ठेवून वाचतो तेव्हा मात्र ती संग्रहाच्या थीमला तंतोतंत समर्पक वाटतात. ही नाटके तशी योजनापूर्वक लिहीलेली नाहीत, ओघाओघात ही चौकडी पूर्ण झालेली आहे, असं चंप्र म्हणत असले तरी ही किमया घडलीय हे खरेच !

ज्यावेळेस ही नाटके चंप्रंनी लिहीली असतील त्यावेळेसच त्यांना धूसरपणे का होईना, या नाटकांना लगटून असलेल्या पुरूषार्थांच्या मितींचा अंदाज आला नसेलच, असं वाटत नाही. पण, नाटककार हा स्वतःच्या नाटकांचा सजग वाचकही असतो. आणि जेव्हा आपणच लिहीलेली नाटके तो वारंवार तपासून पाहत राहतो तेव्हा त्या नाटकांत निहित असलेल्या अशा मिती काळाच्या ओघात त्याच्यापाशी ठळक होत जात असाव्यात. चंप्रंचा नाटकांचा हा संग्रह या प्रोसेसची परिणती वाटतो. किंबहुना, चंप्रंना नाटककार म्हणून या नाटकांची ही मिती कदाचित ती लिहीत असतांनाच जाणवली असावी ! त्यांच्या नाटकांचे वाचक आणि त्या नाटकांच्या प्रयोगांचे कर्ते तसेच रसिक प्रेक्षकांनी ती आपल्या योगदानाने अधिक उजागर केली, असं म्हणता येईल.

champralekhan.com हे आपले संकेतस्थळ विकसित करून आपली समग्र नाट्यसंपदा एका क्लिकसरशी कुणालाही विनामूल्य उपलब्ध करून देणारे चंप्र सबंध देशातील एकमेव साहित्यिक असावेत. तिथे स्वतंत्रपणे त्यांच्या नाटकांच्या संहिता उपलब्ध आहेतच. पण, आपल्या अनेक नाटकांचे एकत्रितपणे संग्रह करून, त्यांत अंतर्निहित असलेल्या मिती अधोरेखित करत, पुस्तकरूपाने ही नाटके चंप्रंनी नव्याने उपलब्ध करून दिली आहेत, यापुढेही देणार आहेत.

सुट्या म्हणून वाचलेल्या संहितांना पुस्तकाच्या रूपात एकत्रितपणे वाचतांना त्या संहितांचा आजवर न जाणवलेला आयाम ठळक होत राहणे, हे या संग्रहांचे वैशिष्ट्य आहे. ते त्यांचे महत्वही आहे ! --- समीर दळवी.

नाटक : इराक लेखक : चं .प्र .देशपांडे प्रकाशन : www.champralekhan.com

'इराक ' हे नाट्यपुस्तक आज वाचलं . दोन देशांमधील राजकारणाच्या सहमती -असहमतीच्या पोझिशन्स , तसेच देशांतर्गत दोन पक्षांमधील मतभेद आणि त्याचसोबत त्यांच्यातील देवघेव , दोन विरोधी पक्षांकरिता सहानुभूती असेलेले नागरिक आणि त्यांमुळे त्यांच्या आप-आपसातील होणारे मतभेद आणि सरतेशेवटी या सर्वांच्या राजकारणाचा एका  सामान्य कुटुंबावर कसा प्रभाव पडत जातो यावर हे नाटक प्रकाश टाकत. नाटक कमालीची  घट्ट पकड वाचकावर ठेवत जात . अनेक नॉन-फिक्शन वाचून देखील इतका कन्टेन्ट मिळायचा नाही जितका हे फिक्शनल

नाट्य तुमच्यापर्यंत पोचवत . हे नाटक वा त्याची पीडीएफ चं .प्र .देशपांडे यांच्या वेबसाइटवरुन डाउनलोड करू शकता .

---------------------------------

प्रिया : मी जेव्हा सत्या बघितला होता ना तेव्हा मलाही मनातनं असच वाटून गेलं होत कि मला असाच पती मिळावा -धीट -actionpacked ! पण मी मिनटाईम तुझ्या प्रेमात पडून बसलेले ! तूच माझ ते स्वप्न सत्यात आणशील असं माझ्या स्वप्नातही आलं नसतं

ओम : याचा अर्थ आपण 'एक दुजे के लिये ' आहोत हेच नक्की ! जगात इतक्या वस्तू इतकी सुखाची साधनं आहेत - ती आपल्यासाठी नाहीत असं स्वतः ला पटवत का जगायचं ? मोठीमोठी हॉटेलं ,एसी बंगले , कार्स -आपल्यासाठी का नाहीत ? थोडं कमी जगू पण दिल खोलके जगू !

प्रिया : मलाही हेच पटतं ! तुलाच असं धाडसी जगण आवडतं त्यामुळे प्रश्नच नाही - नाही तर माझं जगणं फालतूंच झालं असतं! टीव्ही सिरियल्स बघणे आणि पोथ्या वाचणे -- असं ! ----- प्रसन्न जोशी.

माझ्यातला निर्दय लेखक

काल प्रसन्न जोशी यांची माझ्या ‘ इराक ‘ या नाटकावरची पोस्ट पाहिली आणि काही जुन्या आठवणी जाग्या झाल्या. चेतन दातारने हे नाटक ‘ आविष्कार ‘ तर्फे बसवून सादर केले होते. त्या वेळची संहिता जरा सविस्तर होती. नंतर मला ती जरा फापटपसारायुक्त वाटू लागल्याने निर्दयपणे मी तीत काटछाट केली आणि थोडेफार नवीन टचेस दिले. प्रसन्नजींनी त्यांच्या पोस्ट मध्ये दिलेला संवाद हा आधीच्या संहितेतला आहे. म्हटले तर तो संवादही तसा भारी आहे. पण, असा बराच भाग मी त्या संहितेतून उडवून लावला होता. एका मुलाला हवे ते महागडे बूट न घेतल्यामुळे तो घरातून पळून गेलेला असतो. त्याला परत बोलावण्यासाठी जी जाहिरात दिली जाते तीत त्या बुटांचा फोटो छापलेला असतो. “ बघ, तुला हवे ते बूट आणले आहेत – “ वगैरे. स्वतंत्रपणे ते सगळे भेदक होते पण नंतर मी ते नाटक आटोपशीर आणि अधिक तीव्र करायचे ठरवल्याने तो सगळा भाग मी उडवून लावला ! आताचे सुधारित ‘ इराक ‘ हे नाटक मराठीतले एक विशेष लक्षवेधी नाटक ठरावे असे झालेले आहे. तरीही, त्याकडे कुणी फारसे लक्ष देणार नाही, हा भाग वेगळा !

तसेच, पूर्वी मी ‘ नरदेह ‘ नामक एक नाटक लिहिले होते. कालांतराने ते वाचल्यावर माझे मलाच ते भयानक बोधप्रद आणि कंटाळवाणे वाटले. मग ती पूर्ण संहिता नाकारून मी ते पूर्ण नाटक नव्याने लिहिले. ते आता ‘ सध्या तरी शेवट गोड ‘ या नावाने उपलब्ध आहे. विजय वांकर यांच्या निर्मिती-नेतृत्वाखाली भालचंद्र पानसे यांनी ते दिग्दर्शित केले आणि त्याचे २५ प्रयोग सादर केले !

माझे ‘ घोकंपट्टी ‘ हे नाटक पी डी ए या पुण्यातल्या प्रख्यात संस्थेने सादर केले. ते ‘ जिंदगी ख्वाब है ‘ या नावाने रंगमंचावर आले. अजित सातभाई, दिलीप वेंगुर्लेकर आणि संजय डोळे या नाटकातल्या प्राध्यापकत्रयीने खूप मजा आणली. दिग्दर्शन अजित सातभाईंचे होते. याही नाटकात बऱ्यापैकी काटछाट नंतर केलेली असून आता ते अधिक नेटके झाले आहे, असे मला वाटते.

‘ जणू काही वास्तव ‘ हे माझे नाटक गिरीश पतके यांच्या दिग्दर्शनाखाली ‘ आविष्कार ‘ ने सादर केले. त्यातही जरा पसारा जास्त झालेला असून त्यामुळे मध्येच ते कंटाळा आणू शकते हे कळल्याने तेही नाटक आता जरा ‘ नीट ‘ केलेले आहे.

अर्थात अशा कामात मतभेदाला वाव असतो. “ अहो, चांगले होते की ते – उगीचच काढलेत – “ – असे होऊ शकते. पण. लेखकाला स्वत:ला त्याची कलाकृती वाचक/प्रेक्षकांपुढे कशी यायला हवी आहे, हेच शेवटी महत्त्वाचे ठरणार. यासाठी लेखकाला स्वत:च्या लेखनाकडे निर्ममपणे पाहता यावे लागते. आणि जोडीला पुरेसा निर्दयपणाही त्याच्याकडे असावा लागतो.

मी सुरुवातीला लिहिलेली, ‘ राज्य ‘, ‘ पंतप्रधान येत आहेत ‘, ‘ घटना घडतात ‘, ‘ मरणाचे स्मरण असावे ‘, ‘ मानव ‘ – ही नाटके मी स्वत:च नाकारून रद्द केलेली आहेत. ‘ हस्ताक्षर ‘, आणि ‘ निसर्गचित्र ‘ या नावांची नाटके लिहायला सुरुवात करून सोडून दिलेली आहेत. ‘ पाऊस ‘ ही एकांकिकाही अशीच रद्द केलेली आहे.

आता पुस्तके काढण्याच्या निमित्ताने सगळेच लेखन पुन्हा पाहिले जात आहे. आवश्यक ते बदल आणि माझे काही अधिकचे परिसस्पर्श करत आहे. नंतर मात्र पुन्हा ढुंकूनही या लेखनाकडे मी पाहणार नाही.

– ० –


वस्तू आणि इतर सहा दीर्घांक --

ले ० चं. प्र. देशपांडे.

मूळ किंमत रु.४००/--

सवलतीची किंमत रु.३५०/-- पोस्टेजसह.

विक्रीस उपलब्ध.

रक्कम पाठवण्यासाठी --

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

गेला आठवडाभर

व्हायरल सर्दी, खोकला, अंगदुखी यांनी जबर आजारी होतो. त्यामुळे, इकडे फारसे लक्ष नव्हते. आता बरेच बरे आहे. एकदोन दिवसांत गाडी नीट रूटीनवर येईल असे वाटते. काही वर्षांनी हा असा झोपून राहावे लागेल असा आजार आला. पुण्यात याची साथ असल्याची मटात आज मोठी बातमीच आहे. असो.

-- ० –

३१-१०-२३.

नाट्यनि:पात

अमुक एक दिवस विशेष ठरावा अशी विश्वात काही योजना नाही. पण, माणूस मनाचा वापर खूप मोठ्या प्रमाणात करत असल्याने असे  दिवस वा दिन साजरे करण्याची पद्धत पडली. आपल्या जगण्यात काहीतरी विशेष घडते आहे याचा आनंद घेण्याची ही एक सोय निर्माण झाली. तर आज आहे रंगभूमी दिन ! त्यासाठी शिरस्त्याप्रमाणे सर्वांना शुभेच्छा ! या रंगभूमी दिनाला आणि त्याच्या आजूबाजूला आपण काही संबंधितच पण वेगळे काही काम करतो आहोत तर ते नुसते समोर मांडावे, असे ठरवले. एकजण माझ्या लेखनाबद्दल दुसऱ्याशी बोलताना असे म्हणाला होता की, “ अरे त्याची पुस्तकं कुणी काढत नाही आणि काढली तरी कुणी बघणारही नाही ! “ त्या दुसऱ्याने हे समीक्षात्मक वाक्य माझ्याकडे बिनचूक पोचवले होते. त्यातला ‘ लागट ‘ भाग जरी सोडला तरी त्यात काही तथ्यही आहे, हे नाकारता येणार नाही. अर्थात गेली काही वर्षे माझ्या संकेतस्थळावर माझे सर्व लेखन मोफत उपलब्ध असून वर्षाला तिथे चार ते पाच हजार भेटी होत असतात, हा भाग वेगळा. ते असो. काळाचा महिमा असा की आता पुस्तके प्रकाशित करणे तसे सोपे झालेले आहे. एक तर नाटक, एकांकिका आणि कविता हे पुस्तकांच्या जगात सर्वात कमी मागणी असलेले प्रकार म्हणून कुप्रसिद्ध आहेत आणि मी नेमका तेच जास्त लिहीत आलो आहे. त्यामुळे, खप हा विषय विचारात न घेता मी स्वत:च माझे लेखन प्रकाशित करत आहे. सुरुवातीला अर्थात नाट्यलेखन ‘ संपवायचे ‘ ठरवले आहे. या वर्षात माझ्या नाट्यलेखनाचा पूर्ण नि:पात करायचा विचार आहे.

आतापर्यंत --

१ चार पुरुषार्थांची चार नाटके

२ वस्तू आणि इतर सहा दीर्घांक

--- प्रसिद्ध झाले. लौकरच --

३ पाच अब्सर्ड नाटके

५ सहा नाटके

५ निवडक एकांकिका

--- ही पुस्तके येतील. या निमित्ताने सर्वच नाट्यलेखन एकदा नजरेखालून जात असून फायनल होते आहे. एकदा हे सर्व पूर्ण झाले की पुन्हा ढुंकूनही या लेखनाकडे पाहणार नाही. काही वेगळ्याच प्रकारची नाटके लिहिण्याचे मनात आहे पण जे आहे त्याचे व्यवस्थापन पूर्ण झाल्यावरच तिकडे वळेन.

बाकीच्या लेखनावर इथे काही लिहीत नाही. माझे नाट्यलेखन हा एवढाच एक मर्यादित आणि मराठीत फारच थोड्यांना इंटरेस्ट असलेला विषय घेतला आहे. सुमारे ५०-६० वर्षे आपण मराठी नाट्यक्षेत्रात वावरतो आहोत तर तेवढा अधिकार आपल्याला आहे, असे गृहीत धरलेले आहे.

नवे रंगकर्मी, नवी नाट्यभाषा, नवे अवकाश, नव्या समस्या – अशा असंख्य गोष्टींची चर्चेत रेलचेल असताना हा एक जुना नाटककार काय स्वत:चे लिहीत बसला आहे, हे काहींना खटकू शकतेच. मी तसा लेखनातून निवृत्त वगैरे होणारा नाही. तसे तर एक प्रकारे अनेक वर्षे निवृत्त झालेले असण्याचाच तर अनुभव चालू आहे. काफ्काची हिंमत वेगळी होती – त्याने त्याचे लेखन जाळूनच टाकायला सांगितले होते. एक बारीकसा मराठी लेखक या नात्याने इथे, पुस्तके प्रकाशित करणे म्हणजे जाळून टाकण्याहून फार वेगळे काही नसते, या समजुतीतून हे काम करत आहे. आजच्या रंगभूमी दिनाच्या शुभ अवकाशात, म्हणूनच, ही नाट्यनि:पात योजना जाहीर केलेली आहे. सर्वांना रंगभूमी दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा !

--- ००० ---

०६-११-१६ ची कविता –

सांगून निरर्थक कविता

१

तुझ्या बाबतीत मला सल्फरचा अनुभव नव्हता
इकडे खड्डा खणल्यावर आकाशाला खळी पडते
एवढेच रुजलेले होते काचेच्या रंगीबेरंगी बाऊलमध्ये
तुला हसू यायचे कारणच नव्हते तुझा ब्लाऊज
भिजल्यामुळे उडालेल्या ठिणग्या पाहून
तूच तर माजवले होतेस समयसारणीचे महत्त्व

--- ००० ---

२

विद्वानांचे महत्त्व जाणारच होते आज ना उद्या
कारण दगडांचे कावळे उद्विग्न झाले तरी
पाणी पीत नाहीत वा गातही नाहीत
लैंगिक तीव्रतेने पडणारा पाऊस खजिल न होता
घालवू शकतो झाडांच्या पानांचे नैराश्य
त्याचे कामच असते खून होताना प्रत्यक्षदर्शी होण्याचे

--- ००० ---

३

हिरव्या रंगाचे कान असलेली प्रत्येक व्यक्ती
प्रलयातूनही बचावते हे माहीत असल्याने
सगळे कारखाने बंद करण्यात आले त्यांची
निराश मशिनरी पाहून
सुटकेचा एकच मार्ग होता जाणारा
निरर्थकतेकडून निरर्थकतेकडे
अर्थात अर्थहीन
--- ००० ---

गिरीश पतके ---

आत्ताच चंप्रंचे नवीन प्रकाशित झालेले "वस्तू आणि इतर सहा दीर्घांक" हे पुस्तक आले. यातील सगळेच दीर्घांक हे महत्त्वाचे नाट्यऐवज आहेत शिवाय ते चंप्रंस्टाईलचे आहेत.
या सहा दीर्घांकांपैकी "बुद्धिबळ आणि झब्बू" व "डावेदार" हे दोन दीर्घांक मी दिग्दर्शित केले होते. तो कालखंड माझ्यासाठी अत्यंत मजेचा आणि आनंदाचा होता.
आणखी एक जुळून आलेला योगायोग म्हणजे आजच्या दिवशीच पण २३ वर्षांपूर्वी म्हणजे ०६ नोव्हेंबर २००० रोजी "बुद्धिबळ आणि झब्बू" या दीर्घांकाचा पहिला प्रयोग झाला होता.
नाटकवाल्यांनी आणि जिज्ञासू वाचकांनी हे विक्रीस उपलब्ध असलेले पुस्तक जरूर विकत घ्यावे.
वस्तू आणि इतर सहा दीर्घांक --
ले ० चं. प्र. देशपांडे.
मूळ किंमत रु.४००/--
सवलतीची किंमत रु.३५०/-- पोस्टेजसह.

माझी तेलगी लिंक --

२०१७ साली, माझे, ' प्रेमच म्हणू याला हवं तर -- ' हे नाटक, ' रिनोव्हेशन ' या नावाने हिंदीत आले होते. ' अ व्हेरी सीरीयस कॉमेडी ' ( एक अत्यंत गंभीर हास्यात्मिका ) अशी त्याची जाहिरात होती. सर्व जातिधर्माच्या प्रेक्षकांची याला गर्दी होत असे. त्यात, गगन देव रियार आणि मंजिरी पुपाला हे दोन कलाकार काम करत असत. विशेष म्हणजे, त्यातला गगन देव सध्या तेलगीच्या भूमिकेत गाजतो आहे ! म्हणजे पाहिलेत ना -- अखिल भारतीय कीर्ती संपादन केलेला एक पाताळयंत्री वीर तेलगी आणि माझ्यासारखा एक साधा निरुपद्रवी लेखक यांची कशी लिंक लागते ते !

या कामासाठी माझ्या मुलाच्या एका मित्राने त्याला हे श्री. शंतनू पांडे यांचे नाव सुचवले. ते घरी आले तेव्हा मी फोनवर कुणाशीतरी माझ्या पुस्तकांबाबत बोलत होतो. ते ऐकून त्यांनी मुलाकडे सहज चौकशी केली. तर तो मी आहे

हे कळल्यावर त्यांना खूप आनंद झाला ! नाट्यक्षेत्रात त्यांनीही लेखन, दिग्दर्शन, अभिनय असे बरेच काम केलेले आहे -- तेही मराठीतल्या अनेक दिग्गजांबरोबर ! या ओळखीमुळे आमच्या बऱ्याच गप्पा झाल्या. माझाही दिवस छान गेला !

मजा आली !

--- ० ---

" यातले खरे काय आहे ते समजून घेण्यासाठी मी त्यांचे ऐकणार आहे, तुमचे नाही ! " ( १८-११-२२ ची पोस्ट ).

शुभारंभाचे प्रयोग – ढोलताशे --

२१ आणि २२ नोव्हेंबरला, सायं ७:३० वाजता,

द बॉक्स, तिकिट दर ₹१९९

तिकिटांसाठी संपर्क: +91 96577 09448

लेखक: चं. प्र. देशपांडे

दिग्दर्शक: हृषीकेश करदोडे

निर्माते: डॉ. ऋषिकेश भावे आणि राहुल भेंडे

@uchchaishrava

@rotikapadaswag

कलाकार:

निखिल @sailor_nikhil

सई @saeezende

अंजली @anjelina0148

हेमंत @_hemant_sancheti

शुभम @aani_shubhampendse

शर्वा @_sharvaaa_

सागर @sagardahale_3

निर्मिती सूत्रधार: अदिश @adishpawale

संगीत: अभिराम @abhiramparalikar

नेपथ्य: अनिल, चैताली @chaitali_1803

प्रकाशयोजना: अबोली @aboli_shitole आकांक्षा @_aakansha.p_

नक्की या!!

प्रिया छानच करतेय हे काम ! ' मी पाहू कशाला नभाकडे ? '
पाच ॲब्सर्ड नाटके...
ह्या पुस्तकाच्या अक्षरलेखनासाठी चं.प्र. न चा प्रस्ताव आला..
हे काम आधीच्या अक्षरलेखन पेक्षा अधिक आव्हानात्मक होतं.
चं.प्र. न साठी काम करणे जिव्हाळ्याचं तर होतंच,
एकूणच काफ्का, आणि त्याचे " ट्रायल "
हेदेखील माझ्याही विशेष आवडतं.
त्यामुळे ॲब्सर्ड ह्या शब्दाच्या अनुषंगाने...
चं.प्र. न शी झालेले संवाद _ ही अत्यंत मौलिक गोष्ट होती.
शिवाय हे काम व्यावसायिक स्तरावर अधिक ओळख देणारं देखील होतं.
एकूणच ह्या कामानिमित्ताने झालेला आपल्याच शोधाचा प्रवास सर्व अर्थाने मला समृद्ध करत गेला.
ह्यासाठी चं.प्र. न चे आभार तर आहेतच....
ह्या निमित्ताने माझी अक्षरखूण एका मौल्यवान साहित्यकृतीवर उमटलेली असेल...
ही फार मोठी गोष्ट....❤□❤□❤□❤□
# calligraphy _ priya's art studio
# अक्षरलेखन _ प्रिया देशपांडे
*** tagged people... संवाद, चर्चा, मत, मदत ह्याही वेळी घेतली नव्हती. थोडंसं वेगळं काम करताना आपल्याच कामावर, स्वतःवर असणारा विश्वास, प्रेम आणि  तुम्हा सर्वांचे प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष प्रोत्साहन ह्यासाठी तुम्हा सर्वांच्या सोबतीचा आवर्जून उल्लेख असायला हवा. म्हणून tag करत आहे.

अभ्यासांचे ताण, महत्त्वाकांक्षांचे ताण, अपेक्षांचे ताण आणि ब्रेकप्सचे ताण हे पाहता आता तरुण वयापासून व्यसने समर्थनीय ठरतील ?

आयुष्यातले कित्येक तास, दिवस, महिने, वर्षे -- आपण एक मराठी लेखक आहोत या समजुतीत वा भ्रमात उधळली -- आता त्या लेखनाच्या पुस्तकांसाठी काही पैसे उधळणे, हे त्यापुढे काहीच नाही !

' पाच अबसर्ड नाटके ' प्रकाशित झाले.
मराठीतले हे एक अद्वितीय म्हणावे असे पुस्तक आहे.
त्याची विक्री सुरू झालेली असून ते मागवायचे झाल्यास
लागणारी माहिती खालीलप्रमाणे आहे ---

या पुस्तकाची मूळ किंमत र.500/-- असून सवलतीची किंमत रु.350/-- ( पोसटेजसह ) अशी आहे. पैसे पाठवण्याचा तपशील खालीलप्रमाणे ---

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

धन्यवाद !

कोणताही द्रेष्टा हिरीरीने आपले म्हणणे मांडत असेल तर ह्या सोडून -- गोविंदाची गाणी बघा/ऐका !

३०-११-२३.

सुमारे 50 वर्षे नाट्यलेखन करत आलो आहे. आशयाच्या पाण्यात उतरून त्यावर लिहिले गेलेले फारच थोडे आहे. हा लेख तसा आहे. त्यामुळे, लाखे मित्र असले तरीही, धन्यवाद !

साधक-बाधक चर्चेसाठी वा व्यक्तिगत चिंतनासाठी ---

करंदीकरांच्या कवितेने जे वस्तुतः आपल्या निर्मितीतून

टाळावे असे आपणांस वाटते ते तसेच टिकवून ठेवले आहे. याचे कारण तिला समूहमनाचा मोह होत आहे, हे तर नाही ना, अशी शंका आल्यावाचून राहात नाही. खरे म्हणजे हा प्रश्न केवळ करंदीकरांचा नाही. एकूण मराठी वाङ्मय हेच अजून नैतिक आणि मूल्यात्मक पातळी सोडू शकलेले नाही. 'काय हलाखी स्त्रीत्वाची ही- माणूसकीचे काय विडंबन' असे मर्ढेकरांनाही सांगावेसे वाटते. आम्हाला अजूनही मानवी जीवनात, केवळ मानवी जीवन म्हणून रस वाटत नाही, आम्हाला अजूनही कुतूहल वाटते ते काही नैतिक व मूल्यात्मक कल्पनांमध्ये. पायाखालची वाळू सरकत असताना कशाला तरी घट्ट पकडून ठेवावेसे वाटते, तसेच आपले सर्वांचे झाले आहे. परिस्थितीच्या प्रचंड दाबामुळे आम्ही परंपरेपासून बेदरकारपणे ढकलले जातो आहोत आणि आपण मात्र जेथून ढकलले जात आहोत तेथे पुनःपुन्हा चिकटण्याचा प्रयत्न करीत आहोत. मुलाला घराबाहेर काढताच मूल बंद दाराला जसे खिळून दार उघडण्याची वाट पाहत राहते, तसे आपलेही झाले आहे. म्हणूनच परिस्थितीच्या दाबातून जन्माला आलेल्या नव्या नव्या जाणिवांना जिद्दीने समोरे जाण्याऐवजी व असे सामोरे जाताना मोडून पडलेल्या नैतिक व मूल्यात्मक चौकटी तटस्थपणे अवलोकण्याऐवजी आपण या मोडू लागलेल्या चौकटीला खिळून बसतो आहोत. मराठी कादंबरी, नाटक आणि

कविता या तिन्ही क्षेत्रांत हेच चित्र आपणांस पाहावयास मिळते आहे. म्हणून हे अपयश एकट्या करंदीकरांच्या कवितेचे नाही, तर एकूण मराठी वाङ्मयाचेच आहे असे म्हणावे लागेल.

--- डॉ. सुधीर रसाळ – ' काही मराठी कवी जाणिवा आणि शैली – पान १७५.

--- ००० ---

अधिकारी

आमची कन्या सध्या यूके च्या एका नामवंत संगणक कंपनीत नोकरी करते. ती काही दिवसांसाठी भारतात आलेली आहे. योगायोगाने तिची बॉस असलेली तिची मैत्रीणही आताच भारत पाहायला आलेली आहे. दोन दिवस तिचा आमच्या कन्येकडे मुक्काम आहे. या दरम्यान आमच्या कन्येकडे तिने आम्हाला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. काल आमची कन्या-जावई यांसह ती आमच्या घरी आली होती. तिला इडली-सांभार खायचे होते, म्हणून तो बेत होता. या निमित्ताने प्रथमच आमच्या घरी एक गोरी व्यक्ती येऊन गेली !

सांगायचा मुद्दा हा नाही. घर पाहताना एका कपाटात तिला, मला मिळालेली सन्मानचिन्हे दिसली. त्यांबाबत तिने विचारल्यावर, मी मराठीतला एक लेखक असल्याचे मुलाने तिला सांगितले. तर जरा वेळाने ती माझ्याशी फ्रांझ काफ्का या विषयावर बोलू लागली ! मी चकित झालो ! एका संगणक कंपनीतली अधिकारी आणि काफ्का ? मग तिला सांगितले की मी काफ्काच्या ' ट्रायल ' चे मराठीत नाट्यरूपांतर केलेले असून लौकरच कोल्हापुरात त्याचा प्रयोग होतो आहे !

आहे ना विशेष ? सर्जक साहित्य समजून घेण्याची आच असलेले असे लोक आपल्या ' मराठाची बोल कौतुके ' मध्येही वाढत जावोत, हीच सदिच्छा !

--- ००० ---

" जेव्हा कवीच्या जाणिवा या प्रकारच्या सांप्रदायिक श्रद्धा बनून जातात तेव्हा त्याच्या समोर कुठलेच प्रश्न शिल्लक राहात नसतात. त्याला काही पाहायचे नसते आणि काही शोधायचे नसते. वैयक्तिक काय किंवा सामाजिक काय, साऱ्याच प्रश्नांचे, सुखदु:खांचे निदान आणि त्यावरचा त्याचा इलाजही पक्का होऊन गेलेला असतो. त्याच्या कवितेत फक्त कार्य उरलेले असते श्रद्धाप्रदर्शनाचे आणि श्रद्धासंस्काराचे. त्यामुळे पक्क्या निष्ठांची आणि श्रद्धांची कविता वक्तृत्वपूर्ण बनते. ह्या निष्ठांच्या आणि श्रद्धांच्या संदर्भात त्याचे अनुभव घटक हे अत्यंत सुलभपणे एकत्र येत असतात. ह्या श्रद्धांना आव्हान देणाऱ्या घटनांचे, परिस्थितीचे अवलोकन करण्याची शक्तीच त्याने गमावलेली असते. हे केवळ मार्क्सवादी कवितेपुरतेच खरे आहे असे नव्हे, तर कुठल्याही नैतिक किंवा धार्मिक श्रद्धांमधून जन्मलेल्या कवितेबद्दलही हे खरे आहे. किंबहुना विशुद्ध भावकवितेबद्दलही हे खरे आहे. ह्या श्रद्धांच्या पक्केपणामुळे कवीची अनुभव घेण्याची क्रियाच साचेबंद बनून जाते. "

--- डॉ. सुधीर रसाळ, काही मराठी कवी : जाणिवा आणि शैली, पान १९४-५.

अन्नपाणी आणि संकट

आमची कन्या आणि तिची मुलगी व मुलगा काही दिवसांसाठी आमच्याकडे राहायला आले होते. सगळे रूटीन नीट चालू होते. खाणे, गप्पा, आठवणी, हास्यविनोद आणि आता नातवंडे मोठी झालेली असल्याने त्यांच्याशी वादविवाद असे सर्व मजेत चालू होते. आणि अचानक, अनपेक्षितपणे ते संकट उद्भवले ! काही खाताना कन्येचा घास श्वासनलिकेत गेला आणि तिला प्रचंड ठसका लागला. तिला पाणी प्यायला द्यावे तर ते तिला पिणे शक्य नव्हते. काहीच करता येई ना. मी माझ्या एका अनुभवावरून, “ थांब, घाबरू नकोस, एक सेकंद शांत हो “ असे तिला सांगत होतो. ती गुदमरू लागली. स्वत:च्या गळ्यावर हात मारू लागली. आम्ही सगळे भयभीत झालो ! करणार काय ? डॉक्टर, इस्पितळ शक्यच नव्हते. आम्ही सगळे जणू मरणाच्या दारात उभे होतो ! पण, सुदैवाने क्षणभर तो ठसका थांबला आणि हळूहळू सगळे नीट होत गेले ! हे भयानक संकट आले आणि आपोआप गेले ! काही दुर्घटना घडली असती तर ? आणि आपण काहीच करू न शकणे !

बाप रे ! मग, अशा वेळी काय करावे याचा शोध सुरू केला. डॉक्टरांशी बोलणे, नेटवरची माहिती, मित्रांशी चर्चा, वगैरे. कुणी म्हणाले गोड, विशेषत: मध चाटवावा, कुणी म्हणाले पाठीवर थोडा गुद्दा मारावा, वगैरे. पण, एकूणात, हे असे घडत असताना काय करावे याबाबत समाधानकारक काही सापडले नाही. तरीही, असे घडू नये म्हणून सावधानता कशी बाळगावी, असे काही सापडले. ते असे ---

1 खातापिताना बोलणे, हसणे, गप्पा, हास्यविनोद टाळावे.

2 खातापिताना टीव्ही वा मोबाईल बघणे वा मोबाईलवर बोलणे टाळावे.

3 घाईघाईने जेवणे, जाताजाता काही तोंडात कोंबणे हे करू नये.

4 खाण्यापिण्याकडे नीट लक्ष द्यायला हवे.

5 नीट चावून व्यवस्थित खावे.

6 खूप मोठे घास घेऊ नयेत.

7 औषधाच्या मोठ्या गोळ्या पाण्याबरोबर घेताना त्या दोन तुकडे करून घ्याव्या.

8 शक्यतो, व्यग्रता, काळज्या, ताणतणाव थोडा वेळ तरी बाजूला ठेवावे.

9 जेवताना संतापणे, वाद हे घडू नये.

10 शक्य तितके शांततेत, प्रसन्नतेत, अन्नपाण्याला महत्त्व देत खावे-प्यावे.

जेवणा आधी एक श्लोक म्हटला जातो --

जेवणाच्या वेळेची प्रार्थना

वदनि कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे ।

सहज हवन होते नाम घेता फुकाचे ।

जिवन करि जिवित्वा अन्न हे पूर्णब्रह्म ।

उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ।।

जय जय रघुवीर समर्थ

‘ नाम घ्या श्री हरीचे ‘ या ऐवजी ‘ नाम घ्या कार्ल मार्क्सचे ‘ असेही चालेल. यात आणखीही हवे ते बदल करून घ्यावे. त्यातला मथितार्थ लक्षात घ्यावा. मुद्दा तो नाही.

असे संकट आले तर तोंडचे पाणी पळते, हे लक्षात घ्यावे. याबाबत कुणाकडे आणखी काही उपयुक्त माहिती असेल तर ती सर्वांसाठी इथे कोमेन्टमध्ये द्यावी, ही विनंती.

--- 000 ---

' खुल्लम खुल्ला ' हा एकांकिका संग्रह तयार आहे.

लौकरच याच्या प्रती माझ्याकडे येतील.

यात एकूण 12 एकांकिका आहेत.

या पुस्तकाची किंमत रु.400=00 असून

सवलतीची किंमत रु.300=00 ( पोसटेजसह ) आहे.

हे पुस्तक मागावण्यासाठी ---

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

मराठीतला हा एक वेगळा एकांकिका संग्रह ठरावा.

आज -- कोल्हापुरात -- काफ्काची जगन्मान्य कादंबरी -- नाट्यरूपात रंगमंचावर ! -- शक्य असेल त्यांनी जरूर बघा ---- ट्रायल.

परवा २०-१२-२३ ला कोल्हापुरात सादर झाले -- ' ट्रायल ' –

ट्रायल – परीक्षणांवरच्या दोन पोस्ट.

आज रात्री ९-३० वाजता, भरत नाट्यमंदिर, पुणे इथे, माझे नाटक

-- ' ढोलताशे '

मराठी पाट्या, मराठी विद्यापीठ आणि मराठी पंतप्रधान -- एवढे तरी व्हायलाच हवे ! आणि हो, ते अभिजात मराठी एक !

चंद्रकांत कल्लोळी
हा माझा मित्र आणि मी, आम्ही ‘ प्रत्यय ‘ वाले ! कोल्हापूरचा एक नाट्यमंच ! १९७६ ते ७९ या काळात आम्ही एकत्र होतो. अनेकदा भेटीगाठी होत.  माझ्या, ‘ एक गगनभेदी किंचाळी ‘ या नाटकात त्याने मोरेकाका या एका ज्येष्ठ चाळकऱ्याची भूमिका केली होती. शक्य तो भांडण नको, एकोपा राहावा अशा वृत्तीचे हे एक सगळ्यांच्या डोक्यांवर वरदहस्त ठेवणारे पात्र होते. ते त्याने अप्रतिम वठवले होते. “ विचार केला पाहिजे यावर ! “ या संवादात कुठे आहे विनोद ? पण ते तो असे म्हणे की दिलखुलास हसू यावे !
एक चांगला नाट्यसमूह म्हणून आमची जरा प्रसिद्धी होती. त्यामुळे काही नाटककार आमच्याकडे त्यांची नाटके वाचून दाखवत. असेच एक भावोत्कट, अतिनाट्य एका लेखकाने वाचले होते. त्यात मधून मधून अत्यंत कृतक म्हणावेत असे नाट्यमय संवाद होते. तसा संवाद आला की हा आमचा मित्र, स्वत:च्या डोक्यावरचे केस पुढे ओढून, त्याच्या चष्म्यातून, चकितपणे त्या लेखकाकडे पाहात असे ! ही त्याची कृती माझ्या तरी डोक्यात अमर झालेली आहे ! ( निदान मी असेपर्यंत तरी ! ) पण असे प्रकार न हसता, गंभीरपणे पचवण्याची कला आम्हा सर्वांनाच अवगत होती !
कुणालाही माहीत असण्याची शक्यता नाही अशी त्याची एक आठवण सांगतो. मी सेंट्रल बँक ऑफ इंडियात आणि तो बँक ऑफ इंडियात होता.  त्याच्या बँकेकडून मागणी झालेला एक चेक आमच्या बँकेकडून पेमेंट झाला होता. आणि तो चेक आमच्या संबंधित खातेदाराकडून ‘ स्टॉप पेमेंट ‘ म्हणजे ‘ हा माझा चेक पास करू नये ‘ अशी सूचना दिलेला होता. माझ्या एका सहकाऱ्याकडून तो चुकून पास झाला होता ! ते पाहून तो संबंधित खातेदार ओरडत होता. माझ्या एकदोन सहकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होण्याचा धोका होता ! या माझ्या मित्राची शाखा जवळच होती. मी जाऊन त्याला गाठले. ते पेमेंट अजून पुढे गेलेले नाही याची खात्री करून घेतली. त्या वेळी या माझ्या मित्राने पूर्ण सहकार्य देऊन तो चेक परत घेणे आणि आमच्या बँकेचे पैसे परत देणे हे काम करून माझ्या सहकाऱ्यांवरचे संकट टाळले होते ! त्याच्या ऑफिसातल्या अनेकांनी त्याच्या सांगण्यावरून हे काम करणे ही एक विशेष बाब होती ! गेली काही वर्षे आमचा फारसा संपर्क नव्हता. फेसबुकवर अनेकदा त्याच्या कलात्मक फोटोग्राफीचे मात्र दर्शन होत होते. खरोखर छान, दिलखुलास मित्र ! त्याच्या स्मृतीस मनापासून अभिवादन !
--- ooo ---

आदरणीय प्रिय पै. मोहंमद रफी यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले आहे, असे वाचनात आले. त्या निमित्ताने, त्यांनी गायलेले माझे हे एक आवडते गाणे --- साथी ना कोई मंजिल –

या पुस्तकाच्या प्रती आलेल्या असून आता हे पुस्तक विक्रीस उपलब्ध आहे --

हे पुस्तक मागावण्यासाठी माहिती --

मूळ किंमत रु.४००=००

सवलतीची किंमत रु.३००=०० ( पोस्टेजसह )

रक्कम पाठवण्यासाठी --

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

या पुस्तकात १२ एकांकिका असून पाने २६७ आहेत.

या महाग्रेट कवीला हार्दिक वंदन ! --- २७ डिसेंबर १८६९ – गालिबचा जन्मदिन.

अग्रलेखाचे विचारप्रवर्तक शीर्षक --

' कुठे आहे विचारसरणी ? '

पुणे सकाळ दि. ३०-१२-२३.

'चार पुरुषार्थांची चार नाटके ' हे पुस्तक लेखक / नाटककार चं .प्र .देशपांडे यांच्या अनुक्रमे धर्म (ढोलताशे ) , अर्थ (इराक ) , काम (बुद्धी बळ आणि झब्बू ) , मोक्ष (जणू काही वास्तव ) या थीम्स वर बेतलेली नाटके आहेत . 'ढोलताशे' व 'जणू काही वास्तव' चा आत्मा फिलॉसॉफिकल आहे परंतु ते सादर होताना पात्रांमधील चर्चा रंजक होतील असं पाहिलं आहे . पण मुळात कथेचा आशय हा गहन तत्वज्ञानावर आधारित असल्याने विनोदी नाटकातील नव-याची वारंवार होणारी फजिती वगैरेंच्या स्वरूपाचे ठराविक संवाद मिळणार नाहीत . वरती रंजक म्हटलंय म्हणजे जे काही ह्युमर आहे ते नैसर्गिक ,आणि काळाला धरून आहे आहे . पुस्तकाच्या २९५-२९६ या दोन पानांवरील (नाटक : 'जणू काही वास्तव') कॅरॅक्टर नम्रता च्या तोंडी जे संवाद दिले आहेत ते वाचून मला चं.प्र यांच्या पायावर डोकं ठेवावे असेच वाटले . मानसशास्त्र ,शरीरशास्त्र , अध्यात्म , योग या सर्वाचं त्यांनी केलेलं इंटिग्रेशन हे अफलातून आहे . हे दोन चांगले मोठे पॅराग्राफ आहेत . यात सर्व गुंता त्यांनी समर्थपणे उलगडून दाखवला आहे . This is worth a read !

या उलट इराक (थीम 'अर्थ' ) आणि , बुद्धी बळ आणि झब्बू (थीम 'काम' ) हि दोन नाटक टोकाची मटेरियलिस्टिक आहेत . 'बुद्धीबळ आणि झब्बू' मध्ये स्त्री पुरुष एकमेकांना आकर्षित करण्याकरिता कसे हळूहळू अड्वान्समेंट करीत असतात हे वाचाल तर हाच तो 'ढोलताशे' वा 'जणू काही वास्तव ' चा लेखक असेल हे पटतच नाही. इथे चं.प्र.

'छोटी सी बात' मधील कर्नल ज्युलियस नागेंद्रनाथ विल्फ्रेड सिंग जास्त वाटतात . झुडुपा आडून किंवा मॉल मधील फूड पार्क मध्ये गुपचूप कॅमेरे लावून त्यांनी प्रियंकारांत चाललेले संभाषण  रेकॉर्ड वगैरे करून संवाद लिहिलेत कि काय देव जाणे .एकूणच सांप्रत काळात नात्यांमधील वाढत चाललेलं dis-satisfaction काय रूप घेतंय हे यात छान पाहायला मिळेल . 'इराक ' हे पूर्णपणे राजकारण बेस्ड आहे . आणि अफाट आहे .

चं .प्र सारख्या अत्यंत प्रगल्भ ,विद्वान आणि व्यासंगी व्यक्तीची या माध्यमातून वेगळी ओळख झाली , पुस्तक रुपी आशीर्वाद मिळाला त्याबद्दल आनंदी आहे . – प्रसन्न जोशी.

३०/३१-१२-२०२३.